MAMAR 1.5

# एम. ए. (मराठी)
# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार
# सुधारित अभ्यासक्रम
## सत्र - I

# दलित साहित्य
# (DALIT LITERATURE)

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.



**प्रकल्प समन्वयक** : **अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक, कला व मानव्यविद्या शाखा प्रमुख,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. मनिषा बनकर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र
(सी. डी. ओ. ई), मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**लेखक** :

: **प्रा. डॉ. सारीपुत्र अजिनाथ तुपेरे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर - ४१३००१.

: **प्रा. मनिषा बनकर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र
(सी. डी. ओ. ई), मुंबई विद्यापीठ,
मुंबई - ४०००९८.

: **डॉ. सीमा मुसळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र
(सी. डी. ओ. ई), मुंबई विद्यापीठ,
मुंबई - ४०००९८.

: **प्रा. अनुप्रिया खोब्रागडे**
लक्ष्मण देवराम सोनावणे महाविद्यालय,
दुर्गाडी किल्ला, कल्याण पश्चिम,
कल्याण - ४२१३०२.

: **डॉ. सुनिल अभिमान अवचार**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
रानडे भवन, विद्यानगरी, कलिना,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

: **डॉ. अंजली म्हस्करन्स**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
एस. आर. करंदीकर महाविद्यालय, डहाणू,
ता. डहाणू, जि. पालघर - ४०१६०२.

: **प्रा. हरेंद्र सोष्टे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
गोवेली, ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१३०१.

: **प्रा. डॉ. विवेक कुडू**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
सोनपत दांडेकर महाविद्यालय, खारेकुरान रोड,
पालघर, जि. ठाणे - ४०१४०४.

: **प्रा. डॉ. बाळासो सुतार**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर,
शाहूवाडी, जि. कोल्हापूर - ४१५१०१.



**जुलै २०२४, प्रथम मुद्रण, ISBN NO - 978-81-972744-5-9**

**प्रकाशक**
संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १अ | दलित चळवळ : पार्श्वभूमी | १ |
| १आ | आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी चळवळी (सत्यशोधक चळवळ, स्त्री चळवळ, दलित पँथर चळवळ, युक्रांद चळवळ) | २८ |
| १इ | दलित साहित्याची पूर्वपीठिका | ४१ |
| २अ | दलित साहित्य: स्वरूप व संकल्पना | ५४ |
| २आ | दलित साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन | ७० |
| २इ | दलित साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संघर्ष | ८४ |
| ३अ | दलित साहित्याने हाताळलेले साहित्य प्रकार | ९६ |
| ३आ | दलित साहित्याची भाषा | १३७ |
| ३इ | दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र (स्थूल परिचय) | १५१ |
| ४अ | कविता आणि आत्मकथने : तात्विक विचार | १६५ |
| ४आ | कोंडवाडा - दया पवार | १७४ |
| ४इ | ‘जग बदल घालुनी घाव’ - एकनाथ आवाड | १९० |


*****

**Format of syllabus**

**Progamme Name : M.A. Marathi** **Course Name : दलित साहित्य**

Dalit Literature

**Course code** : 50511

**Total Credits : 0**4 **Total Mark :**100

**University assessment :** 50 **College assessment :** 50

**Course Objective**

१) दलित साहित्याच्या निर्मिती आणि प्रेरणांचा शोध घेणे.

२) दलित साहित्यातील वेदना, विद्रोह आणि नकार या तत्वांचा शोध घेऊन दलित साहित्य आणि दलित जाणीव यांचा अभ्यास करणे.

३) आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर दलित चळवळीचा साहित्याशी असलेला अनुबंध शोधणे.

४) दलित साहित्याच्या साहित्यकृतीतून दलित साहित्याचे सौंदर्यतत्त्व शोधणे.

**Course Outcome**

१) दलित साहित्याच्या फुले आंबेडकरी विचारांचे प्रेरणा तत्त्व लक्षात येईल.

२) दलित साहित्यातील वेदना, विद्रोह आणि नकार या तत्वांच्या बरोबरच दलित जाणिवेचे वेगळेपण ज्ञात होईल.

३) दलित साहित्याचा दलित चळवळीशी असलेला अनुबंध परिचित होईल.

४) नेमलेल्या दलित साहित्यकृतीतून दलित साहित्याच्या सौंदर्यमूल्यांचे आकलन होईल.

MODULE 1 : (श्रेयांकने २, व्याख्याने ३०)

घटक १

अ) दलित चळवळ : पार्श्वभूमी.

आ) आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी चळवळी.(सत्यशोधक चळवळ, स्त्री चळवळ, दलित पँथर चळवळ, यूक्रांद)

इ) दलित साहित्याची पूर्वपिठीका.

घटक २

अ) दलित साहित्य : स्वरूप व संकल्पना.

आ) दलित साहित्य : प्रेरणा व प्रयोजन.

इ) दलित साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संघर्ष.

**MIDULE II**(श्रेयांकने २, व्याख्याने ३०)

घटक ३

अ) दलित साहित्याने हाताळलेले साहित्यप्रकार (कविता आणि आत्मकथनाच्या अनुषंगाने)

आ) दलित साहित्याची भाषा.

इ) दलित साहित्याचे सौदर्यशास्त्र (स्थूल परिचय )

घटक ४

अ) कविता आणि आत्मकथने : तात्विक विचार.

आ) कोंडवाडा – दया पवार.

इ) जग बदल घालून घाव – एकनाथ आव्हाड.

**परीक्षा पद्धती :**

अ) अंतर्गत परीक्षा - एकूण गुण ५0

१) २०-२० गुणांसाठी दोन अंतर्गत परीक्षा

२) उपस्थिती, सादरीकरण आणि उपक्रमांमधील सहभाग : १० गुण

आ) सत्रान्त परीक्षा-एकूण गुण ५०

१) घटक १ व २ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.

२) घटक ३ व ४ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.

३) घटक १, २, ३ व ४ यावर आधारित पर्यायासह २० गुणांसाठी चार (आठपैकी चार)टीपा.

**संदर्भग्रंथसूची**


१) आंबेडकर, डॉ. बाबासाहेब ; अस्पृश्य मूळचे कोण ? (The Untouchables), (अनु.) कांबळे, बी . सी.

२) आंबेडकर , डॉ . बाबासाहेब ; जातिभेद निर्मूलन, (अनु. ) गांजरे, मा. फ. प्रज्ञा प्रकाशनमंडळ, नागपूर ,१९७०

३) आंबेडकर, डॉ. बाबासाहेब, शूद्र मूळचे कोण होते ? (अनु) खैरमोडे, चां. भ. ठक्करआणिक. लि., मुंबई १९४६

४) कऱ्हाडे, सदा , दलित साहित्य चिकित्सा , स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद २००१

५) कुलकर्णी, गो. म. (संपा.): दलित साहित्य : प्रवाह व प्रतिक्रिया, प्रतिमा प्रकाशन, पुणे१९८६

६) खरात, शंकरराव ; दलित वाड्.मय प्रेरणा आणि प्रवृत्ती, इनामदार प्रकाशन, पुणे, १९७८

७) जाधव , रा. ग. निळी पहाट , प्राज्ञपाठशाळा मंडळ , वाई , १९७८.

८) डांगळे, अर्जुन (संपा.); दलित साहित्य : एक चिंतन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ, मुंबई, १९७८

९) निंबाळकर, वामन (संपा): सामाजिक क्रांतीची दिशा, (प्राचार्य म. भ. चिटणीस समग्र वाड्.मय) , प्रबोधन प्रकाशन, नागपूर, २००७ ,

१०) पाटील, म. सु., दलित कविता , लोकवाड्.मय गृह मुंबई १९९८१.

११) पानतावणे, गंगाधर, दलित साहित्य : चर्चा आणि चिंतन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३,

१२) फडके, भालचंद्र, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७० (प्र.आ.) १९८९ (दु.आ.).

१३) बागूल, बाबूराव ; दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान, बुद्धिस्ट पब्लिक हाऊस, नागपूर, १९८१.

१४) भगत, दत्ता, निळी वाटचाल , प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००१.

१५) मनोहर, यशवंत, दलित साहित्य: सिद्धांत आणि स्वरूप, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९७८

१६) माटे, श्री. म. अस्पृष्टांचा प्रश्न, दाते प्रकाशन, पुणे, १९३३.

१७) मेश्राम, केशव (संपा.) ; विद्रोही कविता, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८ (प्र. आ.), १९९४ ( तृ. आ.).

१८) मेश्राम, केशव व इतर (संपा) ; दलित साहित्याची स्थितिगती, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि अनुभव पब्लिकेशन्स, मुंबई, १९९७,
१९) मेश्राम, योगेन्द्र; दलित साहित्य-उद्गम आणि विकास, मंगेश प्रकाशन,नागपूर, १९९८.
२०) रेगे, शां. श.; भीमपर्व, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९१.
२१) लिंबाळे, शरणकुमार (संपा.); शतकातील दलित विचार, दिलीपराज प्रकाशन,
२२) लिंबाळे, शरणकुमार (संपा.) ;प्रज्ञासूर्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९९९.
२३) वानखेडे, म. ना. ; दलितांचे विद्रोही वाङ्.मय, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९८१.
२४) डोळस, अविनाश आंबेडकरी विचार आणि साहित्य, साकेत प्रकाशन, पुणे, २००१.
२५) नीळकंठ, शेरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङ्.मय , सुविद्या प्रकाशन, पुणे, २००५.
२६) गरुड, श्यामल; दलित स्त्रीआत्मकथने, यशश्री प्रकाशन, पुणे २०१०.
२७) Ambedkar, Babasaheb; Annihilation of Caste, New Book Company, Bombay, 1936.

# १अ

## दलित चळवळ : पार्श्वभूमी

**घटक रचना**

१.१ उद्देश

१.२ प्रस्तावना

१.३ दलित समाजवास्तव

१.३.१ वर्णव्यवस्था

१.३.२ जातिव्यवस्था

१.३.३ अस्पृश्यता

१.३.४ जातिमीमांसा

१.४ दलित चळवळीचे आद्यपर्व

१.४.१ आद्य दलित सुधारक गोपाळबाबा वलंगकर

१.४.२ 'सोमवंशी मित्र' कार शिवराम जानबा कांबळे

१.४.३ 'अंत्यज समाज' नायक किसन फागोजी बंदसोडे

१.४.४ 'बहिष्कृत भारत' कार गणेश अक्काजी गवई

१.५ दलित चळवळीचे क्रांतिपर्व

१.५.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदय

१.५.२ डॉ. आंबेडकर यांचे लेखन

१.५.३ डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळी

१.५.४ डॉ. आंबेडकरांच्या राजकीय चळवळी

१.५.५ डॉ. आंबेडकरांची धम्मक्रांती

१.५.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण

१.६ दलित चळवळीचे आंबेडकरोत्तरपर्व

१.६.१ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

१.६.२ पँथर चळवळ

१.६.३ नामांतर लढा

१.६.४ रिडल्स आंदोलन

१.६.५ खैरलांजी लढा

१.७ समारोप

१.८ संदर्भ ग्रंथ

१.९ पूरक वाचन

१.१० प्रश्नावली

## १.१ उद्देश

- दलित चळवळीच्या उदयामागील पार्श्वभूमी लक्षात घेणे.
- दलित चळवळीच्या प्रेरणा समजून घेणे.
- दलित चळवळीची भूमिका विचारात घेणे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दलित चळवळीमागील मूळ प्रेरणा समजून घेणे.
- दलित चळवळीचे योगदान लक्षात घेणे.

## १.२ प्रस्तावना

'दलित साहित्य' हा मराठी भाषा आणि साहित्यातील एक क्रांतदर्शी वाङ्मयीन प्रवाह आहे. आज त्याचा परीघ केवळ मराठीच नव्हे, तर भारतीय भाषांमध्ये विस्तारला आहे. किंबहुना जागतिक स्तरावरील साहित्यव्यवहारात त्याची स्वतंत्र ओळख निर्माण झालेली आहे. सामान्यत: १९६० नंतर दलित साहित्यप्रवाहाची निर्मिती झाली असली, तरी या निर्मितीला हजारो वर्षांची परंपरा आहे. भारतीय समाज, संस्कृतीचे मोठे अवकाश त्याला कारक ठरलेले आहे. यामध्ये सामाजिक, धार्मिक, राजकीय चळवळीची पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. विशेषत: विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने मिळालेली उर्जस्वी प्रेरणा, त्यांचे क्रांतिकारी विचार, कार्य आणि तत्त्वज्ञान याचा ऐतिहासिक स्वरूपाचा वारसा त्यात महत्त्वाचा आहे. या सर्व चळवळीच्या तात्त्विक बैठकीतून दलित साहित्य उदयास आले. विद्रोह, विज्ञान आणि विश्वासात्मकता या त्रिमूल्यांची बैठक घेऊन त्याचा विकास झाला. मराठीच्या वाङ्मयीन परिप्रेक्ष्यात दलित साहित्याने क्रांतीविज्ञान घडविले. हे सूर्यसत्य कोणीही नाकारू शकणार नाही. दलित साहित्याच्या या सर्व जडणघडणीच्या मागे चळवळीचा प्रदीर्घ वारसा असून तो सर्वप्रथम समजून घेणे अगत्याचे आहे. म्हणून प्रस्तुत घटक चर्चेत आपण दलित चळवळीची पार्श्वभूमी विस्ताराने लक्षात घेणार आहोत.

## १.३ दलित समाजवास्तव

दलित साहित्य हा एक सामाजिक आविष्कार आहे. हजारो वर्षे दडपलेल्या शोषित, वंचित दलित समुहांनी आपल्या जगण्याला या लेखनातून मुखर केले. त्यामुळे दलित साहित्याची निर्मिती ही सामाजिक वास्तवातून झालेली आहे. तिला भारतातील प्राचीन काळापासून चालत आलेली धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत आहे. या विधानाचे संदर्भ आपल्याला सर्वप्रथम विचारात घ्यावे लागतील. मानवी समाजव्यवस्थेचा इतिहास सांगतो की, माणूस भटकंती करत जगत होता. पुढे तो गुहांमध्ये स्थिरावला. तो समुहाने राहू लागला. पुढे वर्ग अस्तित्वात आले. यातूनच एक समाजरचना निर्माण झाली. भारतीय परिप्रेक्ष्यात समाजव्यस्थेची रचना ही वर्गापेक्षा वर्णाधिष्ठित आहे. इथे धर्माचे प्राबल्य असून त्याआधारेच समाजजीवन चालू असते. या समाजव्यवस्थेतील विविध आंतर्विरोधातूनच दलित समाजवास्तव उभे राहिले. याचा विचार पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

### १.३.१ वर्णव्यवस्था :

भारतीय समाजरचना ही वर्णाधिष्ठित आहे. त्यामध्ये ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय आणि शूद्र यांचा समावेश केला जातो. वास्तविक ही सर्व रचना हिंदू धर्मव्यवस्थेतील वेदांवर आधारित आहे. ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात विराट पुरुषांच्या कल्पनेतून त्याची रचना करण्यात आलेली आहे. या रचनेला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. तरीसुध्दा या विचाराचे प्राबल्य हिंदू समाजामध्ये मोठया प्रमाणात आहे. ब्राह्मण या वर्णाला पारंपरिक रचनेतून श्रेष्ठ दर्जा दिला गेला. कारण ही वर्णव्यवस्था त्यांनीच बनवलेली आहे. याविषयी अभ्यासकांनी नोंदविलेली मते महत्त्वाची आहेत. त्यांच्या मते, आर्य हे भारतात परदेशातून आले. गंगा नदीच्या खो-यात असलेल्या एतदेशीय लोकांवर त्यांनी आक्रमण करून त्यांना पराभूत केले. आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनीच पुढे वैदिक संस्कृती निर्माण केली. वर्णव्यस्थेची मांडणी केली. ब्राह्मण हे आर्य लोकांचेच वारस आहेत. असे अभ्यासकांनी म्हटलेले आहे. प्राचीन समाजरचना ही फक्त द्वैवर्णीय होती. त्यामध्ये ब्राह्मण आणि वैश्य यांचा समावेश होता. ब्राह्मणांप्रमाणेच वैश्यांनी आपली वेगळी संरचना तयार केली. शूद्र हा तिसरा वर्ण पुढे निर्माण केला गेला. शूद्रातूनच अतिशूद्र हा चौथा वर्ण उदयास आला.

दलित साहित्य या वर्णाश्रम व्यवस्थेला नकार देते. कारण या उतरंडीमुळे दलितांचे शोषण झाले. त्याला सामाजिक गुलामगिरीला सामोरे जावे लागले. दलित साहित्याचा हा विरोध बुध्दिनिष्ठ जडवादी तत्त्वज्ञानाच्या पूर्वपरंपरेतून आलेला आहे. भारतातील चैतन्यवादी आणि जडवादी विचारलढयाविषयी डॉ. योगेंद्र मेश्राम यांनी मार्मिक भाष्य केले आहे. भारतातील सामाजिक, धार्मिक वास्तवाविषयी ते लिहितात, ब्राह्मणी वर्णाश्रम धर्म आणि धर्मप्रणीत चातुर्वर्ण्य व्यवस्था ही अव्यवहार्य नाही, तर ती पूर्वीही निरुपयोगी होती, असे इतर बुध्दिनिष्ठ जडवादी दर्शने ही सांगतात. तेव्हा आजच्या काळात पुन्हा तीच व्यवस्था चालविणे अत्यंत गैरवाजवी व समाजविघातक गोष्ट आहे. चार वर्ण हे ब्रह्मसूत्र धर्मशास्त्रकारांनी केवळ सामाजिक निर्बंध्दाच्या सोईस्कर निर्मितीसाठी कल्पिलेले आहेत. त्यांची रचना पुरोहिती वर्चस्व कसे राखता येईल. या एकाच उद्देशाने प्रेरित झालेली आहेत. स्टॅलीनने म्हटले आहे की, व्यवहाराशिवाय तत्त्वज्ञान वांझ आहे. आणि तत्त्वज्ञानाशिवाय व्यवहार आंधळा आहे. सामाजिक व्यवहार सुकर होण्यासाठी तशाच सौकर्यदायी तत्त्वज्ञानाची प्रेरणा हवी असते. पण काही वर्गाच्या वर्चस्वासाठी बहुजन समाजावर चातुर्वर्ण्याचे सोयिस्कर निर्बंध लादण्यास सांगणारे तत्त्वज्ञान व्यवहारोपयोगी तर नाहीच पण साफ आंधळे आहे, असेच म्हणावे लागेल. चातुर्वर्ण्य वेदप्रणित आहे आणि म्हणून ते मान्य केले पाहिजे येथवर ठिक, पण प्राणीमात्राचा आत्मा एकच आहे, तर मग प्रत्यक्ष जीवनात एवढी भयानक आणि क्रूर विषमता का? चातुर्वर्ण्य मान्य आहे पण त्याला असह्य आणि अमानुष भेदभावाची ही कठोर धार कशाला हा रास्त प्रश्न आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. हिंदूधर्म रक्षकांना वेदांची आणि ब्रह्मदेवाची गरज होती ती चातुर्वर्ण्याच्या रक्षणासाठी गौतमबुध्दाने हे सारे जाणिले होते. म्हणूनच आपल्या इहवादी तत्त्वदर्शनात ईश्वराला जागाच ठेवली नाही. त्यांनी चातुर्वर्ण्यालाही मुळातून नाकारले. *(दलित साहित्य: उद्गम आणि विकास, पृ. १३ ते १४)* दलित साहित्यात आलेले वास्तव हे समाजातील ही वर्णव्यवस्था नाकारणारे असून त्याला तात्त्विक अधिष्ठान आहे. हे वरील सर्व विवेचनातून आपल्या लक्षात येते.

## १.३.२ जातिव्यवस्था :

दलित साहित्य हे भारतीय जातवास्तवाचे आविष्करण करते. ज्याप्रमाणे वर्णव्यवस्था ही धर्मरक्षकांची उपज होती, त्याचप्रमाणे जातीची उत्त्पत्ती ही इथल्या पारंपरिक धर्माची निर्मिती आहे. जातिसंस्थेच्या उदयासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भारतातील जाती, त्यांची उत्त्पत्ती आणि विकास या पहिल्याच संशोधनपर ग्रंथात वस्तुनिष्ठ मांडणी केलेली आहे. तसेच वैचारिक लेखनात जातिव्यवस्थेविषयी विविध मान्यवरांनी सुध्दा महत्त्वाची मते मांडलेली आहेत. या सर्व मतांचा विश्लेषणात्मक आढावा डॉ. योगेंद्र् मेश्राम यांनी आपल्या ग्रंथात घेतलेला आहे. ते लिहितात, चातुर्वर्ण्य समाजरचनेप्रमाणेच भारतीय संस्कृतीचे एक प्रमुख वैशिष्ट्य इथली जातिसंस्था व जातिव्यवस्था होय. ही जातिव्यवस्था केव्हा व कशी अस्तित्वात आली. याबाबत विचारवंतात एकमत नाही. कोण म्हणते की जन्मावरून जात पडली, कोणी तिला कर्मावरून आल्याचे म्हटले. कोणी धंदा तर कुणी वंशशुध्दत्वाच्या भावनेतून जन्मास आल्याचे म्हटले आहे. शेवटी जातीचा उगम चातुर्वर्ण्य व्यवस्थेत आहे. याबाबतीत सर्व शास्त्रज्ञ व विचारवंतामध्ये मतैक्य आहे. (दलित साहित्य: उद्गम आणि विकास, पृ. २९) जातिव्यवस्था ही धार्मिक आधारावर उभी केलेली व्यवस्था असून दलितांच्या शोषणाची ती रीती आहे. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी परखड मत नोंदविले आहे. ते लिहितात, जातिसंस्थेने हिंदू समाजाचा तोंडवळाच कुरूप करून टाकला आहे. जातिसंस्था ही चातुर्वर्ण्याने निर्माण केलेली असमानतेची व तिरस्काराची उतरंड आहे. तो हिंदूंच्या सामाजिक जीवनाचा निर्बंध बनली आहे. जातिभेदामुळे सामाजिक जीवनात तट पडले आहेत. जातीजातीत मत्सर, व्देष आणि शत्रूत्व निर्माण झाले आहे. जातिसंस्थेने सार्वजनिक हितबुध्दीच नष्ट केली. मने संकुचित केली. समाजाला नीतिभ्रष्ट नि दुबळे करून ठेवले. जात ही एक भावना आहे. ती एक मनाची अवस्था आहे. ती टाकणे म्हणजे भावनात्मक बदल घडून आणणे. पण असा बदल धर्म होऊ देत नाही. रूढी आड येते. शास्त्र तिला आधार देते. म्हणून धर्मशास्त्रे ही खरी मानवाची शत्रू आहेत. शास्त्रांनी हिंदूंची मानसिक गुलामी मजबूत केली आहे. *(दलित साहित्य: उद्गम आणि विकास, पृ. ३१)* जातिव्यवस्था ही भारतीय समाजाचे एक वास्तव आहे. दलित साहित्याचा लढा याच जातवास्तवाशी असून दलित लेखकांनी सातत्याने भारतीय समाजातील चातुर्वर्ण्य आणि जातिव्यवस्थेवर प्रहार केलेले आहेत.

## १.३.३ अस्पृश्यता :

दलित साहित्यात आलेले समाजवास्तव वर्ण, जातव्यवस्थेशी बांधलेले आहे. विशेषत: यातूनच आलेली अस्पृश्यता ही व्यवस्था त्यात प्राधान्याने चित्रित झालेली आहे. अस्पृश्यता हा भारतीय समाजातील कलंक आहे. अमानवी मानसिकतेचे प्रतीक आहे. यातूनच गुलामगिरी आणि सामाजिक शोषण करण्यात आले. याची परखड मांडणी दलित साहित्यात येते. या अस्पृश्यतेविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूलगामी संशोधन केले आहे. 'अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले?' या ग्रंथात त्यांनी या अस्पृश्यतेचा ऐतिहासिक शोध घेतला आहे. जो महत्त्वाचा आहे. याविषयी डॉ. योगेंद्र मेश्राम लिहितात, अस्पृश्य वर्ग हिंदू समाजातील हया दैनंदिन जीवनामुळे सामाजिकदृष्ट्या समाजात हीन ठरला, आर्थिकदृष्ट्या दरिद्री-गुलाम झाला, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या प्रगतीची संधीच त्याला कधी लाभली नाही. शिक्षण आणि संस्कृतीची दारे बंद झाली.

त्यामुळे त्याच्या जीवनात जिवंतपणाच राहिली नाही. त्याच्यात स्वाभिमान, महत्त्वाकांक्षाच उरली नाही. दलित म्ह्णून ते कायमचे दुदैवी ठरले. त्यांच्या नशिबी आजन्म अपमानित, पराभूत, अन्याय्य जीवन जगणे आले. शूद्र कीटकांप्रमाणे गलिच्छपणात जगण्याची व दु:ख, दारिद्रयात पिचत मरण्याची शतकानुशतके त्यांच्यावर सक्ती झाली *(दलित साहित्य : उद्गम आणि विकास, पृ. ३५-३६)* आणि हे सर्व तथाकथित सामाजिक धारणेच्या व धार्मिकतेच्या नावाखाली घडले, हे विशेष.

अस्पृश्य समाजाला वर्णबाहयच नव्हे, तर जन्माचे जातिबहिष्कृत व अपवित्र ठरवून त्याला गावाच्या बाहेर राहण्यास आणि निकृष्ट असे जीवन जगण्यास वर्ण जातीव्यवस्थेनेच भाग पाडले आहे. भारतातील जाति-जमातीचे पृथकत्व आणि उच्च-नीच भाव हाही मुख्यत: भिन्न अशा पवित्र – अपवित्रतेच्या कल्पनावर आधारलेला आहे. एका जातीची किंवा पोटजातीवर पावित्र्याची कल्पना व अन्य जातीच्या वा पोटजातीच्या पावित्र्याची कल्पना भिन्न असते. जी जात किंवा पोटजात स्वत: उच्च समजते. तिच्या दृष्टीने खालच्या समजलेल्या जातीच्या चालीरीतींना ती अपवित्र समजते. अपावित्र्याचे भय हा जातिभेदाचा व उच्चनीचतेचा गाभा आहे. तिचा आधार केवळ अंधश्रध्दा आहे. आर्थिक व्यवसायांमध्येही उच्च-नीच्च पावित्र्याची कल्पना चातुर्वर्ण्य व्यवस्थेत मुख्य म्ह्णून गृहीत धरली आहे. त्यामुळे असवर्ण विवाह निंद्य किंवा निषिध्द मानला आहे. सामाजिक, वर्गीय पिळवणुकीचे तंत्र मोठया खुबीने या अपवित्रतेच्या भयाखाली निटपणे ब्राह्मणांनी जपून ठेवली आहे. अपवित्र व्यवसाय टाकून अधिक पवित्र व्यवसाय स्वीकारण्यास बंदी घालून असा व्यवसाय बदलने दंडनीय ठरविले. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य नष्ट झाले. त्यामुळे व्यक्तिविकासाचा व सामाजिक परिवर्तनाचा मार्ग कायमचा बंद झाला. *(दलित साहित्य : उद्गम आणि विकास, पृ. ३६)* एकूणच भारतातील समाजव्यवस्थेतील अस्पृश्यतेसाठी रूढी अमानवी होती. कायद्याने यावर निर्बंध लागलेले असले तरी आजही समाजात अशा बहिष्कृततेच्या घटना घडताना दिसतात.

### १.३.४ जातिमीमांसा :

प्राचीन भारतातील वर्ण, जात, अस्पृश्यता या व्यवस्थांमुळे भारतीय समाजात विषमता, भेदाभेद आणि दुरावा निर्माण झाला. ब्रिटीश काळात या सर्व व्यवस्थांमध्ये परिवर्तन होण्यास मदत झाली. अव्वल इंग्रजी कालखंडात भारतात प्रबोधन युग आले. यातून आधुनिक मूल्यांची मांडणी झाली. या काळात अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिविषयक चिंतनास आरंभ झालेला दिसतो. या काळात जातिमीमांसेचे तीन संप्रदाय दिसतात. ते म्हणजे ब्राह्मणी, अब्राह्मणी आणि मार्क्सवादी भारतीय विचारदर्शनातील पारंपरिक संघर्ष, ब्राह्मणीवाद विरुद्ध अब्राह्मणीवाद असा होता. म्हणून महाराष्ट्रातील जातिविषयक विचार करताना हा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. ब्राह्मणी विचारवंतात जातिव्यवस्थेचे समर्थन करणारा एक वर्ग होता. तर हिंदू धर्माचे अस्तित्व अबाधित राहून त्यात सुधारणा व्हावी. अशी धारणा काही विचारवंतांची होती. भारतात सामाजिक परिवर्तन करण्यासाठी पुरोगामी विचारवंतांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी सातत्याने ही हजारो वर्षांची वर्णवादी, जातवादी व्यवस्था मोडीत काढण्यासाठी प्रयत्न केले. आणि आधुनिक समाजनिर्मितीसाठी प्रयत्न केले. त्यामध्ये विविध समाजसुधारक येत असले तरी म. फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य निर्णायक आणि मूलभूत स्वरूपाचे आहे. म.

फुले यांनी एकोणिसाव्या शतकातील समाजाला समतावादी विचारांची दिशा दिली. तृतीयरत्नाच्या माध्यमातून हजारो वर्षांपासून बहुजन समाजावर लादलेल्या ब्राह्मणी गुलामगिरीचे सत्यशोधन केले. आणि सत्यशोधक समाजाची बांधणी केली. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायासाठी आपल्या राजसत्तेचा वापर केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फुले- शाहू महाराजांचा वारसा पुढे घेऊन जात, भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या प्रबुध्द मूल्यांची दिशा दिली. शेवटी भारतीय संविधानाची निर्मिती करून भारत देशातील लोकांना संविधानिक समाज म्हणून उभे राहण्यासाठी निर्णायक केले. याचा परिपाक म्हणजे भारतातील आजचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वास्तव हे संविधानिक मूल्यांवर वाटचाल करत आहे. ही संविधानिकता दलित साहित्याचा गाभा आहे.

## १.४ दलित चळवळीचे आद्यपर्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे आद्य प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या विचार-कार्यातून दलित साहित्याची चळवळ निर्माण झाली. तिला त्यामध्ये तथागत बुद्धांपासून आपल्याला विचार करावा लागतो. निर्णायक रूप प्राप्त झाले. असे असले तरी दलित साहित्याच्या चळवळीचा पट हा आंबेडकरपूर्व, आंबेडकरी आणि आंबेडकरोत्तर काळातील चळवळीशी बांधलेला आहे. विशेषत: या टप्प्यातूनच दलित चळवळ आणि साहित्याची भूमी तयार झालेली आहे. त्यामुळे या तीन टप्प्यावरील चळवळींचा आढावा घेणे अगत्याचे ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवनात तीन गुरू मानले. तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतीराव फुले यांचा त्यामध्ये समावेश होते. बाबासाहेबांची ही भूमिका वैचारिक अधिष्ठानातून आलेली होती. त्यामागे निश्चित असे तात्त्विक अधिष्ठान आणि सामाजिक चळवळीचे भान होते. पूर्वी अगदी प्राचीन काळापासून दलित, शोषित, वंचित समुहांच्या उत्थानाचे प्रयत्न झालेले आहेत. बुध्दाने आपल्या संघात सर्व समूहातील लोकांना प्रवेश दिला. अगदी स्त्री वर्गालाही सामावून घेतले. हजारो वर्षापासून सामाजिक बहिष्कृत असलेला समूह प्रवाहात आला. त्याला अधिकार मिळाले. त्यामुळे तथागत बुद्ध यांनी केलेले सामाजिक उत्थानाचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. पुढे संत कबीर यांनी आपल्या दोह्यातून सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडला. मात्र एकोणिसाव्या शतकात महात्मा फुले यांनी केलेले यासंदर्भातील कार्य अतिशय महत्त्वाचे होते. दलितांना शिक्षण मिळाले तरच त्यांच्यामध्ये बदल होईल. त्यांची गुलामगिरी नष्ट होईल. अशी म. फुल्यांची भूमिका होती. यासाठी त्यांनी कृती कार्यक्रम राबविला. दलितांसाठी, स्त्रीयांसाठी शाळा काढल्या. सावित्रीबाईंना शिक्षण दिले. त्यांना शिक्षक बनविले. या सर्व पार्श्वभूमीवर दलितांच्या चळवळीला गती आली. आंबेडकरपूर्व काळात गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बंदसोडे, गणेश आक्काजी गवई इत्यादी समाजचिंतकांनी आपापल्या परीने दलित चळवळीला सामाजिक उत्थानाच्या दिशेने गतिमान केले. या सर्वांचे कार्य अतिशय मोलाचे असून त्यांचा विचार इथे करणे गरजेचे आहे.

### १.४.१ आद्य दलित सुधारक गोपाळबाबा वलंगकर :

दलित चळवळींच्या इतिहासात गोपाळबाबा वलंगकर यांचा नामोल्लेख आद्य दलित समाजसुधारक, कवी, शाहीर व तळमळीचे कार्यकर्ते म्हणून केला जातो. डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी मार्च १९२७ मध्ये महाड येथे भरलेल्या कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेतील भाषणात गोपाळबाबांच्या कार्याचा गौरवाने उल्लेख केला आहे. गोपाळबाबांचे पूर्ण नाव गोपाळबाबा कृष्णा वलंगकर असे होते. त्यांचा जन्म महाडजवळील 'रावढळ' या गावी झाला. रमाबाई आंबेडकर यांच्या माहेराकडून गोपाळबाबा हे डॉ. आंबेडकरांचे नातलग होते. असे चांगदेव खैरमोडे यांनी म्हटलेले आहे. अस्पृश्यतेचे दाहक अनुभव त्यांनी लहानपणीच पाहिले, अनुभवलेले होते. पुढे त्यांना सैन्यात नोकरी मिळाली. फलटणीतच त्यांनी शिक्षण घेतले. १८८६ साली सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी जात आणि अस्पृश्यता निवारण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी १८८८ मध्ये 'विटाळ विध्वंसन' ही पुस्तिका लिहिली. त्यामध्ये अस्पृश्यता ही समाजाला लागलेला कलंक आहे. ही जातकेंद्री अस्पृश्यता धर्माधिष्ठित मांडली जात असली तरी त्यामागे ब्राह्मणीवर्चस्व आहे. अशी परखड व साधार मांडणी या पुस्तिकेत गोपाळबाबांनी केली. दलित समाजामध्ये प्रारंभीच्या टप्प्यावर जागृती आणि संघटन निर्माण करण्याचे कार्य गोपाळबाबांनी अत्यंत तन्मयतेने केले. विशेषत: ब्रिटिशांनी ज्यावेळी महार, मांग, चांभार या जातीतील सैनिकांना अस्पृश्यतेमुळे सैन्यातून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी गोपाळबाबांनी त्याविरुद्ध सनदशीर मार्गानी लढा उभारला. १८९४ मध्ये त्यांनी एक विनंतीपत्र लिहून याची कैफियत इंग्रज सरकारसमोर मांडली. या पत्राच्या शेवटी त्यांनी १३ कडव्यांची कविता लिहून त्यातून महार समाजाच्या दु:खद स्थितीचे, त्यामागील कारणांचे संदर्भ देवून अस्पृश्यांनी आत्मपरीक्षण करून सन्मानाने जगण्याचा विचार मांडला. गोपाळबाबा वलंगकर यांनी आपल्या लेखनीतून दलित समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. त्याच्या सामाजिक जगण्याचे वास्तव आपल्या ग्रंथातून व स्फूटलेखनातून मांडले. विशेषत: 'दीनबंधू' या मासिकातून त्यांचे लेखन प्रकाशित झाले. त्यांचे गद्य आणि पद्य अशा दोन्ही स्वरूपाचे लेखन प्रसिद्ध असून त्याला सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अतिशय मोलाचे स्थान आहे. अशा दलित चळवळ आणि साहित्याला व्यापक दिशा देणाऱ्या गोपाळबाबा वलंगकरांचे निधन १९०० मध्ये 'रावढळ' येथे झाले. *(अस्मितादर्श वार्षिक विशेषांक २०१२)*

## १.४.२ 'सोमवंशी मित्र' कार शिवराम जानबा कांबळे :

आंबेडकरपूर्व कालखंडात दलित समाजामध्ये परिवर्तनाचा विचार पेरणाऱ्या विचारवंतांमध्ये गोपाळबाबा वलंगकरांच्या नंतर शिवराम जानबा कांबळे यांचा नामोल्लेख करावा लागतो. त्यांचा जन्म १८७५ मध्ये पुणे येथे झाला. वास्तविक त्यांचे वडील मूळचे भांबुर्डे गावचे वतनदान महार होते. मात्र त्यानंतर जानबा हे गावकी बंद करून पुणे येथे येऊन नोकरी करू लागले. शिवरामला शिक्षणाची आवड असल्यामुळे त्याला शिकविले. जातीयतेचे चटके त्यांना लहानपणीच भोगावे लागले. शिवराम जानबा कांबळे यांच्यावर म. फुले यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. मराठा, दीनबंधू या वृत्तपत्रांमधून येणारे लेखन ते वाचत होते. यातूनच प्रेरणा घेऊन त्यांनी दलित समाजाच्या उत्थानासाठी कार्य करण्यास सुरूवात केली. १९०३ मध्ये पुरंदर तालुक्यातील सासवड येथे एकावन्न गावच्या महार समाजातील प्रतिनिधींची सभा भरविली. दलितांचे प्रश्न शासनदरबारी मांडण्यासाठी अर्ज करण्याचे निश्चित झाले. त्यांनी स्वत: इंग्रजीत अर्ज तयार करून त्यावर १५८८ इतक्या जातीबांधवांच्या सह्या घेतल्या. सरकारला निवेदन दिले. परंतु त्याचा फारसा प्रभाव पडला नाही. तरीसुध्दा कांबळे यांनी नाउमेद न होता आपले सामाजिक कार्य चालू ठेवले. शिवराम

जानबा कांबळे यांनी अस्पृश्योन्नतीचे ध्येय समोर ठेवून सोमवंशीय हितचिंतक मित्र या समाजाची स्थापना केली. आपली भूमिका व समाजाची ध्येयधोरणे लोकांपर्यंत पोहविण्यासाठी 'सोमवंशीय मित्र' या नावाने मासिक काढले. यामधून विविध सामाजिक प्रश्नांवर अतिशय परखड अशी मते त्यांनी मांडली. विशेषत: अस्पृश्यांमधील देवदासीसारख्या प्रथा नष्ट व्हाव्यात. समाजात सुधारणा घडावी. त्यांच्या आचारविचारात परिवर्तन व्हावे यासाठी कांबळे यांनी प्रामाणिकपणे कार्य केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डिप्रेस्ड क्लासेस कमिटीमध्ये काही काळ त्यांनी काम केले. शिवराम जानबा कांबळे यांचे विचार व कार्य अस्पृश्यांमध्ये आत्मस्थितीची जाणीव करून देणारे होते. त्यामध्ये धर्मग्रंथांची चिकित्सा होती. अस्पृश्यांचा अवनतीला हीच धार्मिक व्यवस्था कारणीभूत असल्याचे त्यांनी सातत्याने सांगितले. या देशातील जातीभेद आणि विषमता ही आर्यांच्या आगमनापासून अस्तित्वात आल्याचे त्यांनी प्रतिपादित केलेले आहे. त्यांचे बहुतांश लेखन हे आर्य-अनार्य यांच्यातील संघर्षाची मांडणी करणारे आहेत. या मांडणीत परखड चिकित्सा, ऐतिहासिक मीमांसा आणि प्रबोधनाचा विचार इत्यादी वैशिष्ट्ये आलेली आहेत. *(शिवराम जानबा कांबळे चरित्र ग्रंथ : ह.ना. नवलकर)*

### १.४.३ 'अंत्यज समाज' नायक किसन फागुजी बंदसोडे :

दलित साहित्याच्या चळवळीत किसन फागुजी बंदसोडे यांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८७९ मध्ये नागपूर जवळील मोहपा या गावी झाला. पुढे ते नागपूरला आले. येथील पाचपावली भागात ते राहिले. प्रारंभापासून त्यांनी दलित समाजाच्या उत्थान चळवळीत सहभाग घेतला होता. १९०१ मध्ये त्यांनी स्वत:ची प्रिटिंग प्रेस सुरू केली. मराठा दीनबंधू या नावाचे साप्ताहिक सुरू केले. यामधून दलित समाजातील अन्याय-अत्याचारांवर लेखन करून अस्पृश्यांमध्ये आत्मजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पुढे त्यांनी १९०३ मध्ये सन्मार्ग बोधक अस्पृश्य समाज संस्था स्थापन केली. ज्यामधून त्यांनी अस्पृश्यांच्या जीवनाला विधायक रूप देण्याचा उत्तम कार्य केले. १९०७ मध्ये त्यांनी मुलींसाठी चोखामेळा कन्याशाळा स्थापन केली. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे चालवली. मिल कामगारांचे प्रश्न हाताळले. या प्रश्नांना प्रभावीपणे मांडता यावे म्हणून त्यांनी 'मजदूर पत्रिका' सुरू केली. पुढे 'निराश्रित हिंद नागरिक' (१९१०) 'विटाळ विध्वंसक' (१९१३), 'चोखामेळा' (१९१३) इत्यांदी पत्रके सुरू करून समाजाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. १९१९ मध्ये त्यांनी 'अंत्यज समाज' नावाची संस्था स्थापन केली. यातून समाजातील अंतर्गत दुही मिटविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. १९२० मध्ये नागपूर येथे राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेच्या संयोजन मंडळात अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडली. या परिषदेच्या नंतर त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी नऊ कलमी योजना जाहीर केली. ज्यामध्ये अस्पृश्यांतील पोटजाती मोडणे, रोटी-बेटी व्यवहार करणे, अस्पृश्यांनी स्वावलंबी होण्यासाठी स्वतंत्र उद्योगधंदे निर्माण करणे, शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, बलोपासना करणे, वाचनालये उभारणे, अन्यायाविरुध्द संघटित होणे आणि अस्पृश्यांची एक राजकीय संघटना स्थापित करणे इ. कलमांचा समावेश होतो. या सर्व कलमांचा उद्देश दलित समाजाला सामाजिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे हा होता. हे खूप महत्त्वाचे आहे. किसन फागुजी बंदसोडे यांनी वृत्तपत्रीय क्षेत्रात केलेले कार्य अतुलनीय आहे. विशेषत: त्यांनी लिहिलेल्या कवितांमधून समाजोध्दाराचा उद्गार आविष्कृत झालेला आहे. किसन फागुजी बंदसोडे हे अल्पशिक्षित

असले तरी त्यांनी समाजपरिवर्तनाचा वसा घेऊन केलेले कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. अशा महान समाजचिंतकाचे निधन १० ऑक्टोबर १९४६ रोजी नागपूर येथे झाले. *(अस्मितादर्श वार्षिक विशेषांक* २०१२)

**१.४.४ 'बहिष्कृत भारत' कार गणेश अक्काजी गवई:**

दलित साहित्य चळवळीच्या इतिहासात गणेश आकाजी गवई यांचे कार्य अनन्यसाधारण आहे. त्यांचा कालखंड हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समकालीन होता. मात्र बाबासाहेब सामाजिक जीवनामध्ये सक्रीय होण्याच्या अगोदरपासून गणेश आकाजी गवई हे दलितांच्या सामाजिक चळवळीत आपले मूलभूत योगदान देत होते. १९१०मध्ये अमरावती येथे महार सुधारक मंडळ स्थापन करण्यात आली होती. या सामाजिक संस्थेशी गवई यांचे घनिष्ठ संबंध होते. अस्पृश्य समाजामध्ये जागृती घडवून आणण्यासाठी या संस्थेच्या वतीने विशेष प्रयत्न केले जात होते. त्यामध्ये खेडयापाडयात सभा भरवणे, पोटजातीत विवाह घडवून आणणे, मुला- मुलींना शिक्षण देणे, सरकारपुढे गाऱ्हाणी मांडणे इ. कार्याचा समावेश होतो. १९१४ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत भारत' नावाचे पत्र सुरू केले. या पत्रातून त्यांचे लेखन प्रकाशित झालेले आहे. १९१९ ते १९२३ या काळात मध्य प्रांतात वऱ्हाड कौन्सिलवर गणेश आकाजी गवई यांची सरकारचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती. तेव्हा त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांची मांडणी सरकार दरबारी अतिशय सक्षमपणे केली. विशेषत: अस्पृश्यता हा हिंदूधर्माला लागलेला कलंक आहे. त्याचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षण हाच एक पर्याय आहे. त्यासाठी अस्पृश्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. तसेच आपले पारंपरिक व्यवसाय सोडून द्यायला हवेत. आपल्या हक्कासाठी लढायला हवे, असे विचार त्यांनी मांडले. १९२० नंतर गणेश आकाजी गवई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक लढ्यात सहभाग घेतला. नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेचे नियोजन करण्यामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. तद्पूर्वी ते कोल्हापूरला येऊन राजर्षी शाहू महाराज यांच्याशी भेटले होते. त्यांचा तसा पत्रव्यवहारही झाला होतो. बाबासाहेबांच्या सांगण्यावरूनच त्यांनी विदर्भात अस्पृश्यांच्या चळवळीला निर्णायक दिशा देण्यासाठी सर्वांना संघटित करण्याचा प्रयत्न केला.

आंबेडकरपूर्व दलित चळवळीच्या इतिहासातील वरील आलेख अतिशय महत्त्वाचा आहे. गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागुजी बंदसोडे, गणेश आकाजी गवई आणि इतर दलित लेखक, कवी, विचारवंतांनी केलेले कार्य दलितांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी पुरक ठरले. त्यांनी अस्पृश्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. हिंदू समाजातील अस्पृश्यतेचे विदारक चित्र स्पष्ट केले. सामाजिक गुलामगिरी विरुद्ध समाजाला सजग भान दिले. यातूनच दलितांमध्ये आत्मजाणीव निर्माण झाली. विशेषत: आंबेडकरपूर्व काळात सरकार दरबारी विनंती अर्ज करून ज्या मागण्या केल्या होत्या त्यातून राजकीय जागृतीसुध्दा निर्माण झाली. या सर्व प्रयत्नात प्रांजळपणा होता. हक्काची जाणीव होती. सामंजस्य, नम्रता आणि सामाजिक प्रबोधनाची तळमळ इ. गोष्टी होत्या. परंतु आक्रमकता नव्हती. एकसंघ लढा देण्याची भूमिका आणि नेतृत्व नसल्यामुळे हे सर्व प्रयत्न महत्त्वाचे असले तरी मर्यादित स्वरूपाचे होते. असे असले तरी आंबेडकरपूर्व काळातील वरील कार्याला ऐतिहासिक महत्त्व आहे.

## १.५ दलित चळवळीचे क्रांतिपर्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव कोकणातील आंबावडे, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी हे होते. परंतु वडील रामजी मालोजी संकपाळ हे सैन्यात कार्यरत असल्यामुळे मध्यप्रदेशातील महू येथे असताना माता भिमाबाईच्या पोटी बाबासाहेबांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव भिमराव असे होते. लहानपणापासून भिमराव वडिलांच्या संस्कारात वाढले. त्यांनी  शिक्षण घेतले. सातारा येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. पारंपरिक समाजव्यवस्थेतील अस्पृश्यतेचे अनुभव त्यांनाही भोगावे लागले. परंतु न डगमगता भिमरावांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पुढे परदेशी शिक्षण घेऊन उच्चविद्याविभूषीत पदव्या प्राप्त केल्या. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे. सामाजिक लढयासाठी त्याचा वापर होऊ शकतो. हा विचार केंद्रवर्ती ठेवून बाबासाहेबांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाज परिवर्तनासाठी केला. सामान्यत: १९२० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सामाजिक चळवळीला सुरूवात केली. विविध प्रकारची आंदोलने, सत्याग्रह, निवेदने, ग्रंथलेखन, सामाजिक, राजकीय संघटना स्थापन करून दलितांच्या उत्थानासाठी निर्णायक क्रांतिकारी कार्य केले.

### १.५.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदय :

डॉ. आंबेडकरांनी २७ जानेवारी १९१७ मध्ये ब्रिटीशांनी नेमलेल्या साऊथबरो मतदान कमिटीसमोर सर्वप्रथम अस्पृश्यांच्या न्याय हक्कासाठीची निवेदनाच्या माध्यमातून मांडणी केली. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्यांचे प्रतिनिधी स्वत: अस्पृश्यांनीच निवडलेले असले पाहिजेत. अशी भूमिका मांडली. हा दलितांच्या राजकीय हक्काचा लढा बाबासाहेबांनी सुरू केला होता. त्याला सामाजिक परिवर्तनाचे अधिष्ठान होते. डॉ. आंबेडकरांनी पुढे २० जुलै १९२४ मध्ये सामाजिक जागृतीसाठी बहिष्कृत हितकारिणी सभा नावाची संघटना स्थापन केली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हे या संघटनेचे ब्रीदवाक्य होते. बाबासाहेबांनी या संघटनेच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी मूलभूत प्रयत्न केले. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी सर्वप्रथम सत्याग्रहाचा मार्ग् अवलंबला होता. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे अस्पृश्य समाजाची परिषद घेतली. तेथे चवदार तळे सत्याग्रह केला. यामध्ये हजारो दलित सहभागी झाले होते. म्हणूनच या सत्याग्रहाला समतासंगर असे म्हटले जाते. पुढे त्यांनी १९३० मध्ये नाशिक येथील काळाराम मंदिरात सामुदायिक प्रवेश करण्याची घोषणा केली. २ मार्च १९३० रोजी या सत्याग्रहास सुरूवात झाली. तब्बल पाच वर्षे हा लढा चालूच होता. भाऊराव गायकवाड यांनी त्याचे नेतृत्व केले. दरम्यान ब्रिटीश सरकारने भारताला स्वातंत्र्य देण्याच्या भूमिकेतून भावी राज्यघटनेची चर्चा करण्यासाठी जी परिषद बोलावली होती. तिला गोलमेज परिषद असे म्हणतात. या परिषेदच्या एकूण तीन बैठका संपन्न झाल्या. या तीनही बैठकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले होते. पहिली गोलमेज परिषद नोव्हेंबर १९३० मध्ये लंडन येथे भरली. डॉ. आंबेडकरांनी यामध्ये सहभाग घेऊन दलितांच्या राजकीय अस्तित्वाविषयी मांडणी केली. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ तयार करून त्यांच्या मार्फतच अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडले गेले पाहिजे. अशी जोरदार भूमिका बाबासाहेबांनी मांडली. परंतु राष्ट्रीय काँग्रेसने या परिषदेवरवर बहिष्कार

घातला. त्यामुळे दुसरी परिषद सप्टेंबर १९३१ रोजी बोलावण्यात आली. म. गांधी यांनी दुसऱ्या बैठकीत सहभाग घेतला. डॉ. आंबेडकरांच्या मागणीला त्यांनी विरोध केला. शेवटी नोव्हेंबर १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद बोलावण्यात आली. परंतु काँग्रेसने यावरही बहिष्कार घातला. याचा परिणाम म्हणजे ब्रिटीशांनी जातीय निवाडा जाहीर केला. त्याला 'कम्युनल अवार्ड' असे म्हणतात. यामध्ये दलित वर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य करण्यात आली. याला म. गांधी यांनी गोलमेज परिषदेच्या निमित्ताने दलितांना मिळालेल्या स्वतंत्र मतदारसंघाला विरोध केला. सप्टेंबर १९३२ मध्ये ते पुणे येथील येरवडा कारागृहात उपोषणाला बसले. याचाच परिपाक म्हणजे पुणे करार होय. डॉ. आंबेडकर आणि म. गांधी यांच्यात करार झाला. उपोषण समाप्त झाले. मात्र दलितांच्या हिता आड येणाऱ्या हिंदू समाजाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खात्री झाली की, ते दलितांना कधीही न्याय देणार नाहीत. यासाठीच त्यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्हयातील येवला याठिकाणी भरलेल्या प्रांतिक दलित परिषदेत, "मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही." अशी घोषणा केली. जी ऐतिहासिक स्वरूपाची होती.

डॉ. आंबेडकरांनी राजकीय पक्षाच्या माध्यमातून आपली राजकीय चळवळ उभारली. १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष या राजकीय पक्षाची स्थापना करण्याची घोषणा केली. १९३५ ला ब्रिटीश संसदेने पारित कायद्यानुसार १९३७ मध्ये होणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन स्वतंत्र मजूर पक्षाची मांडणी केली होती. याचा फायदा निवडणुकीत झाला. सर्व समाजातील लोकांना घेऊन बाबासाहेब निवडणुकीत उतरले. त्यामध्ये त्यांचे मुंबई विधानसभेत १६ आणि मध्यप्रांत आणि बेरार विधीमंडळात ७ असे एकूण २३ प्रतिनिधी निवडून आले. हा आंबेडकरी चळवळीतील मोठा विजय होता. याचे पडसाद स्वाभाविकच सामाजिक पातळीवर पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४२ मध्ये नागपूर येथे अस्पृश्यांची एक परिषद बोलावली. त्यामध्ये शेडयुल्ड कास्ट फेडरेशन या नावाचा राजकीय पक्ष स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. शे.का.फे.च्या स्थापनेमुळे देशातील अस्पृश्य समाजाच्या मनात नवा विश्वास निर्माण झाला. सर्वत्र याची मार्चेबांधणी करण्यात आली. प्रत्येक राज्यात शाखा स्थापन करण्यात आल्या. अधिवेशने भरविण्यात आली. अस्पृश्य समाजाच्या स्वतंत्र राजकीय अस्तित्वाची मांडणी करण्यात आली. १९४६ ला सार्वत्रिक निवडणुका झाल्या. परंतु संयुक्त मतदार संघ पध्दती असल्यामुळे फेडरेशनचे उमेदवार पराभूत झाले. शे.का.फे राजकीय दृष्टिकोनातून अपयशी झाले असले तरी सामाजिकदृष्ट्या दलितांमध्ये एकोपा आणि संघर्ष करत राहण्याची जिद्द मात्र यातून मिळाली. पुढे डॉ. आंबेडकरांनी भारतीय रिपब्लिकन पक्षाची बांधणी केली. खुल्या पत्रातून त्याची घटना मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील एक महत्त्वाची उपलब्धी म्हणजे भारतीय संविधानाची निर्मिती होय. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. या स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी घटना समितीची स्थापना झाली. याचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. तर घटनेचा मसुदा तयार करण्याच्या समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. बाबासाहेबांनी अनेक दिवस कष्ट, परिश्रम करून लोकशाही विचारांवर आधारित भारतीय घटना तयार केली. २६ नोव्हेंबर रोजी १९४९ ती घटना मंजूर करण्यात आली. २६ जानेवारी १९५० पासून घटनेचा अंमल सुरू झाला. भारत एक लोकशाही देश

म्हणून वाटचाल करून लागला. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. ४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयांयाबरोबर नागपूर येथे बौध्द धम्माचा स्वीकार केला. वास्तविक हे धर्मांतर नव्हते तर ती एक सांस्कृतिक क्रांती होती. तिला धम्मक्रांती असे म्हणतात. बौध्द धम्म स्वीकारल्यानंतर काही दिवसात म्हणजे ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले.

### १.५.२ डॉ. आंबेडकर यांचे लेखन :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र व्यक्तिमत्त्व आणि कार्य कर्तृत्व अद्वितीय होते. यामध्ये त्यांचे लेखन हा भागही अतिशय महत्त्वाचा आहे. ते उत्तम वक्ते आणि लेखक होते. त्यांच्या लेखन साहित्यात ग्रंथ, पुस्तके, प्रबंध, लेख, भाषणे, स्फूटलेखन, पत्रे, वृत्तपत्रातील लेखन इत्यादींचा समावेश होतो. यातील बहुतांश लेखन इंग्रजी भाषेतून लिहिलेले आहे. तर काही मराठी भाषेतून लेखन केलेले आहे. या सबंध लेखनातून त्यांच्या वैचारिकतेचा दार्शनिक आविष्कार होतो. विशेषत: यामध्ये मानव, समाज, संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान, विविध ज्ञानक्षेत्रांचे जागतिक पातळीवरील संदर्भ अभिव्यक्त होतात. डॉ. आंबेडकरांनी आपल्या ग्रंथातून केलेली विचार मांडणी कालातीत आहे. याचा आशय येथे थोडक्यात लक्षात घेता येईल.

'भारतातील जाती: त्यांची उत्पत्ती आणि विकास' हा डॉ. आंबेडकरांचा महत्त्वपूर्ण संशोधनपर निबंध आहे. ९ मे १९१६ रोजी कोलंबिया विद्यापीठात डॉ.ए.ए. गोल्डनवायझर मानववंशशास्त्र परिषदेत त्यांनी तो सादर केला. यामध्ये डॉ. आंबेडकरांनी भारतीय जातिसंस्थेच्या उत्पत्तीसंबंधीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण केले आहे. जाती कशा निर्माण झाल्या? त्या का टिकून आहेत? याबाबतचे मानववंशशास्त्रीय व समाजशास्त्रीय विवेचन त्यांनी येथे अतिशय मार्मिकपणे केलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी यात आंतरजातीय विवाहाचा निषेध किंवा विवाह न आढळणे हेच जातिसंस्थेचे मूळ आहे. बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्त्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होत. असा निष्कर्ष मांडलेला आहे. एकदंरीतच भारतीय समाजव्यवस्थेची मूलगामी चिकित्सा त्यांनी अगदी तरुण वयात केली हे अतिशय महत्त्वाचे आहे.

रूपयाचा प्रश्न हा ग्रंथ डॉ. आंबेडकरांच्या द प्रॉब्लेम ऑफ द रूपी: इट्स ओरिजन अँड इट्स सोल्युशन या इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद आहे. हा डॉ. आंबेडकरांचा शोध प्रबंध असून तो त्यांनी १९२२ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स च्या पदवीसाठी सादर केला होता. १९२३ मध्ये तो ग्रंथरूपाने प्रकाशित झाला. यामध्ये त्यांनी स्पष्ट केले आहे की, मुद्रा समस्याच्या अंतिम निर्णयात कशा प्रकारे ब्रिटीश शासनाने भारतीय रुपयाच्या किमतीला पाऊंडसोबत जोडून आपला जास्तीत जास्त फायदा होण्याचा मार्ग निवडला. यातून भारतीय नागरिकांना गंभीर आर्थिक समस्येला सामोरे जावे लागले. याची परखड मांडणी या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी केलेली आहे.

प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती हा डॉ. आंबेडकरांचा महत्त्वाचा ग्रंथ आहे. तो त्यांच्या हयातीत अपूर्ण राहिला. परंतु पुढे १९८७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे खंड ३ मधून प्रसिध्द झाला. या ग्रंथामध्ये त्यांनी ४१ प्रकरणे केलेली होती.

त्यातील १३ प्रकरणे लिहिली आहेत. यात प्राचीन शासन प्रणाली, आर्यांची स्थिती, ब्राह्मवाद, बुध्द, त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन, बौध्द धर्माची अवनती व ऱ्हास, ब्राह्मण धर्म, राज्यहत्या किंवा प्रतिक्रांतीचा जन्म, मनुस्मृतीतील प्रतिक्रांतीचे विचार, कृष्ण आणि गीता, ब्राह्मण विरुध्द क्षत्रिय, शुद्र आणि प्रतिक्रांती, स्त्री आणि प्रतिक्रांती अशा विविधांगी विषयांवर भाष्य केलेले आहे. हा ऐतिहासिक स्वरूपाचा ग्रंथ आहे.

'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा डॉ. आंबेडकरांचा बहुचर्चित ग्रंथ १९४० मध्ये प्रकाशित झाला. यामध्ये त्यांनी राजकीय विचारांची प्रभावी मांडणी केलेली आहे. त्यावेळी भारताच्या फाळणीचा विषय भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी होता. संपूर्ण देशात अस्वस्थता होती. अशा प्रसंगी अतिशय सम्यक भूमिका घेऊन डॉ. आंबेडकरांनी पाकिस्तानविषयीचे विचार मांडले. पुढे याच ग्रंथाची दुसरी आवृत्ती १९४५ मध्ये 'पाकिस्तान ऑर पार्टिशन ऑफ इंडिया' या नावाने प्रकाशित करण्यात आली. या ग्रंथाचे वेगळेपण म्हणजे यामधून त्यांनी भारतीय राजकारणातील सांप्रदायिक पैलूंची विश्लेषणात्मक मांडणी प्रभावीपणे केलेली आहे.

शूद्र पूर्वी कोण होते? हा डॉ. आंबेडकरांचा महत्त्वाचा ग्रंथ १९४६ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथात त्यांनी भारतीतील चातुर्वर्णाची परखड चिकित्सा करून शूद्र वर्णाच्या उत्पत्तीच्या इतिहासाचे विश्लेषण केले आहे. शूद्र शब्द हा ऐतिहासिक असून ज्यांना शूद्र म्हटले जाते ते सूर्यवंशी आर्य क्षत्रिय लोक होते. असे प्रतिपादन या ग्रंथातून त्यांनी केलेले आहे. या ग्रंथाचाच दुसरा भाग म्हणजे 'द अनटचेबल्स' हा ग्रंथ होय. शूद्र, अतिशूद्र आणि अस्पृश्य असा पट ते पुढे मांडत जातात.

स्टेट अँड माइनॉरिटीज म्हणजेच राज्य आणि अल्पसंख्यांक हा डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ मार्च १९४७ मध्ये प्रकाशित झाला. यामध्ये त्यांनी भारतीय समाजाची समाजवादी रूपरेषा विशद केलेली आहे. भारतीय संविधानाच्या कलमांद्वारे राज्य समाजवादाला स्थापित केले जावे. त्याला संसदीय लोकतंत्राद्वारे व्यावहारिक पातळीवर घ्यावे. असे विचार मांडले. हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले? हा ग्रंथ १९४८ मध्ये प्रकाशित झाला आहे. यात अस्पृश्यता उत्पत्तीचा मूलगामी शोध घेतलेला आहे. यासाठी त्यांनी प्राचीन ग्रंथांचे, इतिहासातील संदर्भ दिलेले आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यतेचा उगम इ.स. चारशेच्या दरम्यान झाला. बौध्द धर्म आणि ब्राह्मण धर्म यात श्रेष्ठत्वासाठी जो संघर्ष झाला त्यापासून अस्पृश्यतेचा जन्म झाला. असे या ग्रंथात त्यांनी संदर्भासहित सिध्द केले आहे.

'थॉट्स ऑफ लिंग्विस्टिक स्टेटस' हा डॉ. आंबेडकरांचा १९५५ मध्ये प्रकाशित झालेला वेगळया विषयावरील महत्त्वाचा ग्रंथ आहे. यापूर्वी त्यांनी १९४८ रोजी महाराष्ट्र 'अ लिंग्विस्टिक प्रोव्हिन्स म्हणजे महाराष्ट्र : एक भाषिक प्रांत' हा ग्रंथ लिहिलेला होता. त्यात भाषावार प्रांत रचनेच्या समस्येचा उहापोह केलेला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्याची निर्मिती भाषिक तत्त्वावर करण्यात आली. यातून बरेच पेचप्रसंग निर्माण झाले. यावर डॉ. आंबेडकरांनी आपले चिंतन 'थॉट्स ऑफ लिंग्विस्टिक स्टेट्स' या ग्रंथातून मांडले आहे. पाच भाग व अकरा प्रकरणे आणि त्याच्या स्पष्टीकरणासाठी पाच नकाशे व प्रमुख जातींची

आकडेवारी त्यांनी परिशिष्टात दिलेली आहे. डॉ. आंबेडकरांनी राज्यांच्या भाषिक एकत्रीकरणाचे प्रभावी चित्रण त्यांनी केले असून एक राज्य एक भाषा या सार्वभौमिक सिध्दांताधारे संघटित राष्ट्र निर्माण होऊ शकते. अशी व्यापक भूमिका त्यांनी या ग्रंथामध्ये मांडलेली आहे.

'बुध्द आणि त्यांचा धम्म' हा डॉ. आंबेडकरांचा शेवटचा ग्रंथ आहे. १९५६ ला तो पूर्ण झाला असला तरी त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर म्हणजे १९५७ मध्ये तो प्रकाशित झाला. ज्याप्रमाणे प्रत्येक धर्माचा धर्मग्रंथ असतो. त्याचप्रमाणे बौध्द धम्माचाही एक धर्मग्रंथ असावा या हेतूने या ग्रंथाची रचना त्यांनी केली. हा ग्रंथ एकूण आठ खंडात विभागलेला आहे. पहिल्या खंडात सिध्दार्थ गौतम हे बुध्द कसे झाले याचे सविस्तर वर्णन पंचेचाळीस प्रकरणांमध्ये करण्यात आले आहे. दुसरा खंड धम्मदीक्षा अभियान या शीर्षकाचा असून त्यात बुध्दांनी विविध लोकांना दिलेल्या धम्मदीक्षेचा आलेख आलेला आहे. तिसरा खंड बुध्दाची शिकवण मांडणारा आहे. चौथा खंड धर्म आणि धम्म यातील भेद विशद करतो. पाचवा खंड संघ या शीर्षकाचा असू त्यात संघाची कार्ये विशद केलेली आहेत. सहाव्या खंडात बुध्द आणि त्याचे समकालीन यांची चरित्रे आहेत. सातवा खंड महान परिव्राजकाची अंतिम यात्रा या शीर्षकाचा असून त्यात बुध्दाच्या अंतिम जीवनाचे चित्रण येते. अंतिम आठवा खंड महामानव सिध्दार्थ गौतम या शीर्षकाचा असून यात त्यांचे क्रांतिकारकत्व आविष्कृत केलेले आहे. डॉ. आंबेडकरांचा हा ग्रंथ म्हणजे नवबौध्दांचा धर्मग्रंथच आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

वरील सर्व ग्रंथाबरोबरच डॉ. आंबेडकरांचे ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती (१९१५), जातीचा पेच आणि तो सोडविण्याचा मार्ग (१९४६), हिंदू धर्मातील कोडे (१९८७) हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती (१९६५), संघराज्य विरुध्द स्वातंत्र्य, मिस्टर गांधी अँड द इमॅन्सिपेशन ऑफ द अनटचेबल्स (१९४३) रानडे, गांधी आणि जीना, गांधी आणि काँग्रेसने अस्पृश्यांसाठी काय केले ? (१९४५) स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देअर रेमिडिज (१९१८) पाली व्याकरण (१९९८), बुध्द की कार्ल मार्क्स वेटिंग फॉर अ व्हिसा (चरित्रात्मक पुस्तिका १९३५-३६) अशी विविधांगी लेखन केलेले आहे. हे सर्व लेखन डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक चिंतनाचा दार्शनिक आविष्कार आहेत. त्यातून ऐतिहासिक मांडणी, क्रांतिकारक सिध्दांतन आणि समग्र मानवी कल्याणाचा विचार येतो. त्यामुळे या ग्रंथरचनांना आंबेडकरी विचार साहित्यात पायाभूत स्थान आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे झुंझार पत्रकार होते. त्यांनी मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), समता (१९२९ )जनता (१९३०), प्रबुध्द भारत (१९५६) ही वृत्तपत्रे चालविली. या पत्रकांमधून त्यांनी मराठीतून लेखन केलेले आहे. डॉ. आंबेडकरांची पत्रकारितकता ही सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक न्याय या तत्त्वांचा आग्रह धरणारी होती. तिने जनकल्याणाचा ध्येयवाद जपला होता. या वृत्तपत्रांमधील डॉ. आंबेडकरांचे लेखन म्हणजे शैलीचा उत्तम नमुना आहे. त्यांची भाषाशैली रोखठोक आहे. त्यात वाङ्मयीन सौंदर्याबरोबरच विचारसौंदर्यही आहे. विशेषत: त्यामध्ये संवादीपणा फार महत्त्वाचा आहे. ते आपल्या लेखनातून एकाचवेळी अस्पृश्य व स्पृश्य समाजाशी संवाद साधतात. याबरोबरच त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनात आत्मविश्लेष्कता, समाजसमीक्षा, रचनात्मकता, दंभस्फोटकता, अमोघ व मार्मिक युक्तिवाद, उपरोधगर्भता, सूक्ष्म निरीक्षण, नि:संदिग्धता, निश्चयात्मकता व

निर्धार, समुचित दृष्टांत, कथांचा समर्पक वापर, चिंतनशीलता व विचारभाष्ये, अर्थवाही शब्दयोजना, सुभाषित सदृशता, सूचक व अर्थगर्भ शीर्षके इ. विशेष येतात. असे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी मांडलेली आहेत. डॉ. आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य त्यांच्या चळवळीचा अविभाज्य भाग होता. त्यांची वृत्तपत्रे ही चळवळीची मुखपत्रे होती. त्यांना इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. डॉ. आंबेडकरांची भाषणे ही आंबेडकरी चळवळीचा दस्तऐवज आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे या खंडामध्ये ही भाषणे प्रकाशित झालेली आहेत. तत्कालीन सामाजिक जीवनामध्ये असणारे विविध अंत:र्विरोध त्यांनी परखडपणे यात मांडलेले असून भारतीय समाजव्यवस्थेची मूलगामी चिकित्सा यात विशद केलेली आहे. डॉ. आंबेडकर हे निश्नात वक्ते होते. त्यांच्या वक्तृत्वाचा आलेख बहुश्रुत होता. त्याची चिंतनशील, विश्लेषक, टीकात्मक आणि दूरगामी विचार इ. वैशिष्ट्ये सांगता येतात.

### १.५.३ डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक चळवळी :

डॉ. आंबेडकरांनी यांनी यासाठी नियोजनबध्द कृती कार्यक्रम राबविले. याचा परिणाम म्हणजे दलित समाजात अस्मितेची नवी उर्जा निर्माण झाली. यामध्ये आंबेडकरी चळवळीतील पहिले आंदोलन म्हणून चवदार तळे सत्याग्रहाचा विचार आपल्याला करावा लागतो.

### चवदार तळे सत्याग्रह :

दलितांच्या प्रश्नांसदर्भात राजकीय पातळीवर नवी जाणीव निर्माण होऊ लागली होती. मुंबई कायदेमंडळात असलेल्या काही प्रतिनिधींनी यासाठी काही ठराव मांडले होते. त्यामध्ये १९२६ रोजी सी.के. बोले यांनी मांडलेला ठराव अतिशय महत्त्वाचा आहे. त्या सार्वजनिक ठिकाणी म्हणजे न्यायालये, शाळा, पाणवठे, बाजार इ. ठिकाणी स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव पाळला जाऊ नये. असा ठराव करण्यात आला होता. याला मान्यताही मिळाली होती. याआधारेच महाड नगरपालिकेत हा ठराव मंजूर करून चवदार तळे अस्पृश्यांना खुले करण्यात आले. मात्र महाडमधील सवर्ण हिंदू लोकांनी याला विरोध केला. याविरुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून १९ व २० मार्च १९२७ रोजी परिषद घेण्यात आली. त्यामध्ये हजारो दलित सहभागी झाले होते. शेवटच्या दिवशी डॉ. आंबेडकर आणि हजारो दलित स्त्री-पुरुषांनी चवदार तळयात उतरुन त्याचे पाणी प्राशन केले. सामाजिक समतेच्या लढयातील, आंबेडकरी चळवळीतील हा मोठा लढा होता. डॉ. आंबेडकरांनी चवदार तळे सत्याग्रह केल्यानंतर तिथे परिषदेसाठी आलेल्या लोकांनावर सवर्ण सनातनी लोकांनी हल्ला केला. जाळपोळ केली, चवदार तळयाला अभिषेक घालून शुध्द केले आणि अस्पृश्यांना येथे येण्यास बंदी घातली. सरकारने यात हस्तक्षेप करून नये असेही सांगितले. बाबासाहेबांनी यांचा विरोध केला. पुन्हा परिषद घेण्याचा निर्णय घेतला. मात्र नगरपालिकेनेही यासाठी सहकार्य केले नाही. उलट सवर्ण समाजाची बाजू घेऊन त्यांचीच पाठराखन केली. चवदार तळे सत्याग्रहात सरळसरळ सामाजिक संघर्ष उभा राहिला. अस्पृश्य समाज समतेसाठी लढत होता. आपले हक्क मागत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला चवदार तळयाचा सत्याग्रह निर्णायक नसला तरी त्यानिमित्ताने अभूतपर्व अशा दलितांच्या लढयाला सुरूवात झाली. सर्व दलित समाज

एकत्र आला. आपल्यावर लादलेल्या अस्पृश्यतेच्या विरोधात त्यांनी एकसंघ आवाज उठविला. ज्या मनुस्मृतीच्या आधारे जातीव्यवस्था प्रस्थापित करण्यात आली होती. गुलामगिरी लादलेली होती. त्या मनुस्मृतीचे दहन याच चवदार तळयाच्या सत्याग्रहात करण्यात आले. ही ऐतिहासिक घटना होती. यामध्ये केवळ दलित समुहच नव्हता तर दलितेतर समाजही यामध्ये सहभागी झाला होता. विशेषत: दलित स्त्रीयांचे प्रमाण यामध्ये खूप मोठया प्रमाणात होते. आंबेडकरी चळवळीतील चवदार तळे सत्याग्रह म्हणजे समता संगरच होते. ब्रिटीश शासनाने १९२८ मध्ये सर जॉन सायमन यांच्या नेतृत्वाखाली एक मंडळ भारतात पाठविले. या मंडळाचा उद्देश राजकीय होता. डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने या मंडळाला एक निवेदन दिले. ज्यामध्ये विधी मंडळात अस्पृश्यांना स्वतंत्र जागा असाव्या असा आग्रह त्यांनी धरला. मात्र भारतात सायमन कमिशनला विरोध झाला. म्हणून गोलमेज परिषदेचे आयोजन करयात आले. डॉ. आंबेडकरांनी या दरम्यान आपले सामाजिक सामाजिक कार्य चालूच ठेवले होते. याचाच एक भाग म्हणजे काळाराम मंदिर सत्याग्रह होय.

**काळाराम मंदिर सत्याग्रह :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३० मध्ये नाशिक येथील काळाराम मंदिरात सामुदायिक प्रवेश करण्याची घोषणा केली. बाबासाहेबांनी आपल्या सामाजिक कार्याला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. महाड येथील चवदार तळयाचा सत्याग्रह केल्यानंतर त्यांनी मंदिर प्रवेशाची चळवळ उभारली. वास्तविक त्यांना मंदिरामध्ये जाऊन देवदर्शन घेण्याचा अथवा दलित समाजाला येथे घेऊन जाण्यात कोणतेही स्वारस्य नव्हते. परंतु पारंपरिक जात मानसिकतेला छेद देण्याच्या मुख्य उद्देशातून त्यांनी हे आंदोलन चालू केले होते. मागील अनुभव लक्षात घेता काळाराम मंदिर प्रवेशासंदर्भात त्यांनी रितसर पत्रव्यवहार करून जोरदार तयारी केलेली होती. दादासाहेब गायकवाड हे बाबासाहेबांचे प्रमुख शिलेदार होते. त्यांच्याशी चर्चा करून आंदोलनाचे स्वरूप ठरविण्यात आलेले होते. २मार्च १९३० रोजी या सत्याग्रहास सुरूवात झाली. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी या सत्याग्रहामागील भूमिका विशद केली. ते म्हणाले, आज आपण मंदिरात प्रवेश करणार आहोत. मंदिराम प्रवेश केल्यामुळे आपले प्रश्न सुटणार नाहीत. आपले प्रश्न राजकीय आहेत. सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक आहेत. काळाराम मंदिरात प्रवेश करणे म्हणजे हिंदू मनाला केलेले आवाहन आहे. उच्चवर्गीय हिंदूंनी आपल्याला आपल्या हक्कांपासून अनेक पिढयांपासून दूर ठेवले. आता तेच हिंदू आपल्याला आपला मानवी हक्क देतील का हा प्रश्न या काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या माध्यमातून मी विचारत आहे. हिंदू मन हे आपल्याला एक मानव म्ह्णून स्वीकारण्यास तयार आहे की नाही याची पडताळणी या सत्याग्रहाद्वारे होणार आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना या सत्याग्रहाचे महत्त्व सांगितले होते. याचा फलित म्हणजे हजारो लोक या सत्याग्रहात सामील झाले. नियोजनबध्द पध्दतीने आंदोलन करण्यात आले. परंतु सवर्ण लोकांनी इथेही आपली विषमतावादी मानसिकता दाखविली. सत्याग्रहाच्या वेळी दगडफेक झाली. अनेकांना इजा झाली. बाबासाहेबांनी या सर्व घटनेची तक्रार ब्रिटीश सरकारकडे केली. नाशिकमध्ये दलितांवर बहिष्कार घालण्यात आला. मानसिक त्रास दिला गेला. तरीसुध्दा सत्याग्रही मागे हटले नाहीत. तब्बल पाच वर्षे हा लढा चालूच होता. भाऊराव गायकवाड यांनी त्याचे नेतृत्व केले. दरम्यान डॉ. आंबेडकरांना गोलमेज परिषदेला जावे लागले. देशपातळीवर राजकीय संघर्ष सुरू झाला. हिंदू समाजाची

मानसिकता बदलणार नाही. हे बाबासाहेबांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी काळाराम मंदिर सत्याग्रह मागे घेतला. आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात या सत्याग्रहाला विशेष महत्त्व आहे. कारण याठिकाणी महाराष्ट्रा बरोबरच गुजरात, कर्नाटक राज्यातील लोक आलेले होते. विशेषत: एवढया प्रदीर्घ काळापर्यंत लढा दिला. हे अतिशय महत्त्वाचे आहे.

### १.५.४ डॉ. आंबेडकरांच्या राजकीय चळवळी:

### १. ५.४.१ गोलमेज परिषदा :

आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात गोलमेज परिषदांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या समाजाच्या हक्कासाठी सातत्याने लढत होते. या लढयात त्यांना राष्ट्रीय पातळीवर संघर्ष करावा लागला. गोलमेज परिषदांच्या निमित्ताने या संघर्षाला नवी धार आली. ब्रिटीश सरकारने भारताला स्वातंत्र्य देण्याच्या भूमिकेतून भावी राज्यघटनेची चर्चा करण्यासाठी जी परिषद बोलावली होती. तिला गोलमेज परिषद असे म्हणतात. या परिषेदच्या एकूण तीन बैठका संपन्न झाल्या. या तीनही बैठकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले होते. पहिली गोलमेज परिषद नोव्हेंबर १९३० मध्ये लंडन येथे भरली. डॉ. आंबेडकरांनी यामध्ये सहभाग घेऊन दलितांच्या राजकीय अस्तित्वाविषयी मांडणी केली. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ तयार करून त्यांच्या मार्फतच अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडले गेले पाहिजे. अशी जोरदार भूमिका बाबासाहेबांनी मांडली. परंतु राष्ट्रीय काँग्रेसने या परिषदेवरवर बहिष्कार घातला. त्यामुळे दुसरी परिषद सप्टेंबर १९३१ रोजी बोलावण्यात आली. म. गांधी यांनी दुसऱ्या बैठकीत सहभाग घेतला. डॉ. आंबेडकरांच्या मागणीला त्यांनी विरोध केला. शेवटी नोव्हेंबर १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद बोलावण्यात आली. परंतु काँग्रेसने यावरही बहिष्कार घातला. याचा परिणाम म्हणजे ब्रिटीशांनी जातीय निवाडा जाहीर केला. त्याला कम्युनल अवार्ड असे म्हणतात. यामध्ये दलित वर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य करण्यात आली. याला म. गांधी यांनी मोठा विरोध केला.

### १.५.४.२ पुणे करार :

दलित समाजाच्या हक्कासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अहोरात्र झगडत होते. मात्र त्यांना प्रस्थापित वर्गाकडून प्रचंड विरोध होत होता. म. गांधी यांनी गोलमेज परिषदेच्या निमित्ताने दलितांना मिळालेल्या स्वतंत्र मतदारसंघाला विरोध केला. सप्टेंबर १९३२ मध्ये ते पुणे येथील येरवडा कारागृहात उपोषणाला बसले. याचाच परिपाक म्हणजे पुणे करार होय. या कराराला आंबेडकरी चळवळीत विशेष महत्त्वाचे स्थान आहे. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या तेजस्वी वाणी आणि बुध्दिमत्तेच्या आधारे दलितांच्या उत्थानाची चळवळ निर्णायक स्थितीत आणली होती. सामाजिक गुलामगिरी नष्ट करायची असेल तर दलितांना राजकीय अस्तित्व प्राप्त झाले पाहिजे. कारण त्याशिवाय परिवर्तन होणार नाही. याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. यासाठीच ते दलित समाजाच्या राजकीय हक्काचा आग्रह धरत होते. परंतु म. गांधी यांनी दलित हे वेगळे नाही. ते हिंदू समाजाचाच एक भाग आहेत. त्यामुळे त्यांना स्वतंत्र अस्तित्व देवू नये. असा आग्रह धरला. डॉ. आंबेडकर यांनी म. गांधी यांच्या या विचाराचा विरोध केला. हजारो वर्षापासूनची सामाजिक गुलामगिरी भोगत असलेल्या दलितांना सामाजिक न्याय मिळणार कधी? हा त्यांचा मूलभूत प्रश्न होता. यातूनच म.

गांधीजींच्या उपोषणाला त्यांनी विरोध केला. याचा परिणाम म्हणजे बाबासाहेबांच्या विरोधात सर्व सवर्ण समाज एकत्र झाला. गांधीजींच्या बिघडत चाललेल्या तब्येतीचा विचार करून आणि व्यापक सामाजिक हित लक्षात घेऊन डॉ. आंबेडकर आणि म. गांधी यांच्यात करार झाला. उपोषण समाप्त झाले. मात्र दलितांच्या हिता आड येणाऱ्या हिंदू समाजाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खात्री झाली की, ते दलितांना कधीही न्याय देणार नाहीत. यासाठीतच त्यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्हयातील येवला याठिकाणी भरलेल्या प्रांतिक दलित परिषदेत, मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी घोषणा केली. जी ऐतिहासिक स्वरूपाची होती.

### १.५.४.३ स्वतंत्र मजूर पक्ष :

आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या राजकीय पक्षांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. १५ ऑगस्ट १९३६ रोजी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष या राजकीय पक्षाची स्थापना करण्याची घोषणा केली. एका बाजूला सामाजिक चळवळीत दलितांच्या हक्काचा विचार केला जात नाही. तर दुसऱ्या बाजूला त्यांना राजकीय अस्तित्व प्राप्त करू दिले जात नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी १९३५ ला ब्रिटीश संसदेने पारित कायद्यानुसार १९३७ मध्ये होणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन स्वतंत्र मजूर पक्षाची मांडणी केली होती. याचा फायदा निवडणुकीत झाला. सर्व समाजातील लोकांना घेऊन बाबासाहेब निवडणुकीत उतरले. त्यामध्ये त्यांचे मुंबई विधानसभेत १६ आणि मध्यप्रांत आणि बेरार विधीमंडळात ७ असे एकूण २३ प्रतिनिधी निवडून आले. हा आंबेडकरी चळवळीतील मोठा विजय होता. याचे पडसाद स्वाभाविकच सामाजिक पातळीवर पडले. पुढे स्वतंत्र मजूर पक्षाने १९३९ पर्यंत अत्यंत महत्त्वाची कामगिरी पार पाडली. विधीमंडळात त्यांचा दबदबा होता. विविध सामाजिक प्रश्नांची मांडणी याठिकाणी करण्यात आली. म. गांधी यांनी दिलेल्या हरिजन शब्दाला विरोध, वर्धा शिक्षण पध्दतीवरील टिका, शासनाचे १९३५ च्या कायद्याचे पालन करत अनुसूचित जातींच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न करण्याविषयीची भूमिका घेतली. याचा परिणाम म्हणजे दलितांच्या सामाजिक गुलामगिरीविरुध्द आवाज उठवला गेला. शासनाने अस्पृश्यांना मंदिर प्रवेश कायदा संमत केला. खोतीशाही किंवा जमीनदारी नष्ट करण्याविषयी विधेयक मांडण्यात आले. मजुरांना संप करण्याचा अधिकार असावा यासाठी संप केला. अशा विविध माध्यमातून स्वतंत्र मजूर पक्षाने यशस्वी वाटचाल केली. परंतु पुढे ब्रिटीश सरकारने क्रिप्स योजना आली. देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. १९४२ मध्ये तर परिस्थिती पूर्ण बदलली. मजूर पक्षाचे कामही मंदावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उद्देशाप्रमाणे समाजातील सर्व जाती एकत्र येऊ शकल्या नाहीत. क्रिप्स समोर डॉ. आंबेडकर साक्ष देण्यासाठी गेल्यानंतर त्यांच्यापुढे प्रश्न होता की मजूरांच्या की अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी म्हणून जायचे. अशा वेळी बाबासाहेबांनी शेडयुल्ड कास्ट फेडरेशन नावाचा राजकीय पक्ष स्थापन करून दलितांच्या हक्कासाठी पुढे लढा देण्याचा निर्धार केला.

### १.५.४.४ शेडयुल्ड कास्ट फेडरेशन :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४२ मध्ये नागपूर यथे अस्पृश्यांची एक परिषद बोलावली. त्यामध्ये शेडयुल्ड कास्ट फेडरेशन या नावाचा राजकीय पक्ष स्थापन करण्याचे

निश्चित करण्यात आले. वास्तविक यामागे बाबासाहेबांची व्यापक, समाजहितवादी भूमिका होती. कारण प्रारंभापासून बाबासाहेब दलित समाजाला न्याय, हक्क आणि अधिकार मिळावेत यासाठी प्रयत्न करत होते. परंतु दलितेतरांनी त्यांना समजून घेतले नाही. त्यामुळे ब्रिटीश शासनाच्या अंतिम टप्प्यात निर्णायक क्षणी जर आपण दलितांच्या भवितव्याचा विचार करून योग्य भूमिका घेतली नाही तर याची फार मोठी किंमत मोजावी लागणार होती. म्हणून शेडयुल्ड कास्ट फेडरेशन स्थापनेचा निर्णय बाबासाहेबांनी अत्यंत जबाबदारीने घेतला होता. शे.का.फे.च्या स्थापनेमुळे देशातील अस्पृश्य समाजाच्या मनात नवा विश्वास निर्माण झाला. सर्वत्र याची मार्चेबांधणी करण्यात आली. प्रत्येक राज्यात शाखा स्थापन करण्यात आल्या. अधिवेशने भरविण्यात आली. अस्पृश्य समाजाच्या स्वतंत्र राजकीय अस्तित्वाची मांडणी करण्यात आली. १९४६ ला सार्वत्रिक निवडणुका झाल्या. परंतु संयुक्त मतदार संघ पध्दती असल्यामुळे फेडरेशनचे उमेदवार पराभूत झाले. परंतु डॉ. आंबेडकरांनी सर्वांना समजावून सांगितले. पुढे १९५२ च्या निवडणुकीत दोन प्रतिनिधी निवडणून आले. शे.का.फे राजकीय दृष्टिकोनातून अपयशी झाले असले तरी सामाजिकदृष्ट्या दलितांमध्ये एकोपा आणि संघर्ष करत राहण्याची जिद्द मात्र यातून मिळाली. पुढे रिपब्लिकन पक्षाची निर्मिती होऊन दलितांच्या राजकारणाला नवी दिशा मिळाली.

### १.५.४.५ भारतीय संविधान निर्मिती :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील एक महत्त्वाची उपलब्धी म्हणजे भारतीय संविधानाची निर्मिती होय. आंबेडकरी चळवळीत याला पायाभूत स्थान आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. या स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी घटना समितीची स्थापना झाली. याचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. तर घटनेचा मसुदा तयार करण्याच्या समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. बाबासाहेबांनी अनेक दिवस कष्ट, परिश्रम करून लोकशाही विचारांवर आधारित भारतीय घटना तयार केली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ती घटना मंजूर करण्यात आली. २६ जानेवारी १९५० पासून घटनेचा अंमल सुरू झाला. भारत एक लोकशाही देश म्हणून वाटचाल करून लागला. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी जगातील सर्व घटनांचा अभ्यास करून आपल्या देशातील बुध्द पूर्व काळापासूनचा अभ्यास करून संविधानाचा मसुदा तयार केला. हे संविधान म्हणजे सामाजिक न्यायाचे प्रतीक आहे. दलित चळवळीमध्ये याच सामाजिक न्यायाची बाजू घेऊन भारतीय संविधानाला प्रमाण मानले जाते. यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य कर्तृत्व आहे.

### १.५.५ डॉ. आंबेडकरांची धम्मक्रांती:

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयांयाबरोबर नागपूर येथे बौध्द धम्माचा स्वीकार केला. वास्तविक हे धर्मांतर नव्हते तर ती एक सांस्कृतिक क्रांती होती. तिला धम्मक्रांती असे म्हणतात. डॉ. आंबेडकरांनी सातत्याने दलितांना सामाजिक न्याय मिळावा म्हणून प्रयत्न केले. सुरूवातील निवेदने दिली. सत्याग्रह केले. सभा, परिषदा भरवल्या. परंतु इथली हिंदू समाज मानसिकता बदलायला तयार होत नव्हती. उलट दलित ज्यावेळी आपल्या हक्कासाठी लढू लागले.

त्यावेळी त्यांचा त्यांना प्रचंड विरोध करण्यात आला. त्यांचा छळ केला गेला. त्यांना वाळीत टाकण्यात आले. राजकीय पातळीवर त्यांची कोंडी करण्यात आली. या सर्व गोष्टी डॉ. आंबेडकरांनी पाहिल्या, अनुभवल्या होत्या. त्यामुळे १९३६ मध्येच त्यांनी येवला येथे मी हिंदू म्हणून मरणार नाही अशी घोषणा केली होती. हा संपूर्ण समाजाला इशारा होता. परंतु याची दखल सवर्ण समाजाने घेतली नाही. याचा परिपाक म्हणजे बाबासाहेबांनी केलेला बौध्द धम्म स्वीकार होय. भारताच्या इतिहासात इ.स. पूर्व काळात गौतम बुध्दांनी बौध्द धम्माची स्थापना केली. हा रूढ अर्थाने धर्म नव्हता. तर तो जीवनमार्ग होता. नैतिक आचारणाचा दीपस्तंभ होता. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये त्यामध्ये महत्त्वाची होती. कोणत्याही विषमतेला नकार देण्याचे कार्य बौध्द धम्मात केले जाते. म्हणून बाबासाहेबांनी बौध्द धम्माचा मार्ग स्वीकारला. मुक्ती कोण पथे या भाषणात बाबासाहेबांनी आपल्या धम्मक्रांतीची पार्श्वभूमी सांगितली आहे. तर बुध्द आणि त्यांचा धम्म या ग्रंथात धम्माचे महत्त्व विशद केलेले आहे. जे क्रांतिकारक आहे.

### १.५.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण :

६ डिसेंबर १९५६ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिर्वाण झाले. डॉ. आंबेडकर यांचे समग्र व्यक्तिमत्त्व आणि कार्यकर्तृत्व अद्वितीय होते. त्यांनी प्रारंभापासून चिंतनशीलपणे दलित समाजाचा शोध घेतला. आपल्या ग्रंथातून मूलभूत मांडणी केली. भारतातील जाती : त्यांची उत्पत्ती आणि विकास, रूपयाचा प्रश्न, क्रांती आणि प्रतिक्रांती, अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले, शूद्र पूर्वी कोण होते? राज्य आणि अल्पसंख्यांक हे त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. बाबासाहेबांनी विविध वृत्तपत्रे चालवली. त्यातून समाजाला दिशा देणारे लेखन केले. त्यामध्ये मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता, प्रबुध्द भारत यांचा समावेश होतो. डॉ. आंबेडकरांची भाषणे ही आंबेडकरी चळवळीचा दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे युगनायक होते. त्यांनी या देशातील दलितांच्याच नव्हे तर भारतीय समाजाच्या जीवनात अमूलाग्र बदल घडविला. आापल्या कार्यातून नवा काळ उभार केला. नवे अस्मितादर्शन घडविले. त्यामुळे आंबेडकरी चळवळीचा कालखंड हा भारतीय इतिहासातील सुवर्णयुग आहे. हे सूर्यसत्य कोणीही नाकारू शकणार नाही.

## १.६ दलित चळवळीचे आंबेडकरोत्तरपर्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आकस्मित जाण्यामुळे संपूर्ण दलित समाज पोरका झाला. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या समाजोध्दाराच्या कार्याला खंड पडला. एक प्रकारची पोकळी निर्माण झाली. जी पुढे कधीच भरून निघणारी नव्हती. आंबेडकरोत्तर कालखंडातील चळवळींचा स्वतंत्र इतिहास आहे. त्यामध्ये विविध स्थित्यंतरे आलेली आहेत. गेल्या पन्नास-साठ वर्षामध्ये यामध्ये मोठया प्रमाणात स्थित्यंतरे झालेली आहेत. त्यामुळे याचाही स्वतंत्रपणे विचार करणे अगत्याचे आहे.

### १.६.१ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या राजकीय जीवनात विविध प्रकारचा संघर्ष करत दलितांना सामाजिक, राजकीय अस्तित्व मिळवून दिले. स्वतंत्र मजूर पक्ष, शेडयुल्ड कास्ट

फेडरेशन इ. पक्षांच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. परंतु बाबासाहेबांच्या राजकारणाला सातत्याने नामोहरण करण्यासाठी प्रस्थापित पक्षांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. शेवटी त्यांना यश आले नाही. कारण डॉ. आंबेडकरांचा राजकीय विचार क्रांतिकारक होता. आयुष्याच्या शेवटी बाबासाहेबांनी रिपब्लिकन पक्षांची संकल्पना मांडली. आपल्या कार्यकर्त्यांना खुले पत्र लिहून त्यांनी रिपब्लिकन पक्षांची स्थापना करण्याची तयारी केली. हा पक्ष सर्वांसाठी खुला असावा आणि त्याने इतर बहुसंख्यांक पक्षांशी युती करून राजकारणात आपले अस्तित्व उभे करावे अशी त्यांची भूमिका होती. यासाठी त्यांनी राममनोहर लोहिया, एस.एम.जोशी, प्र.के.अत्रे अशा नेत्यांशी विचारविनिमय करणारी पत्रे लिहीली. परंतु अचानक त्यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यामुळे या पक्षांची प्रत्यक्ष स्थापना ते करू शकले नाहीत. १९५७ ला नागपूर येथे दलित नेत्यांची सभा भरली. या सभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेवटचे राजकीय स्वप्न म्हणून शेडयुल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून ३ ऑक्टोबर १९५७ रोजी 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या नावाने पक्ष स्थापन करण्यात आला. बाबासाहेबांचे निकटवर्ती एन. शिवराज (मद्रास) यांची निवड अध्यक्ष म्हणून करण्यात आली. नवीन कार्यकारणी घोषित करून विविध प्रांतातील सदस्य निवडले गेले. पक्षाची घटना तयार करण्यात आली. त्यामध्ये भारतीय सरनाम्यात व्यक्त केलेल्या न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता हेच रिपब्लिकन पक्षाचे ध्येय ठरविण्यात आले. *(भारतीय रिपब्लिकन पक्ष : डॉ. रा. का. क्षीरसागर)* दादासाहेब गायकवाड हे रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते होते. त्यांनी भूमिहीनांचा प्रश्न घेऊन लढा उभारला. १९५९ मध्ये औरंगाबाद येथे रिपब्लिकन पक्षाचे पहिले अधिवेशन भरले. यामध्ये जमिनीचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे, सामुदायिक शेती करावी यासारखे ठराव करण्यात आले. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली धुळे, जळगाव आणि नाशिक येथे पक्षाने सत्याग्रह केले. रिपब्लिकन पक्ष नवनिर्मितीसाठी धडपडत होता. परंतू त्याला म्हणावेसे यश प्राप्त होत नव्हते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित चळवळीत फार मोठी पोकळी निर्माण झाली. ती भरून काढण्यासाठी सामुदायिक नेतृत्वाची कल्पना पुढे येऊन अठरा नेत्यांचे प्रेसिडियम स्थापन करण्यात आले. मात्र हे नेतृत्व कोणाला मान्य झाले नाही. जुन्या नव्या कार्यकर्त्यात मतभेद वाढत गेले. १९५९ मध्येच रिपब्लिकन पक्षात दुरुस्त आणि नादुरुस्त अशी फुट पडली. आवळे, बी.सी.कांबळे व दादासाहेब रुपवते यांच्या नेतृत्वाखाली दुरुस्त गटाने आपली वेगळी चुल मांडली. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून हा गट बाजूला झाला. पहिल्या गटाने कार्य करण्याचा प्रयत्न केला. परंतू डाव्या पक्षांबरोबरच्या १९६२ निवडणूकीत पराभव पत्कारावा लागला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून काँग्रेस पक्षाचे सामर्थ्य वाढत गेले. हे लक्षात घेऊन दादासाहेब गायकवाड यांच्या गटाचा कल हळूहळू काँग्रेसकडे झुकला. १९६७ च्या निवडणुकीत या गटाने काँग्रेसशी युती करण्याचा प्रयत्न केला. परंतू याला यश आले नाही. मात्र पुढे १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जिल्हा परिषद व नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. गायकवाड गटाने काँग्रेसशी युती केली. याचा थोडा फायदा रिपब्लिकन पक्षाला झाला. परंतु सामाजिक न्यायाच्या लढयात त्यांना फारसे यश आले नाही. उलट रिपब्लिकन चळवळ काँग्रेसमध्ये विलीन होऊ लागली. पक्षाची वाताहत झाली. आता रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट निर्माण झालेले आहे. प्रत्येक नेता आपले नाव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या नावासमोर टाकतो आहे. निवडणुकीत प्रस्थापित पक्षांची युती, आघाडी करूनही त्यांना यश येत नाही.

रिपब्लिकन ऐक्याचे अनेक प्रयत्न झाले. परंतू त्याला यश मिळाले नाही. आज हा पक्ष आपले अस्तित्व शोधत आहे. असे असले तरी दलित चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील पक्ष म्हणून अजूनही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला जनमनात महत्त्वाचे स्थान आहे. तळागळातील दलित समूहांना रिपब्लिकन पक्षावर विश्वास आहे. कोणतेही सामाजिक आंदोलन असो रिपब्लिकन नेते रस्त्यावर उतरून लढा देतात. मोर्चे काढतात. तरुणांमध्येही रिपब्लिकन पक्षाचा विचार पोहचत आहे. बाबासाहेबांचे राजकीय स्वप्न म्हणून रिपब्लिकन पक्षाची वाटचाल चालू आहे. तिला निर्णायक रूप येत नाही. हे वास्तव असले तरी भारतीय राजकारणात रिपब्लिकन पक्षाचा वाटा महत्त्वाचा आहे.

### १. ६.२ पँथर चळवळ :

आंबेडकरोत्तर दलित चळवळीत एक क्रांतीपर्व म्हणून दलित पँथरच्या आंदोलनाला ओळखले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पश्चात रिपब्लिकन पक्षाचे अस्तित्व धोक्यात आले. सामाजिक चळवळीत फारसा जोर राहिला नाही. दुसरीकडे दलितांवरील अन्याय अत्याचार वाढू लागले. १९७१ मध्ये इलाया पेरुमल समितीचा अहवाल प्रसिध्द झाला. त्यामधून या अन्यायांची नोंद घेतली गेली. याचा परिणाम म्हणजे दलितांवरील अन्यायाविरुध्द आवाज उठविणारे संघटन उभे राहण्याची गरज दलित तरुणांच्या मनात प्रकर्षाने झाली. याचाच आविष्कार म्हणजे १९७२ रोजी दलित पँथर ही लढाऊ संघटना स्थापन करण्यात आली. दलित पँथर ही आंबेडकरी तरुणांची विद्रोही संघटना होती. यात कवी, लेखक, साहित्यिक, कलावंत, विचारवंत होते. यांना आंबेडकरवादाचे वैचारिक अधिष्ठान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतिकारक विचार त्यांनी आत्मसात केलेला होता. नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज.वि.पवार, अरुण कांबळे, रामदास आठवले इत्यादी लढवय्यी नेतेमंडळी यांनी दलित पँथर उभी केली. परंपरावादी विचारांना विरोध, प्रस्तापित समाजव्यवस्थेतील विषमतेविरुध्द आवाज उठविण्याचे कार्य पँथरने केले. विशेषत: मराठी साहित्यातील मध्यवर्ती प्रवाहाला यांनी नकार दिला. त्यांच्याविरुध्द विद्रोह पुकारला. आपल्या लेखनीतून आंबेडकरवादी जीवन जाणिवांची मांडणी केली. पँथर हा निर्भय होता. त्याची बेदरकार वृत्ती आणि क्रांतीची भाषा सर्वांना आकर्षित करत होती. त्यामुळे दलित तरुण यात मोठया प्रमाणात सहभागी झाले. महाराष्ट्रात सुरू झालेली पँथर लवकरच देशातील गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश इ. राज्यांमध्येही विस्तारीत झाली. दलित पँथरने अनुसूचित जाती व जमाती, बौध्द, कष्टकरी जनता, कामगार, गरीब शेतकरी आणि शेतमजूर या सर्वांना एकत्र आणून सर्वंकष आर्थिक, राजकीय व सामाजिक क्रांती घडवून आणण्याची आवश्यकता मांडली. त्यांनी भूमिहीनांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. खेडयातील जातिव्यवस्था, सरंजामशाहीला विरोध केला. शेतमजुरीचे दर वाढविण्याचे प्रयत्न केले. दलितांना रोजगार मिळाला पाहिजे. मोफत शिक्षण मिळायला हवे. स्वस्त धान्य, निवाऱ्याची सोय असली पाहिजे. दलितांचे आर्थिक शोषण थांबले पाहिजे यासाठी दलित पँथरने लढा दिला. दलित पँथरचा प्रभाव वाढत असतानाच प्रस्थापित व्यवस्थेकडून तिच्यामध्ये फूट पाडण्यासाठी प्रयत्न चालू झाले. दलितांमधील असे लढाऊ संघटन वाढत गेल्यास जातकेंद्री व्यवस्थेला शह बसू शकतो. यासाठी दलित पँथरला फोडण्याचे प्रयत्न झाले. यात प्रारंभी यश आले नाही. परंतु १९७७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका आल्या आणि पँथर राजकारणात ओढली गेली. तिला जाणीवपूर्वक यात गुंतवले गेले. याची ठिणगी राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्यातील मतभेदापासून झाले. राजा

ढाले यांनी पँथरमधून बाहेर पडून मास मुव्हमेंट नावाची नवी संघटना स्थापन केली. हळूहळू पँथरमध्ये विभाजने होऊ लागली. तिच्यात गटतट पडले. आंबेडकरोत्तर काळातील एक क्रांतिकारक संघटना लयास गेली. दलित पँथरचा काळ हा दलितांच्या सामाजिक-सांस्कृतिक लढयातील उज्वस्वी पर्व होते. पँथरने दलित साहित्याच्या चळवळीला दिशा दिली. यातूनच लेखकांची पिढी उभी राहिली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी जो ऐतिहासिक लढा महाराष्ट्रात उभा राहिला त्यामागे दलित पँथरचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

### १.६.३ नामांतर लढा :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्यातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात समाजपरिवर्तन झालेले होते. विशेषत: बाबासाहेबांनी केलेले शैक्षणिक कार्य यात अतिशय महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांनी 'पिपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून विविध महाविद्यालये स्थापन करण्यात आली. १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन करण्यात आले. नागसेन परिसरात उभे राहिलेल्या या महाविद्यालयाने दलित चळवळीला उभारी दिली. ते चळवळीचे केंद्र बनले. मराठवाडयातील अनेक विद्यार्थी या महाविद्यालयात प्रवेश घेऊन शिक्षित झाले. दलित पँथरची चळवळ येथेच चालली. दरम्यान मराठवाडयाला स्वतंत्र विद्यापीठ असावे अशी मागणी पुढे आली. शासनाने २७ एप्रिल १९५७ रोजी न्यायमूर्ती पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अहवालानुसार २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले. ७ जुलै १९७७ रोजी दलित पँथरच्या माध्यमातून गंगाधर गाडे यांनी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे अशी मागणी केली. त्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडयाच्या शैक्षणिक विकासात मिलिंद कॉलेजच्या माध्यमातून निर्माण केलेले कार्य होते. या मागणीला विविध विद्यार्थी संघटनांनी पाठिंबा दिला. सरकारने याची दखल न घेतल्यामुळे विविध आंदोलने, मोर्चे निघाले. याचा परिणाम म्हणजे २५ जुलै १९७७ रोजी विद्यापीठ कार्यकारणीने विद्यापीठ नामांतराचा ठराव पास केला. तो ठराव २७ जुलै १९७७ रोजी महाराष्ट्राच्या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहमध्ये पारीत करण्यात आला. दलित चळवळीच्या वाटचालीतील हे मोठे यश होते. मात्र हा आनंददायी क्षण इथल्या प्रस्थापित व्यवस्थेला पाहावला नाही. नामांतराला मराठवाडयातील जातीयवादी संघटनांनी विरोध केला. प्रचंड मोठया प्रमाणात याचे पडसाद ग्रामीण भागात पडले. दलितांची घरे जाळण्यात आली. गावागावात दलितांवर अन्याय अत्याचार करण्यात आले. प्रस्थापित व्यवस्था क्रुरपणे वागली. यावेळी दलित पँथरसह सर्व दलितांचे नेते एकत्र आले. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लाँग मार्च काढला. महाराष्ट्रातील दलित जनता यामध्ये सहभागी झाली. सर्व आंदोलने झाली. यात जनार्धन मवाडे, पोचीराम कांबळे, गौतम वाघमारे शहीद झाले. तब्बल १७ वर्षे हा नामांतर लढा लढला गेला. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ ही दलित चळवळीतील इतिहासातील मोठा लढा होता. यात सर्वं दलित समाज एकत्र आला. रस्त्यावर उतरला. कितीही अन्याय अत्याचार झाला तरी माघार घ्यायची नाही अशी परखड आंबेडकरवादी भूमिका सर्वांनी स्विकारली. शेवटी या लढयाला यश आले. १४ जानेवारी १९९४ रोजी विद्यापीठाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद असे करण्यात आले.

### १.६.४ रिडल्स आंदोलन :

आंबेडकरोत्तर काळात दलितांच्या जीवनात नवे संघर्ष उभे राहिले. ते कधी रस्त्यावरचे तर कधी वैचारिक पातळीवरील होते. वास्तविक ही त्यांच्या अस्मितेची लढाई होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या लढाईतील अस्मितापुरुष होते. त्यांच्या विचारकार्याला विकसित करण्याची प्रतिज्ञा दलित विचारवंतांनी घेतलेली होती. रिडल्स आंदोलन हे याच विचारलढयातील एक महत्त्वाचे आंदोलन होते. १९८७ रोजी महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे खंड ४ प्रकाशित केला. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांचा रिडल्स इन हिंदूझम हा ग्रंथ समाविष्ट करण्यात आला. यात रामायण आणि महाभारतातील नायक असलेल्या राम आणि श्रीकृष्ण यांच्याविषयी परखड चिकित्सा आलेली होती. ही मांडणी अनेक प्रस्थापित नेत्यांना खटकली. त्यांनी या खंडाचा विरोध केला. मा.गो.वैद्य आणि दुर्गाबाई भागवत यांनी या ग्रंथावर बंदी घालावी अशी मागणी केली. यातून सामाजिक तणाव वाढला. मुंबईत रिडल्स समर्थनार्थ विविध दलित नेत्यांनी परिषद भरवली. त्यात प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, राजा ढाले, नामदेव ढसाळ, अरुण कांबळे यांनी सहभाग घेतला. २३ नोव्हेंबर १९८७ रोजी मंत्रालयावर मोर्चा काढला. यात लाखो दलित समाज सहभागी झाला होता. अखेर समर्थक व विरोधक आणि सरकार यांच्यात विचारविनिमय होऊन ग्रंथाच्या खाली या ग्रंथात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र सरकार सहमत असेलच असे नाही. अशी तळटीप टाकण्याच्या तडजोडीवर हा वाद मिटला. या आंदोलनाच्या निमित्ताने दलितांमधील विचारवंतांची तात्त्विक भूमिका समोर आली. त्यामुळे हे आंदोलन दलित चळवळीला नवे वैचारिक परिमाण देऊन गेले.

### १.६.५ खैरलांजी लढा :

महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यात असलेल्या मोहाडी तालुक्यात असलेल्या खैरलांजी या गावात २९ सप्टेंबर २००६ मध्ये भोतमांगे या दलित कुटुंबातील चार लोकांची अमानुष हत्या करण्यात आली. हे हत्याकांड गावातील सवर्ण समाजाने सामुहिकरित्या केले. जातीय मानसिकतेचा कळस म्हणजे यामधील सुरेखा आणि प्रियंका यांच्यावर सामुहिक बलात्कार करण्यात आला. इतरांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. देशाच्या संसदेपर्यंत याचे पडसाद पडले. दलितांवरील अन्यायाची ही परिसिमाच होती. खैरलांजी घटनेच्या विरोधात देशभर दलितांची आंदोलने झाली. ठिकठिकाणी मोर्चे काढण्यात आले. घटनेच्या सात दिवसानंतर सवर्ण समाजातील लोकांवर ट्रॉसिटी दाखल करून गुन्हा दाखल करण्यात आला. १५ सप्टेंबर २००८ रोजी न्यायालयाने ८ आरोपींना दोषी ठरविले. विशेष न्यायालयाने सहा आरोपिंना फाशी तर दोघांना जन्मठेप सुनावली. मात्र हायकोर्टाने निर्णय बदलला व सर्वांना जन्मठेपेची शिक्षा दिली. या निर्णयाविरोधात सुप्रिम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली. दरम्यान या हत्याकांडातून बचावलेल्या भैय्यालाल भोतमांगे यांच्या पाठीशी संपूर्ण दलित समाज उभा राहिला. २०१७ मध्ये भैय्यालाल यांचे निधन झाले. अद्यापही दलित समाजाला न्याय मिळाला नाही. खैरलांजीच्या निमित्ताने परत एकदा निर्धारित झाले की प्रस्थापित समाजाची जातीय मानसिकता बदललेली नाही. या देशात दलितांवर सातत्याने अन्याय अत्याचार केले जातात. खैरलांजीनंतर जवखेडा, खर्डा, सोनई अशा ठिकाणी घडलेल्या घटनांनी हे सिध्द

केले. अशावेळी दलित समाज एकत्र रस्त्यावर उतरला. याविरुध्द आंदोलने, मोर्चे निघाले. परंतु पिडीतांना न्याय मिळाला नाही.

दलित चळवळीच्या इतिहासातील वरील आलेख लक्षात घेता दलित समुहांच्या अस्तित्वाची लढाई प्रारंभापासून लढली गेली. हजारो वर्षांची सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी ही चळवळी उभी राहिली. यात अनेकांनी आपले योगदान दिले. वेळप्रसंगी देहाचे बलिदान दिले. मात्र परिवर्तनाची चळवळ गतिमान ठेवली गेली. आजही आंबेडकरी चळवळ विकसित होत आहे. त्यात चढउतार आले. परंतु तिने आपले स्वतंत्र अस्तित्व राखले. दलित साहित्य चळवळीने या अस्तित्वाला नवा आयाम दिला.

## १.७ समारोप

दलित साहित्य हा आंबेडकरी अस्मितेचा वाङ्मयीन आविष्कार आहे. या प्रवाहची निर्मिती चळवळीतून झाली. दलित समाजाच्या उत्थानासाठी इतिहासात मोठा संघर्ष करावा लागला. हजारो वर्षांची जातीय मानसिकता मोडून टाकणे सहजासहजी शक्य झाले नाही. तरी सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक अधिष्ठानावर दलितांच्या चळवळीला निर्णायक रूप प्राप्त झाले. दलितांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक जागृती झाली. तो लिहू लागला. बोलू लागला. यातून दलित साहित्याचा आविष्कार घडला. ज्याने प्रस्थापित साहित्यव्यहाराला छेद दिला. नवे स्वतंत्र विश्व निर्माण केले. केवळ मराठीच नाही तर विविध भारतीय भाषा आणि जागतिक साहित्यामध्येही दलित साहित्याची चर्चा झाली. त्याचे अस्तित्व मान्य केले गेले. आज वैश्विक साहित्यात मराठी भाषेची जी ओळख निर्माण झाली आहे. त्यामध्ये दलित साहित्याचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

## १.८ संदर्भ ग्रंथ


- इंगळे, रामचंद्र : *महारांचा सांस्कृतिक इतिहास*, अभिजित प्रकाशन, नागपूर, १९८७.
- कुलकर्णी, गो.म. : *दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८६.
- किरवले, कृष्णा : *दलित चळवळ आणि साहित्य*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६.
- किरवले, कृष्णा : *आंबेडकरी शाहिरी : एक शोध*, नालंदा प्रकाशन, पुणे, १९९२.
- खरात, शंकरराव : *दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवत्ती*, इनामदार बंधु प्रकाशन, पुणे, १९७१.
- गारे, गोविंद: *महाराष्ट्रातील दलित : शोध आणि बोध*, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, १९७३.
- पानतावणे, गंगाधर : *पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८७.

- पानतावणे, गंगाधर : *वादळाचे वंशज,* प्रचार प्रकाशन, कोल्हापूर,
- मुरंजन, सुमंत: *पुरोहित वर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास*, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, १९७३.
- मेश्राम, योगेंद्र: *दलित साहित्य :उद्गम आणि विकास*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०११.
- वाघमारे, जनार्दन : *समाजपरिवर्तनाच्या दिशा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९५.
- सरदेसाई, एस. जी. : *भारतीय तत्त्वज्ञान: वैचारिक आणि सामाजिक संघर्ष*, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, १९८७.
- सुमंत, यशवंत व पुंडे, दत्तात्रय :*महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार*, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८८.
- क्षीरसागर, रा.का. : *भारतीय रिपब्लिकन पक्ष*, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९७९.


## १.९ पूरक वाचन

- म. जोतीराव फुले : गुलामगिरी
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : शूद्र पूर्वी कोण होते ?
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले ?
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : क्रांती आणि प्रतिक्रांती
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जातिव्यवस्थेचे निर्मूलन

## १.१० प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी :**

१. दलित चळवळीमागील सामाजिक वास्तव स्पष्ट करा.

२. आंबेडकरपूर्व चळवळीचे योगदान विशद करा.

३. आंबेडकरी चळवळीचे क्रांतिपर्व विशद करा.

४. दलित चळवळीचे सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करा.

५. दलित चळवळीतील आंबेडकरोत्तरपर्वाचे स्वरूप विशद करा.

**ब) लघुत्तरी / टिपा :**

१. आद्य दलित समाजसुधारक गोपाळबाबा वलंगकर यांचे कार्य लिहा.

२. शिवराम जानबा काबंळे यांचे वृत्तपत्रीय योगदान विशद करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनाचा आढावा घ्या.

४. चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व स्पष्ट करा.

५. दलितांच्या राजकीय चळवळीचे स्वरूप विशद करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. जातिव्यवस्था म्हणजे काय?

२. शिवराम जानबा कांबळे यांनी कोणते मासिक काढले?

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या वृत्तपत्राचे नाव काय होते?

४. डॉ. आंबेडकर यांनी बौध्द धम्माची दीक्षा कधी घेतली?

५. नामांतर लढा कोणत्या विद्यापीठासाठी लढला गेला?

*****

# १आ

# आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी चळवळी
# (सत्यशोधक चळवळ, स्त्री चळवळ, दलित पँथर चळवळ, युक्रांद चळवळ)

**घटक रचना**

१.१ उद्देश
१.२ प्रस्तावना
१.३ आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी चळवळींचे स्वरूप
१.४ सत्यशोधक चळवळ
१.५ स्त्री चळवळ
१.६ दलित पँथर चळवळ
१.७ युक्रांद चळवळ
१.८ समारोप
१.९ संदर्भ ग्रंथ
१.१० पूरक वाचन
१.११ प्रश्नावली

## १.१ उद्देश

- दलित साहित्याच्या जडणघडणीस पूरक ठरलेल्या इतर चळवळी लक्षात घेणे.
- सत्यशोधक चळवळीचे योगदान समजून घेणे.
- स्त्री चळवळीचा विचार करणे.
- दलित साहित्याला उर्जा देणाऱ्या दलित पँथर चळवळीचा विकास लक्षात घेणे.
- युक्रांत चळवळीचा आढावा घेणे.

## १.२ प्रस्तावना

मराठी साहित्यामध्ये साठोत्तरी काळात निर्माण झालेल्या सर्वच वाङ्मयीन प्रवाहांना चळवळीचे संदर्भ आहेत. विशेषत: एकोणिसाव्या शतकातील सामाजिक उत्थानाच्या

चळवळींचे संचित त्यामागे दडलेले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात १९ व्या शतकाला एक नव युग, नवा कालखंड म्हणून अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या काळात नव-सुशिक्षितांची पिढी उदयाला आली. शिक्षण, दळणवळणातील सुविधा आणि इतर सुधारणामुळे लोकांमध्ये समाजजागृती होऊ लागली. त्याबरोबरच राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागून आपला धर्म, तत्वज्ञान, साहित्य, इतिहास याविषयी चिकित्सक पद्धतीने लोक विचार करू लागले होते. यातूनच सामाजिक प्रबोधनाची चळवळ निर्माण झाली. या चळवळींनी सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडला. या काळात भारतीय धर्मचिकित्सा, साहित्यमीमांसा, समाजचिंतन मोठया प्रमाणात झाले. यातूनच नव्या वाङ्मयीन जाणिवांची निर्मिती झाली. दलित साहित्य हे चळवळीचे अपत्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या प्रवाहांचे उर्जाकेंद्र आहे. त्यांच्या विचार, कार्यातून दलित साहित्याचे अवकाश विस्तारले. हे सूर्यसत्य कोणीही नाकारू शकणार नाही. असे असले तरी आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर काळात काही समांतर परिवर्तनवादी चळवळीनी दलित साहित्याला विकसित करण्याचे कार्य केलेले आहे. त्यामध्ये सत्यशोधक चळवळ, स्त्री चळवळ, दलित पँथर, युक्रांत सारख्या चळवळींचे योगदान महत्त्वाचे आहे. या परिवर्तनवादी चळवळींचा विचार दलित साहित्याच्या संदर्भात लक्षात घेणे अगत्याचे ठरते. मात्र तत्पूर्वी आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी चळवळींचे स्वरूप समजून घेणे अगत्याचे ठरेल.

## १.३ आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी चळवळींचे स्वरूप

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे १८१८ मध्ये झालेल्या भिमाकोरगाव युध्दानंतर भारतात ब्रिटिश सत्तेचा एकछत्री अम्मल सुरू झाला. ब्रिटिशांनी प्रांरभी भारतातील विविध संस्थाने खालसा करून आपल्या ब्रिटिश सरकारची सुनियोजित यंत्रणा उभी केली. ब्रिटिशांच्या आगमनाने भारतातील जुन्या सर्व व्यवस्थांना छेद मिळाला. इथली राजेशाही नष्ट झाली. राजसत्तेच्या आधारे विस्तारलेली धर्मशाहीसुध्दा खिळखिळी होऊ लागली. ब्रिटिश सत्तेचा मोठा परिणाम म्हणजे भारतात आधुनिक जीवनशैली, संस्कृती आणि विचारांचा प्रचार व प्रसार मोठयाप्रमाणात झाला. यातून भारतीय राजव्यवस्था, समाजव्यवस्था आणि धर्मव्यवस्थांची चिकित्सा सुरू झाली. नव्या शिक्षणपध्दतीमुळे पाश्चात्य ज्ञान, विज्ञान आणि आधुनिक मूल्यांची ओळख नव्या पिढीला होऊन त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडायला सुरूवात केली.

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीमध्ये समाजसुधारकांचे काम अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामध्ये राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, लोकहितवादी, जोतीराव फुले, भाऊ दाजी लाड, भाऊ महाजन, न्यायमूर्ती रानडे, गो.ग.आगरकर, पंडिता रमाबाई, धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर या सारख्या समाजसुधारकांनी सामाजिक उध्दारासाठी विशेष प्रयत्न केले. या समाजचिंतकांनी विविध लेखांतून तत्कालीन समाजातील दोष उजागर केले. बालविवाह, विधवा विवाह, केशवपन, धार्मिक प्रथा याविषयी मांडणी केली. लोकहितवादींची शतपत्रे त्याचा अस्सल प्रमाणके आहेत. या सामाजिक प्रबोधनाच्या प्रयत्नांची नोंद घेत असताना याच्या मर्यादाही लक्षात घ्यायला हव्यात. हे सर्व प्रयत्न मध्यमवर्गीय समुहांच्या प्रश्नांपुरते बांधलेले होते. त्यामध्ये कुठेही अठरापगड जातीतील लोक, त्यांचे प्रश्न, ग्रामीण भागात जगणारे कष्टकरी समूह

यांच्या प्रश्नांची दखल घेतलेली दिसत नाही. याला काही अपवाद असतील परंतु त्यातही अपवादात्मकेतही अपवाद दिसतो.

समाजपरिवर्तनाच्या चळवळीमध्ये या कालखंडात निर्माण झालेल्या विविध समाजांचे संघटनात्मक प्रयत्न ही महत्त्वाचे आहेत. ब्राह्मो समाज (१८२८) प्रार्थना समाज (१८६७) सत्यशोधक समाज (१८७३) आणि आर्य समाज (१८७५) यांनी संघटना पातळीवरून समाजसुधारणेचे कार्य केलेले आहे. या समाजांच्या कार्यपध्दती आणि विचारशैली विषयी डॉ. अरुण शिंदे लिहितात, हे सर्व समाज एकेश्वरवादी होते. सर्व मानव ईश्वराची अपत्ये आहेत, ईश्वराची आराधना करण्यासाठी पुरोहितांची आवश्यकता नाही हे तत्त्व या चारही समाजांना मान्य होते, परंतु त्यांच्या दृष्टिकोनात काही मूलभूत तात्त्विक फरक होता. म. फुल्यांना कोणताही धर्मग्रंथ, धर्मसंस्था आणि समजासंस्था ईश्वरप्रणित आहे, असे वाटते नव्हते. सारे धर्मग्रंथ मनुष्यांनीच निर्माण केलेले आहेत., त्यांच्या भोवती ईश्वरी आज्ञेचे वलय उत्पन्न करून समाजाची वंचना केली जाते, असे त्यांचे प्रतिपादन होते. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि आर्य समाज यांची भूमिका या बाबतीत वेगळी होती. वेद हे ईश्वरनिर्मित ग्रंथ आहेत अशी त्यांची श्रध्दा होती. ब्राह्मो, प्रार्थना आणि आर्य समाजाचे संस्थापक वरिष्ठ वर्गातील ब्राह्मण जातीतील होते व त्यांचे सदस्यही बहुधा याच वर्गातील होते. त्यांचा सर्वसामान्य जनतेशी फारसा संबंध नव्हता. सामान्य माणसाशी समरस होऊन त्यांच्या समस्या सोडविण्यात त्यांना रस नव्हता. आध्यात्मिक समतेसाठी त्यांचे प्रयत्न असले तरी सामाजिक समतेच्या संदर्भात कृतीच्या पातळीवर उतरुन त्यांनी फारसे कार्य केल्याचे आढळत नाही. या तीनही समाजांच्या पार्श्वभूमीवर सत्यशोधक समाजाने खेडयापाडयांतील जनसामान्यांच्या मनात स्थान मिळविले तसेच त्यांच्या जाणिवांना, आकांक्षांना आकार दिला. आत्मोध्दाराची प्रेरणा दिली. धार्मिक आणि सामाजिक शोषणाविरुध्द बंड करण्याची प्रवृत्ती शूद्रातिशूद्रात निर्माण केली. (पृ.१३-१४) यावरून एकोणिसाव्या शतकातील समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे स्वरूप आपल्या लक्षात येते.

आंबेडकरपूर्व काळातील एकोणिसाव्या शतकात प्रबोधन चळवळीने अस्पृश्य समूहांच्या उत्थानासाठी प्रयत्न केले. जोतीराव फुले आणि सत्यशोधक चळवळीने दलित साहित्याच्या पायाभरणीत महत्त्वाची भूमिका पार पाडली. सत्यशोधकी जलसे त्याचे प्रमाणक आहे. यातूनच पुढे आंबेडकरी जलसे, दलितांची वृत्तपत्रे, नियतकालिके निघाली. दलित साहित्याला नवी दिशा मिळाली. हे सर्व पूर्वसंचित महत्त्वाचे असून याचा विस्ताराने आढावा घेणे गरजेचे आहे.

## १.४ सत्यशोधक चळवळ

आंबेडकरपूर्व काळामध्ये दलित साहित्याला पोषक ठरलेली एक महत्त्वाची प्रबोधन चळवळ म्हणजे सत्यशोधक चळवळ होय. जोतीराव गोविंदराव फुले हे या चळवळीचे प्रवर्तक आहेत. आधुनिक सत्यशोधक म्हणून त्यांचे नाव क्रांतदर्शी आहे. भारताच्या इतिहासात तथागत बुध्द यांनी सर्वप्रथम सत्याचा शोध घेतला. विज्ञाननिष्ठ जीवनसत्य शोधून काढले. आर्यसत्याचा सम्यक सिध्दांत मांडला. हा सत्यशोधकाचा वारसा बुध्दापासून जोतीरावांपर्यंत उत्कांत होत आलेला आहे. दरम्यानच्या काळात बुध्दाच्या क्रांतीला छेद देणारी प्रतिक्रांती निर्माण झाली. असत्याचे साम्राज्य निर्माण झाले. मात्र एकोणिसाव्या

शतकात जोतीरावांनी सामाजिक क्रांतीसाठी ऐतिहासिक कार्य केले. त्यांनी आपल्या जीवनकार्यातून सामाजिक कर्तेपण सिध्द करत असतानाच आपल्या ग्रंथनिर्मितीमधून चिंतनशील, वस्तुनिष्ठ, ऐतिहासिक व वैचारिक मांडणी केली. सत्यशोधक जोतीराव फुले हे लोकांचे लेखक होते. यांचे समग्र साहित्य सामाजिक प्रबोधनाचा वारसा मांडणारा दस्तऐवज आहे. (भास्कर लक्ष्मण भोळे, १९९६, पृ.२३) यातूनच सत्यशोधक चळवळ विकसित झालेली आहे. सत्यशोधक म्हणजे सत्यविचाराचा पाईक असलेला, सत्याचा सतत शोध घेणारा, सत्यशोधक वृत्ती जपणारा होय. असा सत्यशोधक या चळवळीचा कार्यकर्ता होता.

सत्यशोधक चळवळीने ब्राह्मणशाही आणि भटशाही यांच्या विरूध्द आवाज उठविला. धर्माच्या नावावर बहुजन समाजाचे शोषण करणारी ब्राह्मणशाही कशी आहे. याचा सम्यक शोध फुल्यांनी घेतलेला आहे. जोतीरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करताना तत्कालीन समाजाला नवा पर्याय दिला. जो समतामूलक होता. मानवी जीवनाला सम्यक दिशा देणारी तत्त्वे यामध्ये होती. तो एक सांस्कृतिक पर्यायही होता. या समाजाने जी नवीन जीवनपध्दती सांगितली. यातून ब्राह्मणी धर्माला छेद देण्यात आला. अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, रूढीपरंपरा, जातीभेद यापेक्षा ज्ञान, विज्ञान आणि सत्यावर आधारित जीवनसूत्रे जोतीरांवानी मांडली. त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये आधी केले मग सांगितले अशी रचना होती. त्यामुळेच जोतीरावांना कर्ते सुधारक म्हटले जाते. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर याची सत्यशोधकांची जीवनपध्दती मांडण्यात आली. तिला नैतिक अधिष्ठान दिले. आयुष्याच्या शेवटी सार्वजनिक ‘सत्यधर्म’ या ग्रंथाच्या रूपाने याची सैध्दांतिक मांडणी केली. जी सत्यशोधक समाजाला मार्गदर्शक ठरली. त्यामुळे या ग्रंथाची मौलिकता सत्यशोधक विचार, साहित्य व समाजाची मार्गदर्शिका म्हणून महत्त्वपूर्ण ठरणारी आहे.

सत्यशोधक चळवळ ही सामाजिक बंधुता व स्वातंत्र्य हे विचार रुजवण्यासाठी या काळात पूरक होती. सर्व जाती-धर्माच्या लोकांना विचारमंच उपलब्ध व्हावा व समाजजागृतीचे कार्य व्हावे हा यामागील हेतू होता. सत्यशोधकी विचारातून बहुजन समाजात जागृती घडवून आणणे, जातिभेद कमी करणे या प्रकारचा विचार जोतीराव फुले व त्यांच्या समकालीन समाज सुधारकांनी मांडला. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन करू खऱ्या अर्थाने ब्राह्मणेतर चळवळीस व्यापक रूप दिले आहे. शूद्रातिशूद्राची स्थिती सुधारण्यासाठी महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर,१८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे होय. जोतीराव फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' या दोन पुस्तकात सत्यशोधक समाजाबद्दलचे आपले विचार मांडले आहेत. 'सर्व साक्ष जगत्पती l त्याला नकोच मध्यस्ती l' हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते. या सत्यशोधक समाजाने अनेक ठिकाणी आपल्या शाखा स्थापन केल्या. पुरोहिताशिवाय लग्न लावण्यासाठी मंगलाष्टके मराठीत रचली. तसेच या समाजाद्वारे उभारण्यात आलेला लढा हा सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक गुलामगिरी विरुद्धचा लढा होता. या सत्यशोधक विचारामुळे आणि त्यांच्या कार्यामुळे स्वार्थ निरपेक्ष कार्यकर्त्यांची नवी पिढी उदयास आली. जोतीरावांची धर्मचिकित्सा परखड, वस्तुनिष्ठ आणि बहुआयामी होती. त्यामध्ये एकांगीपणा नव्हता. अनुभवनिष्ठ अशी तर्कशील मांडणी यात पाहावयास मिळते. या ग्रंथामध्ये त्यांनी समाजातील धर्मविषयीची मतमतांतरे मांडलेली आहेत. विशेषत: धर्माबाबत असलेले लोकांचे गैरसमज ते उदाहरणासह विशद करतात.

सत्यशोधक चळवळीने शेतकरी, कष्टकरी, कामगार, बहुजन, दलित वर्गापासून सामान्य जनसमुदायाने उत्स्फूर्तपणे कार्य केले. सत्यशोधकांनी ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामाण्य मानण्यास नकार दिला. प्रत्येकाने व्यक्तिगत बुद्धीने संशोधन करावे, असा त्यांनी आग्रह धरला. पोथीवाद नाकारून बुद्धिवादाचा पुरस्कार केला. सत्यशोधक चळवळीने धार्मिक व सामाजिक उत्थानाच्या कृतिकार्यक्रमाबरोबरच शिक्षणाच्या प्रसारावर सर्वाधिक भर दिला. म. फुले यांनी हंटर आयोगापुढे कनिष्ठ वर्गातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याची मागणी केली होती. सत्यशोधक समाजाच्या प्रत्येक परिषदेमध्ये मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचे ठराव केले जात होते. सत्यशोधकांनी प्राथमिक शिक्षणाकडे समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले. लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन मुलामुलींना शिक्षण देण्यासाठी जागृती केली. सत्यशोधक चळवळीच्या प्रेरणेतून 'मराठा शिक्षण परिषद', 'रयत शिक्षण संस्था' यांसारख्या ध्येयवादी शिक्षणसंस्था सुरू झाल्या. त्यांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसाराचे फार मोठे कार्य केले. सत्यशोधक चळवळीने भांडवलशाहीला विरोध केला. सरकार, सरकारी नोकर, सावकार, व्यापारी व भटजी यांच्याकडून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आर्थिक शोषणाचे स्वरूप स्पष्ट करून सत्यशोधक चळवळीने त्याविरुद्ध लढे उभारले. नियतकालिकांनी शेतकऱ्यांचे प्रश्न धसास लावले. म. फुले यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ स्त्री-शिक्षणापासून केला. सत्यशोधक चळवळीच्या मुशीतून आधुनिक भारतातील पहिल्या स्त्रीवादी लेखिका ताराबाई शिंदे, संपादिका श्रीमती तानुबाई बिर्जे, महिला प्रकाशिका रत्नम्माबाई अय्यावारू, सत्यशोधक समाजाच्या सेक्रेटरी सावित्रीबाई रोडे यांच्यासारख्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिला निर्माण झाल्या.

सत्यशोधक चळवळीच्या प्रसारासाठी प्रबोधनपर वाङ्मय निर्माण झाले. त्यामुळे बहुजन समाजातून लेखक, अभ्यासक व वाचकांचा वर्ग उदयाला आला. सत्यशोधक जलसे, कीर्तनकार, फिरते प्रचारक, वक्ते यांनी प्रबोधनपर विचार महाराष्ट्रभर पसरवला. सत्यशोधक चळवळीच्या प्रचार-प्रसाराच्या भूमिकेतून नियतकालिके सुरू झाली. बहुजन समाजात ध्येयनिष्ठ व परिवर्तनवादी पत्रकारितेची दर्जेदार परंपरा निर्माण झाली. सत्यशोधक चळवळीने अठरापगड जातीतील सामान्य माणसांमधील 'स्वत्व' जागे केले. त्यांच्यामधून समर्थ लेखक, संपादक, शास्त्री, पंडित, शिक्षणतज्ज्ञ, संघटक, नेते, प्रचारक, कार्यकर्ते, कीर्तनकार, जलसाकार आदी कर्तृत्ववान व्यक्तींची पिढी निर्माण केली. त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया घातला. बहुजन समाजाच्या उत्थानाचे पर्व सुरू झाले. एकोणिसाव्या शतकातील बहुतांश वृत्तपत्रे 'ब्राह्मणी पत्रे होती. ती पक्षपाती असून ती आपल्या जातीच्या लोकांविरुद्ध लिहीत नाहीत. ती शूद्रातिशूद्रांचे खरे प्रतिनिधित्व करत नाहीत', असा म. फुल्यांचा आक्षेप होता. 'निबंधमाला', 'विविधज्ञानविस्तार' या पत्रांनी म. फुले व सत्यशोधक समाजाच्या विचार व कार्याचा विपर्यास करून निंदामूलक, गैरसमज पसरवणारी बेताल टीका केली. त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या विचाराचा प्रचार करण्यासाठी व विरोधकांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी एखादे पत्र असावे, असे सत्यशोधक मंडळींना वाटू लागले. या पार्श्वभूमीवर कृष्णराव भालेकर यांनी १ जानेवारी १८७७ रोजी 'दीनबंधु' हे सत्यशोधक समाजाचे पहिले नियतकालिक सुरू केले. 'दीनबंधु'पासून बहुजन समाजाच्या पत्रकारितेची परंपरा सुरू झाली. सत्यशोधक चळवळीच्या प्रचार-प्रसाराच्या हेतूने १८७७ ते १९३० या काळात सुमारे साठ नियतकालिके निघाली. त्यामुळे बहुजन समाजाच्या ध्येयवादी, प्रबोधनपर, समाजनिष्ठ पत्रकारितेचे नवे पर्व सुरू झाले. सत्यशोधक

चळवळीच्या नियतकालिकांतून समकालीन घटना, घडामोडी, बातम्या, वृत्तसार, अग्रलेख, वैचारिक व स्फुट लेख, कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी ललित वाङ्मय, सत्याशोधक-ब्राह्मणेतर परिषदांचे वृत्तांत, नेत्यांची भाषणे, समाजजागृतीचे कार्य, विरोधकांचा समाचार, बाजारभाव, जाहिराती वगैरे मजकूर प्रसिद्ध होत असे. नियतकालिकांनी सत्यशोधक चळवळीचे विचारकार्य आणि प्रबोधनपर वाङ्मय सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवले.

एकुणच सत्यशोधक चळवळ ही एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन विचारांचा महत्त्वाचा परिपाक आहे. या चळवळीने दलित, शोषित, वंचित, स्त्रीवर्गांच्या उत्थानासाठी तन, मन, धन, लेखनाच्या माध्यमातून कार्य केलेले आहे. या सत्यशोधक चळवळीतूनच विविध दलित लेखकांना उर्जा मिळाली. 'अस्पृश्यता निर्मूलन' हे सत्यशोधक चळवळीचे अंगीकृत कार्य होते. जन्माधिष्ठित उच्चनीचत्व व जातिभेदावर सत्यशोधक चळवळीने कठोर हल्ले चढवले. दलित चळवळीचे प्रारंभीचे पुढारी गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागुजी बनसोडे वगैरे सत्यशोधक चळवळीशी जवळून निगडित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळीला सत्यशोधकांनी सक्रिय पाठिंबा दिला. सवर्ण-दलितांमधील दरी कमी केली. सत्यशोधक चळवळीने दलितांच्या मुक्तिलढयाचा पाया घातला. सत्यशोधक चळवळीने सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मानवाच्या सर्वंकष मुक्ततेचा आग्रह धरला. स्वातंत्र्याची संकल्पना राजकीय क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. सत्यशोधकांनी ती धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक वगैरे जीवनाच्या सर्वांगांपर्यंत विस्तारली. राजकीय स्वातंत्र्यापेक्षा जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक स्वातंत्र्याचा आग्रह धरला. (अरुण शिंदे, पृ.११) यावरून आंबेडकरपूर्व काळातील प्रबोधन चळवळीमधील सत्यशोधक चळवळीचे महत्त्व अधोरेखित होते.

## १.५ स्त्री चळवळ

भारताच्या इतिहासात स्त्री चळवळीचे स्वतंत्र दालन आहे. स्त्रीयांचे हक्क, अधिकार आणि अस्तित्वासाठी चालविलेला लढा म्हणून स्त्री चळवळीला ओळखले जाते.  या चळवळीच्या निर्मितीमागे हजारो वर्षांची परंपरा आहे. भारतीय समाज जीवनात स्त्रीला स्वतंत्र स्थान नव्हते. तिला समाजव्यवस्थेच्या सर्वात खालच्या पातळीवर ठेवण्यात आले होते. असे असले तरी प्राचीन काळापासून स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी विविध टप्प्यांवर प्रयत्न झालेले आहेत. विशेषत: तथागत बुध्दांनी आपल्या संघामध्ये स्त्रीयांना स्थान दिले. त्यांचा स्वतंत्र भिक्खूनी संघ स्थापन केला. यातून स्त्रीचे स्वतंत्र स्थान अधोरेखित झाले. परंतु बुध्दोत्तर काळात प्रतिक्रांतीमध्ये स्त्रीला गुलाम म्हणून तिच्यावर बंधने लादली. मनुस्मृतीसारख्या ग्रंथातून तर स्त्रीची अवहेलना करण्यात आली. स्त्रीला चूल आणि मूल या वर्तुळात बंधिस्त करण्यात आले. पुढे मध्ययुगीन काळात काही संप्रदायात स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व बहाल केले. परंतु त्यालाही मर्यादा होत्या. एकोणिसाव्या शतकात खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळीला सुरुवात झाली. या काळात निर्माण झालेल्या सामाजिक सुधारणांच्या चळवळीने स्त्री प्रश्नांचा विचार केला.

जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी खऱ्या अर्थाने स्त्री चळवळीला चालना दिली. जोतीरावांनी स्त्रीशिक्षणाची सुरुवात केली. तिला लेखनासाठी प्रेरित केले. यातूनच मुक्ता

साळवे, फातिमा शेख, ताराबाई शिंदे या लेखिका उदयास आल्या. या सर्व सत्यशोधकी लेखनकार्यातूनच स्त्री चळवळीची प्रबुध्द वाट विकसित झाली. विविध सामाजिक चळवळींच्या माध्यमातून स्त्रीसुधारणांचे प्रयत्न झाले. यातून स्त्रीयांना आत्मभान मिळत गेले. विसाव्या शतकात स्त्री चळवळीला निर्णायक दिशा मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्रपणे स्त्रीयांच्या हक्क आणि अधिकाराविषयी चळवळ उभारली. विशेषत: स्त्रीयांच्या जीवनाला नैतिक, सांविधानिक अधिकारांविषयी जाणीव निर्माण करून दिली. नव्या ज्ञानाबरोबरच पाश्चात्य विचारांची ओळख होऊन स्त्री चळवळीचा वैचारिक दिशा मिळाली. यातूनच स्त्रीवादी विचारधारा उदयास आली. स्त्रीवाद हा एक राजकीय विचार आहे.

सामान्यत: १८२० ते १९५० या काळात स्त्री प्रश्नांशी निगडीत चळवळीविषयी गेल आम्वेट लिहितात, हया काळात मुख्यत: चार चळवळी निर्माण झाल्या. त्यामध्ये १) सामाजिक सुधारणेची चळवळ, २) जातिविरोधी चळवळ, ३) स्वतंत्र स्त्रियांची चळवळ, ४) कम्युनिस्ट व समाजवादी नेतृत्वाखाली उभी राहिलेली स्त्री चळवळ यांचा समावेश होतो. या चळवळींच्या यशापयशाची मीमांसा डॉ. गेल ऑम्वेट हयांनी पुढीलप्रमाणे केले आहे. त्यांच्या मते, सामाजिक सुधारणेच्या चळवळीत उदारमतवादी स्त्रीवादाची बीजे होती पण हिंदु पुनरूज्जीवन वादाने भारलेल्या सनातन सुधारणावादाने त्यावर मात केली. ब्राह्मणेत्तर चळवळ ही एक नवा अभिजन वर्ग उभरण्याच्या धडपडीत हिंदू समाजातील जातिसंस्था आणि लिंगभाव संबंध (जेंडर रिलेशन) हयांना खरेखुरे पर्याय देऊ शकली नाही. स्वतंत्र स्त्रियांच्या चळवळीतून केवळ अभिजन वर्गातील स्त्रीच्या प्रश्नांना वाचा फुटली. तीही उदारमतवादी स्त्रीवादी परंपरेतून. गांधीजींमुळे स्त्रिया राष्ट्रीय चळवळीत आल्या तरी मूलत: स्त्रीवादी प्रश्नांना तेव्हाही वाचा फुटली नाही. डाव्या चळवळीतील यांत्रिक भौतिकवादी मार्क्सवादामुळे समाजवादी स्त्रीवादाचा उदय होऊ शकला नाही. (परामर्श, मे १९८९)

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांना अधिकार मिळाले. विशेष सवलती, आरक्षण, सुविधांमुळे स्त्रियांमध्ये आधुनिक मूल्याविचार रूजायला सुरूवात झाली. साठोत्तरी काळात निर्माण झालेल्या विविध प्रवाहातून स्त्री लेखन आविष्कृत झाले. ऐंजीच्या दशकात पाश्चात्य स्त्रीवादी चळवळीच्या धरतीवर भारतात आधुनिक स्त्रीवादी चळवळीला सुरूवात झाली. एकविसाव्या शतकात स्त्री चळवळीने नव्या दिशेने वाटचाल सुरू केलेली आहे.

एकुणात स्त्री चळवळीचे फलित काय? असा विचार करता स्त्री चळवळीने स्त्री ही एक स्वतंत्र माणूस आहे. तिचेही स्वतंत्र अस्तित्व आहे. तिला ही माणूस म्हणून स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे. याची मांडणी केली. स्त्रियांच्या जीवनातील सर्व अनिष्ट प्रथा, रूढी परंपरा आणि सामाजिक मानसिकता नष्ट व्हायला हव्यात. यासाठी स्त्री चळवळीने विशेष प्रयत्न केले. सर्व जाती समूहातील स्त्रीया एक असून स्त्री म्हणून त्यांचे वेगळेपण गृहीत धरले पाहिजे. याचा विचार स्त्री चळवळीने केला.

## १.६ दलित पँथर चळवळ

भारताच्या इतिहासात आंबेडकरोत्तर काळात निर्माण झालेली अतिशय महत्त्वाची चळवळ म्हणजे दलित पँथर चळवळ होय. १९७२ मध्ये दलित पँथर या लढाऊ संघटनेची स्थापना करण्यात आली. राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, भाई संगारे, अविनाश महातेकर या दलित जहाल तरुणांनी आपल्या हक्क आणि अधिकारासाठी रस्त्यावरील लढाई करण्यासाठी अमेरिकन ब्लॅक पँथर या संघटनेच्या धरतीवर दलित पँथर चळवळ सुरू केली.

दलित पँथर चळवळीच्या निर्मितीमागे तत्कालीन काळाचे संदर्भ आहेत. याविषयी डॉ. राजेंद्र गणोरकर लिहितात, १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसोबत बौध्द धम्माची दीक्षा घेतली. हे केवळ धर्मांतर नव्हते त ते मोठे मन्वंतर होते. पारंपरिक, बुरसटलेल्या व जीर्ण झालेल्या विषमतावादी मूल्यांना नकार देत त्या जागी समतावादी, मानवतावादी मूल्यांची प्रतिष्ठापना हया ऐतिहासिक धर्मांतरानंतर सुरू झाली. हया घटनेमुळे दलित समूहाच्या जीवन आणि जाणिवांमध्ये मोठा बदल झाला. हया बदलासोबत दलितांच्या अभिव्यक्तीलाही धार आली. शिक्षणाने दलित समूहामध्ये आत्मचेतना जागृत झाली. हे बदल जीर्ण मानसिकतेच्या उच्च वर्णियांना मानवणारे नव्हते. पिढयानपिढया जे दास्य दलितांनी निमूट पत्करले होते ते पुढेही काय रहावे या साठी दहशत आणि दंडेलीचे तंत्र उच्च वर्णियांनी मोठया प्रमाणात सुरू केले. यातूनच दलित समुहांवर बहिष्कार टाकणे, त्यांना चाबकाने फोडून काढणे, त्यांचे डोळे फोडणे, जिव्हा छाटणे, जीवे मारणे, धिंड काढणे वगैरे अमानुष छळ प्रकार यात मोठया प्रमाणात वाढ झाली. दलित स्त्रियांवरील बलात्काराच्या घटना देखील वाढू लागल्या. १९७० च्या आसपास हे प्रकार विशेष गंभीर होते. पण या असहाय्य दलित समूहाच्या बाजूने कुणीही नव्हते. रिपब्लिकन पक्ष दुभंगून गायकवाड गटाने काँग्रेस पक्षाशी तर खोब्रागडे गटाने विरोधी पक्षाशी जुळवून घेऊन सत्ताकाण आरंभिले होते. त्या पक्षीय नेतृत्वांकडून दलित समूहाला कुठलीही आशा उरली नव्हती. शिवाय सरकार आणि पोलीस देखील अत्याचारांच्या घटनांकडे साफ दुर्लक्ष करीत होते. यामुळे नवशिक्षित दलित तरुण अस्वस्थ झाला होता. त्यातच दलित अन्याय – अत्याचाराची स्थिती सांगणारा पेरुमल कमिटीचा रिपोर्ट आला. या रिपोर्टने एकच हल्लकल्लोळ केला. दलितांवरील भीषण अत्याचाराची नोंद करणाऱ्या हया रिपोर्टने दलित अत्यांचारांच्या भीषणतेवर जणू शिक्कामोर्तब केले. त्याच वेळेस पुण्याजवळील बावडा या गावी गावकऱ्यांनी दलित बौध्दांचे तेल, मीठ आणि पाणी बंद करून बहिष्कार टाकला, तर मराठवाडयातील ब्राह्मणगावामध्ये एका दलित महिलेची नग्न धिंड काढण्यात आली. यामुळे दलित युवकांच्या असंतोषाचा स्फोट झाला. यातूनच दलित पँथर जन्माला आली. (प्रस्तावना, पृ.५-६) दलित पँथर चळवळीची निर्मिती सामाजिक गरजेतून झालेली होती. दलितांवरील होणाऱ्या अन्याय-अत्याचारविरोधी हा बुलंद आवाज होता. जो क्रांतिकारक चळवळीला आयाम देणारा ठरला.

दलित पँथरची उर्जा डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. आंबेडकरी विचारक्रांतीने भारलेले दलित तरुण पँथरच्या माध्यमातून नव्या दिशेने मार्गक्रम झाले. या दिशेला विशिष्ट भूमिका होती. जी दलित साहित्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीला पूरक ठरली. पँथरच्या भूमिकेविषयी पँथरचे संस्थापक लिहितात, दलितांचा मुक्तीलढा सर्वंकष क्रांती

इच्छितो. भागश: बदल आम्हाला नको. आम्हाला आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक वरिष्ठ स्थानावर आमचे प्रभुत्व स्थापन करावे लागेल. आता आम्ही अल्पसंतुष्ट राहणार नाही. आम्हाला ब्राह्मण आळीत जागा नको, आम्हाला साऱ्या देशाचे राज्य पाहिजे. आमचे लक्ष्य केवळ व्यक्ती नसून व्यवस्था आहे. ह्दय परिवर्तनाने, शिक्षणातील उदारमतवादी आमच्यावरील अन्याय, आमचे शोषण थांबणार नाही. आम्ही क्रांतिकारक समुह जागे करू, संघटित करू. या प्रचंड समुहातील संघर्षापासून क्रांतीची लाट येईल, सनदशीर अर्ज, विनंत्या, सवलतीच्या मागण्या, निवडणुका, सत्याग्रह यामधून समाज बदलणार नाही. आमच्या समाजक्रांतीच्या कल्पना व बंड या कागदी जहाजाला पेलणार नाहीत, त्या मातीत रुजतील, त्या मनात खुलतील, पोलादी वाहनातून सनसनत अस्तित्वात येतील. (डॉ. गणोरकर, पृ.६) पँथर चळवळीची भूमिका परखड व जहाल होती. त्यामध्ये स्पष्टता आणि सरळपणा होता. त्यामुळेच दलित पँथर चळवळीने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

दलित पँथर चळवळीची निर्मिती, भूमिका याबरोबरच तिची कार्यपध्दती सुध्दा महत्त्वाची आहे. पँथरची कार्यप्रणाली आक्रमक होती. जशास तसे या उक्तीप्रमाणे पँथरने रस्त्यावरचा लढा उभा केला. खेडयापाडयात जिथे जिथे दलितांवर अन्याय अत्याचार होतील. तेथे जाऊन पँथरने अत्याचार करणाऱ्यांना प्रतिउत्तर दिले. दलित पँथर विराट मोर्चे काढत, वादळी सभा घेत, प्रस्थापितांवर जहाल टिका करत, बुलंद घोषणा देत, विरोधकांना प्रती आव्हान करत त्यामुळे पँथरने आपल्या कार्याला आक्रमक रूप दिले. प्रसंगी लाठया-काठया खालल्या, तुरुंगात जावे लागले तरी कशाची ही पर्वा न करता आंदोलने यशस्वी करून दाखविली. यातून या चळवळीची धमक सर्वांच्या लक्षात आली. मुंबई हे पँथरचे केंद्र होते. याठिकाणी पँथरची चळवळ जोरात होती. त्याबरोबरच औरंगाबाद, पुणे, नाशिक आणि महाराष्ट्रातील जिल्ह्याजिल्ह्यातही पँथरच्या शाखा निघाल्या. पँथर चळवळीच्या माध्यमातून रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप, मराठवाडा नामांतर प्रश्नाबाबतचा दिल्ली येथील भव्य मार्चा, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठीची आंदोलने, गावोगावी होणाऱ्या अत्याचाराविरोधातील आंदोलन पँथरने केली. याचा क्रांतिकारक इतिहास आहे.

पँथरने दलितांच्या हक्काचा यल्गार पुकारला असला तरी काही प्रसंगी प्रखर आक्रमतेमुळे अनिष्ट गोष्टी घडल्या, ज्या पुढे दलित पँथरच्या विघटनाला कारणीभूत ठरल्या. १९७७ रोजी दलित पँथर ही संघटना बरखास्त करण्यात आली. याविषयी अनेक अभ्यासकांनी मांडणी केलेली आहे. त्यामध्ये पहिले कारण म्हणजे आंबेडकरवाद की मार्क्सवाद हा वैचारिक पेच होय. त्यामध्ये राजा ढाले हे आंबेडकरवादाची भूमिका घेऊन पँथरला पुढे घेऊन जाऊ इच्छित होते. तर नामदेव ढसाळ यांनी मार्क्सवादाचा पुरस्कार करत जातीय लढयापेक्षा वर्गीय संघर्षाला प्राधान्य देत होते. या पेचातून पँथरचे विघटन झाले असे सांगितले जाते. दुसरे कारण हे दलित पँथर चळवळीतील नेतृत्वातील हेवेदावे, हव्यास, अहंकार, आरोप- प्रत्यारोप आहेत. कोणत्याही चळवळीमध्ये या गोष्टी येतात. परंतु दलित पँथरच्या बाबतीत याचा अतिरेक झाल्याचे बोलले जाते. काहींनी ते उघडपणे लिहिलेले आहे.परंतु या विघटन नाटयाची तिसरी बाजू महत्त्वाची आहे. ती म्हणजे दलित पँथरचा झंझावात या देशातील प्रस्थापित व्यवस्थेला खटकत होता. पँथरची आक्रमकता त्यांना सहन होत नव्हती. पँथरच्या कार्यपध्दतीची दहशत राजकीय, सामाजिक जीवनावर होती. याचा परिणाम म्हणजे पँथरविरोधी शक्तींनी जाणीवपूर्वक प्रयत्न करून पँथरच चळवळीचे विघटन घडवून आणले. ही वास्तविकताही नजरेआड करून चालणार नाही. असे असले

तरी दलित पँथर चळवळीचा कालखंड हा दलित चळवळीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून सातत्याने लक्षात घ्यावा लागतो.

दलित पँथरच्या बरखास्तीनंतर १९७७ ते १९९० च्या काळात भारतीय दलित पँथरची वाटचाल सुरू झाली. प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, एस.एम.प्रधान, प्रितमकुमार शेगावकर, दयानंद मस्के, अनिल गोंडाणे यांनी या संघटनेला विकसित केले. विविध आंदोलने, परिषदा, संमेलने, व्याख्यानांच्या माध्यमातून पँथर विचाराला पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. तोही अतिशय महत्त्वाचा आहे.

दलित पँथरच्या चळवळीने दलित साहित्याला नवा आयाम मिळाला. विद्रोहाचे स्वरूप प्राप्त झाले. कारण पँथर चळवळीतील सर्व नेते हे कवी, लेखक, विचारवंत होते. दलित या संकल्पेतील विद्रोही आविष्कार त्यांनी आपल्या लेखनातून मांडला. यातून दलित साहित्याला विद्रोह, विज्ञान आणि विश्वात्मकतेचे नवे परिमाण प्राप्त झाले.

## १.७ युक्रांद चळवळ

युक्रांद म्हणजे युवक क्रांती दल होय. १९६७ साली पुणे येथे महाविद्यालयीन तरुणांनी एकत्र येऊन या संघटनेची सुरुवात केली. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राममनोहर लोहिया यांच्या विचारांना केंद्रवर्ती मानून युक्रांदने आपली कार्यपध्दती निर्धारित केली. वर्गमुक्ती, जातमुक्ती आणि पुरोगामी विचारांचा समाज निर्माण करण्याचे त्यांचे ध्येय होते. या दलामध्ये कुमार सप्तर्षी, अजित सरदार, शांताराम पंदेरे, सुभाष लोमटे, रंगा राचुरे, हुसेन दलवाई, मधु मोहिते, नलिनी पंडित, रत्नाकर महाजन असे काही प्रमुख नेते होते. तर सुधीर बेडेकर, कुमार शिराळकर, अनंत फडके, दीनानाथ मनोहर, अशोक मनोहर, विक्रम कान्हेरे, भारत पाटणकर, छाया दातार हे त्याचे सदस्य होते. या सर्वांनी युक्रांद चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली.

युक्रांद ही महाविद्यालयीन तरुणांचे संघटन असल्यामुळे कॉलेज आणि विद्यापीठ पातळीवरील विविध प्रश्न त्यांनी हाताळले. महाविद्यालयीन फी, शिष्यवृत्ती, विद्यापीठीय घडामोडी यांच्याविषयी रस्त्यावर आंदोलन करणे, मोर्चे काढणे, घोषणा देणे, निवेदने देणे अशा प्रकारची युक्रांदची कार्यपध्दती होती. याबरोबरच युक्रांदने धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातही कार्य केलेले आहे. डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आपल्या जीवनात युक्रांदच्या माध्यमातून मोठे काम केलेले आहे. त्यांनी राशीन येथे केलेला राशीन कम्युन हा प्रयोग अभूतपूर्व होता. राज्यातील विविध मागातील कार्यकत्यांनी राशीन येथे जाऊन दलित वस्तीत राहणे, त्यांची जनजागृती करणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे इत्यादी कामे केलेली आहेत. याविषयी शाजी जोसेफ लिहितात, मार्क्स, गांधी, फुले व आंबेडकरांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन युक्रांदन इतर डाव्या पक्षांप्रमाणेच गावातील विषम जमीन मालकीचा निषेध करत ग्रामणी भारतात समग्र जमीन वाटपासाठी आग्रह धरला. सुरुवातीस राममनोहर लोहियांच्या समाजवादी विचारांकडे आकृष्ट झालेले युक्रांदचे नेतृत्व नंतर मार्क्सवाद व दलित भूमिकेतून त्याच्या परिणामकारकतेबद्दल साशंक बनले. युक्रांदच्या टीकेचा रोख दोन स्तरांवर होता. एक, तो मुख्यप्रवाही समाजवादी पक्षांवर होता,ज्यांनी जातीय शोषणाचे स्वरूप तर समजून घेतले परंतु समाजाच्या पुनर्रचनेच्या राजकीय रणनीतीत त्याला

समाविष्ट केले नाही. दोन, बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाने सत्ता समीकरण बदलण्यासाठी निवडणुकीच्या राजकारणाचा पुरस्कार केला. युक्रांदच्या मते, यामुळे खऱ्या क्रांतीच्या उद्दिष्टांकडे यांत्रिक दृष्टिकोनातून पाहण्यात आले. युक्रांदला सर्व स्तरांवरील संघटनात्मक कामांमध्ये सहभागी लोकशाही अभिप्रेत होती. त्यामुळे विषयांची सखोल चर्चा व वाद विवादांवर आधारलेल्या सामूहिक निर्णय प्रक्रियेचा युक्रांदच्या नेतृत्वाने आग्रह धरला. (समाज प्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून २००६, पृ.१४५) युक्रांदच्या कार्यामध्ये दलित पँथरबरोबरील आंदोलने, नामांतर लढयातील भूमिकांचा समावेश होतो.

इ.स. १९७५ ते १९८० च्या पाच वर्षांच्या कालखंडात अविस्मरणीय घटना घडल्या. आणीबाणी १९७६ मध्ये लागू झाली. भाषणस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, विहारस्वातंत्र्य यावर बंदी आली; पण त्याच काळात इंदिराजी गांधी यांनी २० कलमी कार्यक्रम जाहीर केला. त्यात गरिबांना रोजगार, सावकारीपासून मुक्तता, गरिबांना घरे असे कार्यक्रम होते. युक्रांदने हा कार्यक्रमही राबवण्यास सुरुवात केली; पण युक्रांदचा आणीबाणीला कट्टर विरोध होता. २६ जूनला आणीबाणी जारी केल्यावर ताबडतोबच अनेकांना अटक झाल्या होत्या. डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. रत्नाकर महाजन, डॉ. अरुण लिमये, विजय दर्प, अजित सरदार आदींनी जवळ जवळ १८ महिने कारावासातच काढले. शांताराम पंदेरे, रंगा राचुरे व अनेक जण अगदी शांतपणे; पण जवळजवळ भूमिगतच काम करत होते. पुढे सप्तर्षी, महाजन हे युक्रांदचे नेते राजकारणात गेले. त्यांनी जनता पक्षाचा स्वीकार केला. या पक्षीय राजकारणामुळे युक्रांदमध्ये फुट पडली. शेवटी १९९४ मध्ये ही संघटना बरखास्त करण्यात आली.

युक्रांद चळवळीने सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनात महत्वाची भूमिका पार पाडलेली आहे. ही चळवळ गांधीवाद, आंबेडकरवाद आणि लोहियावाद अशी वेगवेगळया विचारधारांना एकत्रपणे घेऊन काम करणारी संघटना होती. एकार्थाने समन्वयाची भूमिका त्यांनी स्विकारलेली होती. युक्रांदच्या कार्याचे स्वरूप पाहिले तर त्यामध्ये शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही स्तरांवर या संघटनेने कार्य केलेले आहे. विशेषत: समाजातील विविध जातीसमुहांच्या प्रश्नांना आपल्या कृतीकार्याचा भाग बनविले. प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द आवाज उठविला. दलित, शोषित, उपेक्षित, शेतकरी, कामगार, युवा वर्गाच्या पातळीवर जाऊन काम केले. ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे. १९९४ मध्ये ही संघटना बरखास्त झाली असली तरी २००१ मध्ये कुमार सप्तर्षी यांनी युक्रांदची पुन:स्थापना केली. गेल्या अनेक वर्षात विविध वैचारिक आंदोलने त्यांनी केलेली आहेत. अजूनही युक्रांदचे कार्य चालू आहे.

## १.८ समारोप

आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरोत्तर काळातील विविध सामाजिक परिवर्तनवादी चळवळींचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या चळवळींनी एकोणिसावे आणि विसावे शतकातील प्रबोधन विचारांचे भरणपोषण केलेले आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात दलित, शोषित, वंचित, स्त्रीवर्गांचे स्थान निर्माण करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. या चळवळींचे संचितच दलित साहित्य या प्रवाहाच्या निर्मितीसाठी पोषक ठरलेले आहे. दलित साहित्यातील वेदना, नकार, विद्रोह आणि मानवतावादी तत्त्वे या परिवर्तनवादी चळवळीतून

आविष्कृत झालेली आहेत. यात आंबेडकरी विचारांचे मध्यवर्ती तत्त्व असल्यानेच दलित साहित्य आंबेडकरी अस्मितेचा वाङ्मयीन आविष्कार आहे. असे ठामपणे म्हणता येते.

## १.९ संदर्भ ग्रंथ


- शिंदे,अरुण:*सत्यशोधकीय नियतकालिके,* कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा, २०१९.
- गुंदेकर श्रीराम : *म. ज्योतिबा फुले : विचार आणि साहित्य्,* प्रतिमा प्रका, पुणे, १९९२.
- खराट, संभाजी : *सत्यशोधक जलसे,* लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.
- पानतावणे, गंगाधर : *दलित साहित्य : चर्चा व चिंतन*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३.
- पानतावणे, गंगाधर : *वादळाचे वंशज,* प्रचार प्रकाशन, कोल्हापूर,
- किरवले, कृष्णा : *दलित चळवळ आणि साहित्य*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६.
- फडके, भालचंद्र : *दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह,* श्रीविद्या प्रका., पुणे, १९७७.
- बागूल, बाबुराव: *दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान*, बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर.
- गणोरकर राजेंद्र : *दलित पँथर : सम्यक आकलन* (संपा) ब्ल्यू प्राईड कार्निवल समिती प्रका., नांदेड, २०२२.
- सोमण, अंजली व इतर : *डॉ. कुमार सप्तर्षी : व्यक्ती आणि कार्य,* कॉन्टिनेन्टल प्रका. पुणे.२०२२.


## १.१० पूरक वाचन

- म. जोतीराव फुले : सार्वजनिक सत्यधर्म
- डॉ. गंगाधर पानतावणे : पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
- नामदेव ढसाळ : दलित पँथर
- डॉ. कुमार सप्तर्षी : येरवडा विद्यापीठातील दिवस
- विजय दर्प : युक्रांदचे दिवस

## १.११ स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी :**

१. एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन चळवळींचे स्वरूप स्पष्ट करा.

२. सत्यशोधक चळवळीचे वाङ्मयीन योगदान विशद करा.

३. स्त्री लिखित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

४. दलित पँथर चळवळीचे कार्य विशद करा.

५. युक्रांद चळवळीतील आंदोलनांचा आढावा घ्या.

**ब) लघुत्तरी / टिपा :**

१. सत्यशोधक नियतकालिकांचे योगदान स्पष्ट करा.

२. प्रबोधन चळवळीचे विशेष लिहा.

३. वामनदादा कर्डक यांच्या लेखनाचा आढावा घ्या.

४. म. फुले यांच्या साहित्याचे महत्त्व स्पष्ट करा.

५. दलितांच्या नियतकालिकांचे स्वरूप विशद करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सत्यशोधक म्हणजे काय?

२. सिमॉन दी बोव्हा यांच्या ग्रंथाचे नाव काय आहे ?

३. दलित पँथरची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?

४. युक्रांद याचे संपूर्ण नाव काय आहे?

५. महात्मा फुले यांनी कोणत्या समाजाची स्थापना केली?

*****

# १इ

# दलित साहित्याची पूर्वपीठिका

**घटक रचना**

१.१ उद्देश
१.२ प्रस्तावना
१.३ दलित साहित्याची पूर्वपरंपरा
१.४ बौध्द साहित्य
१.५ संत साहित्य
१.६ म. फुले यांचे साहित्य
१.७ सत्यशोधकी जलसे
१.८ आंबेडकरी जलसे
१.९ दलित वृत्तपत्रे व नियतकालिकातील लेखन
१.१० समारोप
१.११ संदर्भ ग्रंथ
१.१२ पूरक वाचन
१.१३ प्रश्नावली

## १.१ उद्देश

- दलित साहित्याची पूर्वपरंपरा लक्षात घेणे.
- दलित साहित्याच्या निर्मितीमागील ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.
- दलित साहित्याच्या मूलभूत तत्त्वांचा विचार करणे.
- दलित साहित्याचा विकास लक्षात घेणे.
- दलित साहित्यातील लेखनाचा आढावा घेणे.

## १.२ प्रस्तावना

दलित साहित्य या वाङ्मयीन प्रवाहाची निर्मिती ही अनेक वर्षांच्या संचितातून झालेली आहे. या संचितात दलित समुहांच्या उत्थानासाठी प्राचीन काळापासून झालेल्या विविध आंदोलने, सामाजिक चळवळी, वाङ्मयीन चळवळी यांचा समावेश होतो. दलितांचा सामाजिक - सांस्कृतिक इतिहास पाहिला तर हा समूह अत्यंत प्रामाणिक, स्वाभिमानी व

लढवय्या होता. त्याचे नाते ऐतदेशीय लोकांशी होते. परंतु पुढे आर्यांच्या आक्रमणानंतर या समुहांवर गुलामगिरी लादली. त्यांना बहिष्कृत केले. अस्पृश्य म्हणून त्यांना वंचित ठेवण्यात आले. याला धार्मिक रूप देऊन त्याला दलितत्वाचे जीवन जगण्यास भाग पाडले. परंतु या जीवनाविरुध्द समतावादी चळवळीच्या माध्यमातून आवाज उठविला गेला. दलितांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. या अस्मितादर्शनातूनच पुढे दलित साहित्याची चळवळ उदयास आली. याची पूर्वपरंपरा अगदी बौध्द काळापर्यंत सापडते. नंतर संतांची चळवळ, म. फुले यांचे विचारकार्य, सत्यशोधकी जलसे, आंबेडकरी जलसे आणि दलितांची वृत्तपत्रे अशा विविध पूर्वधारा यात समाविष्ट होतात.

## १.३ दलित साहित्याची पूर्वपरंपरा

दलित साहित्याची निर्मिती ही ऐतिहासिक आहे. साठोत्तरी काळापूर्वीचे संचित त्यामागे आहे. वास्तविक दलित समुहाला लेखनाची परंपरा नव्हती. हजारो वर्षे हा समाज अशिक्षित राहिला. तरी सुध्दा मौखिक परंपरेतून दलित साहित्यानिर्मिती होत होती. प्राचीन काळी समतावादी विचार चळवळीने दलितांच्या आवाजाला मुखर केले. त्यामध्ये तथागत बुध्दापासूनची परंपरा सांगता येते. बुध्दाने आपल्या धम्मात उपेक्षित समुहांना स्थान दिले. ज्यांना गुलाम, बहिष्कृत म्हणून नाकारले होते. त्यांना धम्मात स्वीकारले. त्यानंतर ही परंपरा हळूहळू विकसित व्हायला लागली. संतांनी याला आधार दिला. एकोणिसाव्या शतकात प्रबोधन चळवळीने अस्पृश्य समुहांच्या उत्थानासाठी प्रयत्न केले. जोतीराव फुले आणि सत्यशोधक चळवळीने दलित साहित्याच्या पायाभरणीत महत्त्वाची भूमिका पार पाडली. सत्यशोधकी जलसे त्याचे प्रमाणक आहे. यातूनच पुढे आंबेडकरी जलसे, दलितांची वृत्तपत्रे, नियतकालिके निघाली. दलित साहित्याला नवी दिशा मिळाली. हे सर्व पूर्वसंचित महत्त्वाचे असून याचा विस्ताराने आढावा घेणे गरजेचे आहे.

## १.४ बौध्द साहित्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धम्माचा स्वीकार केला. ही भारतातील धम्म क्रांतीच होती. या निमित्ताने भारतीय इतिहासातील बौध्द धम्मविषयक नवे ज्ञान व नवे भान निर्माण झाले. बाबासाहेबांनी धम्म दीक्षा समारंभात नागपूर येथील सभेमध्ये नागपूरचे बौध्द धम्माशी आाणि दलितांना नाग लोकांशी असलेला अनुबंध सांगितला होता. या अर्थाने दलित समुहांचा बौध्द धम्माशी असलेला जुना सहसंबंध अधोरेखित झाला.

भारताच्या इतिहासात बौध्द परंपरा समृध्द आहे. समाजाला नैतिक अधिष्ठान देण्यासाठी या धम्म चळवळीतून विशेष प्रयत्न झाले आहेत. विशेषत: धम्म हा समतावादी जीवनमार्ग आहे. बुध्दाने आपल्या संघात सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश केला. कारण बुध्दाचा धम्म हा सर्वांसाठी होता. बुध्दाने आपल्या संघात स्त्रीयांना संधी दिली. ही घटना क्रांतिकारक होती. वैदिक धर्मात स्त्रीला गौन स्थान दिले होते. तिला शूद्रादिशूद्रापेक्षा खालच्या स्थानी ठेवले. बौध्दांनी या सर्व वैदिक परंपरेला नकार दिला. ही विचारधारा दलित साहित्याच्या निर्मितीसाठी पुरक ठरली.

आंबेडकरी विचारउर्जेतून बौध्द परंपरा दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेत महत्त्वाची ठरलेली आहे. त्यामध्ये बौध्द साहित्याचा भाग महत्त्वाचा ठरतो. त्रिपिठक हे बौध्द् साहित्यातील महत्त्वाचे ग्रंथ आहेत. त्यात विनयपिठक, सुत्तपिठक, अभिधम्मपिठक या रचनांचा समावेश होतो. दलित साहित्यामध्ये या रचनांमधील विचार व चिंतन आविष्कृत झालेले आहे. किंबहुना हे ग्रंथ दलित साहित्याच्या निर्मितीसाठी तात्त्विकदृष्ट्या पोषक ठरलेले आहेत.

## १.५ संत साहित्य

महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. मध्ययुगीन कालखंडामध्ये महाराष्ट्रात विविध संत संप्रदाय निर्माण झाले. महानुभाव, वारकरी संप्रदायांचा यामध्ये समावेश होतो. यामधील वारकरी संप्रदायात दलित संतांनी मोठया प्रमाणात साहित्यनिर्मिती केली. त्यामध्ये संत चोखामेळा आणि त्यांचा परिवार यांचे लेखन अतिशय महत्त्वाचे आहे.

संत चोखामेळा हे जन्माने अस्पृश्य असून वारकरी संप्रदायातील एक संतकवी होते. इतर वारकरी संतांप्रमाणेच त्यांचीही विठ्ठल भक्तीवर श्रध्दा होती. परंतु त्यांना विठ्ठलाच्या जवळ जावून दर्शन घेता आले नाही. त्यासाठी त्यांचे मन व्याकूळ होते. या व्याकुळतेतूनच संत चोखामेळा विठ्ठलाला म्हणतात,

यातीहीन माझी देवा। कैसी घडे तुझी सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती। तुज भेटू कवण्याकरिती।

त्यांच्या अभंगातील पारंपरिक जातिव्यवस्थेविषयी परखड विचार आलेले नसले तरी त्यातून जातजाणीव अस्पष्टपणे अभिव्यक्त झालेली आहे. पिढयानपिढयाच्या वर्णव्यवस्थेने ग्रासलेल्या जातरूपी दु:खाला ते आपल्या अभंगात व्यक्त करतात,

कोण तो सोवळा कोण तो ओवळा।
कोणाशी विटाळ कशाचा जाहला ॥

अस्पृश्यता ही पारंपरिक मानसिकतेची उपज आहे. त्यामध्ये भेदाभेद, जातीभेद, विषमता आहे. त्यामुळे सोवळा, ओवळा मानसिकता नाकारून विटाळाचा प्रश्न चोखोबांनी येथे विचारलेला आहे. या विटाळभावनेतील जातीयता चोखोबांनी मांडलेली आहे. ते आपल्या अभंगात म्हणतात.

जातिभेद गांजिले त्रासिले विटाळे।
एकापुढे एक पडति आघात।

अस्पृश्यतेचे जीवघेणे अनुभव विदारक आहेत. यात माणसाचे माणुसपण नाकारले जाते. माणसाचीच अवहेलना केली जाते. याविषयी चोखोबांनी आपल्या भावना अत्यंत वेदनादायीपणे अभंगातून मांडलेल्या आहे. ज्या चोखोबांची दलित जाणीव अधोरेखित करतात. याबरोबरच 'हीन याती माझी देवा, कैसे घडे तुझी सेवा' अशी भावना त्यांनी आपल्या अभंगात मांडली. चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून आपल्या मनातील सामाजिक विषमतेविषयीची कणव अभिव्यक्त केलेली आहे. मनुष्याला मिळालेला जन्म त्याच्या पूर्वसंचितानुसार लाभतो या पारंपरिक संस्कारातून त्यांचे मन घडलेले होते.

तरीसुध्दा 'मज दूर दूर हो म्हणती' अशी भावना त्यांनी व्यक्त केलेली आहे. कधी कधी ते सामाजिक विषमतेची परखड चिकित्सा करत असल्याचेही दिसते.

पापांचा घडा भरेल त्यांचा, नरक यातना सहतील ते ।
ते माणूस नाही दैत्यांची अवलाद, त्याचे त्यांना भोगू दे ॥

अशी तीव्र चीड ते व्यक्त करतात. संत चोखामेळा यांच्या मनातील भावना अस्पष्टपणे त्यांनी मांडल्या. एकूणच संत चोखामेळा यांचे अभंग दलित जाणीवेचा वाङ्मयीन आविष्कार आहेत. त्यातून दलित जात संवेदना प्रकट होतात.

संत चोखामेळा यांच्या बरोबरच त्यांच्या परिवारातील त्यांची पत्नी संत सोयराबाई, मुलगा संत कर्ममेळा, बहीण संत निर्मळा, मेहुणे संत बंका यांनी ही आपल्या अभंगातून परखड मांडणी केलेली आहे. चोखामेळा परिवारातील संत सोयराबाई आपल्या अभंगात लिहितात,

घेतीले पदरी आता न टाकावे दुरी ।
देहाचा विटाळ देहीची निर्धारी ॥

संत सोयराबाई यांनी आपल्या अभंगात विटाळाचे वर्णन म्हणजेच अस्पृश्यतेच्या दाहक अनुभवांची मांडणी केलेली आहे. संत निर्मळा आणि संत बंका यांचे अभंगही समकालीन समाजव्यवस्था मांडणारे आहेत. यामध्ये संत कर्ममेळा हा दलित जाणीवेचा स्पष्ट आणि परखड आविष्कार आपल्या अभंगातून करतो.

आमची केली हीन याती, तुज का न कळे श्रीपती ।
जन्म गेला उष्टे खाता, लाज न ये तुमचे चित्ता ॥

इथे कर्ममेळा दलित जाणीव अस्सलपणे व्यक्त करतात. आपल्याला समाजामध्ये हिनत्वाची वागणूक मिळत आहे. विठ्ठल हा याचा साक्षीदार असताना कोणतीही भूमिका घेत नाही. याचे त्यांना दु:ख वाटते. म्हणूनच ते पांडुरंगालाच सवाल करतात आणि आपला विद्रोह व्यक्त करतात. संत कर्ममेळा यांनी अतिशय परखडपणे सामाजिक रूढी, परंपरांविषयी मांडणी केलेली आहे. प्रश्नरूपी तक्रारीतून दलितांचे जगणे समाजासमोर मांडले. संत कर्ममेळाचे अभंग हे दलित साहित्यातील विद्रोहाचे आद्यरूप आहे.

मध्ययुगीन काळात संत साहित्यातून दलित स्वर मुखर झालेला आहे. ही जातिव्यवस्थेने लादलेले अस्पृश्यतेचे जगणे त्यांनी येथे मांडले. येथे वेदना आलेल्या आहेत. संत साहित्यात संत तुकाराम आणि संत चोखामेळा आणि परिवाराच्या अभंगातून दलितांच्या वेदना व्यक्त झालेल्या आहेत. त्यांना काळाच्या मर्यादा असल्या तरी त्यातून जो वेदनामय सूर आलेला आहे. तो पुढे क्रांतीचे बोल बनतात.

## १.६ म. फुले यांचे साहित्य

भारताच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकामध्ये जोतीराव फुले हे क्रांतिकारक महापुरुष होऊन गेले. त्यांनी आपल्या विचारकार्यातून समाजातील शूद्रादिशूद्र स्त्री वर्गाच्या उत्थानाची पायाभरणी केली. म. फुले हे कर्ते सुधारक होते. त्यांनी आपला विचार प्रत्यक्ष

कृतीतून दाखविला. त्यांना माहीत होते की, दलित समाजाला जर या गुलामगिरीतून बाहेर काढायचे असले तर शिक्षण देणे खूप गरजेचे आहे. हा विचार त्यांनी आपल्या ग्रंथातून मांडला.

विद्येविना मती गेली, मतीविना नीति गेली,
नितीविना गती गेली, गतीविना शूद्र खचले,
एवढे अनर्थ, एका अविद्येने केले.

दलित, शोषित, कष्टकरी समुहाच्या अवनतीचे एकच कारण आहे ते म्हणजे अविद्या. ती घालविण्यासाठी जोतीरावांनी शाळा काढल्या. पत्नी सावित्रीबाईंना शिकविले. मुलींच्या शाळा, दलितांसाठी शाळा स्थापन करून शिक्षणाचा विचार त्यांच्यापर्यंत पोहचविला. आपल्या प्रत्येक ग्रंथातून प्रस्थापित समाजाकडून होणाऱ्या शोषणाचे रूप उजागर केले. 'तृतीय रत्न', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड', 'ब्राह्मणांचे कसब', 'सार्वजनिक सत्यधर्म' हे ग्रंथ यामध्ये अतिशय महत्त्वाचे आहेत. म. फुले यांच्या विचारकार्यातूनच दलितांमध्ये परिवर्तन होऊ लागले. त्यांना शिक्षणाचा मार्ग मिळाला. त्यामुळेच त्यांच्यामध्ये समाजजागृती निर्माण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही म. फुले यांना आपले गुरू मानले होते. फुल्यांची सामाजिकदृष्टी आणि सत्यशोधकी विचारांचे ते पाईक होते. या याअर्थाने दलित साहित्याच्या चळवळीची बिजे म. फुले यांच्या विचार वारशात आहेत. इथूनच दलितांच्या सामाजिक चळवळींना खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. मुक्ता साळवे सारखी दलित लेखिका जोतीराव व सावित्रीबाईंच्या वैचारिक सान्निध्यात घडली. हे आपल्या लक्षात येते.

संत परंपरेमध्ये दलित साहित्याच्या पूर्वपीठिकेत संत कबीर यांचा उल्लेख महत्वाचा ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना गुरू मानले होते. रामजी आंबेडकर यांनी घरामध्ये कबीराचे दोहे पठन केले होते. यामागे संत कबीराच्या विचारातील मानवतावादी दृष्टी अतिशय महत्त्वाची होती. कबिराला जातीभेद अमान्य होता. कोणत्याही प्रकारची विषमता त्यांना नको होती. व्यक्ती-व्यक्तींमधील दुरावा, अस्पृश्यता, विटाळ यांना कबिरांनी नाकारले. विशेषत: मानवी समाजातील विषमतामूलक रूढी, परंपरा, रितीरिवाज, अंधश्रध्दांचा त्यांनी आपल्या दोहयातून कठोर शब्दात निषेध केला.

उंचे कुल क्या जनमिया, जो करनी उँची न होय।
सबरन कलस सुरा भरा, साधु निन्दे सोय॥

संत कबीर हे समाजातील उच्चनिचतांना नाकारत होते. ही मानवी विषमता त्यांना मान्य नव्हती. धर्माच्या नावावर चाललेले हे अवडंबर त्यांनी आपल्या दोहयातून उजागर केले. कबिरांनी समतेचा विचार मांडला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा विचार मांडला. दलित साहित्यानेही याच सूत्रांच्या आधारे लेखन केलेले आहे.

## १.७ सत्यशोधकी शाहिरी

दलित साहित्याच्या पूर्वरुपात शाहिरी वाङ्मयाचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे. म. फुले यांनी मांडलेल्या विचारांना शाहिरांनी तळागळातील समाजपर्यंत पोहचविला. समाजाचे

प्रबोधन केले. यातूनच सत्यशोधक शाहिरी निर्माण झाली. म. फुले यांच्या सत्यशोधकी विचारांनी शाहिरी वाङ्मयाच्या आकृतिबंधात आमूलाग्र बदल झाला. याविषयी डॉ. कृष्णा किरवले लिहितात, सामाजिक स्वातंत्र्याच्या पायाभरणीसाठी हिंदूंच्या विषमताधिष्ठित चातुर्वण्यांवर म. फुले यांनी घाणाघाती वार केले. मानवाचे धर्म नसावे अनेक किंवा देश धर्म भेद नसावा अंतरी हा मूलगामी विचार घेऊनच फुले यांची शाहिरी अथवा अखंडांची रचना अवतीर्ण झाली. या रचनेचा प्रभाव काही दलित रचनाकारांवर पडला. सत्यशोधकी शाहिरीत जलसा रचनाप्रकारातून मूलभूत लेखन झाले आहे. सत्यशोधक तमाशाची सुरुवात १९०० व्या दरम्यान भीमराव विठ्ठलराव महामुनी यांनी प्रथम केली. त्यांनी मुंबई प्रांतात सत्यशोधक जलसे सुरू केले. यातून लोकजागृती झाली. १८९१ ते १९१० हा सत्यशोधक चळवळीचा दुसरा कालखंड आहे. त्याचे नेतृत्व कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, भीमराव महामुनी यांच्याकडे होते. या काळात जलशांना महत्त्वाचे स्थान होते. त्यामुळे भीमराव महामुनी हे जलशाचे पहिले प्रवर्तक होते. *(दलित चळवळ आणि साहित्य, पृ. ७६)* या सर्व सत्यशोधक जलसाकारांनी समाजप्रबोधनाचा विचार मांडला. ब्राह्मणी धर्माने समाजावर लादलेली गुलामगिरी उजागर केली. धर्म सत्तेचे असलेले अवडंबर नाहीसे करण्याचा प्रयत्न केला. यातून सामाजिक जीवनात नवा बदल दिसू लागला. भीमराव महामुनी यांनी केशवपन या रूढीवर प्रहार करताना लिहिलेले आहे की,

मी लाडली, अण्णा तुमची लाडकी ।
मला कशी करिता हो बोडकी ॥धृ॥

समाजातील विविध प्रथांना नकार देऊन ब्राह्मणी धर्मातील अनिष्ठ रूढी नाकाण्याचा विचार महामुनींनी आपल्या कवनातून मांडलेला आहे. हाच विचार घेऊन पुढे रामचंद्र घाटगे, केशव सुका आहेर, आबासाहेब साबळे, सोनोपंत कुलकर्णी, हरी भाऊ तोरणे यांनी सत्यशोधकी जलसे लिहिलेले आहेत. केशव आहेर आपल्या जलशात लिहितात,

ज्याला शिक्षणाचं ज्ञान ।
त्याला मिळणार भान ॥

हा शिक्षणाचा विचार अतिशय महत्त्वाचा आहे. दलित समाजाविषयी सत्यशोधक जलशांमध्ये प्राधान्याने गोपाळबाबा वलंगकर आणि किसन फागूजी बंदसोडे यांनी प्रारंभी प्रभावी मांडणी केलेली आहे. गोपाळबाबा आपल्या कवनात लिहितात,

थू: तुमच्या तोंडावर लेक हो ।
कसले वतनदार, महार तुम्ही कसले वतनदार ।
वतनदाराची बघा लेकरे फिरती दारोदार ॥

वरील कवनात गोपाळबाबांनी वतनदारी प्रथेवर प्रहार केलेला आहे. वतनदारी ही एक प्रकारची गुलामीच होती. तिला गोपाळबाबांनी नकार दिलेला आहे. ही दलित साहित्यातील नकाराची जाणीव होती. अशाच पध्दतीने किसन फागुजींनी ही सामाजिक विषमतेवर प्रहार केलेला आहे. ते लिहितात,

पाहा पाहा सारे जन हो हा हिंददेश माझा।
दुहीचे मूलस्थान, भेदाचे येथे रान।
वैऱ्यास देई मान हा हिंददेश माझा॥

सत्यशोधकी जलशामध्ये सामाजिक परिवर्तनाचा विचार आलेला आहे. विशेषत: दलित वर्गात नवे भान येऊ लागले. आपणही माणूस आहोत. आपल्यालाही हक्क व अधिकार आहेत. अशी जाणीव त्यांच्यात निर्माण झाली.

एकूणच सत्यशोधक जलशांनी दलित समाजांच्या उत्थनासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडली. यातून दलित समाजात जागृती निर्माण होण्यास मदत झाली. हे कार्यच पुढे आंबेडकरी जलसाकारांनी गतिमान केले. आंबेडकरी जलशांनी खऱ्या अर्थाने दलित समाजाच्या प्रगतीला गती दिली. दलित साहित्याच्या पायाभरणीत यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. या आंबेडकरी जलशांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

## १.८ आंबेडकरी जलसे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदयाने दलित समाजामध्ये क्रांतिकारक बदल झाला. त्यांच्यापासूनच दलित समुहाने सामाजिक परिवर्तनाची चळवळ गतिमान केली. तिला निर्णायक रूप दिले. यासाठी दलित शाहिरांनी जलशाच्या माध्यमातून बाबासाहेबांचा विचार जनसामान्यापर्यत पोहचविले. यातूनच आंबेडकरी जलसे लोकप्रिय झाले. आंबेडकरी जलशांचे स्वरूप बंडखोर होते. हिंदू धर्मातील रूढी - परंपरा, चालीरिती यातून दलितांना भोगाव्या लागणाऱ्या यातनांचा आविष्कार झालेला आहे. विशेषत: शाहिरी रचनांच्या बांधणीला आंबेडकरी जलसाकारांनी छेद दिला. आणि नव्या थाटामध्ये ती आविष्कृत झाली. याविषयी डॉ. कृष्णा किरवले यांनी मार्मिक भाष्य केलेले आहे. ते लिहितात, सामाजिक परिवर्तनाचे एक माध्यम म्हणून सत्यशोधक व आंबेडकरी जलशाचे कार्य फार मोलाचे आहे. आंबेडकरी जलसा भीमराव कर्डकांनी सुरू केला असे म्हटले जाते. परंतु त्या अगोदरच भाऊ फक्कड यांनी आपल्या तमाशात गण, गौळण, बतावणी आणि वग याला आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान दिले होते. भाऊ फक्कड यांच्या तमाशाचा भरभराटीचा कालखंड १९२० ते १९३० असा होता. भीमराव कर्डक व इतर आंबेडकरी जलसे नाशिक मंदिर प्रवेश सत्याग्रहानंतर उदयास आलेले आहेत. आंबेडकरी जलशातील नमन गीताने आणखीनच परिवर्तन आणले. हजारो वर्षाच्या दास्यातून मुक्त करणा-या महामानवांना त्यांनी नमन केले. डॉ. आंबेडकरांना आमच्या कुलदेवतांना, महात्मा जोतीबा फुल्यांला, छत्रपती शाहू महाराजाला अशा प्रकारच्या रचना करून धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेला नवीन जीवनमूल्यांची ओळख करून दिली. *(दलित चळवळ आणि साहित्य, पृ. ७६-७७)* अशाप्रकारे आंबेडकरी जलशांनी तत्कालीन सामाजिक, राजकीय जीवनावर भाष्य करणा-या रचना निर्माण केल्या. बाबासाहेबांचा विचार तळागळातील समुहांपर्यंत पोहचविला. त्यामुळे एक जलसा म्हणजे माझी दहा भाषणे आहेत. असे उदगार स्वत: बाबासाहेबांनी काढले होते. यातून आंबेडकरी जलशांचे महत्त्व आणि दलितांच्या चळवळीतील त्यांचे योगदान स्पष्ट होते. जे क्रांतिकारक स्वरूपाचे आहे.

आंबेडकरी जलशामध्ये प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नमन केले जाते. पूर्वीच्या जलशामधील परंपरा मोडीत काढून भिमराव कर्डक आपल्या कवनामध्ये लिहितात,

हे भीमराव नमितो पाया ।
द्यावी मती आम्हा तव गुण गाया ॥धृ॥
जगी आम्हा नाही वाली ।
तुच आमुची कृपा सावली ।
अस्पृश्यांची खरी माऊली ।
दलितांना उध्दाराया ।
द्यावी मती आम्हा तव गुण गाया ॥१॥

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती अत्यंत कृतार्थ भावना येथे आविष्कृत झालेली आहे. आंबेडकरी जलशामध्ये दलित समाजाच्या शोचनीय स्थितीगतीचा आलेख मांडलेला आहे. याविषयी शाहीर हेगडे लिहितात,

बरी नाही वतनदारी, शुध्द आहे गुलामगिरी ।
तिच्या पायी झालो भिकारी, विचार करा जरा अंतरी॥

गावगाडयामध्ये वतनदारी राबवली जात होती. या वतनदारीमुळे दलितांचे शोषण केले जात होते. याविषयी आंबेडकरी जलसाकारांनी परखडपणे विचार मांडलेले आहेत. वतनदारी म्हणजे गुलामगिरी असा सरळसरळ अर्थ त्यांनी विशद केला आहे. भारतीय समाजातील दलितांची अवस्था ही परंपरेने बांधलेली आहे. प्राचीन काळापासून ते अगदी मध्ययुगीन काळात संतांच्या पर्यंत हा वारसा आलेला आहे. यावरही आंबेडकरी जलशातून विचारमंथन करण्यात आलेले आहे. शाहीर केरुबुवा गायकवाड याविषयी परखड भाष्य करताना लिहितात,

नको नको इठूबा देव आम्हाला ।
पावला का सांगा कधी महाराला ।
सावता माळी, गोरा कुंभार, राऊळी गेला संत ज्ञानेश्वर ।
चोखोबाला ठेवला त्यानं पायरीला ॥

जातिव्यवस्थेविषयी इथे मूलभूतपणे चिंतन मांडलेले पाहावयास मिळते. हजारो वर्षांची ही गुलामगिरीची प्रथा मोडणे गरजेचे आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला विचार आंबेडकरी जलशामध्ये प्राधान्याने आलेला आहे. कवी दीनबंधुंनी दलित समाजला उद्देशून लिहिलेले आहे की,

उठा दलितांनो ओळखा ना हित,
असे स्वस्थचित बैसले का ?
सोडोनिया द्या रे जुना रूढीधर्म,
भीमबाचे मर्म् घरी आणा

कोण ज्ञाने झाला जगाचा उध्दार
चला मार्ग थोर तोचि असे

कवी दीनबंधुंनी वरील ओळीतून खऱ्या अर्थाने दलित समाजाला जागृत करण्याचे विचार मांडलेले आहेत. यामधून दलितांमधील शोषण सहन करण्याची भूमिका ते येथे नाकारतात. आणि आपल्या जीवनाला डॉ. आंबेडकरांच्या विचारांकडे घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहित करतात.

आंबेडकरी जलशाविषयी प्रा. एन. जी. भवरे यांनी अस्मितादर्श दलित शाहीर व शाहिरी विशेषांक १९८२ मध्ये मार्मिक भाष्य केलेले आहे. ते लिहितात,

१) सर्व दलित शाहीर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितोध्दाराच्या चळवळीने आणि संदेशाने झपाटलेले आहेत. त्यांना बाबासाहेबांच्या चळवळीचा गाभा उत्तम समजलेला आहे. दलित समाज गुलामगिरीत खितपत पडला आहे. अज्ञान, अंधविश्वासांनी दारिद्रयांनी पिडलेला आहे. अशा रोगी समाजाला निरोगी आणि जागृत करण्यासाठी जोरदार उपाय योजना आणि सर्वस्पर्शी चळवळीची गरज आहे याची जाणीव सर्व शाहिरांना झालेली दिसते. म्हणूनच बाबासाहेबांचा संदेश दलित जणतेपर्यंत पोहोचवतांना दलित शाहिरांनी दलितांना समजेल अशी सरळ सोपी भाषा वापरली. त्यांच्या दु:खाला हळुवारपणे स्पर्श करून त्यांना माणुसकीचे हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्वाभिमान ह्या तत्त्वांचे महत्त्व विशद करून त्यांच्या मनात सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा आणि जिद्द निर्माण केली. 'तुफानातील दिवे आम्ही तुफानातील दिवे, तुफानवारा,पाऊसधारा मुळी न आम्हा शिवे' या वामन कर्डकांच्या रचेत ती प्रकर्षाने प्रगट झाली आहे.

२) दलित शाहिरांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नुसते थोर नेतेच नसून ते एक महान दैवत वाटतात. कारण आतापर्यंत कोणत्याही देवाने दलितांच्या उध्दारासाठी काहीच केले नाही. दलितांच्या हया श्रध्देला आपण अंधश्रध्दा म्हणावी काय? अशा भीमदैवताला दलितांनी आपल्या प्रेमामुळे भीमाई म्हटले, बाबा म्हटले. म्हणूनच दलितांची शाहिरी ही त्यांच्या ह्दयाचे स्पंदन वाटते. त्यात स्वाभाविकता, प्रामाणिकपणा, अंत:करणाची ओढ, मनाचा सरळपणा, अनुभवाचा साधेपणा आणि रचनेचा ओबडधोबडपणा सुध्दा आहे. दलित शाहीर नुसता शब्दांच्या ठेक्याकडे, त्याच्या ध्वनीकडे शाहिरीच्या वरवरच्या नाद माधुर्याकडेच केवळ लक्ष न देता, त्यातील आशयाकडे त्याचे मन धाव घेते. कारण दलित शाहिरीतील आशय हा तिचा प्राण आहे. दलित शाहिरांच्या अनेक कवनातून आशय, रचना कौशल्य आणि नादमाधुर्याचा अपूर्व संगमसुध्दा पदोपदी आढळतो.

३) दलित शाहिरांनी जुन्या संस्कृतीमधील गुलामगिरी स्वत: भोगल्याने त्यांना ती कायमची नष्ट करावीशी वाटते. जुन्या परंपरांची राखरांगोळी करून त्या ठिकाणी नवे जग, नवा समाज निर्माण व्हावा याची दलित शाहिरांना तीव्र ओढ लागलेली आहे.

४) दलित शाहीर हे सुखी जीवन जगणारे आणि द्रव्यार्जनाकरिता रचना करणारे कवी नाहीत. त्यांचे जीवन अतिशय खडतर आणि हालअपेष्टांनी भरलेले आहे. परंतु अशाही

जीवनात बाबासाहेबांच्या संदेशाचा प्रचार करण्याशिवाय त्यांना जीवनात कशाचीच गोडी वाटली नाही.

५) दलित शाहिरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितोध्दार चळवळीत प्रामुख्याने भाग घेऊन बाबासाहेबांचा संदेश शहरात आणि खेडोपाडयातील दलित जगतात पोहोचविण्याचे महान कार्य केले. त्यांनी आपल्या लेखणीने, वाणीने, आणि आपल्यातील वादन, गायन या कलांनी प्रचंड प्रमाणावर दलित चळवळीला हातभार लावला, पण त्याबद्दल कसलाही मोबदला मिळविला नाही. अशा निष्काम कार्य करणाऱ्या खऱ्याखुऱ्या समाजसेवकांच्या गुणांना, तळमळीला आणि त्यागाला कृतज्ञापूर्वक अभिवादन (पृष्ठ चौतीस) दलित साहित्य चळवळीचा हा दलित शाहिरांचा वारसा अतिशय महत्त्वाचा आहे.

## १.९ दलितांची वृत्तपत्रे व नियतकालिकातील लेखन

दलित साहित्याच्या चळवळीला खऱ्या अर्थाने बळ देण्याचे कार्य वृत्तपत्रे, मासिकांनी केलेले आहे. विशेषत: म. फुले यांनी प्रबोधनाच्या चळवळीला निर्णायक दिशा दिली. १९७७ मध्ये सत्यशोधक समाजाच्या वतीने 'दीनबंधु' हे बहुजन समाजाचे पहिले वृत्तपत्र काढण्यात आले. यातून सामाजिक विषमता, धर्माची गुलामगिरी, शेतकरी, दलित समूहांचे प्रश्न मांडले. पुढे १९८८ मध्ये गोपाळबाबा वलंगकर यांचे ‘विटाळविध्वसक’ आणि किसन फागूजी बंदसोडे यांनी ‘मराठा दीनबंधू’ आणि ‘चोखामेळा’ ही वृत्तपत्रे दलितांच्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने वाचा फोडली.

दलितांच्या वृत्तपत्रीय इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महत्त्वपूर्ण संशोधनाच्या माध्यमातून या योगदानला सर्वप्रथम उजागर केले. बाबासाहेबांनी १९२० मध्ये 'मूकनायक' हे पहिले वृत्तपत्र काढले. हे शीर्षक उद्बोधक असून हजारो वर्षांचा दलितांचा कोंडलेला आवाज पहिल्यांदा मूकनायकमधून बोलता झाला. यामधून बाबासाहेबांनी आपल्या सामाजिक व राजकीय विचारांची मांडणी केली. पुढे १९२७ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र काढले. भारतीय समाजात दलितांना सातत्याने अस्पृश्य ठरवून बहिष्कृत केले होते. या बहिष्कृतांचा बुलंद आवाज या वृत्तपत्रातून आविष्कृत झाला. डॉ. आंबेडकरांनी पुढे 'जनता', 'समता' आणि 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रांची निर्मिती केली. १९२० ते १९५६ या काळातील दलितांच्या सामाजिक – सांस्कृतिक घडामोडींचा ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रांना महत्त्वाचे स्थान आहे.

दलित चळवळ आणि साहित्याचे मुखपत्र म्हणून 'अस्मितादर्श' या नियतकालिकांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी १९६८ मध्ये औरंगाबाद येथून अस्मितादर्श सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयातून अस्मितादर्शची पायाभरणी झाली. तेथे 'अस्मिता' हे अनियतकालिक विद्यार्थ्यांसाठी चालू करण्यात आले. परंतु पुढे ते बंद पडले. आंबेडकरवादाची उर्जा भावी पिढयांमध्ये जागृत ठेवण्यासाठी आणि दलित लेखकांना

हक्काचे विचारपीठ मिळवून देण्यासाठी डॉ. पानतावणे यांनी अस्मितादर्श ची मांडणी केली. आंबेडकरवाद आणि अस्मितादर्श यातील अनुबंध मांडताना डॉ. पानतावणे यांनी लिहिलेले आहे की, अस्मितादर्श हे आंबेडकरवादाचे अपत्य आहे. आंबेडकरी विचार रूजविणे, आंबेडकर विचारांची मशागत करणे आणि आंबेडकरी विचारला विकृत करू पाहणाऱ्या प्रवृत्ती खणून काढणे हीच अस्मितादर्श ची परिक्रमा आहे. आंबेडकरवाद हीच अस्मितादर्शची प्रतिज्ञा आणि जीवनदृष्टी आहे. *(दलित साहित्य: चर्चा आणि चिंतन, पृ.६)* अस्मितादर्श गेल्या पन्नास वर्षांमध्ये दलित साहित्याला बळ दिले. याच्या अभिव्यक्तीसाठीच स्वतंत्रपणे वाटचाल केली. अनेक अंक, विशेषांक, संमेलनांचे आयोजन करून महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर आंबेडकरवादी विचारवंतांच्या पिढया घडविल्या. अस्मितादर्शचे हे कार्य ऐतिहासिक असून आजही ते अविरतपणे चालू आहे. अस्मितादर्शच्या वाटेनेच लोकानुकम्पा, सिंहगर्जना, समुचित, दलित व्हाईस या नियतकालिकांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. यातूनच दलित साहित्याची चळवळ गतिमान झाली.

## १.१० समारोप

दलित साहित्य हा आंबेडकरी अस्मितेचा वाङ्मयीन आविष्कार आहे. या प्रवाहची निर्मिती चळवळीतून झाली. दलित समाजाच्या उत्थानासाठी इतिहासात मोठा संघर्ष करावा लागला. हजारो वर्षांची जातीय मानसिकता मोडून टाकणे सहजासहजी शक्य झाले नाही. तरी सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक अधिष्ठानावर दलितांच्या चळवळीला निर्णायक रूप प्राप्त झाले. दलितांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक जागृती झाली. तो लिहू लागला. बोलू लागला. यातून दलित साहित्याचा आविष्कार घडला. ज्याने प्रस्थापित साहित्यव्यहाराला छेद दिला. नवे स्वतंत्र विश्व निर्माण केले. केवळ मराठीच नाही तर विविध भारतीय भाषा आणि जागतिक साहित्यामध्येही दलित साहित्याची चर्चा झाली. त्याचे अस्तित्व मान्य केले गेले. आज वैश्विक साहित्यात मराठी भाषेची जी ओळख निर्माण झाली आहे. त्यामध्ये दलित साहित्याचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

## १.११ संदर्भ ग्रंथ


- किरवले, कृष्णा : दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६.
- किरवले, कृष्णा : आंबेडकरी शाहिरी : एक शोध, नालंदा प्रका., पुणे, १९९२.
- गुंदेकर श्रीराम : म. ज्योतिबा फुले : विचार आणि साहित्य, प्रतिमा प्रका, पुणे, १९९२.
- खराट, संभाजी : सत्यशोधक जलसे, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.
- पानतावणे, गंगाधर : पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,प्रतिमा प्रका,पुणे, १९८७.
- पानतावणे, गंगाधर : दलित साहित्य : चर्चा व चिंतन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३.

- पानतावणे, गंगाधर : वादळाचे वंशज, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर,
- फडके, भालचंद्र:दलित साहित्य:वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रका. पुणे,१९७७.
- बागूल, बाबुराव: दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान, बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर.
- कांबळे, चिंतामण:अस्मितादर्श : साहित्य आणि संस्कृती, सुविद्या प्रका.,पुणे, २००३.


## १.१२ पूरक वाचन

- म. जोतीराव फुले : गुलामगिरी
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : शूद्र पूर्वी कोण होते ?
- डॉ. भाऊ लोखंडे : मराठी संत साहित्यावर बौध्द धर्माचा प्रभाव
- डॉ. गंगाधर पानतावणे : विद्रोहाचे पाणी पेटलेलेआहे
- भगवान ठाकूर : आंबेडकरी जलसे

## १.१३ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी :**

१. दलित साहित्याची पूर्वपरंपरा स्पष्ट करा.

२. दलित साहित्यामागील संत साहित्याचे योगदान विशद करा.

३. सत्यशोधकी जलशांचे स्वरूप विशद करा.

४. आंबेडकरी जलशातील रचनांचे विशेष स्पष्ट करा.

५. दलितांच्या वृत्तत्रांचे स्वरूप विशद करा.

**ब) लघुत्तरी / टिपा :**

१. जोतीराव फुले यांचे दलितोध्दारक कार्य लिहा.

२. वामनदादा कर्डक यांच्या लेखनाचा आढावा घ्या.

३. म. फुले यांच्या साहित्याचे महत्त्व स्पष्ट करा.

४. दलितांच्या नियतकालिकांचे स्वरूप विशद करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दलित साहित्य म्हणजे काय?

२. त्रिपिठक हे ग्रंथ कोणत्या साहित्यातील आहेत?

३. दलित चळवळ आणि साहित्य हा ग्रंथ कोणाचा आहे ?

४. अस्मितादर्श हे त्रैमासिक कोणी सुरू केले ?

५. नामांतर लढा कोणत्या विद्यापीठासाठी लढला गेला?

*****

# २अ

# दलित साहित्य: स्वरूप व संकल्पना

**घटक रचना**


२.० उद्देश

२.१ प्रस्तावना

२.२ दलित साहित्य संकल्पना

२.२.१ दलित

२.२.२ दलित जाणीव

२.२.३ दलित साहित्याच्या विविध भूमिका

२.२.४. दलित साहित्याची पूर्वपरांपरा

२.३ दलित साहित्य स्वरूप आणि विशेष

२.३.१ आत्मशोध

२.३.२ नकार

२.३.३ विद्रोह

२.३.४ समूहमन

२.३.५ बांधिलकी

२.३.६ विज्ञाननिष्ठा

२.४ समारोप

२.५ संदर्भग्रंथ

२.६ पूरक वाचन

२.९ नमूना प्रश्नसंच


## २.० उद्देश

- दलित साहित्यातील "दलित" ही संकल्पना समजावून घेणे.
- दलित साहित्याच्या विविध भूमिका अभ्यासणे.
- दलित जाणिवांचा अभ्यास करणे.
- दलित साहित्याची वैशिष्ट्ये जाणून घेणे.
- दलित साहित्याच्या विविध व्याख्यांचा अभ्यास करणे.
- दलित साहित्याचे स्वरूप समजावून घेणे.
- दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

मराठी साहित्यात १९६० नंतर विविध प्रवाह उदयास आले. या कालखंडानंतर दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, विज्ञानवादी साहित्य असे अनेक साहित्य प्रवाह उदयास आले. दलित साहित्य प्रवाह हा १९६० नंतर मराठी साहित्यात विकसित झालेला एक ठळक साहित्य प्रवाह आहे. या साहित्य प्रवाहाला सध्या "फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य" या नावाने ओळखले जाते. या साहित्य प्रवाहाच्या मुळाशी असणाऱ्या प्रेरणा गेल्या शतकातील विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घडामोडी आहेत. एकूणच या सर्व साहित्य प्रवाहाच्या मुळाशी शोषणाधिष्ठीत समाज रचना नष्ट झाली पाहिजे, हे समान सूत्र आहे. आणि म्हणूनच सर्व प्रकारच्या शोषणाविरुध्द, अन्ययाविरुध्द आवाज उठवणारे साहित्य या प्रवाहातून निर्माण झाले आहे असे आपणास दिसते. दलित साहित्य भगवान बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणा स्थान मानते. भगवान बुद्ध, आणि महात्मा फुले यांना दलित साहित्याचे आदिम प्रेरणा स्थान मानले गेले आहे. दलित चळवळीचे पहिले प्रणेते तथागत भगवान बुद्ध हेच आहेत. सर्वांना समान पातळीवर 'माणूस' म्हणून सन्मानाने जगण्याचे संपूर्ण इहवादी, लोकशाहीनिष्ठ, तत्वज्ञान प्रथम भगवान बुद्धाने दिले. दलित साहित्याच्या निर्मितीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महान विचार आहेत. बाबसाहेबांची विचारांची प्रेरणा घेऊन दलित साहित्य उदयास आले. 'दलित साहित्य' हा वाङ्मय प्रवाह केवळ मराठीतच नाही तर भारतीय स्तरावर स्थापित झाला आहे. जग जवळ येण्याच्या प्रक्रियेला वाढीला लागल्याने 'दलित साहित्य' हा वाङ्मय प्रवाह विश्वस्तरावरही चर्चिला जात आहे. दलित साहित्य दलितांच्या मुक्तीचे हत्यार आहे. दलितांच्या राजकीय हक्कांची कैफियत म्हणून दलितांकडे पाहिले जाते.

दलित साहित्य हे वेगळ्या जाणिवेचे साहित्य मानले जाते. वर्षानुवर्षे गावकूसाबाहेर जीवन जगणाऱ्या अस्पृश्य व अडाणी समजल्या जाणाऱ्या आणि राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उपेक्षित राहिलेल्या समूहाविषयी ही जाणीव आहे. नकार, दु:ख, अपमान, लाचारी, बेकारी, गुलामगिरी, शोषण, वेदना सहन करून हा वर्ग जगत आहे. याविरुद्ध आवाज उठवणे यातून विद्रोह करणे. हे दलित साहित्य शिकवते. तसेच दलित साहित्य हे वर्ण आणि वर्गवादाच्या विरोधी आवाज उठवते. तसेच हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्यचा कडाडून विरोध करते व माणसाला माणूस म्हणून वागवते. दलित साहित्य समता, बंधुता, न्याय आणि प्रज्ञा, शील, करुणा या मानवी मूल्यांचा पुरस्कार करते. दलित साहित्य समाजवादी, जीवनवादी, नीतिवादी, या भूमिका मांडते. दलित साहित्याने मराठी साहित्यात एक वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. दलित साहित्यविषयक वेगळी वैचारिक भूमिका विविध वाङ्मय प्रकारातून दलित लेखक समर्थपणे आपले वैचारिक स्वतंत्र मांडू लागले आहेत . प्रथम 'कविता' या साहित्यप्रकारातून दलित जाणिवांना मोकळी वाट मिळाली. त्यानंतर कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथा या प्रकारातून अवतरली. दलित लेखक आपली व्यथा-वेदना सांगण्यासाठी लिहितो. आपलं दु:ख, आपले प्रश्न लोकांना समजले पाहिजे, ही त्यांची भूमिका आहे. दलित साहित्य मानवी मूल्यांची आणि मानव अधिकारांची भाषा बोलते. हे साहित्य दलितांच्या चळवळीचे एक अविभाज्य अंग आहे. दलितांच्या समस्यांनी व्यापलेले आहे. हे प्रश्न जातीव्यवस्थेने निर्माण केलेले आहेत दलितांची अवहेलना आणि उपेक्षा ह्यास

दलित साहित्य नकार देते. दलितांवरील अन्याय-अत्याचारविरुद्ध विद्रोह करते. दलित साहित्यातील जीवन अनुभवविश्व, जाणिवा, वैचारिकता, भाषा, अभिव्यक्ती हे मराठी साहित्यापेक्षा संपूर्ण स्वतंत्र आहे. म्हणून दलित साहित्याचे स्वरूप मराठी साहित्यापेक्षा वेगळे आहे. मराठी साहित्यातील अनेक साहित्यप्रकारातून प्रेरणा घेऊन सामाजिक संस्कृती विरुद्ध  आवाज उठवून क्रांतीची प्रेरणा घेतली आहे. दलित साहित्यातील 'दलित' ही संकल्पना दलित साहित्याच्या विविध भूमिका, दलित साहित्याच्या जाणिवा, दलित साहित्याच्या विविध व्याख्या, दलित साहित्य संकल्पना, दलित साहित्याचे वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करून दलित साहित्याचे स्वरूप व वैशिष्टये पुढीलप्रमाणे समजून घेता येईल.

## २.२ दलित साहित्य संकल्पना

'दलित' साहित्याची संकल्पना समजावून घेतांना सर्वात प्रथम आपण दलित साहित्यातील 'दलित' या शब्दाचा अर्थ व आशय व्यापक भूमिकेतून लक्षात घेतला पाहिजे. दलित साहित्य हे शोषण व्यवस्थेविरुद्ध साहित्यातून विद्रोह व्यक्त करीत असते. समाजातील आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय अन्याय, अस्पृश्यता, जातीयता, यांचा विरोध करण्यासाठी अस्पृश्य वर्गातील साहित्यिक, लेखक, विचारवंतांनी साहित्यातून आपले प्रखर विचार मांडून या व्यवस्थेचा विरोध केला. गावकूसाबाहेरील भोगलेले जीवन दलित साहित्यातून मांडलेले आहे. दलितांची  वेदना, विद्रोह आणि नकाराची भावना यातून प्रकट होऊ लागले. दलित साहित्य सामन्यांच्या शोषित, पिडितांच्या इच्छा, आकांक्षाचे चित्रण करणारे साहित्य आहे आणि म्हणूनच सामान्यांसाठीचा झगडा, त्याचे दैंनंदिन प्रश्न, पदोपदी होणारा अपमान त्यांचे अनुभव आणि या सगळ्या घटनांकडे पाहण्याचा जो दृष्टिकोण याचे प्रतिबिंब या साहित्यात घडते. दलित साहित्य ही एक सामाजिक, सांस्कृतिक घटना आहे, केवळ वाङ्मयीन चळवळ नसून जीवनदृष्टी, प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि निर्भय सुरक्षितता याची भूमिका असणारी जीवनदृष्टी आहे. असे दलित साहित्याच्या संदर्भात विचारवंतांनी मांडले आहे. मराठी वाङ्मयाच्या  सातशे वर्षाच्या इतिहासात ज्यांना प्रवेशच देण्यात आला नव्हता तो आज ज्या साहित्यातील नायक झाला ते दलित साहित्य होय.

दलित साहित्य हे केवळ आर्थिक शोषणातून दलितांची मुक्ती व्हावी म्हणून आक्रोश करीत नाही तर वर्णव्यवस्थेविरुद्ध लढा पुकारून सामाजिक स्वातंत्र्य, समता व न्याय प्रस्थापित करण्यास वचनबद्ध आहे. माणसाला माणूस म्हणून हवी असणारी प्रतिष्ठाच हिरावून घेतली गेली म्हणून दलितांचे जीवन हा दलित साहित्याचा एक प्रमुख चित्रण विषय ठरला. पण दलित साहित्य ऐवढयापुरते मर्यादित नाही. कारण दलित साहित्यातील 'दलित' हा शब्द विशिष्ट समूहवाचक किंवा जातिवाचक नाही, तर त्यामध्ये अस्पृश्य दलिताप्रमाणेच बहुजन जातीचाही समावेश आहे. अस्पृश्य दलिताप्रमाणेच या बहुजन जातीचीही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक इत्यादी क्षेत्रात ही पिळवणूक केली गेली आहे. म्हणून हा बहुजन समाज सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या दलितच ठरतो. म्हणून भारतातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रात ज्यांच्या वाटयाला वंचित, उपेक्षित, अवमानित आणि अन्याय-जुलूमाचे जगणे आले, त्या जाती, वर्ग, गट या सर्वातील लोकांना 'दलित' म्हणता येईल. आणि त्याच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या साहित्याला दलित साहित्य म्हणता येईल.

दलित साहित्याची संकल्पना समजावून घेतांना आपण 'दलित' या संज्ञेचा अभ्यास करू.

### २.२.१ दलित:

'दलित' या शब्दाच्या विविध अर्थासंबंधी दलित व दलितेतर समीक्षकांनी आपले विचार मांडलेले आहेत. अत्यंत विषम मूल्यांवर आधारलेल्या आणि पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय समाज व्यवस्थेत तिने आखून दिलेल्या चाकोरीप्रमाणे जीवन कंठणारे धनदरिद्री, ज्ञानदरिद्री, असंघटित व म्हणून शक्तिहीन, सत्ताहीन, लाचार-दीन-दुबळे असे जे लोक ते सर्व दलित होय.

### २.२.२ दलित जाणीव म्हणजे काय?

दलित जाणीवेतून लिहिले गेलेले साहित्य म्हणजे दलित जाणीव होय. दलित जाणीवेमध्ये जीवनाच्या परिवर्तनाचा विचार आहे. नकार, विद्रोह, आत्मभान, आत्मसन्मान, सामाजिक बांधिलकीशी नाते, आशावादी दृष्टीकोन, वर्ण-वंश व्यवस्थेचा कडाडून विरोध, जडवाद, गतिवाद, निरीश्वरवाद ही दलित जाणिवेची वैशिष्ट्ये आहेत. या संदर्भात प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी मत मांडले आहे की, “दलित असणे व दलित जाणीव असणे भिन्न आहे. दलित जाणीवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय.” जन्मत: दलित असलेल्या लेखकाने लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय. आणि कोणत्याही लेखकाने लिहिलेले दलितांचे जीवन, त्यांची दु:खे म्हणजे दलित साहित्य. ही दोन भिन्न भूमिका आहेत. पण जातीव्यवस्थेचे चटके दलितेतर समाजातील लेखकाने तेवढया तीव्रतेने अनुभवले नसल्याने त्यांनी लिहिलेले साहित्य त्यात दलित जाणीवेचा अभाव दिसून येतो. त्यात सहानुभूतीचाच भाव अधिक असतो.

*** दलित साहित्यातील 'दलित' संज्ञा:**

'दलित' हा शब्द जन्मापासून शोषित- दलित या अर्थाने वापरला जातो. दलित साहित्यात माणसाला त्याच्या जन्मामुळे वाटयाला येणाऱ्या दु:खाचे चित्रण येते. प्रामुख्याने हे चित्रण पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांचे चित्रण आहे. यांच्या दु:खाच्या मुळाशी शोषण करणारा समाज आहे. दलित साहित्यातील ‘दलित’ हा जन्माने दलित आहे, शोषित आहे. बाबुराव बागूल, दया पवार, नामदेव ढसाळ, शंकरराव खरात, यशवंत मनोहर, प्र. ई. सोनकांबळे, शरणकुमार लिंबाळे हे साहित्यिक जन्माने अस्पृश्य आहेत तर लक्ष्मण माने, भुजंग मेश्राम, लक्ष्मण गायकवाड, दादासाहेब मोरे, असे अनेक साहित्यिक आदिवासी, भटके जमातीचे आहेत. म्हणूनच दलित हा शब्द जन्मापासून दलित शोषित या अर्थाने येतो. वेगवेगळ्या विचारवंतांनी, साहित्यिकांनी मांडलेल्या संज्ञा संदर्भात व्याख्यांचा थोडक्यात अभ्यास करु.

**बाबुराव बागूल :-**

"माणसाच्या मुक्तिचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य."

**डॉ. म. ना. वानखेडे :**

यांच्या मते, "दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य."

**प्रा. यशवंत मनोहर :-**

"दलित साहित्य हे वर्ण बळीचे आणि वर्गबळीचे साहित्य. बाबासाहेबांच्या वाणीचा हा वाङ्मयीन वणवा आहे. संस्कृतीने ज्यांची पोटे आणि मनेही उपाशी ठेवली त्या उपेक्षितांच्या हृदयाचे, मेंदूचे हे जिवंत ललिताकार आहेत. या साहित्याच्या पोटी एका मानवकेंद्री सुसभ्य युगाचा गर्भ वादळी निकराने वाढतो आहे."

**प्रा. केशव मेश्राम :-**

"हजारो वर्ष ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे."

पुढेही ते म्हणतात, 'ज्या साहित्यविश्वाला पूर्वपिढयांच्या व स्वनुभवांच्या झळाची झळाळी आहे. नेस्तनाबूत केलेल्या मानवी अस्मितेची उभारी आहे, विपरीततेच्या गर्तेतून व उपलब्ध साहित्यविश्वाच्या पोकळ कोलाहलातून स्वतंत्रपणे आकरण्याची आकांक्षा आहे ते दलित साहित्य.

**प्रा. गंगाधर पानतावणे :-**

"दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तिसंग्राम आहे. स्वत:ला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात माझे असे चित्र कोणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य. तो कोंडलेल्या मनाचे हुंकार आहे."

**प्रा. शरदच्चंद्र मुक्तिबोध :-**

दलित असणे व दलित जाणीव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय  निर्माण होते ते दलित साहित्य.

**पू. ल. देशपांडे :-**

"दलित वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रथम जर काही आणले असेल तर संतापातून चमकणारे अश्रू. अन्यायाविरुद्ध उठताना संतापातून फुटणाऱ्या अश्रूचे मोल हे सर्वात मोठे असते. सामन्याच्या भाषेत हा तळतळाट असतो. ह्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य."

**श्री. दि. के. बेडेकर :-**

"माझा समाज आजवर दलित होता. त्याला आता प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. ही प्रवृती या साहित्यात दिसते. दलित जीवनाचे वास्तव लढाऊ समाजपरिवर्तनाची व माणुसकीची जिद्ध, तिचा उद्गार व आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय."

**श्री राजा ढाले :-**

"जो जो या समाज रचनेविरूद्ध आणि सांस्कृतिक व्यूहविरुद्ध लढणारा दृष्टिकोण घेऊन साहित्यनिर्मिती करील आणि चुकलेल्या समाजाला वाटेवर आणील तो तो दलित साहित्यिक असेल आणि त्याचे साहित्य हे दलितांच्या दृष्टिकोणातून लिहिलेले असेल."

**प्रा. दत्ता भगत :-**

"आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषय दृष्टिकोनाधारे स्वत:ला आणि स्वत: भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य."

**गो. पू. देशपांडे :-**

"दलित साहित्य म्हणजे दलितांनी किंवा दलितांसाठी लिहिलेले साहित्य नव्हे, तर दलित संवेदनशीलतेतून जन्मलेले साहित्य होय."

वरील प्रमाणे दलित व्याख्यांवरून असे दिसून येते की, "दलित" या माणसाला केंद्रवर्ती ठेवून व्याख्या मांडल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून आणि प्रेरणेतून जन्माला आलेले दलित साहित्य केवळ दलितांसाठी लिहिलेले नव्हे. क्रांतिविन्मुखता आणि क्रांतिसन्मुखता यांच्या संघर्षातून निर्माण झालेले दलित साहित्य बंधमुक्त माणसाचा विचार करते. तसेच प्रत्येक माणसासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय आणि प्रज्ञा, शील, करुणा या मानवी मूल्यांचा पुरस्कार करते. इतर साहित्याहून दलित साहित्य निराळे ठरते. या साहित्यातील आत्मशोध आंबेडकरी विचार आत्मसात केलेल्या लेखकांचा आहे. आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे धर्म, रूढी, परंपरा, वर्णव्यवस्था इत्यादीमुळे मानवाचे शोषण केले जाते.

*** दलित जाणीव विशेष:**

'दलित साहित्य म्हणजे फक्त दलितांनी लिहिलेले साहित्य नव्हे. तर माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातीच्या श्रेष्ठात्वाला कठोर विरोध करणारे ते दलित साहित्य.' या बाबुराव बागुलांच्या विचारातून दलित साहित्य म्हणजे काय? याचे उत्तर मिळते. जन्माने दलित असणे आणि मनात दलित असणे या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. दलित जाणिवेचा विचार हा सामाजिक बांधिलकीशी जुळवला जातो. विषम पातळीवरून दलित जाणिवा व्यक्त करणाऱ्या दलित साहित्याने भारतीय जीवन पद्धतीचे डोळस भान ठेवावे लागते. दलित साहित्याची शोषणाविरुद्ध सामाजिक व आर्थिक बांधिलकी लक्षात घेतली पाहिजे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक शोषणाविरुद्धची ही जाणीव आहे. हीच जाणीव दलित साहित्यातून प्रकट होत असते. 'दलित जाणीव किंवा संवेदनशीलता मुळात स्वायत्त, स्वयंसापेक्ष नाही. दलितेतर समाजाची सापेक्षता तिच्यात गृहीत धरलेली आहे. हा दलितेतर समाज किंवा संदर्भ खूप बदलत चालला आहे व त्याच्या सोबत दलित  समाज देखील  बदलत आहे. एक मात्र खरे की, दोहोतील हे अपरिहार्य बदल सर्वथा अपेक्षेप्रमाणे होत नाही. त्यामुळे खैरलांजी हत्याकांडासारख्या अमानुष घटना आजही घडताना दिसतात. पण बदलाच्या प्रवाहाची दिशा दलित-दलितेतर अंतर कमी करण्याकडे आहे, गुणवत्ताधिष्ठीत समानता निर्माण करण्याकडे आहे, असे दिसते. हे नव्या दिशेचे निदर्शक आहे. एकूणच मराठी जाणिवेत, मराठी संवेदनशीलता, मानसिकतेत हा आशाकिरण पाहण्याची व जपण्याची ऊर्मी निर्माण व्हावयास हवी.' असे प्रा. रा. ग. जाधव यांना वाटते.

* दलित जाणिवेसंदर्भात दलित विचारवंतांनी आपले वेगवेगळे मते मांडलेले आपणास दिसून येतात.

**डॉ. भालचंद्र फडके :-**

"दलित जाणीव म्हणजे महाराष्ट्राच्या विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीतून निर्माण झालेली व्यक्ति -समष्टीसंबंधीची निरोगी संकल्पनेसंबंधीची जाणीव होय."

**बाबुराव बागूल :-**

"दलित जाणीव म्हणजे लोकशाहीची जाणीव होय. समता, स्वातंत्र, बंधुता व माणसाच्या मोठेपणाची होय."

**वामन निंबाळकर :-**

"जातीयतेमुळे किंवा कोणत्याही अन्य कारणामुळे झालेले शोषण या विषयी निर्माण झालेली चीड आणि या चिडीतून संघर्ष करावा अशी निर्माण झालेली जाणीव म्हणजे दलित जाणीव होय."

**डॉ. वासुदेव मुलाटे :-**

"दलित जाणीव म्हणजे दलित जीवनाच्या परिवर्तनाचा विचार आहे. आशावादी दृष्टिकोण, दलित जीवनाची दु:खे तरलतेने टिपण्याची प्रवृती तसेच सामाजिक बांधिलकीशी असणारे अतूट नाते म्हणजे दलित जाणीव."

**दया पवार :-**

"मध्यमवर्गीय समाजाने स्वीकारलेल्या जाणिवेला छेद देणारी, तळागाळतील माणसाबद्दल आपुलकी बाळगणारी, कप्पेबंद व्यवस्थेला नकार देणारी जी क्रांतिकारी जाणीव तीच दलित जाणीव."

**वसंत पळशीकर :-**

अस्पृश्य असणाऱ्याच्या पोटी आपला जन्म झाला आहे आणि अशा मलिनपणात आपला जन्म झालेला आहे आणि मलिनपणात आपल्याला जन्म काढायचा आहे याची सदोदित जाणीव असणे म्हणजे दलित जाणीव असणे."

वरील प्रमाणे दलित जाणिवे संदर्भात दलित विचारवंतांनी आपले वेगवेगळे मते मांडलेले आपणास दिसून येतात. दलित जाणीव दलित प्रश्नाकडे मानवाधिकारच्या दृष्टीने पहाते. सुधारणावादी विचाराने प्रेरित झालेली जाणीव असून ती क्रांतिकारी भूमिका घेतांना दिसते. दलित जाणीव जाती व्यवस्थेच्या विरोधात बोलत असते. चातुर्व्यवस्थेखाली दाबलेल्या गेलेल्या वेदनेचा हुंकार म्हणजे दलित जाणीव होय. या जाणिवेत सामाजिक बांधिलकी आहे तसेच शोषणाविरुद्ध नकार देखील आहे. दलित जाणीव विशिष्ट सामाजिक दृष्टिकोण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या सामाजिक समतेचा विचाराचा आविष्कार दलित जाणिवेच्या माध्यमातून प्रकट होतांना दिसते. दलित लेखक हा सामाजिक बांधिलकी

मानणारा लेखक आहे. जे जे जगलं, भोगलं, अनुभवले, ते ते तसचं साहित्यात मांडले. लेखक अशोक व्हटकर लिहितता" मला समजू लागल्यापासून मी ज्या पद्धतीच्या समाजात राहलो, वाढलो, शिकलो आणि आता वावरत आहे, त्या समाजाचे यथाशक्ती प्रामाणिकपणे मी चित्रण केले आहे. हयासारखे दलित लेखक सामाजिक जाणिवेने ओतप्रोत भरलेले दिसतात. तर बाबुराव बागूल म्हणातात "अपृश्यता लवकर घालायची असेल तर खेडी सोडा, नाही तर धर्मव्यवस्थेवर आधारलेली अर्थव्यवस्था मोडा. वरील विचारातून असे दिसून येते की, दलित लेखकाची मानसिकता ही इतर लेखकांच्या मानसिकतेहून वेगळी आहे. दलित लेखकाचा अनुभव हा जातीविशिष्ट अनुभव आहे. दलित लेखकाच्या लेखनात जात हा एक महत्वाचा घटक आहे. जन्माने दलित असलेला माणूस व्यवस्थेला आव्हान देतो, हे रुचणारे सत्य आहे. आंबेडकरी विचार आणि दलित लेखकाचा भोगवटा ह्या रसायनातून दलित जाणीव जन्मली आली.

### २.२.३ दलित साहित्याच्या विविध भूमिका:

दलित साहित्य संकल्पनेच्या संदर्भातील वेगवेगळ्या साहित्यिकांच्या भूमिका पुढील प्रमाणे सांगता येतील.

**नामदेव ढसाळ :-**

"दलित म्हणजे अनुसूचित जातीजमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजुर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी इत्यादी होय.

**डॉ. प्रभाकर मांडे :-**

"दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह, ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरवला गेला आहे. ज्यांच्या जन्माने ज्यांच्या वाटयाला या समाजरचनेत एकाच प्रकारचे जीवन आले आहे, माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरले गेले आहे, ज्यांना माणसासारखे मनाने जगणे नाकारले गेले आहे ते दलित होय."

**डॉ. म. वा. वानखेडे :-**

"दलित म्हणजे केवळ बौद्ध अथवा मागासवर्गच नव्हे, तर जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व 'दलित' म्हणून सांगतात."

**प्रा. जनार्दन वाघमारे :-**

"भारतीय दलितला अनेक शतकांपासून संस्कृतीच्या, धार्मिक व सामाजिक जीवनाच्या बांधणीत व विकासात बरोबरीचा हिस्सा मिळू शकत नाही. या देशाचा वारसदार असूनही त्याला वारसा प्राप्त झाला नाही. तो या देशाचा, पण हा देश त्याचा कधीच होऊ शकला नाही, असा तो दलित."

**प्रा. केशव मेश्राम :-**

"दलित शब्दच स्फोटक आहे. महान संस्कृतीचे गोडवे गाणारी समाजव्यवस्था, तिने स्वीकारलेली धर्म व ईश्वर ही भयस्थाने, त्यांना सहाय्यभूत होणारी चतुर्वर्ण्यव्यवस्था,

तीच्यातून निर्माण झालेले जन्माधारित वंशश्रेष्ठत्व अशा या काटेरी साखळीत फार मोठा समाज तिरस्कृत ठरला गेला त्यामुळे उद्धोष मानवतेचा असला तरी कृत्य अमानवीपणाचे, चर्चा बंधुत्वाची पण वागणूक शत्रुत्वाची अशी आहे. मूल्य समानतेचेपण पद्धती विषमतेची, अशा दाहक अनुभावातून पिळवटल्या गेलेल्या माणसाच्या अनंत दु:ख-अपेक्षांना, प्रतिकारच्या हुंकारला, मूल्य व अस्मितेच्या शोधला, दलित शब्द प्रेरक ठरला आहे."

वरील विचारवंतांच्या दलित साहित्याच्या विविध भूमिकेच्या चर्चेवरून असे स्पष्ट होते की, भारतीय जातीवर्गीय परंपरेतील समाजस्थितीशी निगडीत लावलेला आहे. या विविध विचारवंतांच्या भूमिका दलित साहित्याच्या मूळ प्रयोजनावर आणि प्रेरणेवर मुख्यत: प्रकाश टाकतात.

### २.२.४ दलित साहित्याची पूर्वपरंपरा :

दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वी ही उदयास आलेले होते. डॉ. आंबेडकर पूर्व काळापासून दलितांच्या चळवळीना सुरुवात झालेली होती. सत्याग्रह, भाषणे, उठाव, आंदोलने या स्वरूपाचे होते. तसेच ते वाङ्ग्यीन स्वरूपाचेही होते. यांच्याही साहित्यकृतीच्या मुळाशी 'विद्रोह' हाच होता.

थोडक्यात आपण दलित साहित्याच्या पूर्वपरंपरा अभ्यासू.

*** संत चोखामेळा:-**

दलित साहित्याच्या पूर्वपरंपराचा अभ्यास करतांना संत चोखामेळा यांच्या साहित्यनिर्मिती पासून करावा लागेल. संत चोखामेळा जन्माने अस्पृश्य असून वारकरी संप्रदायातील संत कवि होत. त्यांच्या अभंगातून ईश्वर भक्तीबरोबरच समाजातील विषमतेची जाणीव ही ते व्यक्त करतांना दिसतात. संत चोखामेळा आपल्या अभंगातून रूढी-परंपरेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतात.त्यांच्या अभंगातून

“मज दूर दूर हो म्हणती"

अशी ईश्वराजवळ ते तक्रार करतात. या तक्रारीतून सामाजिक विषमतेचे दु:ख प्रकट होते. आणि या दु:खाचा जेव्हा कडेलोट होतो तेव्हा

"पापांचा घडा भरेल त्यांचा,

नरक यातना सहतील ते ।

ते माणूस नाही दैत्याची अवलाद ।

त्यांचे त्यांना भोगू दे ॥

अशी चीड, संताप ते व्यक्त करतात. ही एक प्रकारची विद्रोहचीच भावना आहे.

आपले दु:ख, वेदना ते देवभक्तीमध्ये बुडविण्याचा प्रयत्न करतात.

"कोण तो सोवळा कोण तो ओवळा ।
कोणाशी विटाळ कशाचा जाहला ।।"

असा विद्रोहाचा आवाज त्यांच्या अभंगातून अधूनमधून उठत असला तरी,

'अहोजी, तुमचे दारीचा मी कुतरा' असे लाचार शब्द ही येतात. तरीही चोखोबांनी सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज उठवला. दलित वर्गाच्या वेदनेला, दु:खला शब्दरूप देणारे दलित साहित्याचे पहिले उद्गाते ठरतात.

*** शिवराम जानबा कांबळे:-**

शिवराम कांबळ्यांचे वडील जानबा कांबळे हे पुण्यातील भांबुर्डे गावाचे वतनदार महार होते. त्यांनी दलितोद्धाराचे काम येथूनच केले. हिंदू समाजाची पुर्नबांधणी करायची असेल तर उच्चवर्णीयांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले होते. बाबा पद्मनजी आणि ज्योतिबा फुले यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन शिवराम कांबळे यांनी आपल्या लेखातून स्पष्टपणे विचार मांडले. मराठा दिनबंधू (कोल्हापूर) यामध्ये प्रकाशित केलेल्या पहिल्या पत्रात आपली मते त्यांनी परखडपणे आणि निर्भयपणे मांडली. तसेच त्यांनी आपल्या न्याय-हक्कांच्या मागण्यासाठी पार्लमेंटला अर्ज सादर केला होता. तत्कालीन सरकारने संधी दिली तर महार जमात मागे राहू शकत नाही, असे त्यांनी ब्रिटिश सरकारला आवाहन केले.

शिवराम जानबा कांबळे यांनी १९०३ मध्ये पुणे जिल्ह्यातील सासवड येथे ५१ गावांच्या महारांची सभा बोलावली होती. आपल्या हक्कांसाठी अस्पृश्यांनी केलेला हा पहिला संघटित आणि सनदशीर प्रयत्न होता. १९०८ मध्ये त्यांनी 'सोमवंशीय मित्र' नावाची मासिक पत्रिका सुरू केली. १९१० मध्ये शिवराम जानबा कांबळे यांनी जेजूरी येथे महारांची भव्य परिषद भरवली आणि महारांनी आपल्या मुलींना 'मुरळी' म्हणून देवाला वाहू नये, असे आवाहन केले. त्यांनी आपल्या लेखणीतून अस्पृश्यांमधील अंधश्रद्धेवर जसे प्रहार केलेले आहेत तसे सवर्ण आणि ब्रिटीशांकडून होणाऱ्या अन्ययाविरुद्ध दाद ही मागितलेली दिसते.

*** गोपाळ बाबा वलंगकर:-**

गोपाळ बाबा वलंगकर हे ब्रिटिशांच्या लष्करातून १८८६ मध्ये निवृत्त झाले. त्यांनी आपल्या सेवानिवृत्तीनंतर अस्पृश्य समाजाची सेवा करण्यासाठी 'अनार्य दोष परिहार' नावाची संघटना स्थापन केली. सन १८८८ मध्ये त्यांनी 'विटाळ विध्वंसन' नावाची पुस्तिका लिहून अस्पृश्यतेवर विदारक प्रकाश टाकला. गोपाळ बाबा वलंगकर यांना जेव्हा अस्पृश्यांना जेव्हा ब्रिटिश लष्करात बंदी केली आहे हे कळले तेव्हा त्यांनी महात्मा फुले, बाबा पद्मनजी यांची भेट घेऊन चर्चा केली. आणि १८९४ मध्ये ब्रिटिश सरकारकडे निवेदन सादर केले. त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले होते, "अस्पृश्यांची लष्करात भरती केली पाहिजे. अस्पृश्यांनी वेळोवेळी ब्रिटिशांच्या बाजूने लढून आपले शौर्य सिद्ध केले आहे. तेव्हा ब्रिटिश सरकारने अस्पृश्यांच्या लष्कर भरतीस बंदी करू नये." यांनी अस्पृश्यांच्या सुधारणाविषयक कार्याला वाहून घेतले होते. अस्पृश्यांमधील पोटजातीतील तणाव संपवणे, त्यांच्या मध्ये रोटी-बेटीचा

व्यवहार सुरू करणे, त्यांना मृत मांस खाण्यापासून परावृत्त करणे, त्यांच्या संघटनेची जाणीव निर्माण करणे. असे कार्य केले आहेत.

गोपाळ बाबा वलंगकर दलितांमधील वृत्तपत्राचे पहिले वार्ताहार म्हणून ही ओळखले जातात. त्यांनी विटाळ विध्वंसन या पुस्तकातून अस्पृश्यतेचे जोरदार खंडन केले आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोपाळ बाबा वलंगकरांची सामाजिक कार्यांची स्तुती केली आहे.

*** किसन फागुजी बंदसोडे:-**

किसन फागुजी यांनी दलित व्यथेला, वेदनेला आपल्या कवितेतून व प्रहसनातून प्रत्ययकारी शब्दरूप दिले. अस्पृश्यांसाठी शाळा, वाचनालये आणि वसतिगृहे सुरू केली. सन १८९० सुमारास आपले समाजकार्य सुरू केल्याचे दिसते. सन १९०७ मध्ये त्यांनी अस्पृश्य मुलींच्या शिक्षणासाठी 'चोखामेळा कन्याशाळा' स्थापन केली. महार मजुरांचे प्रश्न सोडवण्यासाठी किसन फागू बंदसोडे यांनी प्रयत्न केले. त्यांनी सन १८८८ ते १९२२ ह्या काळात 'मजदूर पत्रिका' नावाने पत्र चालवले. १९९९ मध्ये 'अंत्यज समाज' नावाची संस्था स्थापन केली. किसन फागुजी बंदसोडे यांनी कविता, तमाशा, नाटक अशा साहित्य प्रकार लिहून अस्पृश्यांच्या प्रश्नाविषयी जागरूकता निर्माण केली आणि अस्पृश्यांच्यावतीने संघर्ष केला. तत्कालीन समाज व्यवस्थेचे वास्तव रूप त्यांनी काव्यातून प्रकट केले.

'पशु हुनि केले हीन ।
नच उर दिला कुठे मान ॥
असे सांगतांच
'साहू नका कुणाचा जुलूम ।
होऊ नका कुणाचे गुलाम ।
सोडून या रे सारे बदकाम ।

असा स्वाभिमानी संदेशही ते देतात. यातून बाहेर पडण्यासाठी

'महाराशी अंती । नही लढ्याविण मुक्ती ॥

असा लढा, संघर्षाचा मार्ग ते सांगतात. या सर्वांनीच आपआपल्या स्वभाव धर्मानुसार साहित्यातून विद्रोह व्यक्त केले आहे. त्यांचे साहित्य दलित जाणीवेतून उदयास आलेले आहे. समाज जागृतेचे आव्हान व प्रबोधन आणि समाज परिवर्तन हे त्यांच्या साहित्याचे महत्वाचे विशेष आहेत. या काळातील वैचारिक लेखन हे अभंग, कवणे, गीते, काव्य, शाहीरी या वाङ्मयाच्या मुळाशी होते. समाज जागृती व प्रचार हाच हेतू दिसतो.

## २.३ दलित साहित्य स्वरूप आणि विशेष

दलित साहित्य हे आधुनिक साहित्य आहे. तसेच ते चळवळीचे साहित्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून दलित साहित्याची चळवळ उभी राहिली. कारण माणसाला माणूस म्हणून आत्मसन्मानाने जगण्यासाठी दिशा या दलित साहित्य चळवळीने

प्राप्त करून दिली. स्वातंत्र्योतर काळातल्या दलित चळवळीच्या झंझावातामुळे हे साहित्य जसे प्रभावित झाले आहे. तसे आंबेडकरी विचाराच्या प्रेरणेमुळे ह्या साहित्याचा उदय झाला आहे. दलित चळवळीचा मुख्य उद्देश माणसाला 'माणूस' म्हणून जगवले पाहिजे. दलितांचे शोषणापासून मुक्ति करण्यासाठी साऱ्या शोषितांचा हुंकार हा नकार, प्रक्षोभ, बंड आणि विद्रोहाच्या माध्यमातून दलित साहित्यातून व्यक्त होतो. दलित साहित्य सामाजिक आणि सांस्कृतिक घटना आहे.

### २.३.१ आत्मशोध :

दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्याच्या विविध चळवळीने आत्मसन्मानाने जीवन जगण्याची दिशा दिली. दलित साहित्य हे चळवळीचे साहित्य आहे. या चळवळीचा मुख्य उद्देश माणसाला 'माणूस' म्हणून वागणूक दिली गेली पाहिजे हा होता. वर्षानुवर्ष माणसाला माणूस पण नाकारले गेले. विषम समाज व्यवस्थेमुळे दलितांना अतिशय हीन, पशू सम वागणूक दिली गेली. जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे सर्व मार्ग सवर्णांनी बंद केले होते. अशा दलितांना आत्मसन्मानाने जगण्याची दिशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली. शिक्षणाचे महत्व दलितांना पटवून दिले. शिक्षणाच्या संस्काराने त्यांच्या विचारांना मार्ग दाखविला. म्हणूनच आत्मसन्मानाची जान आणि भान दलित साहित्यातून प्रकर्षाने व्यक्त होते. कारण दलित मुक्तिच्या लढ्यातील मुख्य उद्देश माणसाचा आत्मसन्मान म्हणजेच माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा देणे हाच आहे.

### २.३.२ नकार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते दलित वर्गामध्ये आत्मभान निर्माण झाले पाहिजे आणि आत्मसन्मानाच्या मार्गात ज्या ज्या गोष्टी अडसर ठरतात त्या सर्वांना नकार दिला पाहिजे हा भाव आहे. धर्माधिष्ठित रूढी- परंपरेला दलित वर्गाने नकार दिला. अस्पृश्यता हा दलितांच्या देहावरील कलंक आहे, वेळ पडली तर दलित वर्गाने आपल्या रक्ताने आपणच तो कलंक पुसून काढला पाहिजे. या बाबासाहेबांच्या विचाराने त्यांच्या आत्मभान निर्माण झाला. शोषण, अंधश्रद्धा, गुलामगिरी, अन्याय, विषमता इत्यादींना नकार देण्याची भूमिका दलित साहित्य घेते. समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, विषमतेला नकार दिला पाहिजे. समाजात खोलवर रुजलेली अन्यायकारक व्यवस्था नाकारणे, हे कोणत्याही विद्रोही चळवळीचे सूत्र असते. उदा. त्र्यंबक सपकाळे यांच्या कवितेत

"आम्ही गॉड मेकर
देतो नोटीस तुझ्यावर
निग्लिजन्स ऑफ ड्यूटीची
युवर सव्हिसेस आर नॉट रिक्वायड"

दलित समाज आक्रमक व संघर्षशील झालेला आहे. मानव म्हणून जगण्यासाठी जात, वर्ण, धर्म , संस्कृती, परंपरा, देव या सर्वाना नाकारले आहे. म्हणून अन्यायाला नकार दिला पाहिजे असे दलित साहित्य मानते.

### २.३.३ विद्रोह :

भारतीय चातुर्वर्ण्यधिष्ठित समाजव्यवस्थेविरुद्ध दलित साहित्याने विद्रोही भूमिका स्वीकारली आहे. या साहित्यात प्रकट होणारे नकार व विद्रोह हे आत्म शोधाचीच प्रकट रुपे आहेत. दलित साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह हा मुख्यत: धर्म, रूढी, परंपरा, संस्कृती इत्यादींना पवित्र व श्रेष्ठ मानून त्या आधारे दलितांना वर्षानुवर्ष गुलाम ठेवू पाहणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध हा विरोध येतो. हा विद्रोह या व्यवस्थेवर आघात करतो. दलित साहित्यातील विद्रोह विशिष्ट व्यक्तिविरुद्ध किंवा विशिष्ट जमातीविरुद्ध नाही तर तो विषमतेविरूद्ध आहे. हा विद्रोह प्रस्थापित व्यवस्थेचा प्रतिशोध नसून एका समान पातळीवरील व्यवस्थेची नितांत गरज प्रतिपादण्याच्या हेतूने आलेला आहे. उदा. दया पवार आपल्या कवितेत म्हणतात.

"हे महाकावे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे?
हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास ....
तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते."

### २.३.४ समूहमन :

दलित साहित्यामध्ये समूहमनाचे दर्शन होते. कोणतीही कलाकृती ही एका व्यक्तीची निर्मिती असते. त्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारा अनुभव हा एका व्यक्तीचा नसून त्या समाजातील सर्वांचा अनुभव असतो. दलित साहित्यात मात्र निर्मितीच्या पातळीवर एका व्यक्तीची असणारी अनुभूति एकाच वेळी व्यक्तिनिष्ठ ही असते व समूहनिष्ठ किंवा समाजनिष्ठ असते. कारण दलित समाजात अन्याय, शोषण, विषमता, दारिद्र्य याने पीडला गेला आहे. धर्म, रूढी, परंपरा माथी टाकलेले बहिष्कृत जगणे हा सर्व समाजाचा अनुभवाचा भाग आहे. म्हणून दलित साहित्यातून येणारे साहित्यिक जेव्हा आपले अनुभव व्यक्त करतो तेव्हा तो अनुभव त्या साहित्यिकाप्रमाणेच त्याच्या समुहाचेही अनुभव असतात. दलित आत्मकथनाचा विचार केला तर तो 'मी' चा अनुभव 'आम्ही' चाही बनतो.

### २.३.५ बांधिलकी :

दलित साहित्यिक हा सामाजिक बांधिलकी मानणारा लेखक आहे. तो आपल्या समाजाचा पक्षकार होऊन लेखन करत असतो. त्याची बांधिलकी जबाबदारीच्या भावनेतून निर्माण झालेली असते. 'बांधिलकी' या शब्दाचा अर्थ कोणत्या तरी एका भूमिकेशी बांधील राहणे असा घेतला जातो. दलित लेखकाची जन्मनाळ ह्या वर्गाच्या वेदनेशी जखडलेली आहे. दलित साहित्यातील बांधिलकी त्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनमूल्यांच्या संदर्भात आहे. धर्माधिष्ठित सामाजिक विषमता, या विषमतेतून वाटयाला आलेले पशुपेक्षाही हीन, भयावह जीवन, डॉ. बाबासाहेबांच्या रूपाने दिसलेला प्रकाशाचा मार्ग यांच्या प्रेरणेतून दिसतो. दलित साहित्याचा उद्देश मानवी जीवनात स्वातंत्र्य, समता, बंधुता, व न्याय मिळावा हा आहे. या करिता पारंपरिक व्यवस्था उद्ध्वस्त केली पाहिजे. तरच माणसात

सौहार्द जपले जाईल. म्हणूनच दलित साहित्यात दलित समाजाच्या दु:ख, भोगाचे आणि वेदनेचे चित्रण येते. आणि याचवेळी सर्व माणसामध्ये मैत्रीपूर्ण नात्याची अपेक्षा व्यक्त करते.

### २.३.६ विज्ञाननिष्ठा :

दलित साहित्य ईश्वरकल्पनेला नकार देते. आंबेडकरवाद हा मानवी मूल्यावर आधारलेला तो भक्कम अशा बुद्धिवादावर उभा आहे. आणि बुद्धतत्वज्ञांनाची त्याची मूल बैठक असल्याने विज्ञान हे त्यांचे एक अंग आहे. भगवान बुद्ध प्रमाणे आंबेडकरवादानेही ईश्वर, आत्मा यांना नाकारले. देवधर्माला, धर्मशास्त्राला त्याच्या सिद्धान्तयास नाकारले आहे. प्रा.रावसाहेब कसबे म्हणतात,

"प्रज्ञा, शील, करुणा व मैत्रीची सांगड म्हणजे आंबेडकरवाद

अनित्य, अनात्म, अनिश्वरवाद आणि

विज्ञानवाद म्हणजे आंबेडकरवाद

बुद्धीप्रामाण्य, विवेक, गती, तर्क आणि

बुद्धिवादाचा स्वीकार म्हणजे आंबेडकरवाद"

यामुळे आंबेडकरी प्रेरणेतून दलित साहित्याचा विज्ञाननिष्ठा हा एक गुणधर्म आहे.

## २.४ समारोप

दलित साहित्य भगवान बुद्ध, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणास्थानी मानते. डॉ. बाबासाहेब यांच्या पूर्व काळातील गोपालबाबा वलंगकर, शिवबा जनबा कांबळे, किसन फागोजी बंदसोडे, गणेश आकाजी गवई इत्यादींच्या कार्य व लेखनातून दलित साहित्याची पूर्वपीठिका तयार झालेली आहे. बाबासाहेब यांनी सुरू केलेल्या दलित चळवळीपासून प्रेरणा घेऊन पदे, पोवाडे, वग, हे साहित्य निर्माण झाले. दलित लेखकांनी प्रस्थापित व्यवस्थेला नकार दिला आणि क्रांतिकारक विद्रोहाचा मार्ग स्वीकारला. दलित लेखकांनी साहित्यनिर्मितीकडे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहिले. दलित साहित्याने सामाजिक आणि सांस्कृतिक विषमतेविरुद्ध आवाज उठवला. प्रस्थापित व्यवस्थेला नकार दिला. मानवतेच्या अधिष्ठानावर उभ्या असलेल्या समाजव्यवस्थेची मागणी केली, यासाठी त्यांनी 'शब्द' आपले हत्यार बनवले आणि ते साहित्यातून व्यक्त होऊ लागले. वाङ्मयाकडे समाज प्रबोधनाचे माध्यम म्हणून त्याचा वापर करू लागले. आपल्या जीवनाच्या व्यथा त्यांनी साहित्यात मांडले. साहित्यकृतीचा आशय, रूपबंध व मूल्य या पातळ्यावर दलित साहित्याने बंडखोरीची भूमिका स्वीकारली. सर्व साहित्य प्रवाहांच्या मुळाशी शोषण हा समान घटक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूढी परंपरेच्या भयावह, अन्यायकारक यांच्या जोखडातून दलित वर्गाला यातून बाहेर पडण्याचा लढाऊ मार्ग दाखविला. पिढयानुपिढयांचे अत्याचार, दारिद्र्य, भूक, अन्याय, इत्यादीचा भोगवटा आला. यामुळेच मनुष्याचे हक्क हिरावून घेणाऱ्या प्रस्थापित धर्माधिष्ठित समाजरचनेशी संघर्ष हे दलित साहित्याचे ध्येय आहे. दलित साहित्याने मनुष्यत्व हेच श्रेष्ठ मूल्य मानले. म्हणून

दलित साहित्य वास्तववादी साहित्य असून ते जीवनमूल्यांचा पुरस्कार करणारे साहित्य आहे.

## २.५ संदर्भग्रंथ


- डॉ. लिंबाळे, शरणकुमार - दलित साहित्य आणि सौदर्य ( समीक्षा )
- प्रा. जाधव, रा. ग. - साहित्य: बदलते परिप्रेक्ष्य
- श्री. खंडेराव, हरीश - आंबेडकरवादी साहित्य: दृष्टिकोण आणि दायित्व
- एम. ए भाग २, मराठी अभ्यास पत्रिका क्रं ८- दलित साहित्य ( भाग १ ) संकल्पना आणि स्वरूप - दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ.
- http://lib.unipune.ac.in:८०८०/ jspui/bitstream/१२३४५६७८९/७५११/८/०८_chapter%२०३.pdf
- फडके, भालचंद्र - दलित साहित्य वेदना आणि विद्रोह.
- जाधव, रा. ग. -निळी क्षितिजे.


## २.६ पूरक वाचन


- बागूल, बाबुराव - दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान, बुद्धिष्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर.
- भगत, दत्ता - दलित साहित्य दिशा आणि दिशांतर.
- खरात, शंकरराव - दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृती.
- कसबे, रावसाहेब - आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे प्र. आ. १९८५ .
- पानतावणे, गंगाधर - दलित वैचारिक वाङ्मय , मुंबई विद्यापीठ, मुंबई प्र. आ. मे, १९९५.


## २.७ नमूना प्रश्नसंच

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. दलित साहित्य स्वरूप आणि दलित साहित्याचे वैशिष्ट्ये सांगा.

२. दलित साहित्य म्हणजे काय? ते सांगुन दलित साहित्याच्या विविध संकल्पना स्पष्ट करा.

३. दलित साहित्याच्या विविध भूमिका स्पष्ट करा?

४. दलित साहित्य स्वरूप आणि दलित साहित्याच्या प्रेरणा लिहा.

५. दलित साहित्याची पूर्वपरंपरा सविस्तर स्पष्ट करा.

६. दलित संकल्पना स्पष्ट करून दलित साहित्याच्या प्रेरणा सांगा.

७. दलित साहित्याच्या विविध भूमिका सांगून दलित साहित्याची वैशिष्टये लिहा.

**ब) टिपा लिहा.**

१. दलित साहित्य संकल्पना

२. दलित जाणीव

३. दलित साहित्याच्या विविध व्याख्या

४. दलित साहित्यातील विद्रोह

५. दलित साहित्यातील समूहमन

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दलित साहित्य साधारणत: कोणत्या वर्षी उदयास आलेला साहित्य प्रवाह आहे?

२. "माणसाच्या मुक्तिचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य." ही दलित साहित्याची व्याख्या कोणत्या विचारवंताची आहे?

३ . जन्मापासून शोषित या अर्थाने कोणता शब्द वापरला जातो?

४ . कोणाच्या मते, "दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य." होय?

*****

# २आ

## दलित साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ दलित साहित्य प्रेरणा

२.२.१ भगवान गौतम बुद्ध-

२.२.२. महात्मा ज्योतिबा फुले-

२.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर-

२.३ दलित साहित्याचे प्रयोजन

२.३.१ दलित जाणिवांचा उच्चार

२.३.२ वेदना, विद्रोह, नकार या त्रिसूत्रींची मांडणी

२.३.३ जगाची समताधिष्ठित पुन:रचना

२.३.४ केवळ मनोरंजन नाही...तर वैचारिक परिवर्तन घडवून आणणे

२.३.५ आत्मोद्धार व अस्मितांचे प्रकटन

२.४ समारोप

२.५ संदर्भग्रंथ सूची

२.६ सरावासाठी प्रश्न

### २.० उद्दिष्टे

सदरील घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

- दलित साहित्याच्या प्रेरणा ध्यानात येतील.
- भगवान गौतम बुद्ध व बौद्ध धम्माचा परिचय होईल.
- म. जोतिराव फुले यांचे सामाजिक व वाङ्मयीन विचार-कार्य ध्यानात येईल.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्यकर्तृत्वाचा सर्वांगीण परिचय होईल.
- दलित साहित्याच्या प्रेरणांबरोबरच दलित साहित्य निर्मितीमागे कार्यरत असलेल्या प्रयोजनांची ओळख होईल.

## २.१ प्रस्तावना

मराठी साहित्य अवकाशात १९६० नंतर 'दलित साहित्य' हा अत्यंत समृद्ध प्रवाह आकारास आला. १९६० नंतरचा कालखंड हा भारताचा स्वातंत्र्योत्तर कालखंड होय. ब्रिटिश राज्याचा अंत होऊन नव्या राज्याच्या स्थापनेनंतरचा हा कालखंड होता. गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वातंत्र्याचा अनुभव सबंध भारत देश घेत होता. पण भारतातील बहुजन वर्गातील दलित म्हणून गणल्या गेलेल्यांच्या वाट्याला मात्र हा अनुभव दुरापास्त होता. जात-पात-वर्ग-वर्ण-पंथ-लिंग अशा अनेक कारणामुळे अजूनही बहुजन स्त्री-शूद्रातिशूद्राना गुलामगिरीतून येणाऱ्या अन्याय-अत्याचाराला सामोरे जावे लागत होते. या काळातच आधुनिकीकरण, शहरीकरण, व्यापार- उद्योगधंद्यांची वाढ, नव्या मिल्सची स्थापना, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण अशा अनेक गोष्टींनी समाज प्रभावित होता. त्यामुळे गावगाड्यात भूमीहीन, कष्टकरी वर्गाला चाकोरीपेक्षा वेगळे काम मिळण्याची संधी शहरातून उभी राहिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अपार कष्टामुळे या नव्या संधी अजमावणे त्यांना शक्य झाले. नवी दलित पिढी शिक्षण घेऊ लागली. आपल्या आधीच्या व आपल्या पिढीतील दु:ख, संघर्षाचे शब्दचित्र रेखाटू लागली. हे अनुभवविश्व चाकोरीबाहेरचे होते. त्यामुळे भारतीय साहित्य परंपरेला मराठी साहित्याचे मोठे योगदान म्हणजे 'दलित साहित्य' होय असे म्हणणे वावगे ठरत नाही.

दलित जाणिवा व्यक्त करणाऱ्या 'दलित साहित्याचा' प्रारंभ याआधी कित्येक वर्षापूर्वी झाला होता. पण ती या दलित साहित्य प्रवाहाची ती पूर्व परंपरा म्हणून गणता येईल. १९६० नंतर तो प्रवाह मात्र अत्यंत प्रभावीपणे सुरू झाला. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन अशा अनेक साहित्यप्रकारातून तो विकसित होत गेला. भारतभरातल्या एकूण दलित साहित्यामध्ये अत्यंत मोलाचा वाटा, ठसा हा महाराष्ट्रातल्या दलित साहित्याचा दिसतो. एकतर अनेक साहित्य प्रकार या प्रवाहाने हाताळले आणि दुसरे म्हणजे या साहित्य - लेखनामागील प्रेरणा आणि प्रयोजन या दोन्ही कारणांमुळे हा प्रवाह अत्यंत जोमाने विकसित होत गेला. त्यामुळे मराठी साहित्य परंपरेतील निराळे अनुभवविश्व साकार करणाऱ्या दलित साहित्यामागील प्रेरणा कोणत्या होत्या आणि या साहित्य निर्मितीमागील प्रयोजनाचा विचार या घटकामध्ये करू या.

## २.२ दलित साहित्य प्रेरणा

आपण या आधीच्या घटकांमध्ये 'दलित' ही संकल्पना, दलित चळवळ व दलित साहित्याची पूर्वपिठीका अभ्यासलेली आहे. त्यामुळे त्याचा इथे पुनःउच्चार न करता दलित साहित्यामागील प्रेरणांचा आपण इथे विचार करू. 'साहित्य प्रेरणा म्हणजे ज्यांच्यामुळे साहित्य अभिव्यक्त व्हायला प्रेरित होते.' ती गोष्ट. दलित ही एक जाणीव आहे आणि ती साहित्यातून व्यक्त होऊ लागली ते साहित्य 'दलित साहित्य' म्हणून नावारूपास आले. दलित जाणिवेचे भान अनेक महामानवांच्या विचार-कार्यानी करून दिले. यामध्ये भगवान गौतम बुद्ध, महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रमुख प्रेरणा मानल्या जातात. आणि याच महामानवांना दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी मानले जाते.

दलित साहित्य हे आतापर्यंत समाजाने बहिष्कृत केलेल्या, सर्व सुख, सुविधा, हक्क, अधिकारांपासून वंचित ठेवलेल्या वर्गातील अभावग्रस्ततेचे साहित्य आहे. दलित साहित्य ही स्वत:च एक प्रेरणा आहे. दलित साहित्य हे पारंपरिक साहित्याच्या तुलनेत आशय, विषय, अनुभवविश्वाच्या अनुषंगाने निराळे ठरते. त्यातून व्यक्त होणाऱ्या दु:ख, वेदना, संघर्षाला जेव्हा पहिल्या शिक्षित पिढीने मांडले त्याच अनुभवातून अनेकांचा प्रवास झाला होता. या वेदना आपणही भोगल्या आहेत. हा विषय जर साहित्याचा असू शकतो तर मी ही लिहू शकतो असा एक आत्मविश्वास या साहित्यातूनच मिळत गेला. त्यामुळेच दलित साहित्य ही स्वत:च एक प्रेरणा आहे शहर व गावगाड्यातील सर्वांना यातून एक उर्मी मिळत गेली. त्यामुळे या साहित्य निर्मितीमागील वाङ्मय प्रेरणा ही सामूहिक स्तरावरची होती. याबाबतचे मत बाबुराव बागुल व्यक्त करताना म्हणतात, ''अनेक सुधारकांना, विचारवंताना त्यांचे शत्रू दिसत होते. त्यांनी ज्यांना शत्रु लेखले होते ते त्या त्या कालखंडात बरोबरही होते. मार्क्सवाद्यांना आणि समाजवाद्यांना त्यांचे शत्रू दिसतात. अनेक राजकीय पक्षांना त्यांचे विरोधक शत्रु दिसतात. पण आमचा शत्रु तर अदृश्य आहे. तो ग्रंथात आहे, भाषेत आहे, शब्दांत आहे, विचारात आहे. तो मनात आहे. प्रचंड असूनही सर्वव्यापी आणि अदृश्य असलेल्या शत्रूबरोबर आमचे युद्ध सुरू झालेले आहे.'' (बाबुराव बागुल, 2007, पृ. 273) या भूमिकेमुळेच ही एक साहित्य चळवळ म्हणून उभी राहिली. जी चाकोरीबद्ध जीवनसरणीला बाजूला सारून वास्तववादी समग्र मानवी जीवनाला साक्षात करणारी होती. या संदर्भाने म. भि. चिटणीस यांचे मत महत्त्वपूर्ण ठरते. ते म्हणतात, "दलित साहित्याची वाङ्मय प्रेरणा ही जितकी वैयक्तिक तितकीच सामाजिकही आहे. दलितांच्या वाट्याला आलेले जीवनानुभव वेगळे होते. आणि या वेगळेपणाच्या वैशिष्ट्यातूनच दलित साहित्याचा वेगळा प्रवाह सुरु झालेला आहे. अन्यायी जुनी समाजरचना मोडून नवे समान पुनर्घटन केल्याविना आपले व्यक्तिगत आणि आपल्या वर्गाचे जीवन सुंदर होणार नाही असा त्यांचा दृढ विश्वास असल्यामुळे त्यांच्या वाङ्मय अभिव्यक्तीत नीतीची प्रेरणा अनुस्यूत राहणारच. ही नीती म्हणजे बाबासाहेबांनी सांगितलेला बुद्धधम्म." (म. भि. चिटणीस, ११९) म्हणजेच दलित साहित्याच्या प्रेरणेमध्ये भगवान गौतम बुद्ध, म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य आहे तसेच दलित साहित्य हेही स्वत:च एक प्रेरणा आहे. एकूणच दलित साहित्याच्या निर्मितीमागे अनेक प्रेरणा अनुस्यूत आहेत हे ध्यानात येते.

दलित साहित्याच्या प्रेरणेबद्दल कृष्णा किरवले म्हणतात, "दलित साहित्याची प्रेरणा आंबेडकरी तत्त्वज्ञान आहे, तर आंबेडकरी विचारांना बौद्ध तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक आहे. बौद्ध तत्त्वज्ञान जसे तत्कालीन रूढ झालेले इतर सांप्रदायिक तत्त्वज्ञान नाकारून अवतीर्ण झालेले आहे, तसेच आंबेडकरी तत्त्वज्ञान हे मानवी कल्याणाला बाधक ठरणारे तत्त्वज्ञान नाकारून क्रियाशील झालेले आहे." (कृष्णा किरवले : २००६ : प्रस्तावना, पृ. १७) दलित साहित्याच्या भगवान गौतम बुद्ध. म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रमुख तीन प्रेरणांचा आपण इथे परिचय करून घेऊ.

### २.२.१ तथागत गौतम बुद्ध (जन्म ५६३ ई सा पूर्व - निर्वाण ४८३ ईसा पूर्व):

दलित साहित्य चळवळीतील एक प्रेरणा ही महाकारुणी तथागत गौतम बुद्ध हे होत. भगवान गौतम बुद्धांचे मूळ नाव सिद्धार्थ. शाक्य गणराज्याचा शुद्धोधन व त्यांची पत्नी महाराणी महामाया (मायादेवी) यांचे ते सुपुत्र. पण आई महामायांच्या निधनानंतर त्यांचा सांभाळ

मावशी व सावत्र आई महाप्रजापती गौतमी यांनी केला. यामुळे त्यांना 'गौतम' म्हणून ओळखले गेले. भगवान गौतम बुद्धांनी 'बौद्ध' धम्माची स्थापना केली. पाली भाषेमध्ये धर्मालाच 'धम्म' असे संबोधले गेले त्यामुळे 'बौद्ध धम्म' हा शब्द आता सर्वत्र स्थिर झालेला आहे. भगवान बुद्ध "धम्मचक्र प्रवर्तन" सुत्तात म्हणतात की, "माझ्या धम्माचा ईश्वर, आत्मा, कर्मकांड व मरणोत्तर जीवनाशी कसलाही संबंध नाही. माणूस आणि माणसाचे माणसाशी या जगातील नाते हा माझ्या धम्माचा केंद्रबिंदू आहे. मनुष्यप्राणी दुःख, दैन्य आणि दारिद्र्यात राहात आहेत. हे सर्व जग दुःखाने भरले आहे. म्हणून हे दुःख नाहीसे करणे हा माझ्या धम्माचा उद्देश आहे. दुःखाचे अस्तित्व मान्य करणे आणि ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हा माझ्या धम्माचा पाया आहे." (Udit Sharma, उद्धृत-विकिपीडिया वरून) गौतम बुद्धांचे सर्व तत्त्वज्ञान तत्कालीन पाली भाषेतून मांडले गेले आहे. हे तत्त्वज्ञान त्रिपिटकांमध्ये समाविष्ट आहे. याच भाषेतून त्यांनी धम्माची शिकवण व आचारविचार सांगितले. ही शिकवण 'चार आर्यसत्ये', 'अष्टांग मार्ग' व 'पंचशील' यांच्याद्वारे सांगितलेली आहेत. बौद्ध धम्माची स्थापना ही भारतात झाली असली तरी या धम्माचा प्रसार जगाभरामध्ये झालेला आहे. जगातील सर्व स्त्री-पुरुष हे समान आहेत, सर्वांना सन्मानाने जगण्याचा हक्क निसर्गानेच दिला आहे. हे लोकशाहीवादी, समतावादी समानतेचे तत्त्वज्ञान प्रथम भगवान बुद्धांनी मांडले. यासाठी त्यांनी मानवतावादी बौद्ध धम्माची स्थापना केली. या धम्मामध्ये 'मानव' हाच केंद्रबिंदू मानला गेला. या धम्माच्या तत्त्वज्ञानानुसार "प्रज्ञा-शील-समाधी" ही जीवनाची प्रमुख तीन अंगे आहेत.

**प्रज्ञा :** मनाच्या संयमाने - समाधीने ज्या सत्याची जाणीव होते ती स्वतःची जाणीव असते. त्यामुळे अशा प्रत्यक्ष अनुभवलेल्या ज्ञानालाच 'प्रज्ञा' असे म्हटले जाते.

**शील :** शील म्हणजेच सदाचार. जेव्हा एखादी व्यक्ती मनामध्ये निर्मल भावना ठेवून शरीर व वाणीने कर्म करते तेव्हा त्या व्यक्तीला मिळणारे सुख हे अमर्यादशील, कालातीत असते.

**समाधी :** मनावर संयम असेल तर चांगले कर्म घडून येते. व्यक्ती दुराचारापासून लांब राहतो. मन जसे भटकेल तसे त्याला श्वासाची जाणीव करून दिल्यास मन नियंत्रित राहते. यालाच समाधी असे म्हटले जाते.

तत्कालीन समाजजीवन हे अनेक विषमता, जातीभेदांनी व्यापलेले होते. या सर्वांविरोधीचे समतेचे तत्त्वज्ञान भगवान बुद्धांनी मांडले. मानवाचे कल्याण स्वातंत्र्य, अहिंसा, नितिमत्ता, समानता या जीवनमूल्यांच्या अंगिकारातच आहे याची जाणीव त्यांनी करून दिली. मानवाला पतनापासून वाचविण्याचे व मानवाचा उत्कर्ष साधण्याचे काम भगवान बुद्धांनी केले म्हणून त्यांना मानवतेचे, क्रांतिप्रवर्तक मानले जाते. अहिंसा, प्रेम अशा जीवनमूल्यांची पेरणी त्यांनी केली म्हणूनच ते 'महाकारूणी' म्हणून ओळखले जातात. सर्व प्रकारच्या शोषणांचा, सर्व विषमतांचा धिक्कार करुन समानतेच्या मूल्यांची प्रतिष्ठापना त्यांनी केली.

या धम्माने वैज्ञानिक दृष्टिकोणाचा पुरस्कार केला. दुसरा कोणी सांगतो म्हणून न ऐकता वास्तव - सत्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवण्याचा विचार मांडला गेला. म्हणूनच हा धर्म विज्ञानवादी धर्म मानला जातो. तसेच स्त्री व कनिष्ठ जातीतील लोकांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. शिक्षणाने माणूस शहाणा होतो याची जाणीव करून

दिली. आणि म्हणूनच त्यांनी त्या काळात 'तक्षशिला 'व 'नालंदा' येथे विद्यापीठांची स्थापना केली. जी भारतीय परंपरेतील सर्वात प्राचीन विद्यापीठे होत.

अशा अनेक मानवहिताच्या मूल्यांची जोपासना या धम्माने केली. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतरासाठी बौद्ध धम्माचीच निवड केली व या धम्माच्या निवडीतून अनेक दलितांसाठी आत्म-सन्मानाची, स्वातंत्र्याची, समानतेची कवाडे खुली केली.

### २.२.२ महात्मा ज्योतिबा फुले (११ एप्रिल १८२७ -२८ नोव्हेंबेर १८९०):

महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचे सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, समाजसुधारक, लेखक, पुरागामी चळवळीचे अग्रणी म्हणून म. फुले यांना ओळखले जाते. म. फुले यांचे प्रमुख कार्य हे धर्मसुधारणा, शिक्षणाचा आग्रह व प्रसार विविध प्रकारच्या विषमता, अन्याय, शोषण व जातीभेदाविरुद्धचा लढा या अनुषंगाने आहे.

ज्योतिराव गोविंदराव फुले हे त्यांचे पूर्ण नाव. सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या हयातभर मानवी जीवनकल्याणाचे विचार - कार्य केले. या दोघांना भारतातील स्त्री-दलित शिक्षणाचे प्रणेते मानले गेले. तत्कालिन समाजजीवन हे विविध भेदांचे, विषमतेचे आगर होते. समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्य व पुरुषसत्ताकवादी होती. ज्यामध्ये शिक्षणाचा, ज्ञानाचा अधिकार फक्त उच्चवर्णीय पुरुषांनाच होता. दलित, मागासलेल्या स्त्री-पुरुषांना त्यापासून वंचित ठेवले गेले होते. समाजामध्ये सुधारणा घडवायची असेल तर प्रथम शिक्षणाची कास धरली पाहिजे हे म. फुलेंनी ओळखले होते. आणि म्हणूनच त्यांनी इ.स. १८४८ मध्ये पुण्याच्या भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. तर इ.स. १८५१ मध्ये पुण्यात महार-मांगासाठी पहिली शाळा त्यांनी उघडली.

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।
विद्याविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

हा शिक्षणाचा फायदा सांगणारा अखंड त्यांनी रचला. शिक्षण ही एक अशी गोष्ट आहे जी माणसाला त्यांच्या सत्य- वास्तव परिस्थितीची जाणीव करून देते. माणसाला विचारी बनवते. त्यामुळेच समाजसुधारणा करायची असेल तर ती कुटुंबापासून व कुटुंबातल्या स्त्रीपासून करावी असे त्यांचे मत होते. म्हणूनच त्यांनी स्त्री व दलितांच्या शिक्षणाचा आग्रह धरला.

जात वर्चस्वातून माणूस माणसाला गुलामीची वागणूक देतो, हे सामाजिक वास्तव म. फुलेंसमोर होते. म्हणूनच त्यांनी जातव्यवस्थेतून विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेला विरोध केला. अस्पृश्यता, दारिद्रय, वेदना, शोषण, अन्याय या सर्व गोष्टी समाजातल्या केवळ स्त्री शूद्रातिशूद्रांच्याच वाट्याला येतात. त्यामुळे त्यांचा विकास खुंटतो. यासाठी समतेचा पुरस्कार केला पाहिजे. जात-वर्णाधारीत व्यवस्थेला विरोध केला पाहिजे. म. फुलेंनी या कार्याची सुरुवात स्वत:पासूनच केली. या वर्गाचे उन्नयन करण्यासाठी, जागृती निर्माण करण्यासाठी त्यांना शिक्षित केले पाहिजे. ज्यातून त्यांना त्यांच्या हक्क, अधिकाराची, स्वातंत्र्याची जाणीव होईल. त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्वतःच्या

घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद खुला केला. धर्म, शिक्षण, न्याय याचे हक्क स्त्री आणि पुरुष यांना वेगवेगळे होते. अशा परिस्थितीत म. फुलेंनी समानतेचा आग्रह धरला. धर्म व रूढीसंदर्भात त्यांनी जळजळीत लेखन केले. धर्माच्या नावाने बहुजन समाजाला गुलाम बनवले जायचे. यासाठीचा पर्याय म्हणून त्यांना मानवी जीवनाला केंद्रभूत ठेवणाऱ्या 'सत्यशोधक समाजाची' १८७३ मध्ये स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करून सर्व स्त्री शूद्रातिशूद्रांना शिक्षण पोहोचणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. त्यांना उच्च वर्गातील लोकांबद्दल तिरस्कार, चीड़ नव्हती तर माणसाला गुलाम बनवणाऱ्या वृत्ती आणि व्यवस्थेबद्दल त्यांना चीड होती. आणि म्हणूनच ते याविरुद्ध बंडखोरपणे बोलत व लेखन करत असत.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे परिवर्तनवादी, मानवतावादी लेखन कार्य अत्यंत मोलाचे आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा ग्रंथ 'सत्यशोधक समाजाचा' प्रमाण ग्रंथ आहे. संत तुकारामांच्या अभंगातील बंडखोर रूप म. फुले यांच्या 'अखंड' मधून दिसते. 'गुलामगिरी' हा त्यांचा अत्यंत मौलिक ग्रंथ. तर 'तृतीय रत्न' नावाचे समाजभान देणारे नाटक त्यांनी रचले. 'अस्पृश्यांची कैफियत' या नावाचा त्यांचा एक अप्रकाशित ग्रंथ आहे. त्यांच्या या एकूण लेखनामध्ये अन्याय, अत्याचार, विषमता, जात-धर्म-भेदाभेद यावर टिका असून समतेचा, न्यायाचा, स्वातंत्र्याचा पुरस्कार त्यांनी केलेला दिसतो. या सर्व अनुषंगाने म.ज्योतिबा फुले यांचे कार्य दलित साहित्याच्या प्रेरणेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. जगभरातले अनेक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंतांचा परिचय झाल्यानंतर अभ्यासाअंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म. फुले यांना आपले गुरु मानले होते. डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानणे यातून त्यांच्या कार्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होताना दिसते.

### २.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल १८९१ - ६ डिसेंबर १९५६):

दलित साहित्य हे 'दलित' या संवेदनेतून जन्मलेले आहे. 'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या. मगच तो पेटून उठेल' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाची सत्यता दलित साहित्याच्या पानापानांतून दिसते. दलित साहित्याच्या आधुनिक युगातील मुख्य आणि मूल प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार - कार्याची आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित लेखकाला नवे मन दिले. दलित साहित्यातील अनुभवाभिव्यक्ती ही जशी व्यक्तिमनाची असते तशी ती समूहमनाचीही असते. या अर्थाने दलित साहित्य हे एक सामाजिक जाणिवांच्या अभिव्यक्तीचे साहित्य असते असे म्हणता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ब्रिटिशकालीन भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ, न्यायशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ होते. त्यांच्या या विविध क्षेत्रातील कामगिरीमुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' म्हणून संबोधले गेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वडिलांचे नाव रामजी मालोजीराव सकपाळ. डॉ. आंबेडकरांचे पणजोबा म्हणजेच मालोजीराव इंग्रजांच्या राजवटीच्या सैन्यात शिपाई म्हणून कार्यरत होते. सैन्यातील नोकरीमुळेच सैनिकी शाळेमध्ये मालोजीराव यांचे शिक्षण झाले. त्यांच्या चार अपत्यांपैकी रामजी हे एक अपत्य. रामजी यांचेही सैनिकी शाळेत शिक्षण झाल्यामुळे ते १८६६ मध्ये इंग्रजी सैन्यात वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी शिपाई म्हणून

भरती झाले. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांचा विवाह भीमाबाईंशी झाला. इंग्रजी भाषा चांगली येत असल्याकारणाने त्यांनी पुढे सुभेदार व सैनिकी शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. रामजी व भीमाबाई यांना चौदा अपत्ये झाली. त्यापैकी चार मुली व तीन मुले हयात होती. भिमराव आंबेडकर हे त्यांचे सर्वात लहान चौदावे अपत्य होते. आंबेडकरांचे मूळचे कुटुंब हे 'आंबडवे' (जि.रत्नागिरी, ता. मंडणगड) गावचे होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म महाराष्ट्रातल्या अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या 'महार' या दलित जात वर्गातील कुटुंबात झाला. त्यामुळे जन्मासोबत मिळालेली जात आणि या जात - वर्गातून मिळणाऱ्या अन्याय, हीन वागणूक, अस्पृश्यता, विषमता या वागणुकीचे चटके त्यांना लहानपणापासून अनुभवाला आले. गावकुसाबाहेरचे जगणे केवळ त्यांच्याच वाट्याला आले नाही तर सर्वच जातबांधवांच्या ते वाट्याला आले. याची जाणीव त्यांना शिक्षणातून होत गेली. माणूस कितीही शिकला, ज्ञानी झाला तरी त्याला त्याची जात बदलता येत नाही या कटू सत्याची जाणीव त्यांनी झाली. या जाणिवेतूनच त्यांनी सामाजिक भेदभाव नष्ट करणारी चळवळ उभी केली. तसेच स्त्री व कामगारांच्या हक्कांचे समर्थन करून त्यांच्या हिताचे अनेक कायदे त्यांनी भविष्यात संविधानाच्या माध्यमातून केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष अनेक पातळ्यांवरचा होता. याबाबत शरणकुमार लिंबाळे म्हणतात, "बाबासाहेबांनी अस्पृश्यांची कैफियत गावकुसापासून ते गोलमेज परिषदांपर्यंत मांडली. अस्पृश्यांच्या समान हक्कांसाठी पाण्यापासून ते परमेश्वरापर्यंत संघर्ष केला." (दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, किंबाळे, पृ.१०) अस्पृश्य समाजाचा विकास करायचा असेल तर केवळ शिक्षण, सरकारी नोकरी मिळून उपयोग नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्येसुद्धा जागृती निर्माण होऊन त्याबाबतचे हक्क आणि अधिकार मिळाले पाहिजे असा त्यांचा विचार होता आणि त्यासाठी ते सतत कार्यरत राहिले.

सामाजिक व सांस्कृतिक जागृती म्हणजे केवळ अस्पृश्यांना त्यांच्या हक्क आणि अधिकाराची जाणीव करून दिल्याने होणार नव्हती. तर त्यासोबतच या गोष्टीचे भान, जागृती प्रस्थापितांच्या मनातही निर्माण करण्याचे आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर होते. अशा दोन्ही बाजूने त्यांचे कार्य सुरू होते. त्यांनी २० जुलै १९२४ ला अस्पृश्यांची 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ही संघटना उभी केली. बहिष्कृत हितकारिणी सभा ही बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, वाचनालये सुरू करणे, वसतिगृहे स्थापन करणे, उद्योग, शेतकी शाळा, संस्कारक्षम वाचनालये चालविणे या उद्दिष्टयांनी सरसावलेली सामाजिक संस्था होती." या सभेच्या माध्यमातून त्यांनी "शिका-संघटित व्हा व संघर्ष करा" हा मूलमंत्र दिला व स्व - हक्कासाठी लढण्याची नवी उर्मी त्यांनी दलितांमध्ये जागृत केली. १९ व २० मार्च १९२७ ला 'महाडचा समता संघर्ष' उभारला. याद्वारे महाडचा 'चवदार तळ्याचा सत्याग्रह' घडवून आणला.

"हिंदू धर्मव्यवस्था म्हणजे एक विचार व्यवस्था होय" असे बाबासाहेबांचे मत होते. या व्यवस्थेचा प्रत्येक व्यक्तीसोबत केला जाणारा व्यवहार हा जातनिहाय होता. आणि दलित जातसमूहाच्या वाट्याला हा व्यवहार मात्र अमानवी स्वरूपाचा होता. एकाच धर्मातील असले तरी दलितांना धर्मस्थळांवर प्रवेश नव्हता. यासाठीही बाबासाहेबांना संघर्ष करावा लागला. "आम्ही हिंदूच आहोत, आम्हास देवाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात प्रवेश हवा आहे."

याकरिता त्यांनी २ मार्च १९३० ला नाशिक येथे 'काळाराम मंदिर प्रवेशाचा' सत्याग्रह केला. दलितांना दलित म्हणून दिल्या जाणाऱ्या वागणुकीच्या मुळाशी 'मनुस्मृती' या ग्रंथातील विचार कारणीभूत होते. त्यामुळे त्यांनी अशा भेदाभेद निर्माण करणाऱ्या विचाराचे प्रतिकात्मक दहन म्हणून २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे 'मनुस्मृती' या ग्रंथाचे सार्वजनिक दहन केले. बाबासाहेबांनी केवळ हिंदू धर्म व हिंदू धर्मीयांवरच टीका केली असे नाही तर अस्पृश्यातील लाचारी, आगतिकता यावर कठोर व कडवट हल्ले केले. धर्मकारण, त्यातील अनिष्ठ प्रथा-परंपरा याची जाणीव त्यांनी 'हिंदूंचे धर्मशास्त्र', 'हिंदू धर्माला नोटीस' यासारख्या अग्रलेखातून करून दिली. डॉ. बाबसाहेबांनी त्यांच्या कार्यकाळाच्या प्रारंभापासून क्रित्येक वर्षे हिंदू धर्माच्या चौकटीमध्ये राहूनच समाज सुधारणेचे काम केले. पण सवर्ण, प्रतिगामी लोकांचा दृष्टिकोन बदलणे शक्य नाही असे त्यांना जेव्हा वाटू लागले तेव्हा त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निर्णय घेतला.

डॉ. आंबेडकरांचा परिवर्तनाचा विचार हा सर्वांगीण होता. म्हणूनच त्यांच्या विचारामध्ये आर्थिक स्वातंत्र्याचा विचार मांडलेला दिसतो. आपल्या समाजातल्या प्रत्येक व्यक्तीची आर्थिक कोंडीतून सुटका व्हावी यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. जात व्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून, त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. (संदर्भ-विकिपीडिया) 'अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया' सारखा त्यांचा अग्रलेख त्यांच्या या विचाराचा वाहक आहे.

**डॉ. बाबासाहेबांचे शिक्षणविषयक कार्य:**

डॉ. आंबेडकरांच्या एकूण कारकिर्दीमधील महत्त्वाचे कार्य म्हणजे शिक्षण विषयक कार्य होय. म. फुले, छ. शाहू महाराज या पूर्व पिढीच्या महात्म्यांनी स्त्री शूद्रातिशूद्राना शिक्षण देण्यासाठी खूप प्रयत्न केले. याचे प्रत्यंतर आपल्याला त्यांच्या चरित्र अभ्यासल्यानंतर दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याचा पुढचा टप्पा पार पाडला. दलित समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी मुंबई येथे 'सिद्धार्थ महाविद्यालय' (१९४६) तर औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालय' (१९४९) सुरू केले.

वैचारिक प्रबोधन करण्यासाठी त्यांनी नियतकालिके सुरू केली. मानसिक गुलामगिरीतून अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठी ३१ जानेवारी १९२० ला मुंबई मध्ये 'मूकनायक' नावाच्या या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. ते बंद पडल्यानंतर 3 एप्रिल १९२७ ला 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले. २८ जून १९२८ ला 'समता' हे मासिक सुरू केले. 'जनता' हे नियतकालिक २४ जाने १९३० ला सुरू केले. ते ४ फेब्रुवारी १९५६ पर्यंत सुरू होते. या सर्व नियतकालिकांतून त्यांनी समाज प्रबोधनात्मक लेखन सातत्याने केले. अस्पृश्य, बहिष्कृत मानल्या जाणाऱ्या शूद्रातिशूद्र लोकांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध त्यांनी या लेखनाद्वारे वाचा फोडली. हा अन्याय कमी करण्यासाठी सरकारपुढे काही उपाययोजना ठेवल्या. या लेखनातून त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. याव्यतिरिक्त भारतीय बहुविध समाज व्यवस्था-धर्म व्यवस्था, त्यातील समस्या आणि त्यावरील उपाययोजना यासारख्या अनेक विषयांवर प्रकाश टाकणारे त्यांनी ग्रंथलेखन केले. 'प्रॉब्लेम ऑफ द रूपी', 'कास्ट इन इंडिया', 'थॉट्स ऑन पाकिस्तान', द अनटचेबल्स', 'हू

वेअर दि शुद्राज' इ. त्यांची महत्त्वपूर्ण ग्रंथसंपदा. या ग्रंथातील त्यांच्या लेखनातून इतिहास संशोधकाची दृष्टी दिसते. सामाजिक तळमळ, स्पष्टवक्तेपणा, सत्यता, सूत्रबद्धता, विचारपूर्णता या गुणांचे दर्शन यातून घडते. सुलभता हे त्यांच्या लेखनाचे शैलीविशेष. तसेच विज्ञाननिष्ठा, बुद्धि- प्रामाण्यता याही गुणांचा परिचय त्यांच्या लेखनातून होतो. हिंदू धर्मातील अनिष्ट चाली, रूढी, जात व वर्णव्यवस्था व त्यातून ओढवल्या जाणाऱ्या अन्यायग्रस्त, शोषण व्यवस्थेला नकार म्हणून त्यांनी हिंदू धर्माचा त्याग केला. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला या गावी भरलेल्या परिषदेत त्यांनी “मी अस्पृश्य जातीत हिंदू म्हणून जन्माला आलो ते माझ्या हाती नव्हते, पण हिंदू म्हणून मरणार नाही.” असे घोषित केले. या घोषणेनंतर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी त्यांच्या कोटयावधी अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केला. हे धर्मांतर म्हणजे केवळ धार्मिक बाब नव्हती तर या घटनेला एक सामाजिक सांस्कृतिक आशयही होता. बौद्ध धम्माच्या स्वीकारामुळे नव्या सांस्कृतिक जीवनाकडे दलितांची वाटचाल सुरू झाली होती. त्यांच्या या एकूण कार्यामुळे त्यांना आत्मोद्धाराच्या चळवळीचे क्रांतिकारी मानले जाते.

वरील तीन महामानवांच्या विचार कार्याच्या प्रेरणेतून शुद्रातिशूद्र समाज एकसंध झाला. स्वत:च्या जीवनाबद्दल, त्यातील व्यथा, वेदना संघर्षाबद्दल स्वत:च बोलले पाहिजे, स्वत:च लिहिले पाहिजे याचे भान त्यांना येत गेले. त्यामुळे दलित साहित्याच्या प्रमुख प्रेरणांमध्ये या तीन महामानवांचे विचार व कार्य प्रामुख्याने येताना दिसते.

## २.३ दलित साहित्याचे प्रयोजन

प्रयोजन म्हणजे हेतू किंवा उद्देश होय. एखाद्या व्यावहारिक गोष्टीच्या निर्मितीमागील हेतू सांगणे सहज शक्य होते पण साहित्य ही एक कलानिर्मिती आहे. त्यामुळे तिच्यामागील हेतू सांगणे हे गुंतागुंतीचे असतात. एखादा लेखक किंवा कवी कोणत्या हेतूने साहित्यनिर्मिती करतो हा प्रश्न अनेक भारतीय पाश्चात्त्य अभ्यासकांनी साहित्यशास्त्राची मांडणी करताना विचारात घेतलेला आहे. याबाबतीत संस्कृत साहित्य मीमांसक मम्मटाचे विचारसूत्र ज्ञात आहे. यश, अर्थप्राप्ती, अशुभनिवारण, कांतासंमित उपदेश, उच्च आनंद, व्यवहारज्ञान याव्यतिरिक्त जीवनभाष्य, जिज्ञासापूर्ती, आत्माविष्कार, पलायनवाद इ. अशी अनेक प्रयोजने सांगितली गेली आहेत.

ही प्रयोजने परंपरागत साहित्यनिर्मितीमागील आहेत. पण मराठी साहित्यामध्ये 'दलित साहित्य' या नावारूपाने एक झंझावाती समृद्ध साहित्यप्रवाह निर्माण झाला. या प्रवाहांतर्गत आत्मकथन, कथा, कविता, नाटक, कादंबरी अशा बहुविध प्रकारांतून लेखन झाले. हे साहित्य विशिष्ट अशा प्रेरणांतून उगम झालेले होते आणि यांच्या निर्मितीमागेही वेगळी प्रयोजने कार्यरत होती. प्रस्तुत प्रकरणात आपण दलित साहित्याच्या असणाऱ्या वेगळ्या प्रयोजनांचा विचार करणार आहोत.

### २.३.१ दलित जाणिवांचा उच्चार:

साहित्य आणि समाज हे नेहमी परस्परसंबंधी, परस्पर पूरक असतात. एखाद्या सृजनशील लेखकाला नव जाणिवा प्राप्त होतात त्या समाजातून. अशा नव जाणिवा लेखक आपल्या वाङ्मयीन कृतीतून व्यक्त करत असतो. वाचकही लेखनातून नेहमीच नव्या जाणिवांची,

अनुभूतीची अपेक्षा करत असतो. या अभिव्यक्तीतून नव विचारांची प्रेरणा जागृत होते आणि परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान व्हायला सुरुवात होते. "नवजीवनमूल्यांवर आधारित कलाकृतीचे वाचक आस्वादकांद्वारे स्वागत होणे, याच स्वागतशील प्रवृत्तीमध्येच परिवर्तन प्रक्रियेचा सुप्त मनोव्यापार क्रियाशील असतो." (पृ. ११२) या जाणिवांतून लिहिलेले साहित्य हे अधिक जीवनाभिमुख व वास्तववादी असते. उदा. दलित साहित्य, मार्क्सवादी साहित्य इ. यातून अभिव्यक्त होणाऱ्या जाणिवा या अधिक वास्तववादी व जीवनाभिमुख आहेत. या साहित्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता या मानवी मूल्यांचा परिपोष झालेला दिसतो. ही मूल्ये मानवाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणतात. दलित समाजाच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये दलित साहित्याचे बहुमोल असे योगदान आहे. यातून केवल बौद्धिक परिवर्तन झाले नाही तर मानसिक परिवर्तनही घडवून आणले गेले. दलित म्हणून वाट्याला आलेले जीवन ही कित्येक पटीने संघर्षमय, यातनामय आहे. अशा संघर्षाची जाणीव मराठी साहित्य परंपरेत पहिल्यांदाच दलित साहित्यातून झाली. गुलामगिरी, अन्याय, शोषणाचे पराकोटीचे अनुभव शूद्रातिशूद्रांच्या वाट्याला आले. जनावरांपेक्षा हीन आणि मानवतेला लाजवेल असे लाजिरवाणे, दिनवाणे जीवन जगण्याची सक्ती केवळ इथल्या समाजस्थित जात-वर्ण व्यवस्थेने केली. या जीवनानुभूतीपासून कोसो दूर असणाऱ्या समाजाला, वाचक वर्गाला याचे भान देणे गरजेचे होते. आणि म्हणूनच या जीवनात अनुभवलेल्या वेदनेचे, दु:खाचे, अभावग्रस्त जगण्याचे, संघर्षाचे शब्दरूप दलित साहित्यातून उमटू लागले. त्यामुळे आपल्याबद्दलच्या जीवन संघर्षाचे भान देणे, दलित जाणिवेला शब्दरूप देण्यातून दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे. त्यामुळेच दलित जाणिवेचा उच्चार हे दलित साहित्य निर्मितीमागील प्रथम प्रयोजन आहे.

### २.३.२ वेदना, विद्रोह, नकार या त्रिसूत्रींची मांडणी:

हिंदू धर्मात जन्मलेल्या व्यक्तीला जन्माबरोबरच एक जात मिळते. या जातीला धर्मामध्ये जे स्थान दिलेले असते त्यानुसारचा व्यवहार सबंध समाज त्या जातीतल्या प्रत्येक व्यक्तीशी करत असतो. हिंदू धर्मव्यवस्थेनुसार दलित हा जातव्यवस्थेच्या उतरंडीतील सर्वात तळाचा वर्ग व या वर्गातील लोकांना सावली, स्पर्श आणि वाणीनुसार अस्पृश्य ठरविले गेले. विविध प्रकारच्या सत्ता, संपत्ती, अधिकार व प्रतिष्ठेपासून दलितांना वंचित ठेवले गेले. वर्णभेद, दारिद्र्य, अज्ञान, उपेक्षा, सामाजिक - सांस्कृतिक - आर्थिक विषमता त्यांच्या वाट्याला आली. दलितांचे जीवन हे गावकुसाबाहेरचे व गुलामापेक्षाही हीन स्वरूपाचे होते. पूर्वजन्मात केलेल्या पापांमुळे या वर्णात असा जन्म मिळाल्याची धारणा इथल्या धर्मव्यवस्थेने त्यांच्या मनात पक्की बसवली होती. दलितांना या धर्मभोळेपणातून बाहेर काढून वास्तव विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून स्वत:च्या जीवनाकडे पाहायला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिकवले. गुलामीची जाणीव करून दिली. या जाणिवेतून दलितांनी स्वत:च्या वाट्याला येणाऱ्या जीवनपद्धतीला नकार दिला. या नकारामागे आतापर्यंत सोसलेल्या अनेक अन्याय, अत्याचार, विषमता, गुलामगिरीतून भोगलेल्या वेदना होत्या. हा नकार त्यांच्यावर लादलेल्या अमानवी, अन्यायग्रस्त व्यवस्थेविरूद्धच्या वेदानांतून जन्मला होता.

दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या वेदनेचे, नकाराचे स्वरूप समूहात्मक होते. सामाजिक होते. अशा शेकडो वर्षापासून रुतलेल्या व्यवस्थेला नकार दिल्याने तिच्यात म्हणावे तसे परिवर्तन सहज आणि तात्काळ होणे अशक्य होते. त्यामुळे या नकारानंतरची अटळ

अवस्था ही विद्रोहाची येते. मला ‘माणूस’ म्हणून जगण्याचा हक्क मिळालाच पाहिजे या जाणिवेतून विद्रोहाचा जन्म होतो. ही विद्रोहाची संकल्पना स्पष्ट करताना गंगाधर पानतावणे म्हणतात, “विद्रोह हा जसा एकीकडे नकारात्मक आहे त्याच वेळी तो सकारात्मकही आहे. मानवी अवमूल्यन, सर्व प्रकारचे मानवी शोषण नाकारणे ही विद्रोहाची जशी एक मुद्रा आहे. त्याच वेळी मानवी स्वातंत्र्य, मानवी न्याय, व्यक्तिप्रतिष्ठा आणि रचनात्मकता ही विद्रोहाची सकारात्म मुद्राही आहे." (गंगाधर पानतावणे, पृ. ४१, साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. ऑगस्ट १९९९)

साहित्यातून व्यक्त होणाऱ्या विद्रोहाचे अस्तित्व केवळ साहित्यापुरते नाही तर त्याला सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीही आहे. यासंदर्भात अर्जुन डांगळे म्हणतात, “ढोबळ मानाने किंवा केवळ एखाद्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानाच्या बांधिलकीने आलेला विद्रोह आणि प्रत्यक्ष जगण्यातील अनुभवातून आलेला विद्रोह ह्यांमध्ये फरक असणे अपरिहार्य आहे.” (५-४२) दलित विद्रोह') दलित साहित्यातून येणारा विद्रोह हा सामाजिक बांधिलकी म्हणूनचा विद्रोह नाही तर तो जगण्यातील अनुभवातून आलेला विद्रोह आहे. याची प्रचिती दलित साहित्याच्या प्रत्येक पाना-पानांतून येते. त्यामुळेच दलित साहित्य निर्मितीमागे वेदना, विद्रोह, नकार हे प्रयोजन प्रामुख्याने कार्यरत असलेले दिसते.

### २.३.३ जगाची समताधिष्ठित पुन:रचना:

डॉ. प्रभाकर मांडे 'दलित' म्हणजे कोण ही संकल्पना स्पष्ट करताना ते म्हणतात, "दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह, ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावला गेला आहे. ज्यांच्या जन्माने ज्यांच्या वाट्याला या समाजरचनेत एकाच प्रकारचे जीवन आले आहे, माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरिले गेले आहे, ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले गेले आहे ते दलित, होय. (उद्धृत - डोळस, वसंत)

दलित साहित्याची वाङ्मयीन प्रेरणा ही जितकी वैयक्तिक तितकीच सामाजिकही आहे दलितांच्या वाट्याला आलेले जीवनानुभव वेगळे होते. आणि या विशिष्टतेतूनच दलित साहित्याचा वेगळा प्रवाह सुरु झालेला आहे. “अन्यायी जुनी समाजरचना मोडून नवे समाजपुनर्घटन केल्याविना आपले व्यक्तिगत आणि आपल्या वर्गाचे जीवन सुंदर होणार नाही असा त्यांचा दृढ विश्वास असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयीन अभिव्यक्तीत नीतीची प्रेरणा अनुस्यूत राहणारच. ही नीती म्हणजे बाबासाहेबांनी सांगितलेला बुद्धधम्म.” (निंबाळकर, वामन (संपा.) लेख-‘दलित साहित्य : जाणिवा आणि प्रेरणा': २००७": पृ. ११९) विशिष्ट वर्गात, वर्णात जन्मल्यामुळे आतापर्यंतच्या अनेक पिढ्यांनी जो अन्याय, अत्याचार, गुलामगिरी अनुभवली तसा अनुभव पुढच्या पिढ्यांना येऊ नये; किंबहुना कोणाच्याच वाट्याला असा अनुभव येऊ नये यासाठी समताधिष्ठित समाजाची रचना होणे गरजेचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो बौद्ध धम्म निवडला तो समतावादी विचाराचा होता. या धम्माचा अंगीकार म्हणजेच समतेचा अंगीकार होता. समतेच्या विचाराची पेरणी समाजात होण्यासाठी तशा पद्धतीची मांडणी लेखनातून होणे गरजेचे होते. त्यामुळेच दलित साहित्य निर्मिती मागे समतावादी विचार कार्यरत असलेला दिसतो.

### २.३.४ केवळ मनोरंजन नाही...तर वैचारिक परिवर्तन घडवून आणणे:

चळवळीचे साहित्य हे नेहमी प्रचारकी असते अशी धारणा आहे. दलित साहित्यिक साहित्याची निर्मिती कल्पनेतून करत नाहीत तर स्वानुभूतीतून करतात. ज्यात हजारो वर्षापासून भोगलेल्या दु:ख, दारिद्र्य, अस्पृश्यता, भूक व अन्नासाठी चाललेल्या संघर्षाची जाणीव शब्दातून व्यक्त होते. मानवी जीवनमूल्यांवर श्रद्धा ठेवून समतेचा पुरस्कार साहित्यातून केला तर तो प्रचार न ठरता तो अधिकार ठरतो. लेखक हा प्रथम आणि अंतिमतः सामाजिक प्राणी आहे आणि म्हणून आंबेडकरी चळवळीतील-दलित साहित्य हे या अर्थाने प्रचारकी नाही. समाजपरिवर्तनाच्या अनेक माध्यमांपैकी साहित्य हे एक माध्यम आहे. निव्वळ साहित्यातून क्रांती जन्मत नाही तर त्यासाठी क्रांतिकारी विचार, तत्त्वज्ञानही गरजेचे असते. दलित साहित्य अशा क्रांतिकारी, समतावादी, परिवर्तनवादी, मानवी जीवनमूल्यांचे वाहक आहे. या संदर्भाने अर्जुन डांगळे यांचे विधान इथे मार्मिक ठरते. "दलित साहित्यातील क्रांतिकारक जाणीव ही वैश्विक साहित्यातील क्रांतिकारी जाणिवेशी जोडली जाणे आवश्यक आहे. " (अर्जुन डांगळे: १९९७ : पृ.२३)

मराठी साहित्याच्या परंपरेचा विचार केला तर दलित साहित्याचा प्रवाह हा परंपरेतील क्रांतिकारी प्रवाह मानला जातो. आतापर्यंत मध्यमवर्ग व मध्यमवर्गीय समस्या ह्या साहित्याच्या केंद्रस्थानी राहिलेला विषय दलित  साहित्याच्या प्रवाह प्रारंभाने बाजूला झाला. मानव हा दलित साहित्याचा गाभा असला पाहिजे हा विचार दलित साहित्याने रुजवला. साहित्यिक हा सर्वसामान्यांपेक्षा वेगळा आहे हा अविर्भाव दलित साहित्यिकांनी टाळाला. दलित साहित्य ही शोषणाविरुद्धची शब्दबद्ध प्रतिक्रिया आहे. शोषण प्रक्रियेविरुद्ध लढणारे कोणतेही तत्त्वज्ञान हे दलित साहित्यासाठी पूरक आहे. परिवर्तनाचा कोणताही विचार किंवा तत्त्वज्ञान हे जसेच्या तसे कलाकृतीत येत नाही तर असे तत्त्वज्ञान, विचार कलात्मक रूपाने साहित्यातून साकारते. दलित साहित्यकारांच्या जाणिवेचा पिंड हा शोषणाविरुद्धची प्रतिक्रिया आणि मानवमुक्तीचा पुरस्कार या बांधिलकीने पोसलेला आहे. तोपर्यंतच्या मराठी साहित्याची सूत्रे उच्च व मध्यमवर्गाच्या सांस्कृतिक वातावरणाला पोषक अशी होती. या सूत्राला डावलून तळागाळातला माणूस या लेखनव्यवहात या साहित्यप्रवाहाद्वारे आला.

### २.३.५ आत्मोद्धार / अस्मितांचे प्रकटन:

सामाजिक प्रतिष्ठा व सामाजिक अधिकार प्राप्त करण्यासाठी स्व-अस्मितांची जाणीव तीव्र असावीच लागते. खरेतर दलितांचा लढा हा अस्मितांचा लढा होता. जगभरातले देश, धर्म, वर्ण, जात, लिंग यासारख्या अनेक विषमतांचे, त्यातून येणाच्या दडपशाहीचे शोषित ठरलेल्या प्रत्येकाने आपला एक लढा उभारला तो अस्मितांच्या जाणिवेतूनच.  अमेरिकेतील काळा-गोरा भेद, भारतातील जात-धर्म-पंथ-वर्ग-स्त्री-पुरुष भेद, जपानमधील 'बुराकुमीन' जमाती, जर्मनीतील ज्यू हा सर्वांचा लढा आपल्या स्व हक्क, अधिकारांसाठी जसा होता तसाच तो स्व-अस्मितांसाठीही होता. वर्ण-वर्ग-जात यातून येणाऱ्या अनेक प्रकारच्या शोषणाला दलित समूह बळी पडला. हा लढा ज्या पद्धतीने प्रत्यक्ष सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाविरुद्धचा होता. तसाच तो परंपरागत सांस्कृतिक हुकुमशाहीतून निर्माण झालेल्या ज्ञान-कला क्षेत्राविरुद्धचाही होता. म्हणूनच रस्त्यावर लढणारी एक फळी होती तर दुसरी

सांस्कृतिक क्षेत्रातून रूढ संकेतांना डावलून नव कलारूपे, नव-अस्मिता, नव-अनुभवांना साक्षात करणारी एक फळी होती. दलित साहित्याप्रवाहातील कथा, कविता, कांदबरी, नाटक, आत्मकथन या सर्वच साहित्यप्रकारांतून या दलित अस्मितेचा पुरस्कार केलेला दिसतो. 'दलित' हे एक लांछन इथल्या समाजव्यवस्थेतून आलेले आहे याचे भान या साहित्याने दिले. मी कोण आहे?, काय आहे? याचे भान स्वतःला येणे व या जाणिवेतून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे म्हणजेच अस्मिता होय. या अस्मितांची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्यातून झाली. या अस्मितांचा उच्चार या साहित्यातून झाला. आणि म्हणूनच दलित साहित्याच्या प्रयोजनामध्ये हे एक प्रयोजन महत्त्वाचे ठरते.

## २.४ समारोप

एकूणच दलित साहित्य ही मराठी साहित्य परंपरेतील वेगळा असा साहित्य प्रवाह ठरतो. याची कारणे आपल्याला या साहित्य निर्मिती मागील प्रेरणा आणि प्रयोजनात दिसतात. क्रित्येक पिढ्यांच्या दाबलेल्या, उपेक्षित, अन्यायग्रस्त जीवनातील वेदनेचा स्वर या लेखनातून ऐकायला मिळतो. भारतीय समाज व्यवस्थेतील उच-नीच, जातीवाद , वर्ण-व्यवस्था यामुळे समाजातील बहुजन लोकसमूह मानवी अधिकारापासून वंचित होता. पशूवत जीवन त्यांच्या वाट्याला आले होते. या बहुजन समूहाला शूद्र म्हणून ओळखले गेले. तर दुसऱ्या बाजूला एक असा वर्ग होता ज्याच्याकडे समाजातील सर्व मालकी अधिकार एकवटले होते. या दुहेरी व्यवस्थेमुळे समाजातील मानवा-मानवातील विषमतावादी विभाजन झाले होते. अशा अन्यायग्रस्त शोषण व्यवस्थेला आव्हान दिले ते तथागत गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर इ. या महामानवानी. या अन्यायग्रस्त शोषणाचा प्रथम उच्चार केला तो दलित साहित्यातून. दलित म्हणून वाट्याला आलेल्या वेदनेला, संघर्षाला, या व्यवस्थेला दिलेल्या नकाराला या साहित्यातून मांडले गेले. त्यामुळे एकूण मराठी साहित्य परंपरेपेक्षा दलित साहित्याच्या प्रेरणा ह्या जशा वेगळ्या आहेत तसेच या साहित्य निर्मिती मागील प्रयोजनेही वेगळी आहेत. या सर्वांमध्ये मानवी मूल्यांचा विचार केंद्रस्थानी आहे.

## २.५ संदर्भग्रंथ सूची


१. वाघमारे, मोहन २००० : 'आंबेडकरी साहित्य समीक्षा', लुम्बिनी प्रकाशन, मुंबई प.आ.एप्रिल २०००.

२. गजभिये, अनिल २००७ : 'दलित साहित्य विचार आणि वैभव'

३. पानतावणे, गंगाधर २००७ : 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे?', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद प.आ. १९७६, दु. आ. ऑगस्ट २००७.

४. डांगळे, अर्जुन १९९७ : 'दलित विद्रोह', ग्रंथघर प्रकाशन, मुंबई, प.आ. २७ सप्टेंबर १९९१.

५. किरवले,कृष्णा २००६ : 'दलित चळवळ आणि साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प. आ. १९९६ दु.आ. ऑक्टो, २००६.

६. लिंबाळे, शरणकुमार २०१४ : 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', दिलीपराज प्रकाशन, पुणे, चतुर्थ आवृत्ती २०१४.

७. डोळस, वसंत १९९२ : 'दलित साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प. आ. डिसें. १९९२.

८. Sharma, Udit (2016-11-25). 'Teachings and Philosophy of Buddha', Diamond Pocket Books Pvt Ltd.

९. निंबाळकर, वामन (संपा.) : 'प्राचार्य म. भि. चिटणीस समग्र वाङ्मय', प्रबोधन प्रकाशन, नागपूर, प. आ ऑक्टो. २००७.


**अधिक वाचनासाठी:**


- पानतावणे, गंगाधर (संपा.) : 'दलित साहित्य चर्चा आणि चिंतन', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३ .
- डांगळे, अर्जुन (संपा.) : 'दलित साहित्य : एक अभ्यास' महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
- डॉ. कऱ्हाडे, सदा : 'साहित्य विश्लेषण'


## २.६ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी.**

अ. परंपरागत मराठी साहित्यापेक्षा दलित साहित्यामागे कार्यरत असणाऱ्या प्रयोजनांचा आढावा घ्या.

आ. दलित साहित्यामागील प्रमुख प्रेरणांचा परिचय करून द्या.

इ. दलित साहित्याच्या प्रेरणा व प्रयोजनांची ओळख करून द्या.

**ब) टिपा लिहा.**

अ. दलित साहित्याची प्रेरणा -भगवान गौतम बुद्ध

आ. म. फुले यांचे कार्यकर्तुत्व

इ. दलित साहित्यामागील वेदना, विद्रोह, नकार' हे प्रयोजन

*****

# २इ

# दलित साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संघर्ष

**घटक रचना**

२.१ उद्देश

२.२ प्रस्तावना

२.३ दलित साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संघर्षाचे स्वरूप

२.४ दलिततत्वाचा शोध

२.५ दलित जाणीवेची संवेदना

२.६ दलितांच्या वेदनांचा आविष्कार

२.७ जातिव्यवस्थेला नकार

२.८ धार्मिक प्रथांना विरोध

२.९ आंबेडकरी अस्मितादर्शन

२.१० बौध्द धम्मतत्त्वे

२.११ सांविधानिक मूल्यविचार

२.१२ समारोप

२.१३ संदर्भ ग्रंथ सूची

२.१४ पूरक वाचन

२.१५ प्रश्नावली

## २.१ उद्देश

- दलित साहित्याची सामाजिकता लक्षात घेणे.
- दलित साहित्यामागील सांस्कृतिकता समजून घेणे.
- दलित साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संघर्षाचा अभ्यास करणे.
- दलित साहित्य चळवळीचा आढावा घेणे.
- दलित साहित्यातील मूल्यसंघर्ष लक्षात घेणे.

## २.२ प्रस्तावना

दलित साहित्य हा वाङ्मयीन प्रवाह चळवळीतून निर्माण झालेला आहे. हजारो वर्षे सामाजिक गुलामगिरी जगलेल्या समूहांना प्रबोधन चळवळीतून अस्मितादर्शन झाले. त्याने आपले सामाजिक अस्तित्व स्वतंत्रपणे उभे करण्यासाठी जो लढा उभारला. यातून दलित चळवळ निर्माण झाली. याच चळवळीतून दलित साहित्याची निर्मिती झाली. कोणत्याही चळवळीतून निर्माण झालेले साहित्य हे संघर्षातूनच विकसित होत असते. हा संघर्ष विविधांगी असतो. परंतु त्यामागे विचारांचा लढा असतो. दलित चळवळ आणि जुन्या जीर्ण सामाजिक व्यवस्थेला नकार दिला दिला. साहित्याने पारंपरिक मूल्याविरूध्द आवाज उठविला. तो बोलू लागला. लिहू लागला. त्याने आपल्या सामाजिक वेदना साहित्यातून मांडल्या. त्यामध्ये दलित समुहांचे समग्र जीवन यामधून आविष्कृत झालेले आहे. ही वाङ्मयीय अभिव्यक्ती संस्कृती संघर्षाची परिणिती आहे. हजारो वर्षांपासून जातिव्यवस्थेच्या गुलामगिरीच्या वेदना, त्याला नकार आणि या सामाजिक गुलामगिरी विरुध्दचा विद्रोह दलित साहित्यातून प्रभावीपणे आलेला आहे. या सामाजिक व सांस्कृतिक संघर्षाचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. दलित साहित्यामधील विविध लेखन प्रकारात या संघर्षाची रूपे आविष्कृत झालेली आहेत. याचा शोध या घटकामध्ये आपण करून घेणार आहोत.

## २.३ दलित साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संघर्षाचे स्वरूप

दलित साहित्य हा एक सामाजिक व सांस्कृतिक दस्तऐवज आहे. त्यामध्ये दलितांच्या जगण्यातील विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक जगण्याचे संदर्भ आलेले आहेत. हे संदर्भ संघर्षमूलक आहेत. दलित साहित्यातून आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक संघर्षाचे स्वरूप अत्यंत व्यापक आणि व्यामिश्र आहे. विशेषत: त्यामध्ये दलितत्वाचा शोध, दलित जाणीवेची संवेदना, दलितांच्या वेदनांचा आविष्कार, आंबेडकरी अस्मितादर्शन, जातिव्यवस्थेला नकार, धार्मिक प्रथांना विरोध बौध्द धम्मतत्त्वे, सांविधानिक मूल्यविचार यांचा समावेश होतो. या सर्व संघर्षमूल्यांचा विचार प्रस्तुत उपघटकात आपण समजून घेण्याचा अभ्युपगम स्विकारलेला आहे.

## २.४ दलितत्त्वाचा शोध

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की, गुलामाला गुलामीची जाणीव झाली की तो बंड करून उठतो. या आंबेडकरी विचारसूत्रानुसार दलित समाजाला त्याच्या दलितत्त्वाची जाणीव झाली. त्याने आपल्या जगण्याचा आणि या दलितत्त्वाचा शोध आपल्या साहित्यातून घेतला. या शोधामध्ये त्याने भारतीय समाजाची चिकित्सा केली. वर्णव्यवस्थेने इथल्या दलितांना सर्वात खालचे स्थान दिले. त्याच्यावर सामाजिक गुलामगिरी लादली. दलित म्हणून त्याची अवहेलना केली. दलित कवितेमध्ये यांचा सरळ आणि स्पष्ट आविष्कार झालेला आहे. वामन निंबाळकर आपल्या कवितेत लिहितात,

तुम्ही रचलीत महाकाव्ये, सोन्याचा घास खाणारांची
भरजरी वस्त्रं नसणारांची, भिजू घातलेत शब्दांचे ढीग

या गावकुसाबाहेर वाळलेले, चिरडलेले जीवन

विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा *(पृ. २)*

दलित हा नेहमीच शोषित राहिला. गावकुसाबाहेरील त्याचे जगणे यामध्ये अभिव्यक्त होते. पारंपरिक दलितत्त्व हे जातिव्यवस्थेशी बांधलेले होते. या दलितत्त्वाचे उत्खनन दलित लेखकांनी केलेले आहे.

## २.५ दलित जाणीवेची संवेदना

दलित साहित्यामध्ये दलित जाणीव ही केंद्रवर्ती आहे. या जाणीवेचे वेगळेपण म्हणजे ती व्यक्तीकेंद्री नाही, तर समाजकेंद्री आहे. दलित लेखन आपल्या लेखनातून आत्माविष्कार करत असला तरी तो जीवनानुभव केवळ त्याचा नसतो. तर यामध्ये समाजनिष्ठ जाणिवा आलेल्या असतात. दलित जाणीवेतूनच दलित चळवळ आणि साहित्याची निर्मिती झाली. वास्तविक ही जाणीव आंबेडकरी विचार प्रेरणेचा परिपाक आहे. बाबासाहेबांनी गुलामाला गुलामीची जाणीव करून दिली. यातून दलित समाज जागृत झाला. आणि आपल्या दलितत्त्वाचा त्याने शोध घेतला. दलित जाणीवेमध्ये पारंपरिक मूल्यव्यवस्थांना नकार देण्यात आलेला आहे. किंबहुना या परंपरा ज्यामध्ये जातियता, अस्पृश्यता होती त्यांना संपविण्याचे ध्येय ठेवण्यात आलेले आहे. ही दलित जाणीव प्रखर आहे. ती केवळ वेदना, नकार मांडत नाही तर या सर्व दलितांच्या सामाजिक व सांस्कृतिक जगण्याला अभिव्यक्त करतात. याचा स्पष्ट आणि ठळक आविष्कार म्हणजे दलित आत्मकथने होत.

दलित आत्मकथनात सामाजिक जाणीव प्रकर्षाने अभिव्यक्त होते. उदा. प्र.ई. सोनकांबळे यांचे “आठवणीचे पक्षी” हे आत्मकथन प्रल्हाद या व्यक्तिरेखेवर आधारित असले तरी त्यामध्ये प्रल्हाद ज्या दलित समाजात जन्मला त्या समूहाचे जगणे यामध्ये प्रभावीपणे येते. याविषयी डॉ. सतीश कामत लिहितात, "आठवणीचे पक्षीमधील प्रल्हाद ही एक सोशिक, सहनशील व्यक्तिरेखा आहे. प्रल्हाद पोरका, गरीब आणि अस्पृश्य आहे म्हणून त्याच्याही वाटयाला अनेक दु:खे आली आहेत. पण अशा दिव्यातून जात असताना आपण पोरके आहोत. गरीब आहोत हे तो विसरत नाही. येईल त्या परिस्थितीला तोंड देत तो शिकतो. तो म्हणतो, “कोणी म्हणायचे की आता लई शिलाय लई पाटील व्हणार है पण जास्त करून मी लावूनच घेऊन राहायचो. कदी कोणा संग मारामारी केली नाही, कुणी मारलं तरी कुणास सांगितले नाही" यावरून प्रल्हाद कमालीचा सोशिक, सहनशील बनला होता असे दिसते. त्याच्या या सोशिकतेला त्याचा स्वभाव जसा कारणीभूत आहे तशीच भोवतालची सामाजिक परिस्थितीही कारण आहे. अपमान आणि अवहेलना सहन करण्याचे प्रसंग तर अनेकदा त्याच्या आयुष्यात आले. अस्पृश्य असल्याने सवर्ण लोक भजन करण्यास त्याला जवळ घ्यायचे नाहीत." (पृ.१२०) एकूनच दलित साहित्यातून आलेल्या वेदनांचे स्वरूप वैयक्तिक नसून सामाजिक आहे. समाजव्यवस्थेने लादलेले दलितत्त्व अनुभवताना आपल्या वेदना संवेदना दलित लेखकांनी आपल्या लेखनातून मांडलेल्या आहे.

## २.६ दलितांच्या वेदनांचा आविष्कार

दलित साहित्यामध्ये तळागळातील शोषित, कष्टकरी, वंचित समूहांचे जगणे आलेले आहे. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये या समूहांना वर्णव्यवस्थेच्या तळाशी ठेवण्यात आले. त्यांना अज्ञानात ठेवून त्यांच्यावर गुलामगिरी लादण्यात आली. अस्पृश्यता हे या गुलामगिरीचा परिपाक होता. दलितांना ही अस्पृश्यता भोगावी लागली. जीचे स्वरूप वेदनामय होते. अशा दलित समूहांच्या वेदनांचा आविष्कार दलित साहित्यात झालेला आहे. भारताच्या इतिहासात प्राचीन काळापासूनच दलितांच्या वेदना मांडलेल्या पाहावयास मिळतात. विशेषत: संत चोखामेळा, संत सोयराबाई, संत कर्ममेळा यांनी दलितांचे वेदनामय जीवन चितारलेले आहे. आपल्या अभंगामध्ये हा वेदनामय सूर लावलेला आहे.

दलितांच्या वेदनांचा आविष्कार कवितेत प्रभावीपणे आलेला आहे. त्याबरोबर कथा, कादंबरीमध्ये याचे मोठया प्रमाणात चित्रण येते. उदा. शंकरराव खरात यांची पहिली कथा 'संतूची पडीक जमीन' ही प्र.के.अत्रे यांच्या नवयुग मासिकाच्या १९५६-५७ मधील दिवाळी अंकात प्रकाशित झाली होती. या कथेत 'संतू' हा नायक असून तो दलित अस्पृश्य समाजातील आहे. त्याला सरकारी पडीक जमीन उपजीविकेसाठी मिळते. संतू त्या पडीक जमिनीत काबाडकष्ट करून चांगले पीक काढतो. प्रगती करतो. परंतु गावातील सवर्ण लोकांना संतूची ही प्रगती बघवत नाही. गावकरी तलाठयाला हाताशी धरून बनावट कागदपत्रे तयार करतात. संतूची जमिनीवर जप्ती आणतात. संतू हा अन्याय सहन करू शकत नाही. त्याला प्रंचड दु:ख होते. आपली सुपिक जमीन गावकरी लुबाडत आहेत. याची वेदना त्याच्या मनात उमटते. परंतु तो शांत बसत नाही. पंचनामा करायला आलेल्या तलाठयाला तो संपवितो. आपल्यावरील अन्यायाविरुध्द तो आवाज उठवतो. ही कथा दलितांवरील होणारे गावपातळीवरील अत्याचार मांडते. जातीय मानसिकता अशी दलितांना जगू देत नाही. याचे चित्रण करते. खरातांच्या कथांविषयी मनोहर सुरवाडे लिहितात, "खरातांनी स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण समाजातील घुसमटणाऱ्या दलित मनाचे चित्रण केले. धर्माचा आधार घेऊन आजही उच्चवर्णीय दलितांचे शोषण करत आहेत. असे दाहक अनुभव त्यांनी आपल्या कथांमधून चित्रित केले आहेत" (पृ.९३) एकूणच दलितांच्या वेदनांना मुखर करण्याचे कार्य दलित साहित्यातून झालेले आहे. यातून दलित साहित्यातील सामाजिक संघर्ष उजागर होतो.

## २.७ जातिव्यवस्थेला नकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदयाने दलित समाजामध्ये क्रांतिकारक बदल झाला. त्यांच्यापासूनच दलित समुहाने सामाजिक परिवर्तनाची चळवळ गतिमान केली. तिला निर्णायक रूप दिले. यासाठी दलित शाहिरांनी जलशाच्या माध्यमातून बाबासाहेबांचा विचार जनसामान्यापर्यंत पोहचविले. यातूनच आंबेडकरी जलसे लोकप्रिय झाले. आंबेडकरी जलशांचे स्वरूप बंडखोर होते. हिंदू धर्मातील रूढी परंपरा, चालीरिती विशेषत: जातिव्यवस्थेविषयीचा नकार येतो. आंबेडकरी जलशामध्ये दलित समाजाच्या शोचनीय स्थितीगतीचा आलेख मांडलेला आहे. याविषयी शाहीर हेगडे लिहितात,

बरी नाही वतनदारी, शुध्द आहे गुलामगिरी ।
तिच्या पायी झालो भिकारी, विचार करा जरा अंतरी ॥

गावगाडयामध्ये वतनदारी राबवली जात होती. या वतनदारीमुळे दलितांचे शोषण केले जात होते. याविषयी आंबेडकरी जलसाकारांनी परखडपणे विचार मांडलेले आहेत. वतनदारी म्हणजे गुलामगिरी असा सरळसरळ अर्थ त्यांनी विशद केला आहे. भारतीय समाजातील दलितांची अवस्था ही परंपरेने बांधलेली आहे. प्राचीन काळापासून ते अगदी मध्ययुगीन काळात संतांच्या पर्यंत हा वारसा आलेला आहे. यावरही आंबेडकरी जलशातून विचारमंथन करण्यात आलेले आहे. शाहीर केरुबुवा गायकवाड याविषयी परखड भाष्य करताना लिहितात,

नको नको इठूबा देव आम्हाला ।
पावला का सांगा कधी महाराला ।
सावता माळी, गोरा कुंभार, राऊळी गेला संत ज्ञानेश्वर ।
चोखोबाला ठेवला त्यानं पायरीला ॥

जातिव्यवस्थेविषयी इथे मूलभूतपणे चिंतन मांडलेले पाहावयास मिळते. हजारो वर्षांची ही गुलामगिरीची प्रथा मोडणे गरजेचे आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला विचार आंबेडकरी जलशामध्ये प्राधान्याने आलेला आहे.

दलित साहित्य चळवळीचा हा दलित शाहीरांचा वारसा अतिशय महत्त्वाचा आहे. हाच वारसा पुढे दलित कवितेने विकसित केला. जातीच्या महाजालातील विविध व्यवस्थांना या कवितेतून उजागर केले आहे. याविषयी बी. रंगराव लिहितात, दलित कवितेतून खेडयातील दाहक जातीवाद, अज्ञान, असहाय्यता इत्यादी बाबी प्रभावीपणे व्यक्त झालेल्या आहेत. अस्पृश्यतेचे किळसवाणे व भयावह रूप या पिढीतील अनेक कवींनी रेखाटलेले आहे. वामन निंबाळकरांची ही कविता बघा-

कळत नव्हते तेव्हाच कळाले
आपली जात खालची
बापाला मारली होती लाथ पाटलाने
आईला शिवी
त्यांनी केल्या नव्हत्या माना वर
माझ्या काळजात घर (गावकुसाबाहेरी कविता)

ज.वि.पवार यांचा सुध्दा हाच अनुभव आपल्या कवितेत रेखाटलेला आहे.

कोपऱ्यात बसून शिकलेल्यांच्या चिल्ल्यापिल्ल्यांना
घरीच जावे लागते पाणी प्यायला
केवळ बाजूचा पाठवठा बाटू नये म्हणून (नाकेबंदी)

दलित कवी आपल्या आयुष्यातील दैन्य, दास्य व गुलामगिरीच्या हृदयद्रावक घटना आपल्या कवितांमधून परिणामकारकरित्या व्यक्त करताना आढळतात. त्याचवेळी परिस्थितीला जबाबदार असलेल्या भारतीय समाजरचनेतील वैषम्यावर ते हिरीरीने तुटून पडतात. (पृ. प्रस्तावना ८ & ९) दलित साहित्यातील ही जातिव्यवस्थेने लादलेली गुलामगिरी तीव्रतेने नाकारलेली आहे. हा नकार सामाजिक संघर्षाचा परिपाक होता.

## २.८ धार्मिक प्रथांना विरोध

दलित साहित्याच्या सांस्कृतिक मांडणी सर्वधर्मसमभावाची आहे. त्यामध्ये कोणत्याही धर्मावर एकेरी टिका नाही. परंतु ज्या धर्माच्या नावावर हजारो वर्षे दलितांचे शोषण केले. त्यांना विविध धार्मिक रूढी प्रथांच्या नावावर गुलामगिरीत जीवन जगायला भाग पाडले. अशा अमानवी प्रथांविरोधात दलित साहित्याने आपली परखड भूमिका मांडलेली आहे. विशेषत: अस्पृश्यता या प्रथेविरुध्द दलित साहित्याने प्रारंभापासून आवाज उठविलेला. आहे. ही अस्पृश्यता अमानवी होती. एका व्यक्तीचा स्पर्शही नाकारला जात होता. हिंदूधर्म व्यवस्थेमध्ये वर्णांची जी उतरंड मांडलेली आहे. त्यातून जातिव्यवस्था निर्माण झाली. पौराणिक ग्रंथांचा आधार घेत त्याला धार्मिक अधिसत्तेचे रूप देण्यात आले. या सत्तेने दलितांना कधीच गृहीत धरले नाही. म्हणूनच दया पवार 'कोंडवाडा' या कवितासंग्रहातील 'हे महाकवे' या कवितेत लिहितात,

बा वाल्मिकी
रामराज्याची स्तुती तू गावी
कारण तू कवींचा महाकवी..!
हे महाकवे,
तुला महाकवी तरी कसे म्हणावे !
हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास..
..तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते.

(बी. रंगराव पृ.९)

दलित कवितेबरोबरच दलित कथा आणि कादंबऱ्यातही धार्मिक रूढी परंपरांना नकार दिलेला पाहावयास मिळतो. बाबुराव बागूल यांची 'सूड' ही कादंबरीमधील ‘जानकी’ ही भारतीय समाजव्यवस्थेने लादलेले स्त्रीदास्य नाकारते. ‘जेव्हा मी जात चोरली होती’ या कथेतील नायक जात चोरून राहत असतो. कारण इथल्या धर्मव्यस्थेने दलितांना नाकारलेले आहे. त्याचा स्पर्श ही अशुध्द मानलेला आहे. म्हणून कथेच्या शेवटी जेव्हा नायकाची जात सर्वांच्या लक्षात येते तेव्हा त्याल सर्वजण मिळून मारतात. कथेच्या शेवटी नायकाच्या तोंडी बागुलांनी एक वाक्य टाकलेले आहे. "मला मनूने मारले" हे वाक्य इथल्या सनातनी धर्माची श्रेणीबध्द व्यवस्था मांडून जाते. एकूणच धर्मव्यवस्थेतील मूल्यसंघर्ष दलित साहित्य प्राधान्याने मांडत आलेले आहे.

## २.९ आंबेडकरी अस्मितादर्शन

दलित साहित्य हा आंबेडकरी अस्मितेचा वाङ्मयीन आविष्कार आहे. या प्रवाहची निर्मिती चळवळीतून झाली. दलित समाजाच्या उत्थानासाठी इतिहासात मोठा संघर्ष करावा लागला. हजारो वर्षांची जातीय मानसिकता मोडून टाकणे सहजासहजी शक्य झाले नाही. तरीसुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक अधिष्ठानावर दलितांच्या चळवळीला निर्णायक रूप प्राप्त झाले. दलितांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक जागृती झाली. तो लिहू लागला. बोलू लागला. यातून दलित साहित्याचा आविष्कार घडला. ज्याने प्रस्थापित साहित्यव्यवहाराला छेद दिला. नवे स्वतंत्र विश्व निर्माण केले. केवळ मराठीच नाही तर विविध भारतीय भाषा आणि जागतिक साहित्यामध्येही दलित साहित्याची चर्चा झाली. त्याचे अस्तित्त्व मान्य केले गेले. आज वैश्विक साहित्यात मराठी भाषेची जी ओळख निर्माण झाली आहे. त्यामध्ये दलित साहित्याचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

दलित साहित्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य आलेले आहे. त्यांनी उभारलेला दलितमुक्तीचा लढा यामध्ये प्राध्यान्याने आविष्कृत होतो. बाबासाहेबांमुळेच दलितांना जगण्याची दिशा मिळाली. ही कृतार्थ भावना दलित लेखकांनी आपल्या समग्र लेखनातून विशद केलेली आहे. नामदेव ढसाळ आपल्या कवितेत लिहितात,

आज आमचे जे काही आहे
ते सर्व तुझेच आहे
हे जगणे आणि मरणे
हे शब्द आणि ही जीभ
हे सुख आणि दु:ख
हे स्वप्न आणि वास्तव
ही भूक आणि तहान
सर्व पुण्याई तुझीच आहे (पृ.१)

बाबासाहेबांनी केलेला संघर्ष समग्र दलितांच्या नव अस्मितेसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांनी केलेले सत्याग्रह, आंदोलने, सभा, परिषदा, ग्रंथनिर्मिती दलितांच्या मुक्तीलढयाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. या सर्व प्रेरणाभूत ठरणाऱ्या गोष्टीमधून दलितांना आपल्या जीवनाचे आत्मभान मिळाले. ही भावना दलित लेखकांनी आपल्या प्रत्येक कलाकृतींमध्ये मांडलेली आहे. याची अनेक रूपे इथे मांडता येतील. त्यातील काही कवितांचा उल्लेख आपणास लक्षात घेता येईल.उदा. अरुण काळे यांची 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' या कवितेत डॉ. आंबेडकरांना केंद्रवर्ती ठेवून ते लिहितात,

तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा
आणि मल्टीमिडीया कीबोर्ड
हा संगणक, ही मेमरी अन
अपडेट प्रोग्रामही तूच दिलेला

आता या आयटीच्या युगात
दलितांना डी-लिट करण्यासाठी
नवनवीन सॉफ्टवेअर येताहेत
आणि प्रोग्राम खराब करण्यासाठी
सोडले जात आहेत विषाणू
तरीही तुझी ॲन्टी व्हायरस खबरदारी
पुन्हा पुन्हा करतेय त्यांना पराभूत (पृ.३७)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा दलित साहित्यामध्ये सर्वच लेखकांनी आपापल्यापरीने मांडलेली आहे. आंबेडकरयुगाने खऱ्या अर्थाने दलितांना आत्मभान मिळाले. त्यांनी चालवलेली आत्मसन्मानाची लढाई निर्णायक ठरली. यातून दलितांना अस्मितादर्शन झाले. हे आंबेडकरी अस्मितादर्शन महत्त्वाचे आहे

## २.१० बौध्द धम्मतत्त्वे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ साली बौध्द धम्माचा स्वीकार केला. ही भारतातील धम्म क्रांतीच होती. या निमित्ताने भारतीय इतिहासातील बौध्द धम्मविषयक नवे ज्ञान व नवे भान निर्माण झाले. बाबासाहेबांनी धम्म दीक्षा समारंभात नागपूर येथील सभेमध्ये नागपूरचे बौध्द धम्माशी आाणि दलितांना नाग लोकांशी असलेला अनुबंध सांगितला होता. या अर्थाने दलित समुहांचा बौध्द धम्माशी असलेला जुना सहसंबंध अधोरेखित झाला.

भारताच्या इतिहासात बौध्द परंपरा समृध्द आहे. समाजाला नैतिक अधिष्ठान देण्यासाठी या धम्म चळवळीतून विशेष प्रयत्न झाले आहेत. विशेषत: धम्म हा समतावादी जीवनमार्ग आहे. बुध्दाने आपल्या संघात सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश केला. कारण बुध्दाचा धम्म हा सर्वांसाठी होता. बुध्दाने आपल्या संघात स्त्रीयांना संधी दिली. ही घटना क्रांतिकारक होती. वैदिक धर्मात स्त्रीला गौण स्थान दिले होते. तिला शूद्रादिशूद्रापेक्षा खालच्या स्थानी ठेवले. बौध्दांनी या सर्व वैदिक परंपरेला नकार दिला. ही विचारधारा दलित साहित्याच्या निर्मितीसाठी पुरक ठरली. आंबेडकरी विचारउर्जेतून बौध्द परंपरा दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेत महत्त्वाची ठरलेली आहे. त्यामध्ये बौध्द साहित्याचा भाग महत्त्वाचा ठरतो. त्रिपिठक हे बौध्द साहित्यातील महत्त्वाचे ग्रंथ आहेत. त्यात विनयपिठक, सुत्तपिठक, अभिधम्मपिठक या रचनांचा समावेश होतो. दलित साहित्यामध्ये या रचनांमधील विचार व चिंतन आविष्कृत झालेले आहे. किंबहुना हे ग्रंथ दलित साहित्याच्या निर्मितीसाठी तात्त्विकदृष्टया पोषक ठरलेले आहेत.

दलित साहित्यात बौध्द धम्मतत्त्वे आलेली आहेत. त्यामध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा समावेश होतो. बहुजन हिताय, बहुजन सुखाय ची तत्त्वप्रणाली यामध्ये आलेली आहे. उदा. गौतमीपुत्र कांबळे यांचा 'परिव्राजक' हा कथासंग्रह त्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. यामध्ये तथागत बुध्दाच्या धम्मविचाराचा आधार घेऊन या कथांचा संग्रह तयार केलेला आहे. अशाच प्रकारे दलित कवितेतही बुध्दतत्त्वाच्या विविध प्रतिमा-प्रतिके आलेली असून

त्यातून बौध्द धम्मतत्त्वांचे आविष्करण झालेले पहावयास मिळते. उदा. केतन पिंपळापुरे आपल्या 'नोबल टूथ' या कवितासंग्रहातील शीर्षक कवितेत लिहितात,

तुष्णा : आदिभौतिक मन गुहेत
घात लावून बसलेली सिंहिण
पावलांचा आवाज न करता
दिसत नाहीत तिची तिक्ष्ण नखे
पण संधी साधू करते आघात
तुष्णा अशी सर्वव्यापी चराचरात गुंतलेली
मानवाच्या जळा मुळात आपटपार रूतलेली
जन्ममृत्यूच्या पाठशिवणीत तुष्णा बनते अंध
तोडता येत नाही कुणालाच तुष्णेचा आदिबंध
आत्यंतिक तृष्णेपायी किती कोसळले तख्त
आदिअनादी तुष्णेने व्यापली अवघी अवनी
तृष्णाच असते सर्वंकष दु:खाची आद्यजननी (पृ. १)

तथागत बुध्दाच्या धम्मविचारात दु:खाचे कारण तृष्णा सांगितले आहे. हीच तृष्णा कवी केतन पिंपळापुरे यांनी आपल्या कवितेत शब्दबध्द केलेली आहे. यामुळे दलित कवितेला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीनंतर दलित कवितेत बौध्द सांस्कृतिकता आविष्कृत झालेली आहे.

## २.११ सांविधानिक मूल्यविचार

भारतीय संविधानाची निर्मिती ही हजारो वर्षांच्या सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेला छेद देणारी ठरली. संविधानाने इथल्या शोषित, वंचित, दलित समूहांना हक्क, अधिकार दिले. त्याला न्यायाचे अधिष्ठान दिले. त्यामुळे स्वाभाविकच दलित साहित्यामध्ये सांविधानिक मूल्यविचारांची प्रभावी मांडणी झालेली आहे. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित नवसमाजाची मांडणी केलेली आहे. आम्ही भारतीय लोक ही मानवतावादी दृष्टी संविधानाच्या प्रास्ताविकेचे आद्य रूप आहे. हाच सांविधानिक मानवतावादी मूल्यविचार दलित साहित्यामध्ये आलेला आहे. नामदेव ढसाळ आपल्या 'गोलपिठा' मधील कवितेत लिहितात,

माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उदध्वस्त करून घ्यावे
..नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही
गुलाम करू नये लुटू नये काळा गोरा म्हणू नये
तू ब्राह्मण तू क्षत्रीय तू वैश्य तू शूद्र असे हिणवू नये

कुठलाही पक्ष काढू नये घरदार बांधू नये
नाती न मानण्याचा
आयभैन न ओळखण्याचा गुन्हा करू नये
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून
त्यांच्या कुशीत गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे
चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माणसावरच सूक्त रचावे
माणसानेच गाणे गावे मानसाचे (पृ.३२)

मानवतावाद हा संविधानातील केंद्रवर्ती विचार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सांविधानिक मूल्यांना बौध्द दर्शनातून घेतल्याचे म्हटलेले आहे. त्यामुळे दलित साहित्य हे जसे बौध्द धम्मतत्त्वे मांडते तसेच सांविधानिक मूल्यविचारही मांडते. हीच दलित साहित्याची सामाजिकता आणि सांस्कृतिकता आहे.

## २.१२ समारोप

दलित साहित्याने सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात क्रांतिविज्ञान घडविले. जुन्या, जीर्ण, मूलतत्त्वादी समाजतत्त्वांना नाकारून समतावादी समाजतत्त्वे आपल्या लेखनातून आविष्कृत केली. या मांडणीत जुन्या-नव्याचा, पारंपरिक-आधुनिक, चैतन्यवादी-भौतिकवादी आणि पुराणमतवादी-संविधानवादी मूल्यांमधील संघर्ष आलेला आहे. दलित साहित्याने नेहमीच नव्या विचारांचा, मूल्यांचा आग्रह धरला. इथल्या जातिव्यवस्थेला विरोध केला. पारंपरिक रूढी, परंपरा, जातिभेद, विषमता, अस्पृश्यता यांना नकार दिला. यातून सामाजिक व सांस्कृतिक संघर्ष उभा झाला. परंतु या संघर्षाला मानवतावादी विचारांची जोड होती. दलित साहित्याने या संघर्ष लढयात मानवमुक्तीची भूमिका घेतली. माणूस म्हणून आपले अस्तित्व मांडले. आपल्या हक्क आणि अधिकारांची मांडणी केली. यातून दलित साहित्य हे सामाजिक सांस्कृतिक संघर्षाचा दस्तऐवज ठरलेले आहे.

## २.१३ संदर्भ ग्रंथ


- किरवले, कृष्णा : *दलित चळवळ आणि साहित्य*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६.
- पानतावणे, गंगाधर:*दलित साहित्य:चर्चा व चिंतन*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३.
- फडके, भालचंद्र:*दलित साहित्य:वेदना आणि विद्रोह,* श्रीविद्या प्रका., पुणे,१९७७.
- बागूल, बाबुराव: *दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान*, बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर.

- मेश्राम, योगेंद्र: *दलित साहित्य :उदगम आणि विकास*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०११.
- रंगराव, बी. : मराठी दलित कविता, साहित्य अकादमी, दिल्ली, पुनमुद्रण २०१५.
- ढसाळ, गोलपिठा, लोकवाङ्मय गृह, मुंबई. चौथी आवृत्ती २००७.
- ढसाळ, नामदेव, तुझे बोट धरून चालत आहे, लोकवाङ्मय गृह, मुंबई. २००६.
- निंबाळकर, वामन : गावकुसाबाहेरील कविता, अस्मिता प्रका. औरंगाबाद, १९७३.
- सुरवाडे, मनोहर : समकालीन दलित कथा : एक अभ्यास, अन्वय प्रकाशन, पुणे, २००८.
- कामत, सतीश : दलित आत्मकथनातील व्यक्तिरेखा, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१६.
- काळे, अरूण, नंतर आलेले लोक, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००६.
- पिंपळापुरे, केतन, नोबल ट्रुथ, समता संगर प्रकाशन, नागपूर.२०१५.


## २.१४ पूरक वाचन


- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : क्रांती आणि प्रतिक्रांती
- डॉ. भाऊ लोखंडे : मराठी संत साहित्यावर बौध्द धर्माचा प्रभाव
- डॉ. गंगाधर पानतावणे : विद्रोहाचे पाणी पेटलेले आहे
- रा.ग. जाधव : निळी पहाट
- अर्जून डांगळे : दलित विद्रोह


## २इ.१५ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी :**

१. दलित साहित्याचे सामाजिक योगदान स्पष्ट करा.

२. दलित साहित्यातील मूल्यसंघर्ष विशद करा.

३. दलित साहित्याचे सांस्कृतिक महत्त्व विशद करा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्यातील अनुबंध स्पष्ट करा.

५. दलितांच्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप विशद करा.

**ब) लघुत्तरी / टिपा :**

१. दलित जाणिवेचे अवकाश लिहा.

२. दलित साहित्यातील स्त्रियांचे लेखन विशद करा.

३. दलित कवितेतील विद्रोही जाणीवेचा आढावा घ्या.

४. दलित साहित्याचे सामाजिक महत्त्व स्पष्ट करा.

५. दलित साहित्याचे निराळेपण विशद करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दलितत्व म्हणजे काय?

२. दलितांच्या सामाजिक दु:ख मूळ काय आहे ?

३. दलित साहित्याने कोणती सांस्कृतिकता नाकारली?

४. समकालीन दलित साहित्यात कोणत्या धर्माचे दर्शन घडते?

५. दलित साहित्यात आलेली सांविधानिक मूल्ये कोणती आहेत?

*****

# ३अ

# दलित साहित्याने हाताळलेले साहित्य प्रकार

**घटक रचना**

३.० उद्देश

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ दलित कवितेचे प्रेरणास्थान
- ३.२.२ दलित कवितेचे स्वरूप
- ३.२.३ दलित काव्यशैली
- ३.२.४ दलित कवितेचा आरंभ
- ३.२.५ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित कविता
- ३.२.६ नव्वदोत्तर कालखंडातील दलित कविता

३.३ दलित आत्मकथने

- ३.३.१ आत्मचरित्र व आत्मकथन यातील भेद
- ३.३.२ मराठी साहित्यातील काही दलित आत्मकथने

३.४ सारांश/समारोप

३.५ संदर्भ ग्रंथ सूची

३.६ पूरक वाचन

३.७ प्रश्नावली

## ३.० उद्देश

प्रस्तुत घटकात आपण ‘दलित कवितां' चा अभ्यास करणार आहोत. दलित काव्य निर्मितीत मागील ऐतिहासिक पार्श्वभूमी, दलित कवितेची प्रेरणा, प्रमुख दलित कवी व त्यांच्या कवितांचा कालखंडानुसार परिचय आपण करून घेणार आहोत. या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला -

१. दलित कवितेचा आरंभ समजावून घेता येईल.

२. महत्त्वाचे दलित कवी विद्यार्थ्यांना समजतील.

३. दलित कवितांचे बदललेले आशय लक्षात येईल.

४. दलित कवितांची वैशिष्ट्ये व वेगळेपण समजून घेता येईल.

५. तसेच दलित आत्मकथन, काही महत्त्वाचे आत्मकथनकार व त्यांची आत्मकथने यांचाही आढावा घेणार आहोत.

## ३.१ प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्याच्या अभ्यासात दलित कवितेचा कालखंड महत्त्वाचा ठरतो.१९६० च्या कालखंडानंतर मराठी साहित्यात दलित ग्रामीण, आदिवासी, मार्क्सवादी, स्त्रीवादी अशा अनेक साहित्य प्रकारांचा उदय झाला. यातील दलित साहित्यातील दलित कवितेचा विचारमर्श आपण करणार आहोत. दलित कविता इतर मराठी कवितेपेक्षा आपल्या आशयाच्या व अभिव्यक्तीच्या अंगाने भिन्न ठरली आहे. १९६० च्या दशकानंतर या कवितेने केंद्राकडून परिघाकडे जोरकचपणे प्रवास केलेला आपणास दिसून येतो. आपल्या कवितांतून उच्चवर्णीय साहित्यिक मूल्यांना सुरुंग लावण्याचे काम दलित कवितेने केले. आपल्या अस्तित्वाची दखल प्रस्थापित साहित्याला घेण्यास भाग पाडले.

जिथे कुठे अन्याय-अत्याचार होत आहे तिथे दलित चळवळीतील कार्यकर्ते मोर्चे, सभा, सत्याग्रहाच्या माध्यमातून आवाज उठवत होते परंतु चळवळीला अधिक व्यापक रूप देण्यासाठी त्यांच्या अन्याय अस्वस्थतेचे हुंकार साहित्यातूनही उमटू लागले. वेदना,विद्रोह आणि नकार काव्यरूप धारण करू लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना 'माणूस' म्हणून जगण्याचे भान प्राप्त करून दिले होते. 'माणूस' पणाच्या शोधासाठी, आपल्या अस्तित्वासाठी प्रस्थापित सदाशिव पेठी साहित्याच्या वर्तुळाबाहेरही फार मोठा उपेक्षित समाज आहे. त्याचेही चित्रण साहित्यात येणे तत्कालीन दलित तरुणांना अपरिहार्य वाटू लागले. अनेक दलित कवींनी आपले अनुभव कवितेतून मांडण्याचा सुरुवात केली. त्यामुळे मराठी कवितेचा आवाका विस्तृत होण्यास सुरुवात झाली. प्रस्थापित समाजाने दुर्लक्षिलेले विषय प्रस्थापित कवितेची अभिव्यक्तीची शैली झुगारून देऊन नव्या अभिव्यक्तीसह दलित कविता अवतरली. त्यामुळे मराठी कवितेच्या विश्वात आमुलाग्र बदल घडून आला. मराठी कवितेला एखाद्या डबक्याप्रमाणे जे साचले पण आले होते, त्यातून मराठी कवितेचा प्रवाह खळखळता, प्रवाही करण्याचे काम दलित कवीने कवितेने केले.

दलित कविता ही प्राय: गद्य काव्य या प्रकारात मोडते. कारण दलितांना धर्म, संस्कृती, परंपरा, समाज व्यवस्था, जातीव्यवस्था यांमुळे दलितांच्या वाटयाला आलेला अमानुषतेचा इतिहास कवितेतून कथन करायचा आहे. त्यामुळे साहजिकच ऐतिह्य कथन हे गद्यात्मक प्रकारात प्रामुख्याने शब्द काव्याच्या रूपाने वर्णिलेले आहे. दलित कवितेच्या प्रेरणा, प्रयोजन, निर्मिती ही मराठी पारंपरिक कवितेपेक्षा पूर्णतः भिन्न आहे. दलित कवितेला एक वेगळी परंपरा लाभलेली आहे. दलित कविता ही पारंपरिक मराठी कवितेचा घाट (फॉर्म) आणि काव्य विषय यापेक्षा वेगळ्या जातकुळीची आहे. ती नकारात्मक व संघर्षशील अशी विद्रोहात्मक स्वरूपाची आहे.

दलित कवितेचा कालावकाश हा पारंपरिक मराठी कवितेपेक्षा कमी आहे. दलित कविता ही एका विशाल समाजापासून विभक्त झालेल्या एका अंगाची कविता आहे. दलित कवितेचे आगमन मराठी कविता विश्वात मूलगामी परिवर्तन घडविणारे ठरले. दलित कवितेच्या सशक्त

आणि लक्षवेधी प्रवाहाने पारंपरिक रूढीवादी व साचलेल्या पाण्याला स्वच्छ करण्याचे काम केले. खडाळता वेग दिला दलित कवितेच्या जीवन जाणिवेने एकूणच कविता विश्वाच्या मर्यादा पार रुंदावल्या.

दलित कविता ही मराठी कवितेपेक्षा मूलतः भिन्न आहे या अगोदर मराठी कवितेत झालेले स्थित्यंतरे ही अतिशय वरवरची होते दलित कवितेत आलेले जग त्यातील माणूस त्याचे जगणे इत्यादींकडे पाहण्याचे दृष्टी मराठी कवितेला नव्हते हिंदू समाज व्यवस्थेतील वरच्या वर्गाच्या दृष्टीला जे आवडेल व मताला पटेल अशा अत्यंत हिणकच अभिरुचीचे सोचले पुरविण्याचे काम मराठी कवितेने शेकडो वर्षे केले अर्थात याला थोडाफार अपवाद कोठे आढळेल माणसाच्या स्वातंत्र्याशी समतेशी बंधू भावाशी न्यायाशी तिचा संबंध नव्हता तिचा संबंध होता तो चार्तुवर्ण्यांची तो सांगणाऱ्या देवधर्माची त्यातील रूढी परंपरांशी स्थिती प्रियतेशी पानाफुलांशी मध्यमवर्गीय प्रेमविरहाशी त्यामुळे मराठी कविता क्षण व अशक्त होत गेले तिला सबळ करण्याचे काम दलित कवितेने केले. ( जाधव रा. ग. निळे पहाट, श्री विद्या प्रकाशन, वर्ष 1991, तिसरी आवृत्ती, पृष्ठ सत्तावन्न)

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ दलित कवितेचे प्रेरणास्थान:

१९२० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची, कर्तृत्वाची सुरुवात झालेली आपणास दिसून येते. अस्पृश्यांच्या हक्कांसाठी महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, पहिल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे नेतृत्व करून त्यांच्या हक्कांची केलेली मागणी, नाईलाजाने करावा लागलेला पुणे करार आणि नागपूर येथे आपल्या लाखो अनुयायांसह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी केलेले धर्मांतर! हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाचा आलेख पाहिल्यास तेच खरे अस्पृश्यांचे कैवारी होते याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खऱ्या अर्थाने दलित साहित्यिकांचे प्रेरणास्त्रोत होय हे अधोरेखित होते.

स्वातंत्र्य, समता आणि न्याय या तत्त्वत्रांसाठी तत्कालीन दलित समाज पेटून उठला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या ऊर्जेतून बाबासाहेबांच्या हयातीतच कालचे मुके मानवतेचे गीत गाऊ लागले. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणून 'लेखणी' लाच त्यांनी देखील हत्यार मानले. आपल्या वेदना कवितेतून मांडण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांनी दिलेला ''शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा'' चा मूलमंत्र त्यांच्या अनुयायांनी शिरसावंद्य मानला. ज्या राज्यघटनेतून बाबासाहेबांनी माणसाचे 'माणूस' पण शिक्कामोर्तब केले. ज्या राज्यघटनेतून माणसाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय प्रदान केले. ही सारी जीवनमूल्ये 'प्रस्थापित' समाजाकडून पायदळी तुडविली जात आहेत, याची जाणीव दलित तरुणास झाल्यावर त्यांच्या कवितेतून विद्रोह आणि नकार दिसू लागला.

दलित कविता दलित जीवनाशी इमान राखणारी आहे तिची नाळ त्या समाजाशी जोडलेली असल्याने त्यातील दाहकता व ओलावा येणे क्रमप्राप्त आहे काही दलित कवींच्या कवितेची भाषा काहींना अग्रांतिक कानाला मनाला बोचणारी अशी वाटणे स्वाभाविक आहे कारण

वरच्या समाज व्यवस्थेने दलितांना जी अवस्था दिली त्याची ती परिणिती आहे दलित कविता विषमतेविरुद्ध आक्रमकता स्वीकारते तसेच विषमता सांगणारे देव धर्म कर्मकांडक पूर्वजन्म अंधश्रद्धा इत्यादी नाकारते या सर्वांनी माणसाला आंधळं केलं. या विचारधारेचे मूळ स्त्रोत बुद्ध तत्त्वज्ञान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आहे समाजाच्या क्रांतीसाठी दलित कविता प्रतिभा झाली आहे मोहरून आलेली आहे तिला अभिप्रेत असलेले परिवर्तन झाल्यानंतर ती पूर्णतः माणूसपणाची होणार आहे.

मराठी कविता व दलित कविता यांचे विवेचन करताना मराठी कविता व दलित कविता यांचे पृथंगात्मता विशद करून दलित कवितेचे मर्म व काव्यधर्म यावर अतिशय साकल्याने विचार कवी दिनकर साकरेकर यांनी मांडलेले आहेत. दलित कवितेचे मराठी कवितेपेक्षा असलेले वेगळेपण दलित काव्याची निर्मितीची मीमांसा तिच्या लेखनामागील प्रेरणास्थान तिचे पृथकत्व तिचे लेखनस्वरूप व दलित कविते मागील वाङ्मय व सामाजिक जाणीव यांचा परामर्श दिनकर साक्रीकर यांनी यथार्थपणे घेतलेला आहे. (साक्रीकर दिनकर, लेख दलित कविता एक टिपण, पूर्व नियतकालिक, प्रथम विशेषांक, दिवाळी अंक, 1986, पृष्ठ ६२)

### ३.२.२ दलित कविता : स्वरूप

दलित साहित्य प्रवाहात दलित कविता हा साहित्यप्रकार समृद्धपणे वाटचाल करीत आहे. हजारो वर्षांपासून दलित मनाचा झालेला कोंडमारा प्रथमतः कवितेमध्ये स्फोट होऊन प्रकट झाला म्हणूनच ‘दलित कविते, तुझे नाव ज्वाला’ असेही दलित कवितेबद्दल म्हटले गेले. दलित कवितेमधून व्यक्त झालेली जाणीव ही पारंपरिक मराठी कवितेपेक्षा आगळे आणि वेगळी आहे. ती आशयाची संपन्नता घेऊन अविष्कृत झाली आहे बहिष्कृत मानवाच्या भावनांना आंबेडकरी विचाराचे विद्रोही रूप देणारी शब्दकळा म्हणजे दलित कविता होय. (मालेगावकर रमेश, लेख काव्यसंग्रहांच्या प्रस्तावनेतील कुरुंदकरांचा काव्यविचार, अनुष्ठभ, जुलै- ऑगस्ट, १९८३, पृ. २३)

१९६० नंतर मराठी साहित्यात अनेक वाङ्मय प्रवाह ठळकपणे जाणवू लागले. त्यापैकी दलित साहित्याचा प्रवाह त्याच प्रवाहांपैकी एक म्हणावा लागेल या प्रवाहाने आक्रमक स्वरूप धारण करून पुढे धबधबा निर्माण केला झंझावाती वादळाने आपल्या मस्तीत गिरक्या घ्याव्या आणि सर्व वातावरण अंतर बाह्य ढवळून टाकावे तसे दलित साहित्याच्या प्रवाहामुळे झाले.

दलित साहित्यातील ज्वालामुखीचा पहिलाच स्फोट कवितेच्या रूपाने झाला नकार, विद्रोह या कवितेने आक्रमकतेने मांडला कवितेत नवी भाषा नवी प्रतिमा नवी प्रतिभा नवे जीवन समोर आणले मध्यमवर्गीय संकुचित मराठी साहित्य चे सर्व संकेत दलित साहित्याने झुगारले. (तत्रैव २३)

काव्य हा मूलभूत मानवी उद्गार मानला जातो. या न्यायाला अनुसरून दलित साहित्यिकांचा पहिला उद्गार कवितेच्या माध्यमातून प्रकट व्हावा हेच स्वाभाविकच होय.

दलित साहित्यात चळवळ आणि दलित कविता याविषयी चर्चा करताना रवींद्र घरी लिहितात, “आज प्रस्थापित कवितेतील एक धारा निव्वळ प्रयोग वादात रमलेली आहे. दलित कविता अशी प्रयोगवाद आणि पराभूतता यात रमलेली नाही. ती अस्सल भारतीय

जाणिवांनी निर्माण होत आहे. ती आपले स्वत: व राखून नवी कलात्मक शिखरे गाठू शकेल, असा विश्वास वाटतो. एखादा कवी हा ब्राह्मण आहे की वाणी आहे म्हणून मराठी कवितेत तो थोर पावलेला नाही तसाच दलित कवीही दलित म्हणून थोरवेला पावणार नाही, हे उघड आहे, त्याची कविता श्रेष्ठ आहे की नाही हाच महत्त्वाचा प्रश्न राहणार आहे. अशी श्रेष्ठ कवीची उत्सुकतेने वाट पहावी एवढी कामगिरी आजवरच्या दलित कवितेने जरूर केली आहे. (डॉ. ठाकूर रवींद्र, प्रवाह आणि प्रतिक्रिया, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. ६८)

दलित वर्गावर होणारे अत्याचार, त्यांच्या वेदना अपमान, त्यांची झालेले उपेक्षा, अवहेलना या साऱ्यांचे चित्रण दलित कवितेतून प्रकट होणे साहजिक आहे. इथल्या प्रस्थापित समाज व्यवस्थेला दलित कविता आव्हान देते. ज्या मनुस्मृतीने दलितांचे माणूस म्हणून जगणे अमान्य केले त्या मनुस्मृतीत विरोधीचा संताप व नकार दलित कवितेतून दिसून येतो. येथील संस्कृतीने परंपरेने ज्या दलितांचे शोषण केले, त्या शोषणाविरुद्धचा आवाज दलित कविता उठविते. सदाशिव पेठे साहित्यापासून दलित कवितेने आपले वेगळेपण निश्चितच सिद्ध केले. मानवमुक्तीची भूमिका दलित कवितेने प्रमाण मानली. त्यांच्या कवितेत वेदना, विद्रोह, नकार त्याचबरोबर आशावाद आणि उत्साह देखील दिसून येतो. दलित कविता पानाफुलात, प्रेमात, संगीतात, भावनेत रमणारी नाही. ती वास्तवाला सरळ भिडते. मराठी कवितेचे क्षेत्र दलित कवितेने अधिक व्यापक केले. मराठी कवितेला अधिक समृद्ध केले. शोषण विरहित समाज रचनेची, समानतेची अशा दलित कवितेतून व्यक्त होते. दलित कवी लढाऊ बाण्याचा आहे. त्याची वृत्ती पलायनवादी नाही. दलित कवितेतून मी पेक्षा समूहाची वेदना मुखर होताना दिसते. त्या कवीच्या एकटयाच्या वेदनास राहत नाहीत तर त्या वेदनांना समूहाचे रूप प्राप्त होते.

### ३.२.३ दलित काव्यशैली:

'योग्य कल्पना योग्य शब्दात मांडणे म्हणजे शैली!' असे डॉ. र.वि. हेरवाडकर यांनी शैलीच्या संदर्भात म्हटले आहे. 'Style is the man' या उक्तीनुसार 'जशी व्यक्ती तशी शैली' ठरते. (धोंगडे दिलीप, शैली विज्ञान)

आधुनिक मराठी काव्यशैलीचे केशवसुतपूर्व अशी काव्यशैली, आंग्लानुगामी काव्यशैली, केशवसुतांची स्वच्छंदतावादी शैली, ओजस्वी शैली, छंदोबद्ध शैली, विडंबनशैली, रविकिरण मंडळ शैली व रविकिरण मंडळ उत्तर शैली, रेगे-अनिल-कुसुमाग्रज, बोरकर-मर्ढेकर या कवी पंचकाची संप्रदायी शैली, अनिलांची-मुक्तिबोधांची-मुक्त छंद शैली-मुक्तकशैली, कुसुमाग्रजांची अग्निपूजक शैली, ग्रेस यांची पृथक शैली, चित्रे, कोल्हटकरांची नवकाव्यशैली असे प्रकार पडतात.

तरीच कवितेचे शैली ही कवी अनिल यांच्या मुक्तछंदात्मक शैलीचे अनुकरण करून मुक्त संघर्ष शैली निर्माण झाली. दलित शैली ही परंपरेपासून आपली पृथ्वी कथा सिद्ध करू पाहणारी आहे. तिच्या शैलीगत प्रेरणा मराठी काव्यशैलीतूनच उदयास आलेल्या असल्या तरी रुळलेल्या राजपथावरून मार्गक्रमण करण्याचा या शैलीचा इरादा नाही. शैलीच्या संदर्भात कितीतरी प्रयोगक्षम असणारी नवकविता डोळ्यांसमोर असून दलित शैली त्यापासून वेगळीच राहिली आहे. तिचे स्वरूप अत्यंत सोपे आणि सरळ आहे

कलात्मकतेच्या संदर्भातील पारंपरिक कल्पनांच्या मायाजाळात जशी ती गुरफटलेली नाही. तद्वतच नवकाव्याच्या प्रयोगशील गुंतागुंतीत तिची दमछाक झाली नाही. दलित काव्याचे प्रयोजनच मुळी वेगळे असल्याने तिची शैली ही वक्तृत्वशाली अशी झालेली आहे. तिथे स्वरूप प्रामुख्याने निषेधात्मक, विद्रोहात्मक आणि आव्हानात्मक झाले. (काळे अक्षय कुमार, लेख-दलित शैली : मुक्ती संघर्ष शैली, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक 218, पृष्ठ 44)

नाना थरातून दलित कवी आलेले असल्यामुळे रचनेचे तेच ते घाट या शैलीत नाहीत एकीकडे यशवंत मनोहर यांची दाहक तांडव नृत्य करणारी, पेटणारी व पेटवून देणारी विखारी शैली आहे, तर दुसरीकडे नामदेव ढसाळ यांचे सामान्य रचिकाला गुदमरून टाकेल अशी जुगुप्सायुक्त शैली आहे. पुष्कळदा तर ती अपरिचित शब्दांनी दुर्बोधतेकडे ही वळते. पण मर्ढेकरी शब्दांची दुर्बोधता वेगळी व ढसाळांच्या शैलीचे दुर्बोधता वेगळी. विजय तेंडुलकर ढसाळ यांच्या शैलीबाबत लिहितात, “पांढरपेशा समाजाने जपलेली अलवार घरंदाज भाषा नामदेव ढसाळ एखाद्या बटीकेसारखे वागवतो निर्दयपणे तिची मोडतोड करतो. अथवा तिच्यात अशिष्ट भर घालून तिचे एक विद्रूप रूप करतो.” (तेंडुलकर विजय, प्रस्तावना-गोलपिठा, नामदेव ढसाळ, पुणे प्रकाशन, १९७८, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक ९-१०)

दलित कवींच्या काव्य लेखनाच्या वाटचालीत किसन फागुजी बनसोडे यांच्या काव्य लेखन शैलीत वस्तुस्थितीचे विदारकता रोखठोकपणे अभिव्यक्त झालेली आहे. (नाही लढयाविण मुक्ती), मार्क्सवादी व कामगार कवी नारायण सुर्वे यांच्या काव्यशैलीत कठोर आत्मपरीक्षण करणारे अर्थबहुल शब्दरचना, सूचकता आणि समूह मनाशी चाललेला असतो संवाद व्यक्त होताना दिसतो. (ऐसा गा मी ब्रह्म, जाहीरनामा, माझे विद्यापीठ) केशव मेश्राम यांची काव्यशैली काहीशी संयम व आत्मनिष्ठ स्वरूपाची आहे (उत्खनन) कवी मामा निंबाळकर यांच्या काव्यशैलीत हळुवारपणे केलेले कुटुंब चित्रण आणि आशावादी भविष्य कथन यांचा आढळ होताना दिसतो. नामदेव ढसाळ यांची लेखन शैली सामान्य रसिकाला गुदमरून टाकेल अशी जुगुप्सायुक्त शैली आहे. पुष्कळदा तर ती अपरिचित शब्दांनी दुर्बोधतेकडे ही वळते पण मर्ढेकरी शैलीची दुर्बोधता वेगळी व ढसाळ यांच्या शैलीची दुर्बोधता वेगळी. “पांढरपेशा थराने जपलेले अलवार घनदास भाषा नामदेव ढसाळ एखाद्या भटकी सारखे वागवतो निर्दयपणे तिची तोडमोड करतो अथवा तिच्यात अशिष्ट भर घालून तिचे रूप विद्रूप करतो. (गोलपिठा, गांडू बगीच्या, मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविला.)

यशवंत मनोहरांची दाहक तांडव नृत्य करणारे पेटणारी व पेटवून देणारी शैली आहे. (उत्थान गुंफा) दया पवार यांचे लेखन शैली नाट्यात्मक प्रसंग चित्रणात्मक आत्मशोधनाची प्रखर उर्मी असलेली आणि रोखठोक अशी आहे. (कोंडवाडा), प्रल्हाद चांदवडकर यांच्या कवितेतील शब्द हे विजेच्या चाबकासारखे कडाडतात. अत्यंत दाहक व विध्वंसक असे शब्दकळा असलेली त्यांचे लेखन शैली आहे. (ऑडिट) त्र्यंबक सपकाळे यांची लेखन शैली अत्यंत स्फोटक असून तिचा मुख्य स्वर संतापाचा आहे, आव्हानात्मक आहे. (सुरुंग), अर्जुन डांगळे यांची प्रतिमा शैली झुंजार व आशावादीच स्फुल्लिंगे उसळणारी अशी आहे. (छावणी हलते आहे), ज. वि. पवार यांची लेखनशैली आत्मनिष्ठतेपेक्षा सामाजिक आशयाने भारलेली अशी आहे. (नाकेबंदी), रविचंद्र हडसनकर यांच्या काव्य लेखनातून सामाजिक व्यवस्थेतील वेदनांचे भिन्न चित्र प्रतिबिंबित झालेले दिसते. डॉक्टर नीलकांत चव्हाण यांची

कविता सूक्ष्म उपरोध आणि वेदक प्रतिमा योजना अशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. (निखारा), प्रकाश जाधव यांच्या कवितेचे शब्द काढा घुस्मटून टाकणारी धबधब्यासारखे स्वयं तेजी अशी आहे. (असलीयत, मरण या कविता), उमाकांत रणधीर - स्वाभाविक उमाळ्याचा अंतःकरणापासून येणारा आवेद आणि तीव्र संवेदन क्षमता हे त्यांच्या कवितेचे विशेष आहेत. अरुण कांबळे यांच्या कवितांतून व्यक्तिगत जीवनातले ताण-तणाव सामाजिक संघर्षातील वाटा वळणे यांचे दर्शन घडते. कवी धर्मराज निमसरकर यांचे शैली आदेशपूर्ण पण अभिनव अशी व रसिकांना अंतर्मुख करणारे आहे कवी माधव कोंडविलकर यांची कविता तीव्र भावनांना प्रांजलपणे व्यक्त करणारी अशी आहे. (वाढत होतो), बबन चहांदे यांच्या कवितेतून हीन - दीन व वंचित समाजातील दुहेरी आणि स्वार्थी तडजोड यातील उद्विग्नता प्रकट होताना दिसते. (काळे अक्षय कुमार, लेख- दलितशैली : मुक्ती संघर्ष शैली, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक 218, पृष्ठ 44) भीमसेन देठे यांच्या कवितांतून देखील अत्यंत स्फोटक पण समृद्ध भावजीवनाचे दर्शन घडते.

### ३.२.४ दलित कवितेचा आरंभ:

दलित कवींनी जे काव्य लेखन केले त्या आधी देखील दलितांविषयी कनवळा वाटून त्यांच्या दुःखाचे विषय मराठी कवितेत काही कवींनी हाताळले. परंतु ते अत्यंत अल्प आणि वरवरचे वाटते. केशवसूत यांनी ‘अंतजाचा मुलाचा पहिला प्रश्न’ या कवितेतून दलितांचे दुःख मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु या कवितेतून आपणास विद्रोह दिसून येत नाही. मध्ययुगात संतांच्या परंपरेतील संत चोखामेळ्यानेही अस्पृश्य म्हणून वाटयाला आलेल्या वेदना काव्यातून मांडल्या परंतु त्यातही विद्रोह दिसून येत नाही. विटाळाचे दुःख त्यांच्या कवितेतून ते मांडतात.

“काळाचा विटाळ जीवशिवा अंगी।
बांधलासे जगीं दृढ गांठी ॥
विटाळी विटाळ चवदाही भुवनीं।
स्थावर जंगम व्यापुनी विटाळची ॥
सुखाशी विटाळ दुःखाशी विटाळ।
विटाळीं विटाळ वाढलासे ॥
विटाळाचे अंगी विटाळाचे फळ।
चोखा तो निर्मळ नाम गाय ॥”

संतांच्या मांदियाळीचे दैवत हे एकच म्हणजे विठ्ठल होय. परंतु इतर संतांप्रमाणे चोखोबाला समान वागणूक नाही. त्याला विठ्ठलाचे दर्शन करू दिले जात नाही. वाटयाला अवहेलना व उपेक्षाच येते. हे दुःख त्याच्या अभंगातून व्यक्त होताना दिसते. तत्कालीन दलित समाजाचे चित्रण चोखोबाच्या अभंगाच्या अभंगातून आपणास होते. चोखामेळा, बंका, कर्ममेळा यांच्या काव्यातून तत्कालीन दलित समाजाची आपणास प्रचिती होते. परंतु यात तत्कालीन समाजाविरुद्ध बंड केलेले दिसत नसले तरी तत्कालीन सामाजिक परिस्थिती लक्षात घेता

या वेदनेतूनही आपणास विद्रोहाची ठिणगी पडलेली दिसून येते. संत कर्ममेळा मात्र या पुढचे पाऊल टाकून थेट विठ्ठलालाच जाब विचारतो.

"आमुची केली हीन याती
तुज कां न कळे श्रीपती ।
जन्म गेला उष्टे खातां
लाज न ये तुमचे चित्ता ।
आमचे घरीं भात दहीं
खावोनी कैसा म्हणसी नाहीं ।
म्हणे चोखीयाचा कर्ममेळा
कासया जन्म दिला मला ।"

असा रोकडा सवाल विठ्ठलाला विचारतो.

महात्मा फुले देखील आपल्या कवितांमधून कर्मठपणावर प्रहार करतात. अस्पृश्यांच्या शोषणाविरोधात ते आवाज उठवितात. विचारांची पेरणी करतात. ते आपल्या कवितेत म्हणतात,

"विद्या विना मती गेली, मती विना नीती गेली,
नीती विना गती गेली, गतिविना वित्त गेले,
वित्तविना शुद्र खचले.
इतके अनर्थ एका अविद्येने केले."

शिक्षणाचे महत्त्व ते दलित समाजात पटवून देताना दिसतात. त्याचवेळी प्रस्थापित समाज व्यवस्थेवर देखील आसूड ओढतात.

"शूद्रांना सांगण्याजोगा । आहे शिक्षण मार्ग
शिक्षणाने मनुष्यत्व येई । पशुत्व हटते पहा"

असा शिक्षणाबद्दलचा विश्वास ते व्यक्त करतात. धर्माच्या नावाखाली ब्राह्मणांनी दलितांचा छळ केला. पूर्व जन्माचे कृत्य, पाप पुण्याच्या संकल्पना यांची भीती दाखवून त्यांचे शोषण केले. ते म्हणतात,

"आणिक भटांनी कपटे ती केली ।
विद्यार्थी ठेविली । आपले हाती
आजवर त्यांचे कपट चालले ।
इतरां नाडले । जोती म्हणे ॥"

अशी टीका करून मानवाचा केवळ एकच सत्यधर्म असावा असे, मत ते आपल्या कवितातून मांडतात.

महात्मा फुले यांची कविता व्यवस्थेला नकार देऊन विद्रोह करताना दिसते.

### ३.२.५ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित कविता:

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपल्याला समानतेची वागणूक मिळेल, या अपेक्षेचा भंग झाल्यामुळे दलितांच्या मनात चीड निर्माण झाली. भारतीय समाज व्यवस्थेतील विषमता, दास्य, पिळवणूक याविरुद्धची भावना दलित कवितेतून व्यक्त होताना दिसते.

"पहा पहा सारे जन हो, हा हिंद देश माझा

दुहीचे मूलस्थान

भेदांचे येथे रान

वैरास देई मान, हा हिंद देश माझा

जगतात कोठे नाही

तो भेद येथे पाही

जन्माने वर्ण ठरवी, हा हिंद देश माझा

भटास उंच पदवी

इतरांस नीच ठरवी

धर्मात ठेवी यादवी, हा हिंद देश माझा

मनुजास पशुहून

मानी जो येथे हीन

तोच आर्यावर्त जाण, हा हिंद देश माझा"

जगात कोठेही दिसणार नाही असा भेद, वैराची भावना, पशुहूनही हीन जगणे या हिंद देशात दिसून येते. जगात कोठेही नसलेली वर्ण व्यवस्था, धर्मातील यादवी या देशात असल्याचे किसन फागुजी बनसोडे व्यक्त करतात. इथल्या विषमतावादी व्यवस्थेवर ते परखडपणे भाष्य करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले क्रांतीचे वारे प्यायलेले हे दलित कवी कोणत्याही संकटाला भीत नाहीत. आपल्या कवितेत म्हणतात,

"तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे

तुफान वारा पाऊस धारा मुळी न आम्हा शिवे ।"

भारतीय समाज व्यवस्थेतील या अस्पृश्यतेला कंटाळून किचन फागुजी बनसोडे देवाला जणू विनवणी करतात,

"हरि मज पशु कर वा पक्षी कर

परि नको करू महार

पक्षीयोनी मज राघू केले तरी हिंदू शिकविती

महार केलिया विटाळ मानुनी
शिक्षण - बंदी. करिती”

या अन्याय- अत्याचारापासून स्वतःला मुक्त करण्यासाठी, गुलामीच्या बेडया झुगारून देऊन मानव मुक्तीची गीत दलित कवी गातो. दलित कवितेला अधिक सशक्त करण्याचे काम पुढील कवींनी केले.

**नामदेव ढसाळ :** ‘गोलपिठा’, ज. वि. पवार - ‘नाकेबंदी’, वामन निंबाळकर - ‘गावकुसाबाहेरिल कविता’, प्रा. केशव मेश्राम - ‘उत्खनन’, डॉ. यशवंत मनोहर - ‘उत्थानगुंफा’, अर्जुन डांगळे - ‘छावणी हालते आहे’, प्रल्हाद चेंदवणकर -: ‘ऑडिट ‘, त्र्यंबक सपकाळे - ‘सुरुंग ‘ , दया पवार - ‘ कोंडवाडा’ , भीमसेन देठे - ‘होरपळ’ आणि बा. स. हाटे - ‘रक्तखुणा’. दलित कवितेची दमदार सुरुवात करणाऱ्या या गाजलेल्या कवी आणि त्यांच्या कवितांनंतर गौतम शिंदे, अशोक पाटील, दामोदर मोरे, ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, यांच्याही कविता अनुक्रमे ‘ प्रवर्तक’, ‘बस्तान’, ‘विमुक्त’, ‘दिशा’ , ‘फिर्याद’ अशा कविता - संग्रहांमधून गाजलेल्या आहेत. त्यानंतरही अस्पृश्यतेचा लढा कवितेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने सुरुच असलेला दिसतो. ‘अस्मितादर्श’ या त्रैमासिकातून कवितेचे लेखन करणारे अनेक दमदार कवी आजच्या कालखंडापर्यंत नावारुपास आलेले दिसतात. त्यांच्या कवितेतील आशय दमदार, सामर्थ्यशाली आणि प्रज्ञावान आहे. दलितांचे दुःखभोग मांडता - मांडता काव्यप्रांतामध्ये दलितांच्या कवितांनी काव्यश्रेष्ठत्वाचे यशोशिखर गाठल्यासारखे वाटते. अनेक कवितांच्या संदर्भात यशोशिखरावर वाटचाल करणाऱ्या अनेक कवींची नावे सांगता येतील. लोकनाथ यशवंत, डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रज्ञा लोखंडे, डी. बी. जगतपुरिया, संजीवकुमार सोनवणे, भगवान भोईर, भगवान ठाकूर, सायमन मार्टिन, बजरंग मेश्राम, वाल्मिक अहिरे, शशिकांत हिंगोणेकर, उषा हिंगोणेकर, भास्कर आबाजी कांबळे, विलास खरात, राजेश डोंगरे, मांगिलाल राठोड, प्रा. सुषमा अंधारे, मनोहर जाधव, दामोदर मोरे, परशुराम गिमेकर, मारोती वाघमारे, संजय घाडगे, जयवंत बोदडे, उषा किरण आत्राम, मंगेश बनसोड, अनिल सपकाळ, प्रकाश गायकवाड, संध्या रंगारी, डॉ. म. सु. पगारे, विश्वास वसेकर, हरिश्चंद्र कांबळे, सुरेश जगताप, गोकुळदास मेश्राम, अशोक इंगळे अशा अनेक कवींनी कवितांमधून दलित- चळवळ जिवंत ठेवली आहे आणि दलितांचे प्रश्न मांडले आहेत.(दलित साहित्याचा इतिहास, प्राचार्य डॉ. म.सु.पगारे, प्रशांत पब्लिकेशन, प्र. आ.११ डिसेंबर २००५, पृ. ७७,७८) अशा अनेक दलित कवींच्या कवितांचा आपण आढावा घेणार आहोत.

कवी नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, दया पवार, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, उमाकांत रणधीर, त्र्यंबक सपकाळे यांचा पहिल्या पिढीतील कवी म्हणून उल्लेख करता येईल. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन अनेक कवी उदयाला येऊ लागले. नामदेव ढसाळ किंवा दया पवार यांच्या आधी भावकविता किंवा प्रेम कविता होत्या. नंतर यांच्या कवितेने रूप बदलले.

**प्रल्हाद चेंदवणकर :** प्रल्हाद चेंदवणकर यांची कविता चळवळीच्या वेळची कविता आहे. शहरातील दलित वस्त्या व झोपडपट्ट्यांमधून बेरोजगारीचे वाढते प्रमाण व गरिबी यामुळे इथल्या तरुणांच्या मनात असंतोष निर्माण झाला. त्यांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक

जीवन चिरडले गेले. मुंबईवरून हा दलित तरुण ज्यावेळी त्याच्या गावी जातो त्यावेळी तो क्रांतीचे वारे प्यायला आहे, समाजवाद आत्मसात केलेला आहे परंतु गावचा पाटील मात्र अजूनही मानसिक दृष्ट्या जुन्या युगातच वावरतो आहे. प्रल्हाद चेंदवणकर आपल्या कवितेत म्हणतात,

'पाटलानं बोलावलं'

म्हणून मी गेलो

'बस' मला म्हटलं,

पण, अंगण होतं ओलं ;

फाटकं बारदान

अंगावर भिरकावलं

तरीही मी उभाच

तोंड नव्हतं उघडलं;

या मानसिकतेला तत्कालीन नवशिक्षित व शहरात राहणाऱ्या तरुणाला गावी गेल्यावरही सामोरे जावे लागत होते.

"फुटक्या कपात

काळ पाणी आणलं

घाण त्यातली पाहून

मी, 'चहा नको' म्हटलं;"

गावात नवी उत्पादनसाधने आली पण नवी वैचारिकता आली नाही, याची खंत कवी व्यक्त करतात.

"मुंबईला भेटतो

हंसतो

हात मिळवतो"

मी त्याच्या गाववाला म्हणून

"माझ्याकडून तो

चहा, सिगारेट किंवा

बिर्याणी सुद्धा चापतो,"

हाच पाटील जेव्हा गावे भेटतो, तेव्हा कवीला 'महारडा' म्हणून हिणवतो. कारण तो तेव्हा जातीच्या लोकांमध्ये बसलेला असतो. परंतु शोषण रहित समाज निर्मिती करण्याचे ध्येय बाळगणारे, क्रांतीचे स्वप्न पाहणारे बंड करून उठतात आणि म्हणतात,

"महात्मा फुले आंबेडकरांनी

तुमचे अकाऊंटस् ऑडिट केलेत
ग्रंथा ग्रंथाच्या पानांवरचे फ्रॉडस्
सगळे डिटेक्ट केलेत"

**यशवंत मनोहर :** 'यशवंत मनोहर यांची कविता म्हणजे अग्निप्रलय. ती रुद्रसुंदर, क्रूर - कोमल व क्रांतीसारखी भव्योदात्त आहे. तिच्या हातात वादळे अन् वणवे आहेत.' ('दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान', बाबुराव बागुल, भेटायची 28, व्दि. आ. धम्मचक्र परिवर्तन दिन ऑक्टोबर २००४, दिशा प्रकाशन) यशवंत मनोहर यांची कविता क्रांतीची हत्यारे वापरते.

"मी विघ्नसंतोषी
उतट समाधानाने मला पहावीशी वाटतात
असल्या विषविलासाची चटपट मरणे
त्याच्यातील बाटल्या श्रद्ध निष्ठांसहित अवसान घातकी मूल्य परंपरेसहित"

असे म्हणून पुढे ते आरोप करतात,

"सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडविले.
कपटी चांडाळ ते आहेत
ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडविले'
'ज्यांनी इथल्या सूर्याला दगडांनाही
ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले
संचित निश्चित केले
त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो'
असे रोखठोकपणे म्हणून क्षेत्र समोर आव्हान उभे करतात.
डोळ्यात तेल घालून भोवताल पाहा
नजरेतील क्षितिजे  सांभाळा आणि ध्यानात ठेवा
माती ज्यांच्याजवळ आपली मनोगते मांडते
त्यांचा विचार उजेडाच्या युगासाठी कळत होत असतो"

असा आशावादही त्यांच्या कवितेतून ते व्यक्त करतात.

**नामदेव ढसाळ** यांच्या कवितांनी तर कवितेचा आश्चर्यच बदलून टाकला. ढसाळ यांची स्वतःची अशी प्रतिमासृष्टी आहे. 'निमित्त १५ ऑगस्ट ७१' या कवितेत ते व्यवस्थेला प्रश्न विचारतात,

"१५ ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ट
स्वातंत्र्य कुठच्या गाढवीचे नाव आहे?
रामराज्याच्या कितव्या घरात आपण राहतो
उदगम, विकास, उंची, संस्कार, संस्कृती
कंचा मूलभूत अर्थ स्वतंत्र्याचा?"

देशाला स्वातंत्र्य मिळूनही इथल्या दलितांच्या वाटयाला घोर उपेक्षाच आली. स्वातंत्र्य गोरगरिबांपर्यंत पोहोचलेच नाही, ही खंत ते कवितेतून व्यक्त करतात. नामदेव ढसाळ यांच्या कवितेबद्दल विजय तेंडुलकर म्हणतात, 'पांढर पेशा जगाच्या सीमा संपून पांढरपेशा हिशेबानी 'नो मॅन्स लँड', 'निर्मनुष्य प्रदेश' जिथून सुरू होतो, तिथून नामदेव ढसाळ यांच्या कवितेचे मुंबईतील 'गोलपिठा' नावाने ओळखले जाणारे जग सुरू होते. हे जग आहे रात्रीच्या दिवसांचे, रिकाम्या किंवा अर्ध भरल्या पोटांचे, मरणाच्या खस्त्यांचे, उद्याच्या चिंतांचे, शरम आणि संवेदना जळून उरणाऱ्या मनुष्यदेहांचे, असोशी वाहणाऱ्या गटारांचे, गटारा शेजारी मरणाची थंडी निवारीत पोटाशी पाय मोडपून झोपणाऱ्या तरुण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे, खिसेकापूंचे, बैराग्यांचे, दादांचे आणि भडव्यांचे, दर्ग्यांचे आणि क्रूसांचे, कुरकुरणाऱ्या पलंगालगतच्या पोपडे गेलेल्या भिंतीवरच्या देवांचे आणि राजेश खन्नाचे, गंजाच्या खाटल्याचे, त्याच काढल्यावर कोपऱ्यात झोपलेल्या गोजिरवाण्या मुलाचे, त्या मुलाला 'शरीफ' बनविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगीत जवळच्या कुंटण खाण्याची रखवाली करणाऱ्या क्षयरोगी बापाचे, हिजड्यांचे, हातभट्ट्यांचे, त्यात मी कवाल्यांच्या तबकड्यांचे आणि कोणत्याही क्षणी पाण्याच्या भावाने वाहणाऱ्या अन् चिकट रक्ताचे, वाफा ओकणाऱ्या अन पाणचट लालभडक चहाचे, स्मगलिंगाचे नागव्या चाकूचे, अफूचे...' (तेंडुलकर विजय, गोलपिठा, प्रस्तावना, पृ. ८)

ढसाळांची कविता मानवतेचे गाणे गाऊ पाहते. परंतु इथल्या प्रस्थापित व्यवस्थेत त्यांचा भ्रमनिरास होतो आणि माणुसकीचे गाणे गाण्यासाठी म्हणतात,

"माणसाने प्लेटो, आईन्स्टाईन, आर्किमिडीज, सॉक्रेटिस,
मार्क्स, अशोक, हिटलर - बिटलर, कामू, सार्त्र, काफका,
बोदलेअर, रेम्बो, इझरा, पाउंड, हापकिप्न्स, गटे,
दोस्तोव्हस्की, मायक्रोव्हकी, मॅक्झिम गॉर्की,
एडिसन, मेडिसिन, कालिदास, तुकाराम, व्यास शेक्सपिअर,
ज्ञानेश्वर वगैरे वगैरेंना त्यांच्या शब्दांसकट गटाराचे
मेन हॉल उघडून त्यात सलग, सडत ठेवावे....
नंतर उरल्या - सुरल्यांनी कोणालाही गुलाम करू नये,
लुटू नये,
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून
त्यांच्या कुशीत

गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे.
चंद्र, सूर्य फिके पडतील, असे सचेत कार्य करावे.
एक तीळ सर्वांनी करंडून खावा. माणसावरचे सूक्त रचावे.
माणसाचे गाणे गावे माणसाने."

नामदेव ढसाळ एकाच वेळी इथल्या व्यवस्थेला विरोध करतात व मानवतेचे, समानतेचे गाणेही गातात.

'आता' या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति असलेली श्रद्धा व्यक्त होते.

"सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला,
आता अंधारयात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे.
हा आपला बाप अंधार वाहून वाहून अखेर बोक्या झाला,
आता त्याच्या पाठीवरचा बोजा खाली ठेवलाच पाहिजे,
या वैभवनगरीसाठी आपलाच खूण सांडला,
आणि दगडी खाण्याचा मक्ता मिळाला,
आता आभाळमुका घेणाऱ्या हवेल्यांना,
सुरुंग लावलाच पाहिजे.
सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला,
आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे."

आंबेडकरी चळवळीला एक नवी दृष्टी देण्याचे काम ढसाळ यांची कविता करते. सामाजिक आशय त्यांच्या कवितेतून जाणवतो.

**केशव मेश्राम** त्यांच्या 'उत्खनन' या कवितासंग्रहातून केवळ विद्रोहच नाही तर सौंदर्यवादी वृत्ती, विविध प्रतिमा, संवेदनशीलता व निसर्ग दिसून येतो. त्यांच्या कवितेतील विद्रोह 'एक दिवस मी परमेश्वराला' या कवितेतून आपणास पाहता येईल,

"साल्या, तुकडयावर भाकरीसाठी
गाडीवर लाकडं फोडशील काय?
चिंधूक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजलेले हाडके शरीर पुसशील काय?
बापाच्या बिडीकाडीसाठी
भावा बहिणीची हाडके झिजवशील?
बाप्पा रे, देव बाप्पा रे !
तुला हे जमणारच नाही.

त्यासाठी पाहिजे अपमानित
मातीत राबणारी
प्रेम करणारी माय माऊली.
एक दिवस परमेश्वराला आई वरून शिवी दिली.
तो लेखाचा फक्कन हासला."

दलित समाजाला माणूस म्हणून समानतेची न मिळणारी वागणूक, पिढ्यानपिढ्यांचे शोषण, यातना, अपमान, गरिबी, कष्ट ते चित्रित करतात.

**ज. वि. पवार** आपल्या 'नाकेबंदी' या कवितासंग्रहातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली वैचारिक जागृती व्यक्त करताना दिसतात.

"तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या तत्त्वज्ञानामुळे स्वतःला व समाजाला जागृत करून पाहतात. ते आपल्या कवितेत लिहितात,

"या वळलेल्या मुठी आता सैल होणार नाहीत
होऊ पाहणारी क्रांती तुमच्यासाठी थांबणार नाही
पुष्कळ सहनलं आता सहवणार नाही
शस्त्र हातात घेत सांगणाऱ्या रक्ताशी
बेईमान होऊन जमणार नाही"

असे जर केले नाही तर आपल्याला पुन्हा गुलामीत अडकावे लागेल, असा इशाराही ते समाजाला देतात. 'दवा - दारू' या कवितेतून मार्क्सने केवळ आर्थिक विषमतेला पर्याय दिला, परंतु जातीयता विषमता आणि गुलामी तोडण्यासाठी पर्याय दिलेला नाही, असे मत ते व्यक्त करतात.

"तू म्हणतोस मार्क्स हा दवा आहे
मी म्हणतोय ती एक दारू आहे.
ही जातीयता फोड, हे बांध फोड
बांधा बांधातील पाणी घुसू दे,
तुझ्या बांधात, माझ्या बांधात,
पाण्यालाच बांधलेस, तर तू
क्रांती कसा करणार?

आंबेडकर जेथे सगळ्या दुःखालाच दवा आहे
तेथे तुझ्या दारुने काय होणार?"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दलचा निस्सिम भाव व्यक्त होतो.

**यशवंत मनोहर** आपल्या 'उत्थानगुंफा' या काव्यसंग्रहातून धर्म, धर्मग्रंथ व इथल्या विषमतावादी समाज व्यवस्थेबद्दल चीड व्यक्त करतात.

"मी आंबेडकरांच्या ओठांवर उगवलेला
प्रलयंकारी सूर्य आहे.
चार्वाक माझ्या धगधगत्या घराण्याचा
मूळ पुरुष आहे.
मखली गोशाल
अजितकेश कंबली आणि गौतमबुद्ध
ही खवळलेली वादळे
माझे अभिवादनीय आजोबा आहेत.
फुले आणि मार्क्स यांनी
आशीर्वादाचे हात विश्वासून
माझ्या भाळावरच पेरले आहेत."

गौतम बुद्ध, चार्वाक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ते श्रद्धास्थानी मानतात.

इथल्या प्रस्थापित समाज व्यवस्थेला ते सडेतोड पणे म्हणतात,

"जाताना मुक्याने जाणार नाही
या पसाऱ्याला शाप देऊन जाईन.
येताना उत्तरे घेऊन आलो होतो
जाताना प्रश्न घेऊन जाईन.
त्या हरामखोर परंपरांवर
मी विध्वंसाचा नांगर धरतो
ते सर्व दैववादी
माझे वैरी आहेत
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली,
तिची मधुर ओवी केली,
ते शब्द प्रामाण्यावादी सगुण, निर्गुण

वैरी आहेत माझे,

ज्यांनी मला

आजवर मला मुक्त होऊ दिले नाही."

यशवंत मनोहर यांच्या कवितेत अतिशय अर्थपूर्ण प्रतिमा योजिलेल्या दिसून येतात.

**दया पवार** यांच्या 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहातून आपल्या व्यथा ते व्यक्त करतात. ते थेट वाल्मिकीलाच प्रश्न विचारतात,

"हे महाकवे,

तुला महाकवी तरी कसे म्हणावे?

हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा

एक तरी श्लोक तू रचला असतास...

तर तुझे नाव काळजावर करून ठेवले असते."

दया पवार यांचे शिक्षणामुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमुळे विचारभान जागृत होताना दिसते. ते त्यांच्या पुढील कवितेतून जाणवते,

"खरंच कशाला झाली पुस्तकांची ओळख

बरा ओहळाचा गोटा

गावची गुरे वळली असती

असल्या इंगळे डसल्या नसत्या..."

अशी हताश भावना ते व्यक्त करतात.

काशिनाथ वेलदोडे आपल्या कवितात म्हणतात,

"बापाने ढुंगणावर

दोरीचा फटकारा ओढला

चड्डी ओली झाली

शाळेची वाट धरली

आणि शब्दांची ओळख करून घेण्याची झटापट सुरू झाली"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणुकीनुसार आधीच्या पिढीने आपल्या मुलांना शिकवायला सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाच्या गाथा ते आपल्या मुलांना सांगू लागले. काशिनाथ यांची आई देखील त्यांना झोपताना बाबासाहेबांचीच गोष्ट सांगायच्या,

"आज त्याच सामर्थ्यावर आम्ही

नव्या जगाची

नवी समाजरचना
उभारणार आहोत
पिढ्यान्पिढ्यांची मक्तेदारी मोडून !"

त्यांच्या 'दुपार' या कवितेतून वेगळे वास्तव चित्रित होताना दिसते.

"तुमची दुपार
एअरकंडिशन रूममध्ये
फोमच्या गादीवर
वामकुक्षी करत असते
किंवा आफ्टरनून ट्रान्समिशनचा
आस्वाद घेत असते!
मी म्हणतो
तुम्ही तुमच्या कॉलनीतून बाहेर पडा
ग्रांटरोड, कामाठपुरा, बुधवारपेठ
धारावी डोळ्याखालून घालवा !"

असे केल्याशिवाय वास्तव जीवनाचा प्रत्यय येणार नाही. दलित कवींनी आपल्या कवितांतून 'सूर्य' या प्रतिमेचा अनेकदा वापर केलेला दिसतो. जसे,

"शतकानुशतके अंधारकोठडीत
डांबलेल्या गुलामांच्या
बेडया तूच तोडल्या
प्रकाशमान जगाच्या वाटा
त्यांना तूच दाखविल्या"

अशा भावना फुले आंबेडकरांच्या कार्यातून प्रेरित होऊन ते व्यक्त करतात किंवा

"फुले - आंबेडकरांच्या उपचाराने
आंधळे, बहिरे, मुके
पाहायला, ऐकायला, गायला लागले
आणि लुळे पांगळे
लढायला, धावायला लागले
तेव्हा संस्कृतीवर राज्य करणारा मनुच
आंधळा, बहिरा, मुका झाला

आणि... तुळा पांगळा होऊन कोसळला

आता फक्त

शिल्लक उरलेत अवशेष

जेव्हा उपचार

घराघरातील औषधे होतील

तेव्हा...

अवशेषही शिल्लक राहणार नाहीत !"

**वामन निंबाळकर** 'गावकुसाबाहेरील कविता' या काव्यसंग्रहातून अस्पृश्यतेचे दुःख व्यक्त करताना दिसतात,

"या मनूच्या देशात म्हणतात

अस्पृश्यता मी जन्मताच सोबत आणली..."

दारिद्र्य, अन्याय, अत्याचार, अपमान यामुळे व्यतीत होऊन ते लिहितात,

"शाळेची पायरी चढलो

तेव्हाही कळले आपली खालची जात

मी बसायचो बाहेर

सारेत बसायचे आत"

अशा परिस्थितीत त्यांना केवळ शब्दांनीच बळ दिले,

"या गावकुसाबाहेरचे वाळलेले चिरडलेले जीवन

विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा..."

शब्दांचे सामर्थ्य घेऊन त्यांची कविता अवतरते,

"शब्दांनीच पेटतात घरे,दारे, देश

आणि माणसेसुद्धा

शब्द विझजवतात आगही

शब्दांनी पेटलेल्या माणसांची"

**त्र्यंबक सपकाळे** 'सुरुंग' या काव्यसंग्रहातील कविता एखाद्या सुरुंगाप्रमाणे स्फोट घेते. 'मुक्ती' या कवितेत ते म्हणतात,

"मागून मिळत नाही

मिळवावे लागते बाहुबळावर

दे ना सोडून

खाली मान घालून

जगण्याची सवय
कुठवर करणार कालहरण?"

अस्पृश्यांच्या वाट्याला कायम अवहेलनाच आली. हे वेदनेने व्याकुळ होऊन म्हणतात,

"हे संस्कृतीपूर्व देशा
माझा नागडेपणा तुला
कधी झाकताच आला नाही."

**लोकनाथ यशवंत** आपल्या कवितांतून 'नवा माणूस' उभा करण्याचे स्वप्न पाहतात,

"परिवर्तनीय जग झपाट्याने बदलताहे
याचा वेग समजावून घे.
धर्म ही संकल्पना केव्हाचीच बाद झाली
धर्मांधतेवर माणसं कापल्या जाऊ लागली
तेव्हाच धर्माचा ऱ्हास सुरू झाला.
मी यावर अनेकदा बोललोही.
पण, तू आहेस की,
भटकून येतेस धर्माच्या अंधाऱ्या बोगद्यातून.
तुला पुन्हा शेवटचे सांगतो.
धर्म झालाय कुचकामी, त्याचे दिवस संपलेत.
आता तरी तुझ्या गर्भाशयाला जप
तिथे अविष्कारतोय नि:स्पृह नवा माणूस,
धर्माच्या पलीकडला संपूर्ण माणूस."

### ३.२.६ नव्वोदोत्तर कालखंडातील दलित कविता:

नव्वदोत्तर कालखंडातील दलित कवितांचा विचार करता ही कविता पहिल्या पिढीच्या कवींची विचारधारा घेऊन पुढे झेप घेत आहे. असे असले तरी ही कविता पहिल्या पिढीच्या कवितेपेक्षा भिन्न आहे. १९९० नंतर जागतिकीकरण आल्यामुळे मानवी जीवनावर त्याचा प्रचंड मोठा परिणाम झाला. मानवी जीवनमूल्ये संपुष्टात आली. केवळ कालखंडाच्या दृष्टिकोनातून नाही, तर वेगळ्या जाणीवा, वेगळ्या प्रवृत्ती घेऊन नव्वदोत्तरी कविता अवतरलेली दिसते.

नामदेव ढसाळ यांचा 'निर्वाणा अगोदरची पीडा' या काव्यसंग्रहातून खाऊच्या धोरणाविरुद्ध आवाज उठवितात. 'या सत्तेत जीव रमत नाही', 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' हे काव्यसंग्रह जागतिकीकरणाशी संबंधित आहेत. ढसाळ म्हणतात,

"वर्ग शत्रूंनी घेरून टाकले आहे आपणाला
आपल्या अवस्थेला कोण जबाबदार?
कोण देणार याची उत्तरे?
आपले काही चुकलंय काय?"

नव्वदनंतर सातत्याने यशवंत मनोहर यांनी काव्य लेखन केले. त्यांचे 'जीवनयान' व 'प्रतीक्षायान' नव्वदनंतर प्रकाशित झाले आहेत.

"पायाखाली सुरुंग आणि माथ्यावर आगीचा ढग ओथंबून आहे;
जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यानो, खूपदा इथे आपला वध झाला आहे."

नव्वदपूर्व कवितेमधील साचलेपणा काढून पुन्हा एकदा नवा प्रवाह देण्याचे काम नव्वदोत्तरी कवितेने केलेले दिसून येते. यात कवी अरुण काळे, महेंद्र भवरे, अविनाश गायकवाड, लोकनाथ यशवंत, प्रज्ञा लोखंडे, धम्मपाल रत्नाकर, केतन पिंपळापुरे या नावांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

'रॉक गार्डन' या कवितेत कवी अरुण काळे प्रश्न उपस्थित करतात,

"इथं कुणीच का करीत नाही
साधकंबाधक समीक्षण ?
इथं कुणीच का करीत नाही
खतपाण्याचे वितरण ?
इथं कुणीच का करीत नाही
दिलदार परीक्षण ?"

असे आत्मपरीक्षण सबंध चळवळीला व कार्यकर्त्यांना करण्यास प्रवृत्त करतात. त्यांच्या 'सायरनचे शहर' या काव्यसंग्रहातून 'मुक्या मारातून शिणग्या उठाव्यात तसे वाचतात सायरन.' शहरीकरणाचे भेदक वास्तव चित्रीत करतात.

**महेंद्र भवरे** 'चिंताक्रांत मूलुखाचे रुंदन' व 'महासत्तेचे पीडादान' या काव्यसंग्रहातून चळवळीतील नेत्यांच्या कृत्यावर भाष्य करताना दिसतात. खाऊजा धोरणामुळे उच्चवर्गीयांचा हितसंबंध जोपासले जात आहेत व शोषित पीडितांचे अधिकाधिक आर्थिक शोषण होत आहे. त्यामुळे दलित चळवळीत केवळ अस्मितेचा प्रश्न न राहता आर्थिक प्रश्नही सोडविणेही गरजेचे आहे असे महेंद्र भवरे यांना वाटते.

**अविनाश गायकवाड** आपल्या 'जंजाळ' व 'अजूनही अस्वस्थ रोहिणी' या दोन काव्यसंग्रहातून सामाजिक दुभंगलेपणाने अस्वस्थ झालेले दिसून येतात.

"गुढतेचं पाणी गढूळ
दिसेना निर्मळ बिंब
अंधाराचं जाळं कुरतडावं कुठवर
राहो शाबूत दातांची हाडं"

**प्रज्ञा लोखंडे** यांच्या 'अंतस्थ', 'उत्कट जीवघेण्या धगीवर' व मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा'

या काव्यसंग्रहातून भारतीय संस्कृतीला आव्हान देव पाहतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून समग्राशी डोळा भिडाविण्याचे धाडस त्यांच्यात निर्माण झाले आहे. त्या म्हणतात,

"A For Ambedkar

मी अंत:र्बाह्य भरून पावते

वाढतच जाते तू ओढलेली रेघ पुढे पुढे…

आणखी पुढे"

असे आंबेडकरी विचार व्यक्त होताना दिसतात.

**धम्मपाल रत्नाकर** 'हॉटेल माझा देश' या काव्यसंग्रहातून सामाजिक समस्यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचारच उपयुक्त ठरू शकतात, याची ग्वाही देतात. हॉटेल कामगारांच्या दारिद्र्याचे, शोषणाचे वास्तवता समोर आणू पाहतात.

खेड्यातून शहरांकडे आल्यानंतरही प्रश्न काही सुटले नाहीत, फक्त प्रश्नांचे स्वरूप बदलले,

"प्रगतीच्या भाकरीमागे

खेड्यातून शहरात आलोत

अस्पृश्यता नाहीशी होण्याच्या मोबदल्यात

आम्ही झोपडपट्ट्या पदरात घेतल्या.

ही जागतिकीकरणाची कुठली गलीच्छ पद्धत?

माणसं उंदरासारखी एकमेकांवरुन धावताहेत?

या संगणकाच्या तथाकथीत प्रगतीत

मी होत्याचा नव्हता झालो.

अन आडवे अंतर उभे ठाकले."

जागतिकीकरणाचे रौद्र स्वरूप आपल्या कवितेतून ते मांडतात.

"जागतिकीकरणात झाले माणसाचे अवमूल्यन

झाला माणूस खूपच स्वस्त… कोथिंबीर महाग, ताक महाग"

भौतिक संस्कृतीपुढे मानवी मूल्यांना महत्त्व राहिले नाही.

'जागतिकीकरण आणि माझी कविता' या काव्यसंग्रहातून उत्तम कांबळे मानवी संवेदना कशा बोथट झाल्या आहेत, यावर भाष्य करतात.

"कॅरीबॅगांमधून

प्रश्न वाहून नेताहेत इथले लोक

दुधाच्या पिशव्यांप्रमाणे, अश्रूंच्या पिशव्याही
फ्रिजमध्ये ठेवताहेत लोक
फ्लॅटमध्ये काळीज ठेवून
रस्त्यावर फिरताहेत इथले लोक."

मानवाने संगणक निर्माण केला परंतु संगणक मानवावर वर्चस्व मिळवू पाहतो आहे,

"कुणी सांगावं
नव्या शतकातला माणूस
संगणकाच्या खांद्यावर
मान ठेवून
शेवटचा श्वास घेईल
दयाळू संगणक
अंतराळात मानवाच्या थडग्या शेजारी
शोकसभा घेतील."

यंत्रयुगाने मानवी जीवनाचा केलेला घात पाहून ते व्यथित होतात.

**केतन पिंपळापुरे** 'डेमोफुन' या काव्यसंग्रहातून जागतिक महासत्ता अविकसित व विकासानशील राष्ट्रांवर कसे दडपण आणते, व स्वतःचा फायदा करून घेते, याचे कवी सूक्ष्म निरीक्षण करतात,

"या शहराच्या पायातल्या दोऱ्या अडकल्या असतात
न्यूयॉर्क - वॉशिंग्टनच्या करंगळीत
आणि तिरंगी टोपीखाली लपलेली भगवी शेंडी
दबली असते.
व्हाईट हाऊस मधल्या खुर्चीच्या पायाखाली
शिरावर लटकत असते डॉलरची हुकूमत."

अमेरिकेने घेतले आर्थिक निर्णय कमकुवत राष्ट्रांना स्वीकारावेच लागतात.

**सुनील अभिमान अवचार** आपल्या कवितेतून मानवी नाती, भावना संपुष्टात आल्याची खंत व्यक्त करतात. समग्र मानवी जीवन जागतिकीकरणाने बदलून टाकले आहे,

"या ग्लोबल वर्तमानात
भावना झाली आहे जाहिरात
आणि
मेंदूचे झाले आहे कम्प्युटर

तत्त्वज्ञान झाले आहे Use &Throw

संस्कृती झाली आहे रखेल

किंवा

एड्स, विस्की / कोक / सिग्निचर पीत आहे."

जागतिकीकरणामुळे विकृती वाढत चालली आहे.

**रोहन नागदिवे -** 'स्थितीचा ओला कोलाज' या काव्यसंग्रहातून रोहन नागदिवे हे 'युथ अँड थ्रो' ची संस्कृती कशी बोकाळत चालली आहे, केवळ वस्तूच नाही तर निरुपयोगी झालेली माणसे अगदी आई वडील देखील वृद्धाश्रमात फेकून दिली जातात, याचे प्रत्ययकारी चित्रण करतात,

"इलेक्ट्रॉनिक्स युगात

डॉट कॉम समाजात

'युज अँड थ्रो'

म्हणजे

सत्यमेव जयते."

जागतिकीकरणाच्या जगाचे द्वार दलितांसाठी वंचितांसाठी आतून रिमोटने बंद केले आहे.

आंबेडकरी चळवळीत प्रत्यक्षपणे काम करणारे कवी आनंद गायकवाड 'इस्तो' या कवितेतून जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांविषयी चिंतन करताना दिसतात,

"कंपनीची दवाई खेडोपाडी बाजारात

सरकारचा जावई कंपनीच्या विचारात

कंपनीने जगाचे एक मोठे खेडे केले

कार पासून बारची

खेड्यामध्ये जत्रा आली

जत्रा मे कचरा बिठाया

प्लास्टिक मे आया पानी

दुनिया भई कंपनी

डॉलर की मनमानी…"

सेझ सारख्या वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांची वाताहत झाली, खाजगी कंपन्यांमुळे सरकारी नोकऱ्या गेल्या. त्यामुळे पुढे ते म्हणतात,

"… कंपनीला सार करू

एकदाचाच वार करू

राजाच्या छातीत होईल धस्सं

खूप झाले आता बस्सं

नमो तस्सं

अन् जस्सं होईल तस्सं!"

**महेंद्र गायकवाड** 'ओलीस ठेवलेली माणसे' या काव्यसंग्रहातून सत्ताधीश राष्ट्रांना भारताला अजूनही कसे गुलाम करायचे आहे, तुमची जाणीव करून देतात,

"महासत्तेला आवडतो

हा देश.....

आदेशानुसार कदमताल करतोय

पिंजऱ्यातील पोपटाची भाषा बोलतोय

धर्मोपदेशानुसार वागतो

पाळीव कुत्र्याप्रमाणे चालतो

स्वाभिमानी संस्कृती

पेप्सी, कोलाच्या शीत बाटलीत बंद झाली."

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आपण गुलाम झाल्याची भावना ते चित्रित करतात.

**राजेंद्र गोणारकर** जागतिकीकरणावर भाष्य करताना आपल्या कवितेत म्हणतात,

"जा ना विसरून चळवळ

बिळवळ

काय पडलंय त्येच्यात

त्यापेक्षा दुकान टाक

प्रमाण चिकनचं

आहेस कुठे येड्या

तुला ज्या मानवाच्या सर्वांकष मुक्तीचं

पडतंय स्वप्न

प्रत्येक क्रांती लांबहे अजून

खूप दूर

नुसताच गटांगळ्या खाऊन मरशील

इतका वेगवान आहे जागतिकीकरणाचा पूर."

असा उपरोधिक सूर त्यांच्या कवितेतून जाणवतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही दलितांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत फरक न पडता परिस्थिती आणखी हालाखीची होताना दिसते. जागतिकीकरणाच्या धोरणामुळे दलित कवितेची व्याप्ती देखील विस्तीर्ण होताना दिसते.

**अविनाश गायकवाड -** जागतिकीकरणाची कविता म्हणजे केवळ संगणकीय शब्दांचाच वापर नाही तर अविनाश गायकवाड आपल्या कवितेतून जागतिकीकरणाचे परिणाम अधोरेखित करतात.'कब्ज का दुश्मन' या कवितेतून म्हणतात,

"कब्ज का दुश्मन
रामबाण
हजम करो हजम करो
दाबेली कळ
फापडा पसर
साजूक
पिझ्झा बर्गर
लिज्जतदार पिकल"

वरील कवितेतून ते कालबाह्य होत जाणारे शब्द व जागतिकीकरणाचे नवे शब्द दोन्हींची पेरणी करतात. जुने शब्द त्यांना जपावेसे वाटतात.

अशा पद्धतीने लोकनाथ यशवंत, उत्तम कांबळे, केतन पिंपळापुरे, प्रज्ञा लोखंडे, सुनील अभिमान अवचार, रोहन नागदिवे, आनंद गायकवाड, धम्मपाल रत्नाकर, महेंद्र गायकवाड, राजेंद्र गोणारकर, अजय खडसे, दीपध्वज कोसोदे, प्रमोद अहिरे, शशिकांत हिंगोणेकर, छाया कोरेगावकर महेंद्र भवरे, प्रदीप जाधव, अशोक इंगळे, सिद्धार्थ भगत, विठ्ठल शिंदे, विनोद बुरबुरे अशा अनेक कवींचा समावेश नव्वदोत्तरी कवितांमध्ये होतो.

## ३.३ दलित आत्मकथने

### ३.३.१ आत्मचरित्र व आत्मकथन यातील भेद:

आपण वरील भागात दलित कवी व कवितांबद्दल माहिती करून घेतली. आता आपण दलित आत्मकथनांबद्दल चर्चा करणार आहोत. मराठी साहित्यात इतर साहित्य प्रकारांप्रमाणेच 'चरित्र व आत्मचरित्रे' हा साहित्यप्रकार देखील तितक्याच ताकदीने हाताळला गेला. 'दलित आत्मकथने' यांनी देखील या साहित्य प्रकारात मोलाची भर घातलेले दिसते. मराठी साहित्यात कधीही न उमटलेले असे जग दलित आत्मकथनांतून व्यक्त झालेले दिसते. दलितांच्या वाट्याला आलेले उपेक्षित जीवन, दुःख, दैन्य, गरिबी, विषमता दलित आत्मकथनांतून प्रतीत होऊ लागली.

'आत्मचरित्र' ही साधारणतः आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात लिहिली जात होती तर आत्मकथने ही खूप काही अनुभवलेले असल्यामुळे आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यातच लिहिली जाऊ लागली. मराठी साहित्यातील आत्मचरित्र लिहिण्याचे निकष दलित

आत्मकथनांनी मोडून काढले. या आत्मकथनातून 'मी' सोबत 'समाज' देखील प्रतीत होतो. दलित आत्मकथनातील लेखकाला केवळ 'स्व' विषयीचे अनुभव कथन करायचे नसते तर त्याच्या समाजातील दुःख, दैन्य, यातनांचे दर्शन समाजाला घडवून द्यायचे असते. दलित आत्मकथनांची वैशिष्ट्ये नोंदविताना डॉ. आरती कुलकर्णी लिहितात, "दलितांची आत्मकथने हे आत्मपर लेखन असले, तरी रूढ आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराहून त्यांचे वेगळेपण आता सर्वांनी मान्य केले आहे. आत्मचरित्रात असलेल्या व्यक्तीत्त्वाचा नव्याने वेध घेतला जातो. या लेखनाचे आत्मचरित्राहून निराळेपण दर्शविण्यासाठी 'आत्मकथा', 'आत्मनिवेदन', 'आत्मकहाणी' असे शब्द वापरले गेलेत. १९८७ मध्ये या लेखनाचे साहित्यरूप वेगळे आहे, हे लक्षात घेऊन त्यासाठी 'स्व कथन' हा शब्द स्वीकारून मी ग्रंथलेखन केले. त्यामध्ये या साहित्यरूपाची वेगळी आयडेंटिटी लक्षात घ्यावी आणि 'आत्मचरित्राचा' एक नवा उन्मेष, म्हणून त्याकडे पाहिले जावे, हा माझा हेतू होता." (डॉ. आरती कुलकर्णी, दलित आत्मकथेच्या मूल्यमापनाचा विचार, लोकानुकम्पा ए. मे. जून 2001, प्रेरणा विशेषांक)

"आत्मकथने आणि आत्मचरित्र यांमधून एक संपूर्ण माणूस त्याच्याशी संबंधित असलेल्या अनुभवांच्या मानव - समूहांसोबत उभा राहताना दिसतो. त्याचे हे उभे राहणे इतरांना आदर्शवत किंवा प्रेरणादायी ठरू शकते; कारण त्याच्या आयुष्यातील सुख - दुःखे, संघर्ष, वाटचाल ही वास्तवदर्शी पद्धतीने वाचकांना दिशा सूचनच करीत असते. दलित आत्मकथने ही आत्मचरित्राच्या रूपबंधाची प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेली नाही. ते साहित्याचे उत्क्रांत रूपही मानले पाहिजे. दलित आत्मकथनांनी दलित मुक्तीसाठी सातत्य ठेवलेले दिसते. त्यांच्यामधून आत्मदर्शन - समाजदर्शन - आत्मशोध - समाजशोध - आत्मसंघर्ष - समाजसंघर्ष, असे सृजनशील द्वंद्व निर्माण होताना दिसते. आत्मकथनांचा विचार करताना विशुद्ध जीवनानुभवाच्या कलात्मक पातळीवरचा आविष्कार ही महत्त्वाचा मानला जातो. कलात्मक मूल्यांची भाषा, जीवनशैली, लेखनशैली यांचाही विचार केला जातो. बहुतांश आत्मकथाकारांनी मात्र निव्वळ वास्तवदर्शी जीवन केंद्रवर्ती मांडलेले आहे. क्वचित दलित आत्मकथनांमधून जीवन - दर्शनाच्या सोबत कलात्मकता, भाषा, रचना, शैली यांचाही प्रभावी वापर केलेला दिसून येतो. (डॉ. म. सू. पगारे, दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, प्र. आ. ११ डिसेंबर २००५ पृ. १२७)

साधारणपणे आत्मचरित्रामध्ये आत्मचरित्र लेखकाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा कालखंड चित्रित झालेला असतो. आपल्या आयुष्यातील वेगवेगळ्या टप्प्यांचे दर्शन तो घडवितो. त्याच्या लेखनात त्या अनुषंगाने अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संदर्भ येत जातात. बहुतांश आत्मचरित्रातून लेखकाच्या जीवनाचे सूत्र नमूद होत असते. आत्मचरित्रात ते त्याला आयुष्याच्या शेवटी जाणवलेले असते. आत्मचरित्रात केवळ व्यक्तिगत जीवनाचा आलेख किंवा आठवणीच नसतात. काही आत्मचरित्र वाचनीय होण्यासाठी काही प्रसंग नाट्यमयरीत्या सांगितले जातात परंतु आत्मचरित्र केवळ मनोरंजनासाठी नाहीत, त्यामागचा हेतू भिन्न आहे. आपल्या आयुष्याचा अर्थ, वेग, हेतू याचा शोध आत्मचरित्रकार त्याच्या आत्मचरित्रात घेत असतो. आपला जन्म, बालपण, कुटुंब, शिक्षण, अर्थार्जन, गाव या सगळ्या पातळीवर त्याचे जगणे अधोरेखित होत जाते. आत्मचरित्रात 'मी' नायक म्हणून अवतरत असला तरी, त्यातून समूहाचे, समाजाचे दर्शन चित्रित होत असते किंबहुना तसे ते व्हावे, हे आत्मचरित्रात अपेक्षित असते. आपल्या

समाजाचे प्रतिनिधित्व तो आत्मचरित्रातून करीत असतो. डॉ. आनंद यादव यांच्या मते, "आत्मप्रतिमेच्या जाणिवेतून आत्मपूजा, आत्मप्रौढी आत्मगौरव, आत्म समर्थन यासारखे दोष आत्मचरित्रात अवतरण्याचा धोका असतो. हा धोका अतिशय जागरूकपणे टाळण्याची दक्षता घ्यावी लागते. यासाठी आत्मप्रतिमेचे, ती ज्या कार्यातून उभी राहिली, त्या कार्याचे मूल्यमापन परीक्षण, सखोल निरीक्षण करण्याची आवश्यकता असते. आत्मप्रतिमा आकाराला आणण्यास वर सांगितल्याप्रमाणे अनेकांनी, अनेक मार्गांनी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात हातभार लावलेला असतो. ज्याचे त्याचे श्रेय ज्याचे त्याला देत जाण्याने आत्मप्रौढी आत्मगौरव कमी होऊ शकतो. आपण एखादी आगळीक, एखादी चूक केलेली असेल, तर त्याची साधार कबुली देत जाण्याने, तसेच त्या प्रमाणाला आपल्या स्वतःपेक्षा इतरच कसे जबाबदार आहेत, हे अभिनिवेशाने, वकिली डावपेचाने न सांगण्याने आत्म - समर्थनाला आळा बसू शकतो. एवढेच काय, तर सरळ आणि प्रांजळपणाने कथन केल्याने आत्मसमर्थनाला, आत्मप्रौढीला आळा बसू शकतो. आत्मचरित्रात निवडक, महत्त्वाच्या आणि अर्थपूर्ण घटनांनाच स्थान असते. 'मी' च्या जीवनातील एखादे महत्त्वाचे सूत्र विशद करण्यासाठीच या निवडक, महत्त्वाच्या घटना अवतरत असतात. उलट आपण आपल्या जीवनातील मूळ कथनसूत्रापासून दूर नेणाऱ्या; पण अहंकार गोंजारणाऱ्या घटना - घडामोडी चवीने, विस्ताराने सांगू धजतो. पुष्कळदा किरकोळ अनुभवात रममाण होऊन जातो. मागचे - पुढचे सूत्र - संदर्भ विसरून एखाद्या घटनेत काव्यात्म वा क्रीडावृत्तीने रमतो. या सर्वातून आत्मप्रतिमेची पूजा, उपासना सुरू होते आणि आत्मचरित्र दोषांनी डागाळू लागते. सारांश, आत्मप्रतिमेच्या जाणिवेच्या प्रेरणेतून अनेक दोष अनुषंगाने निर्माण होण्याची शक्यता असते. त्यांच्यापासून सावध राहूनच आत्मचरित्राचे लेखन व्हावे, अशी अपेक्षा असते. आत्मचरित्रात आत्मप्रतिमा ही येणारच; पण तिचे पर्यावसान आत्मपूजेत होऊ न देता आत्म - मूल्यमापनात, भोवतालच्या परिस्थितीशी संबंधित आत्म - प्रतिमेचे वस्तुनिष्ठ स्वरूप विशद करण्यात व्हावे लागते. हे ओळखता आले, तरच आत्मचरित्राचे लेखन यशस्वी होऊ शकते." (आनंद यादव, आत्मचरित्र मीमांसा, पृ. १७, १८) आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर लेखकाला त्याच्या जीवनाचा संपूर्ण पटच डोळ्यासमोर दिसत असतो. अनेक अनुभव गाठीशी आलेले असतात. या अनुभवांचा त्रयस्थ दृष्टिकोनातून विचार करण्याचे सामर्थ्य, मानवी आशा - आकांक्षा, मानवी मूल्ये, कृष्णा, भाव याविषयीची सजगता आलेली असते. म्हणजेच आत्मचरित्रात केवळ जीवनातील घटना - प्रसंगच नसून आत्मशोध ही घेतलेला असतो. रोजच्या धकाधकीच्या जीवनात ज्या गोष्टींचा त्याला शोध घेता आला नाही तो त्याला, आयुष्याला स्थैर्य मिळाल्यावर घेता येणे शक्य होते. हा आत्मशोध घेता येणे शक्य झाले की आत्मचरित्राचा उद्देश सफल होतो.

स्वतःविषयीचे कुतूहल, जिज्ञासा भोवतालचा परिसर, रितीभाती, कालखंड, सामाजिक नितीनियम याविषयी आत्मचरित्रातल्या लेखकाला उत्सुकता असते. आपल्या विचार मंथनातून तो आपल्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागतो. तो स्वतःचा शोध असतो. हा शोध तो त्याची संवेदनशीलता, सद्सद्विवेक, बुद्धिमत्ता, भावना, चिंतन, मंथन करून घेत असतो.

आत्मचरित्र व आत्मकथनांतून अनेकदा बोलीभाषा अवतरलेली दिसते. लेखकाला जे घटना प्रसंग सांगावयाचे असतात ते त्याच्या बोलीभाषेतून वेगवेगळ्या संवेदनांसह त्याला समर्पकरीत्या मांडता येतात. त्यामुळे आत्मकथनातून प्रमाणभाषेबरोबरच बोलीभाषेचाही

समावेश झालेला दिसून येतो. दलित आत्मकथनांमधून वेगवेगळ्या बोलींचा वापर अनेक दलित आत्मकथनकारांनी जाणीवपूर्वक केलेला दिसतो. याविषयी डॉ. संपतराव गायकवाड म्हणतात, “दलित आत्मकथनातील भाषिक समाज हे भारतीय समाज व्यवस्थेच्या आकृतीबंधात घडले गेलेले समाज आहेत. तेव्हा या भाषिक समाजाच्या भाषा - वापराची सामाजिक प्रमाणके ही या व्यवस्थेच्या आकृतीबंधाशी निगडित झालेली प्रमाणके आहेत. त्यानुसारच या भाषिक समाजाचा भाषा - व्यवहार होताना दिसतो. तसे पाहिले, तर कोणत्याही भाषिक समाजात त्या त्या समाजाच्या आकृतीबंधानुसारच त्या त्या भाषिक समाजांच्या सामाजिक अस्तित्वाच्या व संबंधाच्या पातळ्या निर्माण झालेल्या असतात. त्यातूनच जीवनाविषयी, आचार - विचारांविषयी, काही नियम वा प्रमाणके (Norms) तयार होत जातात. या नियमांच्या किंवा प्रमाणाच्या अधीन राहूनच तो तो भाषिक समाज आपला वर्तन - व्यवहार पार पाडत असतो. प्रमाणके ही त्या त्या भाषिक समाजाच्या वर्तनविषयक अपेक्षांची चौकट असते. ही चौकट त्या त्या भाषिक समाजाच्या सामाजिक संरचनेबरोबरच निर्माण झालेली असते. या प्रमाणकांमुळे त्या त्या भाषिक समाजातील व्यक्तींचे वर्तन नियंत्रित होत जाते. त्यातूनच समाजमान्य असे वर्तन - प्रकार निर्माण होतात.” (गायकवाड संपतराव, दलित आत्मकथनांतील भाषिक समाज व भाषा व्यवहार, अस्मितादर्श पृ. ११, वार्षिक विशेषांक, २००२)

### ३.३.२ मराठी साहित्यातील काही दलित आत्मकथने:

१९६० जो दलित साहित्याचा प्रवाह निर्माण झाला, त्यात ‘दलित आत्मकथने’ हा देखील एक अत्यंत प्रभावी ठरलेला साहित्यप्रकार होय. या आत्मकथनांमधील वास्तवचित्रण, प्रस्थापित समाज परिघाबाहेरचे चित्रण, वेदनेने आणि उपेक्षेने भरलेले दलित जीवन आत्मकथनातून प्रतीत होते. मराठी साहित्याला दलित आत्मकथनांतून चित्रित झालेले हे उपेक्षितांचे जीवन अतिशय नवखे व वास्तव असल्यामुळे मराठी साहित्यात ते प्रभावी ठरले. या दृष्टीने अनेक दलित आत्मकथनकार व त्यांची आत्मकथने यांचा उल्लेख करून काही आत्मकथनांवर चर्चा करता येईल. ‘बलुतं’ - दया पवार, ‘आठवणींचे पक्षी’ - प्र. इ. सोनकांबळे, ‘उपरा’ - लक्ष्मण माने, ‘मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे’ - माधव कोंडविलकर, ‘उचल्या’ - लक्ष्मण गायकवाड, ‘तराळ-अंतराळ’ - शंकरराव खरात, ‘अक्करमाशी’ - शरणकुमार लिंबाळे, ‘गावकी’ - रुस्तुम अचलखांब, ‘अंत:स्फोट’ - कुमुद पावडे, ‘माझ्या जल्माची चित्तरकथा’ - शांताबाई कांबळे, ‘मला उध्वस्त व्हायचंय’ - मल्लिका अमर शेख, ‘जिण आमुचं’ - बेबी कांबळे, ‘टाच’ - प्रल्हाद चेंदवणकर, ‘आमचा बा आणि आम्ही’ - नरेंद्र जाधव, ‘कोल्हाट्याचं पोर’ - किशोर शांताबाई काळे, ‘गबाळ’ - दादासाहेब मल्हारी मोरे, ‘अस्मादिक’ - म. सु. पगारे, ‘सोनजातक’ - रतनलाल सोनग्रा, ‘फांजर’ - नानासाहेब झोडगे, ‘काट्यावरची पोटं’ उत्तम बंडू तुपे, ‘बेरड’ - भीमराव गस्ती, ‘जातीला जात वैरी’ - ना. म. शिंदे, ‘ख्रिस्ती महार’ - बाळासाहेब गायकवाड, ‘मरणकळा’ - जनाबाई गिऱ्हे, ‘रात्रंदिन आम्हां’ - शांताबाई दाणी, ‘मिटलेली कवाडे’ - मुक्ता सर्वगोड, ‘कळा त्या काळच्या’ - माधव कोंडविलकर, ‘ मुस्लिम महार’ - इब्राहीम खान, ‘वस्ती’ - वसंत मून, ‘आदोर’ - नाजुबाई गावीत, ‘ मी डॉक्टर झालोय’ - किशोर शांताबाई काळे, ‘बिराड’ - अशोक पवार, ‘तीन भिंती’ - वैजनाथ कळसे तसेच ‘बारामाशी’, ‘राणीमाशी’ यांचा देखील आत्मकथनात समावेश होतो. प्रा. केशव मेश्राम यांनी लिहिलेल्या ‘हकीगत’ आणि ‘जटायू’ या कादंबऱ्यांना देखील

आत्मकथन म्हणता येईल. यातील काही आत्मकथनांचा आपण परिचय करून घेणार आहोत.

**दगडू मारुती पवार उर्फ दया पवार -**

१९७८ साली दगडू मारुती पवार यांचे 'बलुतं' हे आत्मकथन प्रकाशित झाले. याआधी आपल्या 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहातून दया पवार यांचे अनुभव कथन चित्रीत झालेले दिसते. दया पवार म्हणतात, "माझ्या कोंडवाड्यातील कविता बरेच अनुभव आहेत, असे नंतर मला आढळून आले त्यामधूनच 'बलुतं' सारखं आत्मचरित्र लिहिण्याची मला कल्पना सुचली. 'बलुतं' या आत्मकथनांमधून चाळीस वर्षांचा इतिहास मांडला गेलेला आहे.... माझी मानसिकता दुभंगलेली, संतांसारखी दोन दिशांना फेकलेली..." (गो. म. कुलकर्णी, दया पवारांची मुलाखत, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, दीपावली विशेषांक, पृ. ८०) 'कोंडवाडा' या काव्यसंग्रह नंतर दया पवार यांना 'बलुतं' लिहिण्याची कल्पना सुचली. त्यांच्या आत्मकथनातून त्यांचे खेड्यातील बालपण आणि शहरात व्यतीत केलेला कालखंड, वाट्याला आले जाते त्याचे अनुभव चित्रेत झालेले दिसतात. यासंदर्भात बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, "अनेक दरिद्री, दुःखी, उद्ध्वस्त अशा माणसांची चित्रे 'बलुतं' मध्ये येतात. किंबहुना, असेही म्हणता येईल की, व्यक्तींच्या द्वारेच जीवनाकडे जाण्याची दया पवारांची पद्धत असून अशा अनेक व्यक्तीचित्रांमधूनच 'बलुतं' मधील जीवनदर्शन घडवले जाते. या व्यक्तींची चित्रे रेखाटताना पवारांचे हे प्रेम स्वाभाविकपणे प्रकट झालेले दिसते. या व्यक्तींच्या काही वर्तनांचे पवार अप्रत्यक्षपणे समर्थनही करताहेत, असे जे पुष्कळदा वाचकांना वाटते, तेही पवारांना या व्यक्तींविषयी वाटणाऱ्या प्रेमापोटी झालेल्या लेखनामुळेच होय. 'दादा', 'आई', 'तात्या', 'सदाशिव', 'जावजीबुवा', 'हरी' आणि अशी कितीतरी माणसे 'बलुतं' मधून उभी राहतात आणि आपल्याबरोबरच आपला समाजही उभा करतात. त्यांच्या व्यक्तीचित्रांतील अल्प प्रमाणातील उदात्तता, प्रेमळपणा, व्रात्यपणा अशा अनेक गुण - दोषपूर्ण विशेषांच्या चित्रांमुळे 'बलुतं' ला एक रोचक वाचनीयताही प्राप्त झाली आहे. पवारांची अनेक दुःखे अनुभवत असतानाही शाबूत राहिलेली मिश्किल, खोडकर मनोवृत्ती पुष्कळदा या व्यक्तींच्या खिल्ल्या उडवते. त्यातूनही 'बलुतं' ला एक रोचक परिमाण प्राप्त होते." (बाळकृष्ण कवठेकर, दलित साहित्य : एक आकलन, पृ. ८३, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, जानेवारी १९८१) 'बलुतं' मध्ये दया पवार अशा पद्धतीने घटना - प्रसंग चित्रित करतात, की ती वाचनीय ठरतातच परंतु साहित्यिक गुणवत्ता देखील अधोरेखित होते. 'बलुतं' मधील अनेक घटना रोमांचक वाटतात. दया पवार ज्या महार समाजात जन्माला आले त्या समाजाचे चित्रण ते आपल्या आत्मकथनातून करतात. त्यांचे अकोला तालुका येथील धामणगाव, तेथील महारवाडा, चावडी, मोकळे मैदान, खेळ याचे चित्र ते डोळ्यासमोर उभे करतात. त्या वेळचे खेड्यातील लोकांना असणारे मुंबईचे आकर्षण, काम धंद्यासाठी त्यांचे मुंबईला जाणे, अर्थार्जन करून घरी पैसा कमवून आणणे, परत मुंबईला जाताना मात्र त्यांच्याकडे जाण्याइतके देखील पैसे शिल्लक राहत नसे. अशावेळी घरातला एखादा दागिना गहाण ठेवावा लागे. मुंबईला न गेलेली उरलेली माणसे गावात गावकीची कामे करीत. गावातील 'सारा' तालुक्याला नेऊन पोहोचवणे, मोठ्या जमीनदाराच्या घोड्यापुढे धावणे, जनावरांची काळजी घेणे, चारा खाऊ घालणे, गावात दवंडी देणे, कोणाचा मृत्यू झाल्यास गावोगावी निरोप पोहोचवणे, मेलेली जनावरे गावाबाहेर ओढून येणे, गावात कोणाची लाकडे फोडून देणे, गावची यात्रा वाजवणे इत्यादी कामे करण्याच्या मोबदल्यात

महारांना थोडेसे धान्य किंवा भाकरीचा तुकडा मिळे. त्याला 'बलुतं' असे म्हणत. शिळ्या भाकरी मागण्यासाठी महार स्त्रिया व पुरुष गावात घरोघरी जायचे त्याला 'येसकरपाळी' असे म्हणायचे. तसेच मेलेले जनावर गावाबाहेर ओढून नेले की त्या जनावराचे मांस महारांमध्ये वाटले जायचे. गावात एखादे जनावर मेल्यास महारांना मांस खायला मिळेल, या विचाराने आनंद व्हायचा. अनेकदा जनावराच्या वाटणीवरून भांडे व्हायची. गावात महारांना उपेक्षित जीवनच वाट्याला आले होते. पाण्यासाठी सार्वजनिक विहिरीचा वापर करता येत नव्हता, महार - मांगांसाठी चहाचा वेगळा कप ठेवला जाई, या साऱ्यांचे ज्वलंत चित्रण तसेच महार समाजात रुजलेली अंधश्रद्धा 'बलुतं' मधून चित्रित झालेली दिसते. खेड्यातील महारांपेक्षा शहरातील महारांचे जगणे मात्र भिन्न होते. ते लिहितात, "छोटी छोटी बेटं करून महार मंडळी राहत. सारी घाटावरची संगमनेर, अकोला, जुन्नरकरांची. आजूबाजूला ख्रिश्चन, मुस्लिमांची वस्ती. महार मंडळींची राहण्याची व्यवस्था खूपच निकृष्ट. एका - एका खुराड्यात दोन किंवा तीन पेटा भाडोत्री. मध्ये लाकडी पेटीचं पार्टिशन. या लाकडी पेटीत सारा संसार. रात्रीच्या वेळी वलाण्यावर जुनेराच्या आसऱ्यानं तात्पुरत्या भिंती उभारल्या जायच्या. पुरुष लोक हमाली करीत." दलित स्त्रियांचे जीवन तर अतिशय हालाखीचे होते. स्त्रियांकडून सारी कामे करून घेतली जायची. सासुरवाशीनीला कोंड्याच्या भाकरी खायला देत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार जलशांच्या माध्यमातून खेडेपाड्यांपर्यंत कसा पोहोचत होता, याचे वर्णन देखील 'बलुतं' मधून येते. याचे चित्रण करताना ते म्हणतात, "लौकिक दृष्टीने पाहिलं, तर मी सुखी माणसाचा सदरा घातलाय, असंच कुणालाही वाटेल. महिना ७०० - ८०० रुपये पदरात पडतील, अशी सरकारी खात्यात नोकरी आहे - तीही ऑडिटरची. माय - बाप सरकारनं भाड्याचं का होईना सबबर्नमध्ये घर दिलंय. सुशिक्षित बायको आहे. दोन मुली शिकताहेत. आपलं नाव पुढे चालवावं; म्हणून अंगाखांद्यावर ५ - ६ वर्षांचा मुलगा खेळतोय. मोठ्या मुलीचं लग्न झालंय. मागच्याच वर्षी तिला मुलगा झालाय. म्हणजे चाळिशीत मी आजोबा झालोय. एकंदरीत वेल मांडवाला चाललीय." दया पवार आपल्या 'बलुतं' या आत्मकथनातून आपल्या स्वतःच्या लेखनशैलीतून तत्कालीन दलित समाजाचा चित्रण करताना दिसतात.

**प्र. ई. सोनकांबळे:**

२७ जानेवारी १९७९ मध्ये प्रकाशित झालेले 'आठवणींचे पक्षी' हे प्र. ई . सोनकांबळे यांचे आत्मकथन अतिशय गाजले. वेदनेची ठसठसणारी जाणीव त्यांच्या आत्मकथनातून दिसून येते. महार मांग समाजाचे कष्टमय व खडतर जीवन त्यांच्या आत्मकथनात दिसून येते. एका प्रसंगात महार आणि मांगांची मेलेले जनावर ओढून आणून त्या मांसाची वाटणी, भांडणे, कुत्र्याने मांस तोंडात ओढून नेणे, मेलेले मांस खाल्ले म्हणून माणसांचा होणारा मृत्यू, या साऱ्यांचे जिवंत चित्रण ते करतात.

उस्मानाबाद जिल्ह्यामधील सुल्लाळी या छोट्याशा गावी जन्म झालेल्या प्र. ई. सोनकांबळे यांच्या आई - वडिलांचे लहानपणीचे निधन झाले. ते आपल्या विवाहित बहिणीच्या घरी लहानचे मोठे होतात. लहानपणापासून कष्ट करीत जीवन व्यतीत करतात. परीक्षेला जाण्याआधी संडासाच्या मागे जाऊन कडक झालेली चतकोर भाकर खाण्याचा प्रसंग,

महारोगी म्हातारीच्या ताटेत जेवण्याचा प्रसंग आठवून ते व्यतीत होतात. फाटके कपडे, पायाला कधी चप्पल नाही, होणारा सततचा अपमान, उपेक्षा, दारिद्र्य या साऱ्यांशी चार हात करत ते इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होतात परंतु खूप वर्षांनी जेव्हा ते त्यांच्या गावी जातात तेव्हा देखील त्यांना जातीयतेचा तीव्र अनुभव येतो आणि त्यांचे मन खिन्न होते.

**माधव कोंडविलकर:**

'मुक्काम पोस् ट: देवाचे गोठणे' हे माधव कोंडविलकर यांचे आत्मकथन 1979 मध्ये प्रकाशित झाले. हे आत्मकथन 'डायरी' या 'फॉर्म' मध्ये लिहिले गेलेले दिसते. लेखकाच्या आयुष्याचा आठ वर्षांचा कालपट आपणास यातून प्रतीत होतो. या आत्मकथनातून कोकणातील चांभारांचे सामाजिक चित्रण दिसून येते. कोकणातील जातीच्या श्रेणी प्रमाणे असलेली व्यक्तीची रचना, कोकणातील रूढी, परंपरा अंधश्रद्धा, चांभार समाजातील दारूचे व्यसन यांचे चित्रण करतानाच ते 'स्व' चा ही शोध घेत जातात. ते म्हणतात, "आपण भोगलेलं नि अनुभवलेलं जीवन शब्दांत उतरवण्याचा प्रयत्न करावा म्हणून प्रथम कविता करू लागलो, कथा लिहू लागलो; पण त्यात समाधान होईना. माझं अनुभव - विश्व कितीतरी मोठं होतं. त्याला आत्मनिवेदनाशिवाय दुसरं माध्यम नव्हतं." (माधव कोंडविलकर, साहित्याचे माझ्या जीवनातील स्थान, पुस्तक पंढरी, पृ. ८, १९८०) अशी स्वतः कबुली माधव कोंडविलकर देतात. घरात लग्नकार्य असेल, कोणी पाहुणा घरी आला असेल, घरात कोणाचा मृत्यू झाला असेल अशा कोणत्याही प्रसंगी चांभार समाजात दारू पाजण्याची पद्धत होती. इतकेच काय तर बाळंत पण करणारी सुईन व बाळंतिणीलाही बाळंतपणाच्या वेळी दारू पाजली जाई, दारू पिऊन झिंगणारे, भांडणे - मारामाऱ्या करणारे चित्रण पाहिल्यामुळे लेखकाला वाटते की, चांभार समाजाचे वाताहत व्हायला, प्रगती खुंटायला 'दारू' देखील कारणीभूत आहे. चांभार समाजातील 'अंधश्रद्धेवर' हे ते भाष्य करतात. देवीला नैवेद्य दाखविणे व इतर अनिष्ट प्रथा परंपरा यात पैसा खर्च होत असल्यामुळे चांभार समाजाची अर्थार्जनात कुचंबना होताना लेखक पाहतात. चांभार समाजाची व स्वतःची भुकेची जाणीव व्यक्त करताना ते म्हणतात, "कसलेही अन्न खायची मला लहानपणापासून सवय लागली होती. कोंड्याची भाकरी,  शिळापाका भात, सुकटाचं सार, इतकच नव्हे; तर गावातून जमवून आणलेल्या शिळ्या - पाक्या भाकरी, काहीही चालत होतं.  पुढ्यात पडेल, ते खायचं; चांगलं - वाईट म्हणायचं नाही.  पोट भरलं नाही म्हणून कुथायचं नाही, अशी सवय होती." (माधव कोंडविलकर, आत्मकथन मुक्काम पोस्ट:  देवाचे गोठणे, पृ. १५९)

कोंडविलकर यांची कौटुंबिक पार्श्वभूमी म्हणजे वयोवृद्ध वडील, अशिक्षित बहिणी, फाटक्या लुगड्यातील आई, फक्त कोंडविलकर शाळा शिकले, वडिलांच्या दारुमुळे आई - वडिलांत होणारी सततची भांडणे होत. आईच्या मते, "मी म्हणू ह्येच्या घरात दिवस काढलं. दुसरी - बिसरी आस्ती, तर घरास आग लावून कधीच गेली आस्ती ! लगन झाल्यापासून ह्या घरात मी हाल काढताय. कधी आंगावर चांगला कपडा मिल्ला नाय, का कोणाचा सुकाचा सब्द नाय! हाता मेल्या म्हणू त्येची कुटालकी करूची नाय - पण रांडा नंदानी मात्र रडरड रडवलानी हाय ! त्येनी नाय नाय सांगायचा आणि मग ह्येनं मार मार मारूचा ! हा तरी का हलका नाय हाय ! हळद न्हाल्या पास्ना ह्येनं माजं कसला ता सुक देला नाय !"

'मुक्काम पोस्ट: देवाचे गोठणे' या आत्मकथनातील भाषाशैलीवर बोलताना डॉ. वसंत डोळस म्हणतात, "या डायरीतील लेखन नागर व राजापुरी भाषेत आपणापुढे आलेले आहे. राजापूरच्या परिसरात महार, चांभार, कुणबी इत्यादी जातींमध्ये बोलली जाणारी राजापुरी बोली लेखकाने वापरली आहे." (वसंत डोळस, दलित साहित्य : प्रेरणा व स्वरूप, दिलीप राज प्रकाशन, ३०डिसेंबर १९९३, पृ. १०४,१०५) त्या प्रदेशातील बोली वापरल्यामुळे आत्मकथनातील घटना प्रसंग अधिक जिवंत वाटतात. दलित साहित्यावर आक्रस्ताळेपणाचा जो आरोप केला जातो, तो माधव कोंडविलकर यांच्या आत्मकथनात अपवाद ठरतो. वाट्याला आलेले दुःख, दैन्य, कुचंबना, वेदना यामुळे ते अक्रताळेपणा करताना दिसत नाही. या आत्मकथनातील माणसे वेदनेने, दारिद्र्याने, दुःखाने, भुकेने ग्रासलेली, गांजलेली आहेत. या आत्मकथनाच्या लेखनाच्या वैशिष्ट्याबद्दल बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, "जीवन - दर्शनाला डायरी लिखाणाची पद्धतच पोषक ठरलेली आहे; त्यामुळे जीवनाच्या भिन्न स्तरांचा स्तर भेद कायम राहूनही त्यांचे अकृत्रिम प्रकटीकरण झाले आहे. जे घडले; ते तसेच आणि जे ज्या भाषेत बोलले गेले, ते त्याच भाषेत येथे नोंदविले गेले आहे. त्यामुळे विचार, व्यक्तीमत्त्व यांच्या बाबतीत कसलीही पोच न घेता स्वाभाविकपणे प्रकट झालेले आहे." (कवठेकर बाळकृष्ण, दलित साहित्य: एक आकलन, पृ. ८६, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, जानेवारी १९८१)

डायरी लेखन पद्धतीचा अवलंब केल्यामुळे या आत्मकथनाला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहेच त्यातील भाषाशैलीमुळे आत्मकथन वास्तव झाले आहे.

**शंकरराव खरात:**

१९८१ मध्ये शंकरराव खरात यांचे 'तराळ - अंतराळ' हे आत्मकथन प्रकाशित झाले. शंकरराव खरात यांनी याआधी दलित कथा लेखन केलेले आहे. महार जातीत जन्माला आलेले खरात यांचे काम सांगली जिल्ह्यातील आटपाडी हे होय. आपल्या आत्मकथनातून ते केवळ आत्मशोधक घेत नाहीत तर आपल्या निरीक्षण शक्तीतून दलित समाजाचेही चित्रण करतात.

'तराळ - अंतराळ' या आत्मकथनात लेखकाचे बालपण ते वयाच्या साठाव्या वर्षापर्यंतचा प्रवास चित्रीत झाला आहे. त्यांचा शैक्षणिक प्रवास, वकीली व्यवसाय यावर विस्तृत प्रकाश ते टाकतात.

त्यांच्या गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर्तमानपत्राचे वाचन होत असल्यामुळे त्यांच्यावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडला. ते म्हणतात, "मुंबईवाल्यांनी 'जनता' पत्रातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार माझ्या गावी आणले होते. भावकीच्या या बैठकीपासून चावडीत बाबासाहेबांच्या कार्यावर - विचारांवर तक्क्यात रोज काही ना काही बोलणं गड्या - गड्यात चालत होतं. सुट्टीच्या दिवशी शनिवार व रविवारी दोन दिवस रात्री मी भावकीच्या कळत्या गड्यांपुढे 'जनता'पत्र वाचत होतो. डॉक्टर बाबासाहेबांच्या भाषणातील शब्द न् शब्द धार्मिक ग्रंथातील शब्दांप्रमाणे कान देऊन, मन लावून भावकीतले घडी ऐकत होते. महार वाड्यातील तरण्या गड्यांची, तरुण युवकांची मने बाबासाहेबांच्या नव्या विचाराने भारून जात होती. त्यांची मन त्या क्रांतिकारक विचारानं भेटत होती."

'तराळ - अंतराळ' या आत्मकथनातून अनेक अस्पृश्य जातींचा उल्लेख दिसून येतो. 'तू धेड का बच्चा', 'माझ्या रोट्या बाटतील की', 'ये, महारड्या, आम्हाला पाठवतोस का?', 'आम्हाला विटाळ होईल' अशी जातीभेद दर्शविणारे अनेक वाक्ये लेखकाला ऐकावे लागतात. कुटुंब, समाज यांच्यातील आंतर - संबंध यांचे हे चित्रण 'तराळ - अंतराळ' मध्ये दिसते. शंकरराव खरातांसारखा एका महाराच्या, येसकराच्या मुलाचा शैक्षणिक प्रवास, वाट्याला आलेले अस्पृश्य त्याच्या चटके, वकिलीचा व्यवसाय ते मराठवाडा विद्यापीठाचा कुलगुरू हा प्रवास तराळा कडून अंतराळाकडे नेणारा आहे. म्हणून 'तराळ - अंतराळ' हे आत्मकथनाचे शीर्षक समर्पक वाटते.

**लक्ष्मण माने:**

लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनातून महार, मांग, रामोशी, कैकाडी समाजाच्या वाट्याला आलेली उपेक्षा मैत्रीत झालेले दिसते. लक्ष्मण माने म्हणतात, "ते जगलो, जे भोगलं, अनुभवलं, पाहिलं, ते ते तसंच लिहित गेलो. कुणावर दोषारोप ठेवावा, हा हेतू कधीच नव्हता. अनेकदा मोह होऊनही स्वतःला सावरत गेलो... या पुस्तकानं भटक्या - विमुक्त जाती - जमातींच्या प्रश्नांवर सामाजिक मंथन सुरू झालं, भटक्यांचे प्रश्न सामाजिक चर्चेचा विषय झाला आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या मंडळींच्या कामाला चालना मिळाली, तर पुस्तक लिहिण्याचे श्रम सार्थकी लागले, असे मी समजीन. पिढ्यान् पिढ्या बिऱ्हाडं पाठीवर घेऊन जिणं जगणाऱ्या मंडळींच्या वेदना समाज समजावून घेऊ शकला, तरी खूप झालं." (माने लक्ष्मण, उपरा, या मुक्कामावरून, १९८०, प्र. आ.) कणगी आणि झाप गोळा करण्यासाठी कैकाडी समाजाला गावोगावी सातत्याने भटकंती करावी लागते. हेच त्यांचे अर्थार्जनाचे साधन आहे. पोरा - बाळांचे सकट गाढवांवरती संसार घेऊन त्यांना भटकंती करावी लागते. कैकाडी समाजात देखील सुख - दुःखात, न्याय - निवाड्यात, जात - पंचायतीत दारू पिण्याची पद्धत आहे. देवाला नैवेद्य म्हणून कोंबडा किंवा बकरा कापण्याची पद्धत आहे, यावरही ते भाष्य करतात. अंगावरती फाटके कपडे आहेत म्हणून शाळेतील चिडवणाऱ्या, हसणाऱ्या मुलांकडे दुर्लक्ष करून लक्ष्मण माने शिक्षण घेतात. नंतर उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला येतात, मित्रांची पुस्तके आणि कपडे वापरतात. ज्या मुलीशी प्रेम करतात ती ब्राह्मण असल्यामुळे ते टिकत नाही. पुढे शशी नावाच्या मुलीसोबत त्यांचा प्रेमविवाह होतो. तीदेखील सवर्ण असल्यामुळे तिला कैकाडी समाजात प्रवेश देण्यासाठी विधी केला जातो. हायस्कूलमध्ये बिन पगारी नोकरी, साताऱ्याला कपडे - ब्लाऊज विकणे अशा नाना प्रकारे जगण्याची दोन हात लक्ष्मण माने करतात.

**उत्तम बंडू तुपे:**

१९८२ मध्ये प्रकाशित झालेले उत्तम बंडू तुपे यांचे 'काट्यावरची पोटं' आणखी एक आत्मकथन होय. या आत्मकथनाचे मलपृष्ठ वाचल्यास लेखकाचे जीवनाचे तत्त्वज्ञान त्याला आपल्या आईकडून कसे मिळाले, याचा प्रत्यय येतो, "काट किंजाळ केक ताडाचा ह्यो पांढराफेक वाख कसा गं होतो आये?" "बाळा, पाण्याच्या पोटात केकताडाचे आग थंड हुती नि त्याचाच रेसमागत मऊलूस वाख होतो?" त्यांची आई उत्तमला पाणी होऊन जग असे सांगते, "पाणी काय बी पचवत, त्याच्या पोटात सगळ्याचा रस होतो. जसा आपल्या केकताडांची आगबी थंड हुती, तशी ही आग थंड करून, पचवून, बुडवून तू तुझ्या

कर्तबगारीवर ह्या रेश्मागत मऊलूस वाखागत जग." मांग समाज, लेखकाचे कुटुंब, या साऱ्यांची आर्थिक विवंचना, अंगावर पुरेसे वस्त्र नाहीत, खायला पुरेसे अन्न नाही, वरून सोसावे लागणारे अस्पृश्यतेचे चटके, या वास्तवाचे चित्रण उत्तम बंडू तुपे आपल्या 'काट्यावरचे पोटं' या आत्मकथनातून करतात.

**शरणकुमार लिंबाळे:**

शरणकुमार लिंबाळे यांची तीन आत्मकथने 'अक्करमाशी', 'बारामाशी' आणि 'राणीमाशी' प्रकाशित झालेली दिसतात. त्यानंतर त्यांचे 'पुन्हा अक्करमाशी' हे आत्मकथन प्रकाशित झाले. अस्पृश्य स्त्री आणि सवर्ण बाप यांच्या पोटी जन्म घेतल्याने आणि त्यातून वाटयाला आलेल्या उपेक्षेमुळे ते उद्वेगाने म्हणतात, 'मी वाढत होतो महाभारतभर कर्णासारखा!' वरील आत्मकथनांतून शरणकुमार लिंबाळे यांचे दारिद्र्य, बालपण, शिक्षण, नोकरी, प्रेमप्रकरण, विवाह, समाजाकडून मिळालेली अवहेलना, मनात निर्माण झालेली सुडाची भावना या साऱ्यांचे चित्रण दिसून येते. सामाजिक जाणीव व आंबेडकरी विचार मात्र तितक्या प्रकर्षाने आलेले दिसत नाहीत. सामाजिक रूढी - परंपरांमुळे वाटयाला आलेल्या अपयशी प्रेमाच्या गाथा, विवाहबाह्य संबंध यांचे चित्र दिसते.

**शांताबाई कांबळे :**

'माझ्या जल्माची चित्तरकथा' या नावाने शांताबाई कांबळे यांनी आत्मकथन लिहिले. त्यांच्या आत्मकथनातून स्त्री म्हणून वाटयाला आलेले दुःख तर चित्रित होतेच परंतू एक दलित स्त्री म्हणून वाटयाला आलेले दुःख दुहेरी आहे. त्यांचे बालपण, शिक्षण, नोकरी, विवाह, संसार हा सारा प्रवास उलगडत जातो. समाज घडविण्याचे काम करणाऱ्या 'शिक्षिके' चा पेशा त्या स्वीकारतात पण समाज मात्र त्यांच्याकडे एक दलित महिला शिक्षिका म्हणूनच पाहतो. या आत्मकथनाच्या निमित्ताने दलित शिक्षिकांचे प्रश्न देखील अधोरेखित होतात. बालपणापासूनचे अस्पृश्यतेचे अनुभव अधिकाधिक गडद होत जातात, असे असले तरी शांताबाई कांबळे यांच्या आत्मकथनात कोठेही उरबडवेपणा किंवा सहानुभूतीची अपेक्षा नाही. आंबेडकरी चळवळीला त्या वाहून घेतात. डॉ. मनोहर जाधव लिहितात, "शांताबाईंची ही 'आत्मकहाणी' आहे. स्वकेंद्र यात प्राधान्याने दिसते; त्यामुळेच समाज - जीवनाचे विस्तृत चित्रण यात येत नाही. शिक्षकाचा ध्येयवाद, उदात्तता आणि निष्ठा यातून प्रकट झाल्या आहेत. शिक्षक पेशा हा व्यवसाय अथवा केवळ नोकरी नसून ती जीवनदृष्टी आहे; एक व्रत आहे, ही गोष्ट प्रामुख्याने या आत्मचरित्रात दिसते. सांप्रत काळातील शिक्षक आणि तत्त्कालीन शांताबाई ही पहिली शिक्षिका यांच्या वृत्तीत विसंवाद आढळत असला, तरी शांताबाईंची शिक्षकी वृत्ती ही आज प्रेरणादायक आणि ध्येयवादाला पूरक ठरणारी आहे, हे नाकारता येणार नाही. शांताबाई या दलित चळवळीतील कार्यकर्त्या नाहीत; मात्र आंबेडकरी विचारांचा प्रभाव असणाऱ्या आणि त्यानुसार जीवनप्रणाली अनुसरणाऱ्या ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'' या डॉ. आंबेडकरांच्या विचारसूत्राला प्रमाण मानून वाटचाल करणाऱ्या एक ध्येयवादी महिला शिक्षिका आहेत"[२३] शांताबाई कांबळे यांचे पतीदेखील शिक्षक होते. ते दुसऱ्या स्त्रीसोबत विवाह करतात. त्यामुळे आलेल्या मनस्तापाला शांताबाईंना सामोरे जावे लागते. सवतीसोबत संसार न करता त्या एकटे राहण्याचा निर्णय घेतात. दुसरे एक शिक्षक शांताबाईंना लग्नाविषयी विचारतात,

त्यावेळी शांताबाई त्यांना नकार देतात व पतीने दुसरे लग्न केले तरीही त्या मात्र पतीसोबत एकनिष्ठ राहतात. कालांतराने पतीने विवाह केलेल्या स्त्रीचा मृत्यू होतो व ते शांताबाईंकडे परत येतात. शांताबाई मात्र त्यांचा पुन्हा स्वीकार करतात आणि त्यांच्यासोबत संसार करतात. येथे त्यांच्या मनाची शोषिकता दिसून येते.

**जनाबाई गिऱ्हे :**

दलित स्त्रियांच्या आत्मकथनातील आणखी एक महत्त्वाचे आत्मकथन म्हणजे 'मरणकळा' हे होय. जनाबाई गिऱ्हे यांचा जन्म 'गोपाळ' समाजामध्ये झाला. त्यांच्या आई-वडिलांना भटकंती करावी लागत असल्याने आजी त्यांचा सांभाळ करते व जनाबाईंचे प्राथमिक शिक्षण खेरडा येथे होते. त्यांच्या पतीच्या प्रेरणेमुळे त्या आत्मकथन लिहिण्यास प्रवृत्त होतात. डॉ. अविनाश डोळस यांच्या मते, "जनाबाईसारखी भटक्या समाजातील पहिली लेखिका आत्मनिवेदन लिहिते आहे. डॉ. आंबेडकर यांना - प्रेरणा मानणाऱ्या, तसे जगणाऱ्या जनाबाईंचा 'गोपाळ' समाजाने विरोध केला, त्यांनी जात - पंचायती भरवल्या; तरीदेखील ही अशी विस्तारत आहे,"[२४] बालपणापासूनच त्यांना दारिद्र्याचे आणि उपेक्षेचे चटके सोसावे लागले. जनाबाईंच्या शिक्षणाला मात्र त्यांच्या वडिलांनी कधीही विरोध केला नाही. जगतांना खऱ्या अर्थाने जनाबाईंना 'मरणकळा' सोसाव्या लागल्या, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**मुक्ता सर्वगोड :**

सामाजिक कार्यकर्त्या असलेल्या मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' हे आत्मकथन प्रकाशित झाले. सामाजिक परिवर्तनाचे कार्य हाती घेतल्यावर त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अनेक सन्मान त्यांना मिळतात तसेच सामाजिक रोषालाही सामोरे जावे लागते. तरीदेखील सामाजिक परिवर्तनाचे कार्य त्या सुरूच ठेवतात. आपल्या अधिकारी पतीची त्यांना साथ मिळते. महार समाजात जन्मलेल्या मुक्ता सर्वगोड यांच्या आत्मकथनातून महार समाजाचे मागासलेपण, सामाजिक दास्यत्व, शिक्षणाचा अभाव, आर्थिक शोषण यांचे चित्रण घडून येते.

**शांताबाई दाणी :**

यांचे 'रात्रंदिन आम्हा...' हे आत्मकथन होय. शांताबाईंच्या आत्मकथनातून महाराष्ट्रातील विशेष करून नाशिक जिल्ह्यातील दलितांचे जीवन अधोरेखित होते. दलित चळवळीतील त्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. कार्यकर्त्या म्हणून काम करताना दौऱ्यात आलेले अनुभव, सभांमधून केलेली भाषणे, दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली केलेली अनेक आंदोलने, दादासाहेब गायकवाड यांची स्वभाव वैशिष्ट्ये या साऱ्यांचे चित्रण आत्मकथनातून प्रतीत झालेले दिसते.

**बेबी कांबळे :**

यांच्या 'जिण आमुचं' या आत्मकथनातून गेल्या ५० वर्षातील दलित समाजाचे दर्शन होते. 'स्व' विषयी अधिक न लिहिता दलित समाज, त्यांची जीवन पद्धती, विचार, रूढी - परंपरा या बाबींवर त्या अधिक प्रकाश टाकतात.

समाजिक अल्पवयीन विवाह, अंगारे धुपारे, अंगात येणे, पोतराज सोडणे या भयंकर रूढी – परंपरांचे चित्रण त्यांनी केलेले आहे. त्यांनी आपल्या समाजातील स्त्री जीवनाच्या विविध रूढी परंपरांचा विचारप्रवाह वाचकांसमोर मांडलेला आहे.

**प्रा. कुमुद पावडे :**

एकूण नऊ प्रकरणे असलेल्या 'अंत:स्फोट' या आत्मकथनातून हुशारी आणि कर्तृत्वावरून श्रेष्ठ - कनिष्ठ न ठरविता जातीवरून कसे श्रेणीबद्ध केले जाते, याचे अनुभव कथन प्रा. कुमुद पावडे करतात. लहानपणापासून अत्यंत हुशार असणाऱ्या, नीटनेटके व स्वच्छ राहणीमान असणाऱ्या कुमुद केवळ खालच्या जातीची आहे म्हणून वंचित ठेवली जाते. वर्गातील इतर गबाळ्या, घाणेरड्या आणि मठ्ठ असणाऱ्या विद्यार्थिनी या सवर्ण असल्यामुळे लेखिकेपेक्षा श्रेष्ठ ठरतात का?' असा प्रश्न उपस्थित होतो. ज्या संस्कृत विषयाचे ज्ञान घेण्याची दलितांना पूर्वी बंदी होती, तोच विषय शिकून त्या संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका होतात. परंपरेने स्त्रीवर जे जगणे लादले ते त्या नाकारतात. प्रा. प्रज्ञा लोखंडे व डॉक्टर श्रीकांत तिडके म्हणतात, "प्रा. कुमुद पावडे यांचे 'अंत: स्फोट' हे रूढ अर्थाने आत्मकथन नसून वेगवेगळ्या निमित्ताने लिहिलेल्या आत्मपर लेखांचे संकलन असून कालानुक्रमेदेखील दलित स्त्री - मनाचा पहिलाच सृजनात्मक आविष्कार वर्तविणारे हे लेखन आहे... कुमुद पावडे यांचे 'अंतस्फोट' प्रभावी आहे. रुढार्थाने ते आत्मचरित्रही नाही. विविध अनुभवांचे प्रगटीकरण करणाऱ्या लेखांचा तो एक संग्रह आहे."[२५] या आत्मकथनातील लेखनातून लेखिकेची वैचारिक प्रगल्भतेकडची होत जाणारी वाटचाल दिसून येते. मलाच वाटत गेलेल्या अनुभवांचा हा जणू स्फोटच आहे.

**लक्ष्मण गायकवाड :**

वडार समाजातील कार्यकर्ता म्हणून काम करणारे लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या' हे आत्मकथन होय. 'चोरी करणे' हाच वडार समाजाचा व्यवसाय आहे. आपल्या मुलांना शालेय शिक्षण देण्याऐवजी देवीकडून कोंबड्या कापून त्यांना चोरीचे शिक्षण देण्याचा आरंभ केला जातो. ब्लेडने खिसे कापण्यापासून ते चोरीचे अनेक प्रकार व पकडले गेल्यास मार सहन करण्याचा सराव देखील त्यांना दिला जातो. गावात लग्न असल्यास जेवायला मिळेल म्हणून ताटकळत उभे राहणे, सवर्णांनी त्यांना वारंवार हाकलून लावणे, वीतभर पोटासाठी चोरी करणे, यात्रेकरू बनून, कीर्तनकार बनून, मदत करण्याच्या निमित्ताने, चोऱ्या केल्या जाई. याविषयीचे वेगवेगळे घटना - प्रसंग लक्ष्मण माने आपल्या आत्मकथनात चित्रित करतात.

**रुस्तुम अचलखांब :**

'गावकी' या आत्मकथनाचे लेखक रुस्तुम अचलखांब हे जन्माने महार समाजाचे आहेत. जातव्यवस्थेचे ते देखील बळी ठरले आहेत. लहानपणी लेखक चोरून तमाशा बघायला जात. तमाशा मालकाच्या लक्षात आल्यास त्यांना तेथून हाकलून दिले जाई. मात्र लेखक निर्धाराने शिक्षण घेतात व मोठे झाल्यावर 'नाट्यशास्त्र' विभागात प्राध्यापक पदी रुजू होतात. आता मात्र लेखकाला तमाशाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यासाठी सन्मानाने

बोलावले जाते. हा प्रवास मात्र 'गावकी' च्या जाचक बंधनांचा अडथळा पार करून यशस्वीरित्या पूर्ण करणे, वाटते तेवढे निश्चितच सोपे नव्हते.

**ना. सं. झोडगे :**

खेड्यात महार समाजात जन्माला आलेल्या ना. सं. झोडगे यांनी 'फांजर' हे आत्मकथन लिहिताना 'फांजर' म्हणजे काटेरी फांद्यांप्रमाणेच आपले जीवन आहे, असे प्रतिपादन करतात. सदर आत्मकथनात लेखक ग्रामीण समाजातील उपेक्षित जीवन तर चित्रित करतातच परंतु शहरात आल्यावर ही उपेक्षा वाटयाला येणार नाही हा त्यांचा केवळ भ्रम ठरतो आणि शहरातही त्याच उपेक्षेला त्यांना सामोरे जावे लागते, हे वास्तव ते त्यांच्या आत्मकथनातून मांडतात.

**मल्लिका अमर शेख :**

शाहीर अमर शेख यांच्या कन्या व नामदेव ढसाळ यांच्या पत्नी म्हणजे मल्लिका अमर शेख होय. असे असले तरी कवयित्री असलेल्या मल्लिका यांनी 'मला उद्‌ध्वस्त व्हायचंय' या आत्मकथनातून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या आयुष्यात आलेल्या वेदना, अन्याय, झालेली फरफट, घुसमट, स्वप्नातील, कल्पनेतील प्रेम आणि विवाह नंतरचे वास्तव त्या वेगळ्या जाणिवेतून मांडतात.

**नरेंद्र जाधव :**

'आमचा बाप आन् आम्ही' हे आत्मकथन लिहिलेले नरेंद्र जाधव उच्चशिक्षित आहेत. भारतीय रिझर्व बँकेचे 'डायरेक्टर' म्हणून देखील काम पाहिले आहे. नरेंद्र जाधव यांच्या आत्मकथनात त्यांच्या सोबतच त्यांच्या कुटुंबातील माणसांचीही मनोगते आलेली दिसतात. स्वतः नरेंद्र जाधव व त्यांची भावंडे शिक्षण घेतात मोठया पदावर जातात, याचे श्रेय ते त्यांच्या वडिलांना देतात. त्यांचे वडील अडाणी होते. मात्र जे काही कराल त्यात 'टॉप' ला जा, या शिकवणुकीचाच हा परिणाम होय, असे ते नमूद करतात. आपला अडाणी बाप मुलांच्या शिक्षणाकडे कसे लक्ष देत होता, त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप किंवा वेळप्रसंगी शिक्षाही ते करीत. त्यामुळे आपण जे आहोत ते केवळ या 'बापा' मुळेच. आपल्या यशाचे श्रेय ते आपल्या 'बापा' ला देतात.

**किशोर शांताबाई काळे :**

कोल्हाटी समाजात जन्माला आलेल्या किशोर शांताबाई काळे यांचे आत्मकथन म्हणजे 'कोल्हाट्याचं पोर' होय. कोल्हाटी समाजातील स्त्रिया नाचून - गाऊन आपला उदरनिर्वाह करतात. गरिबीमुळे केवळ त्या उपभोगाच्या वस्तू ठरतात. आपल्या बापाचे नाव ठाऊक नसल्यास ते आईचे नाव लावतात. किशोर शांताबाई काळेदेखील वडिलांचे नावच माहीत नसल्यामुळे आईचे नाव लावतात. शाळेमध्ये त्यांची सगळे हेटाळणी करतात. पुढे ते शिकून जिद्दीने एम. बी. बी .एस. डॉक्टर होतात. किशोर यांचा जीवन प्रवास तसेच त्यानिमित्ताने कोल्हाटी समाजातील स्त्रियांची होणारी ससेहोलपट सदर आत्मकथनातून झालेली दिसते.

**ना. म. शिंदे :**

अस्पृश्य म्हणून समजल्या जाणाऱ्या चांभार समाजात देखील पुन्हा उपजाती आहेत. त्यातील 'ढोर' या पोटजातीत जन्माला आलेल्या ना. म. शिंदे यांचे 'जातीला जात वैरी' हे आत्मकथन प्रकाशित झाले. जातव्यवस्थेला विरोध करणारे, स्वतः अस्पृश्य ठरविले गेलेले, जातीयतेला विरोध करताना जातीच्या उतरंडीचेच समर्थन करताना दिसतात. अशा परिस्थितीतही लेखक स्वतःचा उत्कर्ष करून घेतात.

## १.४ सारांश / समारोप

अशा प्रकारे दलित आत्मकथनांचा विचार करता स्त्री व पुरुष लेखकांनी 'आत्मकथन' हा साहित्य प्रकार समृध्द केलेला दिसतो. कारण ही आत्मकथने वेगवेगळा समाज, त्यांचा प्रदेश, बोली, चालीरीती, संघर्ष हे सारे घेऊन येतात. दलितांचे वास्तव जीवन आपणास यात प्रतीत झालेले दिसते. सामाजिक शास्त्राच्या दृष्टीकोनातूनही ही आत्मकथने महत्वपूर्ण ठरतात. ही आत्मकथने विविध बोलींतून आलेली असल्यामुळे भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातूनही ती महत्वाची ठरतात. एकूणच मराठी साहित्याच्या परीघ भेदून पांढरपेशी समाजाबाहेरही उपेक्षितांचे केवढे मोठे जग आहे, ते परिघाच्या बाहेर जाऊन मराठी साहित्याला, वाचकाला व समीक्षकांना दाखविण्याचे काम आत्मकथनाने केले.

## ३.५ संदर्भ ग्रंथ सूची


१. जाधव, रा. ग. निळे पहाट, श्री विद्या प्रकाशन, वर्ष 1991, तिसरी आवृत्ती, पृष्ठ सत्तावन्न

२. साक्रीकर, दिनकर, लेख, दलित कविता एक टिपण, पूर्व नियतकालिक, प्रथम विशेषांक, दिवाळी अंक, 1986, पृष्ठ ६२

३. मालेगावकर, रमेश, लेख काव्यसंग्रहांच्या प्रस्तावनेतील कुरुंदकरांचा काव्यविचार, अनुष्ठभ, जुलै- ऑगस्ट, १९८३, पृ. २३

४. तत्रैव २३

५. डॉ. ठाकूर, रवींद्र, प्रवाह आणि प्रतिक्रिया, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. ६८

६. धोंगडे, दिलीप, शैली विज्ञान

७. काळे, अक्षय कुमार, लेख-दलित शैली : मुक्ती संघर्ष शैली, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २१८, पृ. ४४.

८. तेंडुलकर विजय, प्रस्तावना-गोलपिठा, नामदेव ढसाळ, पुणे प्रकाशन, १९७८, प्रथम आवृत्ती, पृ. क्रमांक ९-१०

९. बागुल, बाबुराव 'दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान', भेटायची 28, व्दि. आ. धम्मचक्र परिवर्तन दिन ऑक्टोबर २००४, दिशा प्रकाशन.

१०. तेंडुलकर, विजय, गोलपिठा, प्रस्तावना, पृ. ८

११. डॉ. कुलकर्णी, आरती, दलित आत्मकथेच्या मूल्यमापनाचा विचार, लोकानुकम्पा ए. मे. जून 2001, प्रेरणा विशेषांक.

१२. डॉ. पगारे, म. सू., दलित साहित्याचा इतिहास.

१३. यादव, आनंद, आत्मचरित्र मीमांसा, पृ. १७,१८.

१४. गायकवाड संपतराव, दलित आत्मकथनांतील भाषिक समाज व भाषा व्यवहार, अस्मितादर्श पृ. ११, वार्षिक विशेषांक, २००२

१५. कुलकर्णी, गो. म., दया पवारांची मुलाखत, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, दीपावली विशेषांक, पृ. ८०.

१६. कवठेकर, बाळकृष्ण, दलित साहित्य : एक आकलन, पृ. ८३, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, जानेवारी १९८१

१७. कोंडविलकर, माधव, साहित्याचे माझ्या जीवनातील स्थान, पुस्तक पंढरी, पृ. ८, १९८०.

१८. कोंडविलकर, माधव, आत्मकथन मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे, पृ. १५९.

१९. डोळस, वसंत, दलित साहित्य : प्रेरणा व स्वरूप, दिलीप राज प्रकाशन, ३०डिसेंबर १९९३ पृ. १०४,१०५.

२०. कवठेकर बाळकृष्ण, दलित साहित्य: एक आकलन, पृ. ८६, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, जानेवारी १९८१.

२१. माने लक्ष्मण, उपरा, या मुक्कामावरून, १९८०, प्र. आ.

२२. जाधव मनोहर, दलित स्त्रियांची आत्मकथने, पृ. १०, एमेजू, १९९९, अस्मितादर्श.

२३. डोळस अविनाश - आंबेडकरी विचार आणि साहित्य, पृ. ५

२४. मेश्राम केशव, 'फांजर' च्या मलपृष्ठावरील अभिप्राय, १९८२.

## ३.६ पूरक वाचन

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - शूद्र मूळचे कोण होते?, रघुवंशी प्रकाशन.

२. फडके भालचंद्र - डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.

३. कवठेकर बाळकृष्ण - दलित साहित्य : एक आकलन, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

४. कुलकर्णी आरती - दलित आत्मकथेच्या मूल्यमापनाचा विचार, लोकानुकंम्पा, ए. मे. जून २००१, प्रेरणा विशेषांक.

५. डोळस वसंत - दलित साहित्य : प्रेरणा व स्वरूप, दिलीपराज प्रकाशन.

## ३.७ प्रश्नावली

### अ] लघुप्रश्न

१. दलित कवितेचे प्रेरणास्थान कोण आहे, ते सोदाहरण स्पष्ट करा.

२. दलित कविता पारंपरिक मराठी कवितेपेक्षा भिन्न कशी ठरते, ते लिहा.

3. दलित कवितेने कोणती शैली अवलंबिली ते, सोदाहरण लिहा.

४. दलित कवितेतील आरंभीच्या कवितांचे स्वरूप स्पष्ट करा.

५. दलित आत्मकथने हे मराठीत आत्मचरित्राहून भिन्न कसे ठरतात, ते लिहा.

६. दलित स्त्री आत्मकथनांचा आढावा घ्या.

### ब] दीर्घप्रश्न

१. दलित कवितेचे स्वरूप स्पष्ट करून दलित काव्यशैलीवर अधिक प्रकाश टाका.

२. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित कवी आणि कवितांचा आढावा घ्या.

३. नव्वदोत्तर कालखंडातील दलित कवितांचे स्वरूप स्पष्ट करा.

४. दलित आत्मकथनांनी मराठी आत्मचरित्रात कशी मोलाची भर घातली, ते उदाहरण स्पष्ट करा.

५. दलित आत्मकथनांतून दलित समाजाचे चित्रण कसे घडून येते, ते लिहा.

६. दलित आत्मकथनांतील संघर्ष चित्रित करा.

### क] टीपा लिहा.

१. दलित आत्मकथने

२. दलित कविता

३. आत्मकथनातील नकार, विद्रोह

४. दलित कवितेतील नकार विद्रोह

५. दलित कविता – आत्मकथने यातील संघर्ष.

*****

# ३ आ

# दलित साहित्याची भाषा

**घटक रचना**


३.० उद्देश

३.१ प्रस्तावना

३.२ दलित साहित्याची संज्ञा

३.३ भाषा म्हणजे काय?

३.४ दलित साहित्याची भाषा

३.५ दलित साहित्याची निवेदन शैली

३.६ दलित साहित्यातील स्त्रियांच्या भाषेचे वेगळेपण

३.७ दलित साहित्यातील म्हणी – वाक्यप्राचार

३.८ दलित साहित्यातील प्रादेशिक भाषा

३.९ दलित साहित्यात आलेले नवे शब्द

३.१० समारोप

३.११ संदर्भग्रंथ

३.१२ प्रश्नावली


## ३.० उद्देश

- दलित साहित्याची संज्ञा विद्यार्थ्यांना समजण्यास सोपे होईल.
- दलित साहित्याची भाषा आणि निवेदनशैली समजेल.
- विद्यार्थ्यांना दलित साहित्यातील स्त्रियांच्या भाषेचे वेगळेपण लक्षात येईल.
- दलित साहित्यातील म्हणी–वाक्यप्राचार यांचा परिचय होईल.
- विद्यार्थ्यांना दलित साहित्यात आलेले नवे शब्द  समजतील.

## ३.१ प्रस्तावना

मराठी साहित्यात १९६० च्या सुमारास प्रथम 'दलित साहित्य' प्रवाहाचा उगम झाला. दलित साहित्य मराठी साहित्याबरोबरच अन्य भारतीय भाषांमध्येही लिहिले जात आहे. तसेच जगातील विविध विद्यापीठात दलित साहित्यावर विद्यार्थी मोठया प्रमाणावर संशोधन करीत आहेत. समाजशास्त्रीय, भाषाशास्त्रीय अशा विविध अंगानी हा अभ्यास सुरू आहे. दलित साहित्याने नवी विद्रोहाची भाषा निर्माण केली आहे, घडवली आहे. या प्रकरणात

आपण दलित साहित्याच्या भाषेचाच विचार प्रामुख्याने करणार आहोत. दलित साहित्यातील निवडक प्रकारांच्या आधारे आपण दलित साहित्याच्या भाषेचे स्वरूप, वेगळेपण समजून घेणार आहोत.

## ३.२ दलित साहित्याची संज्ञा

दलित साहित्याची निर्मिती झाल्यावर त्याच्या सैद्धांतिक मांडणीसाठी अनेक लेखक, कवी साहित्यिकांनी व समीक्षकांनी त्याच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. दलित साहित्याची संज्ञा या व्याख्यांच्या आधारे समजून घेता येते. बाबुराव बागूल म्हणतात, “माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, धर्म, जाती, श्रेष्ठत्वाला विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य.” डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात की, “माणसामाणसातील विसंवाद व वैर, अस्पृश्यता, पोथिनिष्ठा, अंधश्रद्धा, प्राक्तनवाद, वर्णवाद, मानवी दास्य, पवित्र-उपपवित्रतेच्या भ्रामक कल्पना ज्यावेळी दलित जाणीव नाकारते त्याचवेळी मानवी प्रतिष्ठा व स्वातंत्र्य मानवी जीवनातील अर्थपूर्णता आणि समानता स्वीकारते.” तसेच नामदेव ढसाळ म्हणतात, “दलित म्हणजे अनुसूचित जाती जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहिन, शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदीवासी.” अशी दलित साहित्याची व्यापक संकल्पना आहे.

दलित साहित्य हे समाजव्यवस्थेने साधनसंपत्तीपासून वर्षानुवर्ष कोसो दूर ठेवलेल्या, कनिष्ठ, नीच मानून ज्यांचे माणूसपण हिरावून घेतले आहेत, पशुपातळीवर जीवन जगायला भाग पाडले आहे, सन्मान आणि अधिकार यांपासून वंचित करून, धर्मव्यवस्थेच्या आडून गावकुसाबाहेर ताटकळत ठेवले आहे अशा मानवी समुहाच्या दुःख, वेदना, विद्रोह आणि नकार मांडणारे साहित्य आहे. माणूस म्हणून घेतलेला शोध, सामाजिक न्यायचे स्वप्न, जातीव्यवस्था मोडून काढण्याचा संकल्प म्हणजे दलित साहित्य होय.

## ३.३ भाषा म्हणजे काय?

भाषा हा मानवी जीवनातील एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. मराठीतील “**भाषा”** हा शब्द मूळ संस्कृत भाषेतील भाष् (म्हणजे बोलणे) या धातूवरून तयार झालेला तत्स्म शब्द आहे. भाष्य, भाषक, भाषण, संभाषण, भाषीय हे या धातूपासून निर्माण होणारे भाषेशी निगडित विविध संकल्पना सूचित करणारे शब्द आहेत. या मूळ संदर्भामुळे 'भाषा' ही संज्ञा 'बोलणे' या अर्थाने सर्वसाधारण व्यवहारात वापरली जाणे स्वाभाविक होय. मानवी मुखयंत्रणेतून निर्माण झालेली ध्वनिचिन्हांनी युक्त असलेली यादृच्छिक संकेतव्यवस्था म्हणजे 'भाषा' होय.

आधुनिक भाषाविज्ञानाने भाषेबाबतचा शुद्ध–विशुद्ध, अपभ्रष्ट तसेच प्रमाण आणि बोली हा भेद बाद ठरवला आहे. डॉ. भालचंद्र नेमाडे ‘साहित्याची भाषा’ या पुस्तकात म्हणतात की, “भाषेचे सर्व भेद नैसर्गिक मानून एकाच भाषिक समूहात व्यवसायानुरूप, वयानुरूप, लिंगानुरूप, शिक्षणाच्या पातळीनुसार, प्रसंगानुसार वापरली जाणारी निरनिराळी रुपे साहित्याच्या भाषेत महत्त्वाची मानली जातात. यासंदर्भात शुद्ध किंवा अशुद्ध अशी भाषा मानणे अशास्त्रीय आणि अडाणीपणाचे असते. भाषा वापरण्याचे प्रकार समाजातल्या

निरनिराळ्या गरजानुसार, प्रथानुसार आणि संदर्भानुसार बदलत असतात. साहित्यिक ह्या सर्व भाषिक गरजा, प्रथा आणि संदर्भ प्रकर्षाने आपल्या कृतीमध्ये वापरीत असतात." तर डॉ. महेंद्र भवरे म्हणतात की, "एकाच भाषेत, भाषेची विविध रूपे असतात." संदर्भानुसार या रूपात विविधता असू शकते. समकालीन दलित कवितेचा विचार करताना असे प्रत्ययास येते की, ही कविता सामाजिक गंभीर स्वरूपाची असून काळानुरूप व अनुभूतीच्या बदलत्या केंद्रानुसार साकार झाली आहे. पूर्वसूरीच्या आक्रमक, आक्रस्ताळी भाषेला फाटा देऊन, विविध समाजगटातून, समूहजीवनाची जगण्यातली भाषा, बोलभाषा या कवितेत वापरलेली आहे. त्यामुळे दलित कवितेचे पूर्वसूरीचे रूप बदलण्यास मदतच झाली आहे. अनुभवाची म्हणून एक खास भाषा या कवितेत अभिव्यक्त झाली आहे." दलित कवितेबरोबरच दलित लेखक आणि लेखिका यांनी लिहिलेल्या कथा, कविता, कादंबरी, आत्मकथने यातून समृद्ध भाषा आली आहे. त्याचा विचार आपण पुढे करणारच आहोत.

## ३.४ दलित साहित्याची भाषा

दलित साहित्य हे दु:ख, वेदना, विद्रोह आणि नकार या सूत्रावर आधारीत आहे. आशय आणि अभिव्यक्ती या अनुषंगाने दलित साहित्य हे खचितच मराठीत साहित्यात आपले वेगळेपण अधोरेखित करणारे ठरते. त्यामुळे दलित साहित्याची भाषा सुद्धा दु:ख, वेदना, विद्रोह आणि नकार यावर आधारितच आहे. लेखक आणि भाषा याबद्दल जेष्ठ समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात की, "लेखक ज्या जीवनाच्या क्षेत्रातील स्तरातील अनुभव प्रकट करीत असतो. त्या क्षेत्रातील व स्तरातील भाषा किंवा बोली त्याच्या लेखनातून अवतरत असते. आणि हे आवश्यक व अपरिहार्यही असते. कारण त्याशिवाय चित्रित करावयाच्या जीवनानुभवाचा प्रत्यय सर्वार्थाने येणारच नाही. गावातील आणि तळातल्या समाजातील माणसांची भाषा ही त्याच गावातील मध्यमवर्गीय किंवा उच्च समाजातील माणसांच्यापेक्षा वेगळी असते. त्यातील फरक शोधणे अवघड असते. सवयी, वळणे, रूढी आणि परंपरा यांचाही या संदर्भात विचार करावा लागतो. अनेकदा घरात बोलली जाणारी भाषा घराबाहेर व्यवहारात बदलली जाते. माणूस ज्या जमातीचा प्रतिनिधी असतो, त्या जमातीच्या भाषेचा संस्कार त्याच्यावर होत असतो." म्हणजेच लेखक ज्या भागातून येतो त्या भागाचे, प्रदेशाचे, समाजाचे प्रतिनिधित्व लेखक करत असतो. दलित साहित्य लिहिणारे लेखक अशाच शोषित, पिडीत समाजाचे नेतृत्व करतात आणि म्हणूनच त्यांच्या साहित्याची भाषा ही त्या समाजाची भाषा आहे. दलित साहित्यात बोलीभाषेचा वापर प्रामुख्याने केला जातो. त्याबद्दल शरदच्चंद्र मुक्तीबोध म्हणतात, "दलित साहित्यानं बोली भाषेचा सकसपणा पुन्हा मराठीत आणला. हा सकसपणा आमच्या लेखनात नव्हता. आम्ही भाषेवर Aesthetics चे प्रयोग करीत होतो. जिवंतपणा जीवनात असतो याची आम्हाला जाणीव नव्हती."[३] हे मुक्तीबोधांचे मत महत्त्वाचे आहे. बोलीची सर्जनक्षमता, आवाहकक्षमता व कलात्मकता यांची दलित साहित्याने मराठी साहित्याला ओळख करुन दिली आहे.

दलित साहित्यामधील जग हे पांढरपेशा जगापेक्षा वेगळे आहे. नामदेव ढसाळ यांच्या गोलपिठामध्ये या जगाची भाषा आली आहे. 'गोलपिठा' या काव्यसंग्रहातील कवितांची भाषा तर अत्यंत उग्र, रोखठोक, दाहक व अंगाची लाही लाही करणारी वाटते. परंतु त्या भाषेशिवाय कवीचा तो अनुभव, राग व्यक्त होवूच शकत नाही व त्याशिवाय राग-लोभाचे सौंदर्य वाढत नाही. उलट थोडीशी अमंगल वाटणारी भाषाच आपणास वेड लावते. या

'गोलपिठा' काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिताना नाटककार विजय तेंडुलकर म्हणतात, 'पांढरपेशा गटाने दिमाखाने जपलेली अलवार घरंदाज भाषा, नामदेव ढसाळ एखाद्या बटकीसारखी वाकवतो. निर्भयपणे तिची मोडतोड करतो. तेंडुलकर यांना नामदेव ढसाळ यांची भाषा समजून घ्यावी लागली. त्याबद्दल पुढे ते म्हणतात, "प्रथम मी ढसाळाचे शब्दभांडार जमेल तेवढे माहीत करून घेतले. त्याने स्वाधीन केलेल्या कविता एकत्रितपणे वाचल्या. न कळणाऱ्या शब्द प्रतिमा बाजूला काढून ठेवल्या आणि ढसाळाच्यापुढे एखाद्या विद्यार्थ्यासारखा बसलो. ढसाळने मला समजावून सांगितले. 'चंद्रबिंदी म्हणजे काय? 'डोब्ली' म्हणजे काय? सादळलेली झाडं म्हणजे काय? गूपची शिगा, डेडाळे, डल्ली, सदी, बोट्या, गुडसे, डिल बोल, एक ना शंभर गोष्टी; त्यांच्या कवितेमध्ये अशा प्रकारचे अपरिचित शब्द त्यांच्या अभिव्यक्तीतून आलेले आहेत."

दलित साहित्य हे क्रांतीचा संवाद करणारे साहित्य आहे. आपल्या दु:ख, वेदनेविषयी अभिव्यक्त होतांना दलित कवींची भाषा कधी खंत व्यक्त करते, तर कधी रागावते तर कधी अंतर्मुख होताना दिसते.  उदाहरण म्हणून पुढील काही दलित कवितांच्या ओळी बघता येतील.

"आज विषाद वाटतो कशा वागविल्या मणामणाच्या बेड्या,
गाळात हत्तीचा कळप रूतावा तशा,
ध्येय आकांक्षा, रुतलेल्या शिळेखाली,
हात होता तरीही नाही फोडला हंबरडा
किती जन्माची कैद, कुणी निर्मिला कोंडवाडा।"
"हे महाकवे..../हा अन्याय वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू लिहिला असतास/तर
तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते." - (कोंडवाडा, दया पवार)

"हे संस्कृतीप्रिय देशा!
माझा नागडेपणा तुला/कधी झाकताच आला नाही." (सुरुंग, त्र्यंबक सपकाळे)

अशी अनेक उदाहरणे या संदर्भात देता येतील. सौंदर्य सर्जनाबरोबरच विचारप्रवणता हा दलित कवितेच्या भाषेचा विशेष आहे. यशवंत मनोहर आणि केशव मेश्रामांची कविता या दृष्टीने पाहता येते.

"माझ्या भूमिकेवर माझी निष्ठा आहे
जितका आहे द्वेष तुमच्या डोळ्यात माझ्याविषयी
मी पेटवली मने सळसळली अरण्ये माझे
मन उन्मत खळखळले कितीकांच्या ओठांतून"

आपला ठामपणा, निश्चयी भाव इतक्या संयतपणाने व्यक्त करूनही मनाच्या आतले वादळ सूचित झाल्याशिवाय राहत नाही, हे भाषेचे सामर्थ्य केशव मेश्रामांच्या कवितेत आहे.

"आहे जीव तोवर पाखडीत जाणारच आहे शेवटचा दिवस गोड होवो न होवो आता बांधलेच आहे. घर या निषिद्ध मैदानात आतड्यांचे गहिवर कुणी घेऊन येवो न येवो...असे एकाकी पेटणे व पेटवणे मुक्रर केल्यावर वणवा बुडवायला समुद्र मिळो न मिळो...."

कवी हा शांतता प्रिय असूनही आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात उभा राहतो, पेटून उठतो. तो कधीच माघार घेत नाही. दलित कवितेत आपल्याला हवे तसे अर्थ शोधण्याची ताकद आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला भिडताना दलित कवितेने नव्या तंत्रज्ञानाची भाषा, नवे शब्द आत्मसाद केले आहेत. त्यामध्ये अरुण काळे, मंगेश बनसोड, महेंद्र भवरे, प्रज्ञा पवार, सुनील अवचार यांच्या कवितेमध्ये हे नवे जग नव्या शब्द भंडारांनी विकसित झालेले दिसते. ग्लोबलचे गावकूस, केंद्र हरवत चाललेल्या वर्तुळाचा परीघ, महासत्तेची पिडादान इ.कविता संग्रह या दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहेत.

प्रत्यक्ष जीवनाशी नाळ जोडलेल्या भाषिक रूपांमुळेच समकालीन दलित कविता अधिक अर्थपूर्ण झाली आहे. जागतिकीकरणात माणसाला आलेले तुटलेपण आणि शोषणाची व्यवस्था अरुण काळे यांच्या कवितेतून अधोरेखित होते.

"काचा पत्रं येचायचं निमित्त झालं/गोळीनं काळजाचा ठाव घेतला/म्हणलं 'नका जाऊ करफी आडर हाये'/'नाट नको लावू दोन पैशे मिळत्यात'/सोडा बाटल्या, कपाटकाचा, टिनटप्पर/ठेले गाड्या उलथल्यात, चौकात ढिग पडलाय/दोन मिल्टात पोतं भरतंय/नाय गेलो तं इस्न्या, परश्या नेत्यातं/गेलं ते परत आलच नाय/चिलं पिलं उघडं पडलं/जल्माचं वाटूळं झालं/हे बी कळाना, /आम्ही कोनाचं काय वाईट केलं" (सायरनचे शहर /३६)

महेंद्र भवरे हे अरुण काळे यांच्या कवितेचे वेगळेपण सांगताना म्हणतात की, "रुढार्थाने जिला आपण महानगरातील 'स्लम'ची भाषा म्हणतो त्या भाषेचा हा एक प्रातिनिधिक नमुना आहे. त्यातून काचकपटा, टिनटप्पर, गोळा करून त्यावर उपजिविका करणाऱ्या कष्टकरी समाजाचे प्रातिनिधिक चित्र उभे राहते. एका विशिष्ट प्रदेशातून पोटापाण्यासाठी महानगरात येऊन स्थायिक झालेल्या माणसांची प्रादेशिक भाषा आणि महानगराची एक टिपीकल भाषा यांच्या मिश्रणातून तयार झालेले एक नवेच भाषिक रूप प्रत्ययाला येते."

कवितेबरोबरच दलित कथेमध्ये दलित वेदनेची वेगळी भाषा आलेली दिसते. बाबुराव बागूल, अण्णाभाऊ साठे, बंधू माधव, शंकरराव खरात, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, योगेंद्र मेश्राम, अमिताभ, उर्मिला पवार, अविनाश डोळस, सुधाकर गायकवाड आदींच्या कथेतून हे भाषिक वेगळेपण समजून घेता येते. बाबुराव बागूलांच्या कथेतील माणसे म्हणजे महानगरीय जीवनातील झोपडपट्टीतील किडयामुंग्यासारखे जगणारी, दारिद्र्याने विकल झालेली, गुन्हेगार, गुंड, मवाली, वेश्या अशा विभिन्न स्तरातली आहेत. दलित, दुःखित, शोषितांच्या जगण्याचे विविध पदर बागूल अशा रितीने साकार करतात की, त्यांची कथा वाचकाला अंतर्बाह्य हादरवून टाकते, अस्वस्थ करते, अंतर्मुख करते. 'जेव्हा मी जात चोरली होती'

आणि 'मरण स्वस्त होत आहे' हे त्यांचे दोन कथासंग्रह. त्यातील बाबुरावांच्या शब्दकळेची काही उदाहरणे पाहू-

"टकरीला निघालेल्या रेडयाप्रमाणे त्याचे प्रचंड मस्तक पुढे झुकलेले होते. खुनाच्या विचाराने त्याचे सबंध शरीर वेगवान झाले होते. त्यामुळे त्याचे पाठीवरील व दंडभुजांवरील लहान मोठे स्नायू सापासारखे सळसळून उठत होते." (काळोखाचे कैदी, जेव्हा मी जात चोरली होती)

"गप्पकन काळा विक्राळ चेहऱ्याचा ढग झेपावत येऊन आरशात दाटला आणि ते चारी चेहरे खारीच्या चपळाईने लुप्त झाले. फक्त दोन लाल बारीक डोळे आणि लोखंडी रंगाचे लोखंडी मुंडके आरश्यात भरून राहिले." (गुंड, जेव्हा मी जात चोरली होती)

"सावित्रीच्या सुंदर शरीराचा सत्यानाश पाहून मी संतापाने वेडा झालो. जयदेवचा खातमा करण्यासाठी त्याचा दुष्ट आत्मा मातीत मिळवण्यासाठी व माझ्या अंत: करणाच्या रूमालाने तिची जखम बांधण्यासाठी. तिला गळा भरून हाक मारण्यासाठी मी उतावीळ झालो होतो." (पेसूक, जेव्हा मी जात चोरली होती)

"पॉवरहाऊस जवळील त्या कळाहिन मैदानावर हिवाळ्यातील प्रसन्न पुनव प्रकाशित प्रसन्नता उधळत होती आणि थंडी आकाशातील उदय आंधळ्या कुऱ्हाडीसारखी त्या मैदानातील माणसांवर कोसळत होती आणि थंडीमुळे एकमेकाला बिलगत, आरडत, ओरडत माणसे उब ओरबडीत होती."

उपेक्षित माणसे बागूल आपल्या कथेत घेऊन येतात. 'राक्षसी पकड', 'पोलादी पावले', 'काळा विक्राळ ढग' या प्रतिमा पाहिल्या की ज्याच्याविषयी बागूल बोलतात, ''तो राक्षसी वृत्तीचा 'गुंड' असावा हे वेगळे सांगावे लागत नाही. 'आंधळ्या कुऱ्हाडासारखी थंडी', 'उब ओरबाडणारी माणसे' या प्रतिमांपासून फुटपाथवरचे जग अधोरेखित होत जाते.''

दलित आत्मकथनांची भाषा मराठी साहित्याला वेगळेपण देते. बोलीभाषा, ग्रामीण भाषा, जातीजमातींची वैशिष्ट्ये मिरवणारी भाषा, नवी शब्दकळा, विशिष्ट हेल, परिसरनिष्ठता क्वचित जातीनिष्ठता, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा, प्रतिके, संस्कृती, शिव्या इत्यादी साऱ्याच वैशिष्ट्य पूर्णतेमुळे दलित आत्मकथनाची भाषा निराळी ठरली आहे. बाबुराव बागूलांनी प्र. ई. सोनकांबळे यांच्या आत्मचरित्रातील कारुण्य जागतिक वाटते. त्यातील वेदनेचे व दुःखाचे स्वरूप जागतिक सत्याचे वाटते. हा खरे तर दलित आत्मचरित्राचा गौरव आहे. प्र. ई. सोनकांबळे आपल्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात लिहितात, "पोरं बोलायचे न्हाईत. कारण सगळे वाण्याचे, जंगमाचे व बामणाचे हायचे. ते फुगून गेल्यावाणी करायचे. ते लई इटाळ मानायचे. माजा जीव लिव्हण्यापाई तुळतुळ तुटायचा" किंवा 'मर थोडीच कुणाची चोरी करत होतो. फक्त तहान लागली म्हणून पिढयानपिढया रस्त्यावर असलेल्या चेलम्याचे (डबक्याचे) पाणी पीत व्हतो. ही आणि अशी सर्व आत्मकथनभर विखुरलेली भाषा नवगाव, अहमदपूरपासून लातूरपर्यंतच्या बोलीच्या खुणा वागवताना दिसते. प्रा. योगेंद्र मेश्राम हे प्र. ई. सोनकांबळे यांच्या भाषेबद्दल म्हणतात. "त्यांची आबडधोबड मायबोलीतून (महारी) आलेली भाषा मूळ अनुभव जिवंतपणे व्यक्त होण्यास कारण झाली आहे. सालंकृतभाषा वापरून त्यांनी कुठेही भाष्य केले नाही किंवा प्रसंगांनी गडद-गहिरे असे रंगही भरले नाहीत."

याचाच अर्थ असा की साधेपणा हाच प्र. ई. सोनकांबळे यांच्या भाषेचा गुण आहे. हाच साधेपणा पुढे 'माझ्या जल्माची चितरकथा, बलुतं, गावकी, मरणकळा, अंतःस्फोट, जिणं आमुचं, उपरा, उचल्या, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, तराळ अंतराळ, फांजर, आभाळाने पाय पोळले, काट्यावरची पोटं, माझी वाकळ, जातीला जात वैरी, कथा माझ्या जल्माची (नामदेव व्हटकर), गबाळ (दादासाहेब मोरे), मिटलेली कवाडे (मुक्ता सर्वगोड), तीन दगडांची चुल (बिमल मोरे), मला उध्वस्त व्हायचयं, (मल्लिका अमरशेख) आमचा बाप आणि आम्ही (नरेंद्र जाधव), गँगमन (सदानंद पुंडगे), घडई ( दाजिबा रायभोळे), बाप्तिस्मा ते धर्मांतर इत्यादी आत्मकथनांच्या भाषेचा गुण राहिला आहे. उत्तम कांबळे यांचे 'वाट तुडवताना' हे आत्मकथनही याअनुषंगाने महत्त्वाचे आहे. या आत्मचरित्रात, "दारिद्रय विरूद्ध दारिद्रयात कष्टणारी माणसे, अक्का विरूद्ध अण्णा, आक्का विरूद्ध आजी, दारिद्रय विरूद्ध अण्णा / उत्तम कांबळे / भिकारी/वेश्या, शोषक व्यवस्था विरूद्ध रपवड झालेली माणसे, प्रभुत्त्व संपन्न अधिसत्ता विरूद्ध शोषिताचे जग, नैतिक संवेदनविरूद्ध अनैतिक संवेदनहिनता, स्वार्थप्रेरीत शासन व्यवस्था विरूद्ध अन्यायग्रस्त माणसे अशा अनेकविध संघर्षाची रूपे आविष्कृत केली आहेत." (निवडक उत्तम कांबळे प्रल्हाद जी. लुलेकर, पृ. ३१) पण ही आत्मकथा वाचनीय होते ती त्याच्या भाषेमुळे, लेखकाची आई आणि त्याचे बालपण या अवकाशात जी भाषा येते ती बोलीभाषा होय.

विमल मोरे या भटक्या विमुक्त गोंधळी जमातीत जन्मल्या आहेत. अज्ञान अंधश्रद्धांच्या गर्तेत अडकलेल्या व रूढी परंपरांच्या चक्रात गुरफटलेल्या या समाजात बालपणापासून अन्याय, अत्याचार, अगतिकता, अवहेलना सहन करीत त्या मोठया झाल्या. या जमातीमध्ये स्त्रियांचे जीवन हालअपेष्टा सहन करणारे असते, असे त्या म्हणतात. आपले आयुष्यही इतर स्त्रियांसारखेच भोगवाटा भोगत जाईल वाटत असतानाच त्यांचे लग्न दादासाहेब मोरे यांच्याशी होते. ते विमलमधील न्यूनगंड घालवून आत्मविश्वास, स्वाभिमान आणण्यासाठी प्रयत्न करतात. दादासाहेबांच्या सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते साहित्यिक आणि विचारवंत यांच्या कार्याचा प्रभाव पडत विमलमध्ये आमुलाग्र बदल होतो. 'मी माझे कुटुंब' एवढ्यापुरता विचार करणारी विमल समाजाचा विचार करू लागते. दादासाहेबाच्या समाजकार्यामुळे खूप ओढताण होते पण विमलने बिनतक्रार सर्व सहन केले. दादासाहेबांच्या सामाजिक चळवळीत आजही विमल भटक्या-विमुक्त स्त्रियांसाठी कार्य करताना दिसतात.

## ३.५ दलित साहित्याची निवेदन शैली

दलित साहित्यातील आत्मकथनांच्या निवेदन शैलीत वेगळेपण दिसून येते. बोलीभाषेचा अधिक वापर करत हे निवेदन कथानकाच्या किंवा आशयाच्या अनुषंगाने आलेले आपल्याला दिसून येते. वासुदेव मुलाटे हे बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथानातील निवेदन शैलीबद्दल बोलताना म्हणतात की, "त्यांची निवेदन शैली ही लेखनानुगामी असण्यापेक्षा कथनानुगामी अधिक आहे. कथनाचाच तिला अधिक बाज आहे. ग्रामीण दलितांच्या बोलीचा अकृत्रिम वापर त्यांनी केला आहे. दलितांच्या जीवनातील नित्याच्याच प्रसंगातून त्यांच्या जीवनातील अपार दारिद्रय आणि करुणामय जिणे त्या सहजपणे मांडतात. हे मांडताना त्यांनी कुठलीही 'पोज' घेतलेली नाही. त्यामुळे कारुण्य,

मिस्किलपणा, उपहास आणि भाष्य यांचे बेमालूम मिश्रण त्यांच्या निवेदनात आढळते." उदा.

"लुगडं लेकीजवळ, सुनेजवळ धुण्यास द्यावं. त्याला म्हणतानी लुगडं म्हणायचं. नाही तर चक्क तिरंगा झेंडाच तो. एका धडक्याला तीन चार धडपी जोडून केलेलं ते महावस्त्रच असे. (पान १६).

"---मढं सरणावर ठेवलं की वरचा कपडा बाहेर काढून फेकत. महार दुधाला मांजर टपल्यागत त्या दोन बांबूला आन् मढयावरील कपडयाला टपून बसत. मढं जळून माणसं उठून गेली की महारांनी पितांबराचं दान मिळाल्यासारखं कफन दान घ्यावं. ते दोन बांबू, कफनाचा कपडा ही महाराची हक्काची जायदाद होती. (पान ७९) 'आमुशा म्हणजे आईची रेड जत्रा. जत्रा म्हणजे म्हारांना मिळालेलं जणू इंद्राच राज्यच." (पान ८०).

## ३.६ दलित साहित्यातील स्त्रियांच्या भाषेचे वेगळेपण

दलित साहित्यात स्त्रियांनी देखील आपले महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बेबी कांबळे, हिरा बनसोड, उर्मिला पवार, प्रज्ञा पवार यांचे साहित्य महत्त्वाचे आहे. 'चौथी भिंत, 'सहावं बोट' आणि 'हाताचा एक' हे उर्मिला पवार यांचे महत्त्वाचे तीन कथासंग्रह आहेत. या संग्रहातील कथांमधून आलेली भाषा ही संपन्न, समृद्ध तितकीच लालित्यपूर्ण आहे. कोकण आणि मुंबईच्या परिसरात उर्मिला पवार यांचे व्यक्तीमत्त्व फुलले आणि बहरले आणि म्हणूनच त्यांच्या कथेत या प्रदेशातील भाषांचा प्रभाव दिसून येतो. दलित आणि स्त्रीसंबंधी कथानके अशा दुहेरी अनुभवाचा अवकाश कवेत घेत त्यांची कथा अवतरते.

स्त्री संबंध कथानके आणि ‘स्त्री’केंद्री आशय व्यक्त करताना त्यांची भाषा हळवी होते तर दलित जीवनास मांडणाऱ्या त्यांच्या कथांतून त्यांची भाषा प्रगल्भ आणि विचारप्रवर्तक बनते. त्यांच्या कथा आकाराने फार विस्तारशील नाहीत त्यामुळे त्या उत्कंठावर्धक व वाचकाचे कुतूहल वाढवत नेणाऱ्या झाल्या आहेत. भाषिक वैशिष्ट्यांचा वापर, सहजपणे येणारी प्रतिमासृष्टी इत्यादीमुळे त्यांची भाषा लालित्यपूर्ण झाली आहे. पण ती लालित्यात रमत नाही त्यामुळे कथा आशयावरील त्यांची पकड सैल होत नाही. उदाहरणार्थ, "सर्वांच्या नजरा भरल्यासारख्या ज्योतीवर खिळल्या होत्या. त्या काल्यात अडकून तिचं हृदय रक्तबंबाळ झालं होतं. कुणाला दाखवणार होती ती ते रक्ताळलेलं हृदय अन आता आयुष्यभर सोबत करणारं ते शल्य!" (सहावं बोट, उर्मिला पवार, पृ. ९) 'पूर्वीचा प्रसन्न बोलका चेहरा सुकलेल्या वांग्यासारखा दिसत होता' (सहावं बोट, पृ. १३) 'ज्या गोष्टीचं कौतुक पारिजातकाच्या फुलासारखं प्रत्येकाच्या तोंडातून टपटप खाली पडणार होतं' (सहावं बोट, पृ. १३) 'विहिरीपासून केळीपर्यंत आणून सोडलेलं पाटाचं पाणी केळीच्या पावलांना गुदगुल्या करीत स्वच्छंद बागडत होतं! (सहावं बोट, न्याय, पृ. २५) 'अन तू मात्र धारेत भिजून न भिजलेल्या कोरडया अलिप्ततेनं बघत होतास कुठेतरी, काय होतं तुझ्या त्या हारवलेल्या नजरेत? मी हृदय खोलून बोलत होते तुझ्याशी आणि तू सिलबंद हृदय घेऊन मरखासारखा उभा' (कोश - सहावं बोट, पृ.४३). 'त्यांच्या सर्वांगावर रोमांच फुलले होते त्याने हलकेच हात उंचावून अधोवदन अंजुमच्या घुंघटाकडे नेले, जणू तो आपल्या सुखी संसाराची बंद कवाडेच उघडीत होता.... सुरूंग उडताच खडकाचे टवके धडाडकन दूर उडावेत तसे आपले हात बाजूला करीत तो ओरडलाच.... सुख स्वप्नात दंग असतानाच

अचानक सापाचं भलंमोठं धुड अंगावर कोसळावं तशी अंजुमची स्थिती झाली' (अंजुम, सहावं बोट) इत्यादी अवतरणे उर्मिला पवार यांच्या कथांतील लालित्यपूर्ण भाषेची उदाहरणे ठरावीत कल्पनात्मकता प्रतिमा-प्रतिकांचा सूचक वापर उर्मिला पवार आपल्या कथेत करतात. त्यामुळे त्यांची कथा स्त्रियांची वेदना, दु:ख मांडते. त्याचबरोबर शोषणाची व्यवस्था स्त्रियांना गुलाम म्हणून जे दुय्यम स्थान देते त्या व्यवस्थेचा चेहरा उर्मिला पवार आपल्या कथेत अधोरेखित करतात. डॉ. माया पंडित यांनी दलित स्त्रियांच्या भाषेसंबंधी आपले मत मांडताना म्हंटले आहे की, "एक नवे भाषिक क्षितिज दलित आणि नवबौद्ध लेखिकांच्या लिखाणातून व्यक्त होते. अगदी अलीकडच्या काळातील सुनीता बोर्डे यांची "फिंद्री" ही कादंबरी तथा आत्मचरित्र त्या दृष्टीने फार उल्लेखनीय आहे. त्यांच्या लेखनातून स्त्रीभाषेची अनेक प्रादेशिक आणि कणीदार. कंगोरेदार रूपे सामोरी येतात जी 'सभ्य' भाषेत सहसा वापरली जाणार नाहीत. हे खास दलित स्त्रियांचे एक वेगळे भाषिक विश्व त्या आपल्यासमोर आणतात."

## ३.७ दलित साहित्यातील म्हणी–वाक्यप्राचार

लोकजीवनात प्रचलित असलेल्या म्हणींची, वाक्प्रचारांची अर्थवाहकता विलक्षण असते. शब्दजतन करण्याची वा सुचलेले काही शब्दात बांधून त्याला चिरंतनत्त्व देण्याची सोय नसलेल्या काळातील जीवनार्थ अल्पाक्षरे म्हणी, वाक्प्रचारातून लोकपरंपरेने जपले. म्हणींची निर्मिती सहजतेने होत नसते. निरीक्षण, परीक्षण, मूल्यमापनाच्या कसोटयांमधून तिचा प्रवास होतो. तिची अर्थप्रतिपादकता, रमणीय आणि अल्पाक्षरत्व गुणांमुळे त्या स्मरणसुलभ होतातच पण काव्यमयही होतात, नव्हे असाक्षरांच्या जीवनचिंतनातून स्फुरलेल्या त्या कविताच होत, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक म्हणी-वाक्प्रचार उर्मिला पवार यांच्या 'आयदान' आत्मकथनामध्ये आल्या आहेत. उदा. 'कोण रे भांडतात...? नाही ते महार जेवतायत......', 'रांडवलीच्या पोराची आली पाली नि देणाराच्या हातावर झाली पुली', 'कुडा मांडा खाय त्येचा दांडा उभा हाय', 'आयनाच्या बायना घेतल्याशिवाय जाईना', 'सन गेला सरून नि आंदल्याला आलं भरून', 'जेव रे जावया सासूच्या सेवया', 'नवरा म्हणाला रांड तं जग म्हणतं सांड', 'घटाय खाय मिठाय नि गरिब खाय गचकाली', 'रांड झाली येसवा तं काय करील पेसवा' यांसारख्या म्हणींना जातीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ आहेत. त्यात उपहास आहे. उपदेशपरता, बोध आणि विरोधाभास आहे. 'आडवा घालणे', 'इयाटानं शिपणे', 'काळजाच्या सुपाऱ्या घशाशी येणे', 'मांडीचा काळोख करून जेवणे' इत्यादी अर्थपूर्ण वाक्प्रचारही 'आयदान' मध्ये येतात. त्यातही शिकवण, उपदेश आहेच. या म्हणी विशेषतः स्त्रियांच्या तोंडी येतात. त्यातील बिनधास्तपणा प्रथमदर्शनी खटकतो पण कोकणी बोली स्त्रियांच्या जीवनाशी त्याचा स्वाभाविक संबंध लक्षात घेतला की शब्द वापरातील अपरिहार्यता आणि त्यांच्या भाषिक स्वाभाविकतेबद्दल बोलण्याची गरज उरत नाही.

## ३.८ दलित साहित्यातील प्रादेशिक भाषा

दलित आत्मकथनांतून येणारी भाषा नवे भाषिक पर्यावरण घेऊन अवतरते. प्रत्येक आत्मकथनात नवी भाषा आणि भाषिक परिसर घेऊन येते. त्यामध्ये प्रामुख्याने

**कोकण विभागात**

१. ढगा आडचा चंद्र (सातार्डा, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग),

२. मु. पो. देवाचे गोठणे, कळा त्या काळाच्या (सोगमवाडी, ता. जि. रत्नागिरी),

३. रमाकांतच्या आठवणी (काळिंजे, जि. रायगड),

४. आमचा बाप आन् आमी (मुंबई),

५. जगायचंय प्रत्येक सेकंद (मुंबई)

ही आत्मकथने येतात. तर

**पश्चिम महाराष्ट्र मधील**

१. कोडाळं (सातवणे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर),

२. तीन दगडांची चूल (कळंबा, पाटील झोपडपट्टी, कोल्हापूर),

३. कथा माझ्या जन्माची (माले-मसूद, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर),

४. फिरस्तु (इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर),

५. तराळ-अंतराळ (आटपाडी, जि. सांगली),

६. फांजर (माडगूळ, ता. आटपाडी, जि. सांगली),

७. टाच (नागेवाडी, ता. खानापूर, जि. सांगली),

८. खिंडार (खैराव, ता. जत, जि. सांगली),

९. जिणं आमुचं (वीर, ता. पुरंदर, जि. पुणे),

१०. उपरा (निरगुडी, ता. फलटण, जि. सातारा),

११. माझ्या जल्माची चित्तरकथा (महूद बु., ता. सांगोला, जि. सोलापूर),

१२. गबाळ (बावची, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर),

१३. अक्करमाशी (बासलगाव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर),

१४. आभरान (केम, ता. करमाळा, जि. सोलापूर),

१५. कोल्हाट्याचं पोर, मी डॉक्टर झालो (नेलें, ता. करमाळा, जि. सोलापूर),

१६. जातीला जात वैरी (सोलापूर),

१७. अगा जे कल्पिले नाही (हंगे, ता. पारनेर, जि. अहमदनगर),

१८. बलुतं (धामणगाव, ता. अकोला, जि. अ. नगर),

१९. झळा (बोरी, ता. अकोला, जि. अ. नगर), हेडया (सावरगाव पाटाचे, ता. अकोला, जि.अ.नगर),

२०. हातोडा (धुमाळवाडी, ता. अकोला, जि. अ. नगर),

२१. ख्रिस्ती महार (उंबरे, ता. राहुरी, जि. अ.नगर),

२२. सोनजातक (अहमदनगर), काट्यावरची पोटं (घायपातवाडी, बेलवंडी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर),

२३. ढोर (खर्डा, ता. जामखेड, जि. अ.नगर),

२४. तीन दगडांची चूल (जामखेड, जि. अ.नगर),

२५. मरणकळा (सांगवी, खेर्डे, ता. पाथर्डी, जि. अ.नगर),

२६. मिटलेली कवाडे (पुणतांबे, ता. कोपरगाव, जि. अ.नगर),

२७. रात्रंदिन आम्हा (नाशिक),

२८. अस्मादिक (देवळाली रोड, नाशिक),

२९. दगड फोड्या (गाव नाही; पण भटकंती कराड, पुणे-कोकण)

ही आत्मकथने आहेत.

**खानदेश मधील**

आदोर (बोढरे पाडा, ता. साक्री, जि. धुळे) ही आत्मकथने आहेत.

**मराठवाडयातील**

१. दे दान सुटे गि-हान (वैजापूर, जि. औरंगाबाद),

२. पाचट (खंडाळा, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद),

३. भटक्या (गोल्लवाडी, जि. औरंगाबाद),

४. गावकी (मानेगाव, जि. जालना),

५. मी एक अस्पृश्य (मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद),

६. वादळ (रोसा, ता. परांडा, जि. उस्मानाबाद),

७. टाबरो (गंधोर, बरमटेकडी तांडा, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद),

८. आठवणींचे पक्षी (सुल्लाळी, ता. उदगीर, जि. लातूर),

९. महाराजा वकील (बेळसंगी, ता. अहमदपूर, जि. लातूर),

१०. धुळपाटी (धानूरं, ता. अहमदपूर, जि. लातूर),

११. उचल्या (धनेगाव, जि. लातूर),

१२. आयरनीच्या घना (रांकोळ, ता. मुखेड, जि. नांदेड),

१३. झुंज (शेलगाव, ता. भोकर, जि. नांदेड),

१४. बावळट (कोपरा, ता. किनवट, जि. नांदेड)

ही आत्मकथने आहेत. इत्यादि आत्मकथानामध्ये प्रदेश आणि त्याठिकाणची बोली भाषा आलेली आहे.

## ३.९ दलित साहित्यात आलेले नवे शब्द

मराठीला अपरिचित असे अनेक नवीन शब्द दलित साहित्याने दिलेले आहेत. उदा. "उरकुंड" (वशिंड), "बळळ" (चरबी), "कोपिस" (स्वादुपिंड), "पारकंड" (जठर), "डिल्ल" (हृदय, फुप्फुस), काळीज, बोका, आतड्या, भेजा, खूर, ठोणा, मासकंड, चाण्या, सागूती, डल्ल्या, पड (मेलेलं जनावर) असे काही शब्द हे मेलेल्या/कापलेल्या जनावराच्या निमित्ताने खास महारी बोलीत येतात. ("अक्करमाशी" पृ.२०, ४६)

शरणचे मानलेले आजोबा (दादा) महामूद जमादार दस्तगीर हे मुसलमान असल्याने आणि शरण त्यांच्या सहवासात बराच काळ राहिल्याने साहजिकच मुसलमानी शब्दांचाही वापर लिंबाळे यांच्या आत्मकथनांत होताना दिसतो. उदा. डोला, देवतांची नावे हैद्रीखाजा, बंदेनवाज, हाजिमलंग, लगीनशा, अल्ला, बिस्मीला, मौला, रमजानचा ईद, मस्जिद, नमाज, शूरखुर्मा ("अक्करमाशी" पृ. २७,९४) हड्डी मत डालो, मुल्लाची अजान, ईदचा चांद ("बारामाशी" पृ.२८,९६) यांसारख्या शब्दप्रयोगांमुळे व्यक्तिचित्ररेखाटन स्वाभाविक बनले आहे.

तसेच लिंबाळे महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमाभागात वावरल्याने त्यांच्या लेखनात काही कानडी शब्ददेखील येतात. उदा. ग्वलं, ईसकी (किळस), हेसकी (वास येणे), गुंडगे (पाण्यासाठी जमिनीत खणलेले लहान लहान खड्डे), माळवद (इमारत, इमला), चाकरी (नोकरी), ईड (मदत), हिबाळणे (भिरकावणे) ("अक्करमाशी" पृ.१५, १६, २४)

शंकरराव खरातांच्या 'तराळ-अंतराळ' मधून आपणास त्यांच्या आटपाडी औंध या भागातील ग्रामीण महारी भाषेतील काही शब्द वाचावयास मिळतात, ते पुढीलप्रमाणे –

(१) तडकी – दार,

(२) कनात पडदा,

(३) शिकुरी - मातीची बशी,

(४) गंमत- तमाशा,

(५) मढं होणं- निर्जीव होणं,

(६) उगराट- रानटी,

(७) कडाण – रस्ता,

(८) म्हारोडा – महारवाडा,

(९) गोळ्यामोळ्यानं – एकोप्याने,

(१०) भावकी भाऊबंदकी

ऊर्मिला पवार यांच्या 'आयदान' मधून कोकणातल्या महार समाजातल्या नेहेमीच्या बोलीभाषेतले खूप मार्मिक शब्द येत जातात. जे शब्द देशावरच्या लोकांसाठी खूप नवे वाटतात. उदाहरण म्हणून काही शब्द पुढे दिले आहेत.

१) खाजकं – खाऊ,

२) खारकुंड्या पक्षांनी बोचलेले हापूस आंबे,

३) कोलीम- सुका जवळा,

४) चडू - बारीक माशे,

५) गचयाली – गचांडी,

६) गस्ताली - गेल्या वर्षी,

७) शेलते – छळते,

८) वरणे – पावटे,

९) तिसऱ्या- मुळे (शब्द खाली क्रमवारीने यावा),

१०) तेरसा शिमगा - फाल्गून महिन्याच्या अमावस्येपासून तिसऱ्या दिवशी होळी पेटवून शिमगा साजरा केला जातो,

११) मुहूर्तवळ्या - लग्नात पाच कुमारीका लग्न होईपर्यंत कडकडीत उपास धरतात व सगळे विधी संपल्यावर त्यांना माना-सन्मानाने पाटावर बसवून जेवू घातले जाते,

१२) रंडकी सूज - नवरा गेल्यावर, त्याच्या मानसिक काचातून सुटल्यावर काही बायका अंगापिंडाने थोडया भरतात,

१३) बावस्तो – खांदा,

१४) मिरशांगो - सुक्या मिरच्या,

१५) इयालय – व्याले,

१६) मिलोची भाकरी – तांबडया जोंधळ्याची,

१७) दंत – जंत इ.

## ३.१० समारोप

दलित साहित्य हा मराठीतील एक महत्वाचा साहित्य प्रवाह आहे. दलित साहित्यामध्ये विविध प्रदेश, समाज, जाती यांच्या भाषा आणि भाषेचे विविधांगी रूप आलेले आहे. दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून भाषेचे वेगळेपण अधोरेखित झाले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने म्हणी–वाक्यप्रचार यांची समृद्धता आपल्याला दिसते. दलित साहित्याची भाषा ही वेदना, विद्रोह आणि नकाराची भाषा आहे. दलित साहित्याची भाषा हे नव्या भाषा अभ्यासकांसाठी महत्त्वाचे दालन खुले झाले असून ते मराठी भाषेला अधिक समृद्ध करत आहे.

## ३.११ संदर्भ ग्रंथ


- मालशे – स. ग., आधुनिक भाषाविज्ञान सिद्धांत आणि उपयोजन
- नेमाडे भालचंद्र, साहित्याची भाषा
- भवरे महेंद्र, दलित कवितेतील नवे प्रवाह
- डॉ. गायकवाड संपत, दलित आत्मकथने भाषिक समाज: भाषा आणि भाषा व्यवहार
- गरुड श्यामल, दलित स्त्री आत्मकथने
- डॉ. पंडित माया, स्त्रियांचा भाषिक व्यवहार


## ३.११ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. भाषा म्हणजे काय हे स्पष्ट करून दलित साहित्याच्या भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

२. दलित आत्मकथनातील भाषेचे स्वरूप आणि वैशिष्टये उदाहरणांसहित स्पष्ट करा.

३. दलित साहित्याने मराठी भाषेला दिलेल्या योगदानाची चर्चा करा.

**ब) टिपा.**

१. भाषा म्हणजे काय?

२. दलित कवितेची भाषा

३. दलित स्त्रियांच्या आत्मकथनातील भाषेचे वेगळेपण

*****

# ३इ

# दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र (स्थूल परिचय)

**घटक रचना**


३.० उद्देश

३.१ प्रस्तावना

३.२ 'दलित' व दलितत्त्वाचा अर्थ

३.३ दलित साहित्याच्या व्याख्या

३.४ दलित साहित्य : बौद्ध विचार आणि आंबेडकरवाद

३.४.१ भगवान बुद्ध

३.४.२ आंबेडकरवाद

३.५ दलित साहित्याचे स्वरूप, जाणीव, वैशिष्ट्ये

३.६ दलित साहित्य समीक्षा व दलित समीक्षक

३.७ दलित साहित्य आणि मार्क्सवाद

३.८ दलित साहित्य समीक्षकांनी दलित साहित्याच्या संदर्भात घेतलेल्या भूमिका

३.९ मराठी समीक्षकांनी केलेली दलित साहित्याची समीक्षा

३.९.१ मराठी साहित्याचे सौंदर्यशास्त्र

३.९.१.१ आनंद हे सौंदर्यमूल्य

३.९.१.२ सौंदर्यशास्त्र आणि दलित साहित्य

३.१० दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र

३.११ दलित काव्यातील सौंदर्य

३.१२ समारोप

३.१३ संदर्भ ग्रंथ

३.१४ प्रश्नावली


## ३.० उद्देश

- 'दलित' व दलितत्त्वाचा अर्थ विद्यार्थ्यांना समजेल.
- 'आंबेडकरवाद' ही संकल्पना विद्यार्थ्यांना समजेल.

- दलित साहित्य समीक्षकांनी दलित साहित्याच्या संदर्भात घेतलेल्या भूमिका जाणून घेता येईल.
- दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र विद्यार्थ्यांना समजेल.
- मराठी समीक्षकांनी केलेली दलित साहित्याची समीक्षा विद्यार्थ्यांना समजण्यास सोपे होईल.

## ३.१ प्रस्तावना

प्राचीन काळी भारतात अनेक वंशाचा आणि संस्कृतीचा जो संघर्ष झाला, त्यामधून जातिसंस्थेचा उदय झाला. निरनिराळ्या मानववंशाचा येथे झालेला संकर, मातृप्रधान व पितृप्रधान कुटुंबपद्धतीचा संघर्ष, कारागिरांच्या श्रेणी आणि आपल्या सदस्यांवर त्यांनी घातलेले निर्बंध, छोट्या छोट्या सत्ताधिशांनी अमलात आणलेली भिन्न भिन्न शासकीय धोरणे, आणि पुनर्जन्म, कर्म स्त्री-पुरूषसंबंध, यज्ञयाग, सोवळे-ओवळे, जादूटोणा या संबंधीच्या गूढ कल्पना अशा अनेक गोष्टींचा जातिभेदाच्या उत्पत्तीला हातभार लागलेला आहे, असे प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ हटन यांचे मत आहे.

भारतीय संस्कृतीचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे चातुर्वर्ण्य व जातिव्यवस्था हे होय. विषमता व भेदभावाची जननी जातिव्यवस्था होती. त्यामधून शूद्रवर्णांच्या शेकडो जाती, पोटजाती निर्माण झाल्या. या जातिव्यवस्थेला हिंदू धर्मशास्त्राने चिरंजीवी रूप प्राप्त करून दिले. पुढे शूद्र-अतिशूद्र बहुजन समाजाचे जीवन हे ‘दलित जीवन’ म्हणून धर्मशास्त्राने कायम केले. जातिसंस्थेमुळे माणसाची किंमत गुणावरून न ठरता ती जातीवर्णावरून ठरविण्यात आली. श्रमाची विभागणी न होता श्रमिकांचीच विभागणी झाली. जातिवरून धंदा व धंद्यावरून जात ओळखण्याचा प्रघात पडला. जाती-जातीचे वेगवेगळे गट आणि स्वतंत्र समूह निर्माण झाले. जातिविषमतेप्रमाणे वरिष्ट जातीने कोणते हक्क व अधिकार उपभोगावेत आणि कनिष्ठ जातींनी त्यांची कोणत्या प्रकारे सेवा करावी, हे ठरले. शूद्रांवर सेवाचाकरीचा कायमचा बोझा लादला गेल्यामुळे वरिष्ठांची सेवा करणे आपले कर्तव्य आहे. त्यासाठीच आपला जन्म आहे. आपल्या मागच्या जन्माचे व कर्माचे हे फळ आहे. अशा भावना त्यांच्यात निर्माण झाल्या. आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या समाजात हीन ठरला व गुलाम झाला. त्याला शिक्षण आणि संस्कृतीची दारे बंद झाली. अस्पृश्य समाजाला वर्णबाह्य नव्हे, तर जन्माने जातिबहिष्कृत व अपवित्र ठरवून त्याला गावाच्या बाहेर राहण्यास आणि निकृष्ट असे जीवन जगण्यास जातीवर्ण व्यवस्थेनेच भाग पाडले.

## ३.२ ‘दलित’ व दलितत्त्वाचा अर्थ

भारतीय समाजव्यवस्थेत ‘दलित’ या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. त्या शब्दात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक असा सगळा आशय अंतर्भुत आहे. अत्यंत विषम मूल्यांवर आधारलेल्या नि पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय समाजव्यवस्थेत तिने आखून दिलेल्या चाकोरीप्रमाणे जीवन कंठणारे कर्मदरिद्री, धनदरिद्री, असंघटित व म्हणून

शक्तीहीन, पैसाहीन, शस्त्र व सत्ताहीन, ज्ञानदरिद्री, लाचार, दीन-दुबळे असे जे लोक ते सर्व 'दलित' होत.

'सामाजिक जाणिवेच्या दृष्टिकोणातून 'दलित' या शब्दप्रयोगात हिंदू धर्माने व संस्कृतीने अस्पृश्य या जातीचा समावेश होतोच. पण याशिवाय आदिवासी विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांना जन्माने, जातीने, धंद्याने तसेच परंपरागत रूढीने दूर बहिष्कृत, अस्पृश्य म्हणून ठेवले. रानटी, भटके, गुन्हेगार म्हणून ठेवले, त्यांना माणसाप्रमाणे मानले नाही त्यांचा सामाजिक दर्जा खालचा, कमी प्रतीचा ठरवला तसाच मानला. या सर्व जाती जमातींचा समावेश दलितांमध्ये केला असे श्री.शंकरराव खरात लिहितात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, "दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि रेटलेला सामाजिक वर्ग आहे."

डॉ.म.ना.वानखेडे यांच्या मते, "दलित म्हणजे केवळ बौद्ध अथवा मागासवर्गच नव्हे, तर जे पिळलेगेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व दलित." श्री.बाबुराव बागूल यांच्या मते, "दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा, त्याचे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा, या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत तो" असा क्रांतिकारी अर्थ श्री.बाबुराव बागूल यांनी दिला आहे.

थोडक्यात, 'दलित' ही एक उत्क्रान्त होत असलेली अवस्था आहे. ही दलित जाणीवच दलित साहित्याचे वेगळेपण राखते. ती जाणीव सामाजिक अवस्थेचे भान देते. त्याला सामाजिक क्रांती संदर्भाचे सामर्थ्य प्राप्त करून देते.

दलित जीवनाचे चित्रण करणारा तो दलित साहित्यकार होत. दलित जातीत जन्माला आलेली व्यक्ती व तिने लिहिलेले आपल्या जातीचे साहित्य तेच दलित साहित्य होय.

## ३.३ दलित साहित्याच्या व्याख्या

* **डॉ. म. ना. वानखडे :** 'दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य.'

* **श्री. बाबुराव बागूल :** 'माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य.'

* **प्रा. गंगाधर पानतावणे :** दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तीसंग्राम आहे. स्वत:ला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात माझे असे चित्र कोणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य. तो कोंडलेल्या मनाचा हुंकार आहे.

* **श्री. राजा ढाले :** 'जो जो या समाज रचनेविरूद्ध आणि सांस्कृतिक व्युहाविरुद्ध लढणारा दृष्टिकोन घेऊन साहित्य - निर्मिती करील आणि वाट चुकलेल्या समाजाला

वाटेवर आणील तो तो दलित साहित्यिक असेल आणि त्याचे साहित्य हे दलितांच्या दृष्टिकोणातून लिहिलेले असेल.

या व्याख्या 'दलित' या माणसाभोवती गुंफलेल्या त्यालाच केंद्र मानणाऱ्या आहेत. यामधून दलित साहित्याच्या प्रेरणा-प्रयोजने, उद्दिष्ट, प्रवृत्ती-प्रेरणा, दृष्टिकोण, विशिष्ट समाजिक बांधिलकी यातून एकूण दलित जाणिवेचे चित्रण करणाऱ्या आहेत.

## ३.४ दलित साहित्य : बौद्ध विचार आणि आंबेडकरवाद

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला. बाबासाहेबांच्या धर्मांतरामुळे दलितांनी हिंदू धर्माचा त्याग केला. हिंदू देव-देवता नाकारल्या. हिंदू धर्मातल्या प्रथा, रूढी नाकारल्या. गावकीची कामे सोडून दिली. त्यामुळे सवर्ण आणि दलितांमध्ये नवी तेढ निर्माण झाली. या धार्मिक उलथापालथीतून दलितांना सत्त्व मिळाले. त्यांच्यात नवी चेतना जागृत झाली. या सांस्कृतिक संक्रमण काळातच दलित साहित्य चळवळने मूळ धरली. बौद्ध विचारप्रणाली बरोबर आंबेडकरी विचार प्रणाली दलित साहित्यात डोकाऊ लागली.

### ३.४.१ भगवान बुद्ध :

भगवान बुद्धाने 'स्वर्ग' ही कल्पना मानली नाही. जातिभेद, कर्मकांड, यज्ञयाग, मूर्तिपूजन, परमेश्वर यांना मानले नाही. पशूवधाला नकार दिला. त्याने माणसातील महानतेचा गौरव केला आणि मानवसमाजाचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, मानसिक असे सम्यक परिर्वतन घडवून अखिल मानव समाजाचे सर्वांगीण उत्थान साधले. समता, बंधुता, न्याय, नीतिमत्ता व स्वातंत्र्य या सामाजिक लोकशाही मूल्यांचा स्वीकार केला. विज्ञानाधिष्ठित बुद्धीप्रामाण्याचा पुरस्कार केला. दु:खाचे, पिळवणुकीचे, शोषणव्यवस्थेचे, अमानुषतेचे गमक असलेल्या जातिभेद व अस्पृश्यतेचा सर्व सामाजिक विषमतेचा बुद्धाने धिक्कार केला व त्यांचा धिक्कार न करणाऱ्या ईश्वराला त्याने नाकारले. या बौद्ध विचारांचा, बौद्ध धर्माचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकार केला. दलित समाजाने या बौध्द विचारांचा स्वीकार केल्यामुळे व त्यांच्या साहित्याला एक तात्त्विक बैठक लाभली.

### ३.४.२ आंबेडकरवाद :

आंबेडकरवाद हा मानवी मूल्यांवर आधारलेला मानवतावाद आहे. तो भक्कम अशा बुद्धिवादावर उभा आहे. बुद्ध-तत्त्वज्ञान त्याची मूळ बैठक असल्याने विज्ञान, विवेकनिष्ठ विद्रोह आणि विश्वात्मकता ही त्याची अंतर्धारणा व ध्येय आहे. म्हणूनच भगवान बुद्धाप्रमाणे आंबेडकरवादाने पोथीनिष्ठा, ग्रंथ प्रामाण्य, बुवाबाजी, विभूतिपूजा, अंधश्रद्धा आदी विरूपे पेरणाऱ्या देवधर्माला, धर्मशास्त्राला नाकारले आहे. आंबेडकरवाद आर्थिक-सामाजिक विषमता, पिळवणूक, अन्याय व सामाजिक शोषणाची यंत्रणा कायम करणाऱ्या वर्ण-जातिव्यवस्थेला, अस्पृश्यतेला, जातीयवादाला व ब्राम्हणशाहीला, भांडवलशाहीला, सामंतशाहीला नाकारतो. आंबेडकरवाद विज्ञाननिष्ठेचा, बुद्धिप्रामाण्याचा, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुभावाचा, लोकशाही समाजवादाचा स्वीकार करतो. आंबेडकरवाद ही माणुसकीने व स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा आहे. आंबेडकरवाद म्हणजे आंबेडकरांचे

संपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे. दलित चळवळीमागील एक संपूर्ण विचार, आचार व उच्चार म्हणजे आंबेडकरवाद. आंबेडकरवाद व बुद्धतत्त्वज्ञान हे दलित साहित्याची प्रेरणा आहेत.

## ३.५ दलित साहित्याचे स्वरूप, जाणीव, वैशिष्ट्ये

अस्पृश्यतेचा अंत आणि नव्या माणसाचा जन्म हे दलित साहित्याचे स्वप्न आहे. दलित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव हा एक मूल्यवान अनुभव आहे. त्या अनुभवाची आदिप्रेरणा 'स्वतंत्रता' ही आहे. धर्मांतरानंतर दलितांना प्रथम स्वतंत्रतेचा अनुभव आला. हा अनुभवच दलित साहित्याचा गाभा आहे. शतकानुशतके त्यांनी भोगलेल्या दु:खाची, त्यांच्यावर केल्या गेलेल्या अन्यायाची ही गाथाच आहे. अन्याय, छळ, अपमान, शोषण या विरूद्ध संताप ते साहित्यातून व्यक्त करतात.

दलित साहित्याने स्वत:च्या अस्तित्वाच्या शोधासाठी विद्रोहाची वाट जाणीवपूर्वक निवडली आहे. 'माणूस' हाच साहित्याच्या केंद्रस्थानी मानून माणूस म्हणून जगण्यासाठी विद्रोह आला आहे. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली वर्णरहित समाजरचना लक्षता घेऊनच दलित लेखक विद्रोह व्यक्त करतात. हा विद्रोह वेदनेचा आहे. समाजातील अनिष्ट प्रवृत्ती, ढोंग, खोटेपणा, अंधश्रद्धा या विरूद्ध आक्रमक पवित्रा घेऊन बंड करायला निघालेले विद्रोही साहित्य आहे.

*** दलित जाणीवेचे साहित्य:**

प्रा. शरदच्चंद्र मुक्तीबोध यांनी दलित जाणिवेचा विचार केला आहे तो असा : 'दलित वाङ्मयाची जाणीव मूल्यगर्भ जाणीव आहे. 'मानवी स्वातंत्र्य' हा दलित वाङ्मयाच्या जाणिवेचा गाभा आहे. विवक्षित सामाजिक वास्तव, याची सुस्पष्ट कारणमीमांसा व वास्तवाच्या परिवर्तनाचा आशावादी दृष्टिकोण त्यात आहे. दलित दृष्टिकोण व त्याबद्दलची तीव्र आस्था म्हणजे दलित जाणीव. दलित जाणीव ही समाज जाणिवेत अनुरूप परिवर्तन करू पाहणारी जाणीव आहे. म्हणूनच ती विद्रोहात्मक, आशावादी व क्रांतिकारी जाणीव आहे.

*** प्रा. गंगाधर पानतावणे** यांच्या मते दलित साहित्य म्हणजे, "माणसाला केंद्र मानणारे दलित साहित्य आहे. त्यामुळे क्रांतिविन्मुखता आणि क्रांतिसन्मुखता यांच्या संघर्षातून निर्माण झालेले दलित साहित्य बंधमुक्त माणसाचा विचार करते.

*** प्रा. यशवंत मनोहर** यांच्या मते दलित जाणीव म्हणजे, - "विद्रोह, मानवमध्यवर्तीत्त्व, अनात्मवाद, अनिश्वरवाद, गतिवाद, ज्ञानविज्ञाननिष्ठा हा सर्व ऐहिक भौतिक बुद्धिवादी असलेला सम्यक विचार हीच दलित जाणीव होय. मानवकेंद्रितता, इहलोकनिष्ठा आणि माणसावर अन्याय करणाऱ्या सर्वच संस्था विरूद्ध विद्रोह असे या जाणिवेचे स्वरूप आहे."

दलित जाणिवेविषयीच्या या सर्व मतांचा विचार करता दलित जाणिवेची प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील :

गुलामीची वा दास्याची जोखड फेकून देण्याच्या मानसिक प्रेरणेतून दलित साहित्य जन्म पावले आहे. म्हणून स्वातंत्र्यकांक्षा ही दलित जाणिवे मागील मूल प्रेरणा आहे.

दलित जाणिवेतून निर्माण झालेले दलित साहित्य आहे. ही जाणीव मूलत: प्रस्थापित मराठी साहित्यात नसलेली नवी जाणीव आहे.

मराठी साहित्याच्या मुळात रूजून असलेल्या सनातनी रूढीच्या जीवनदृष्टीच्या वा मूल्यांच्या विरोधात उभी असलेली दलित जाणीव आहे. धर्म संस्कृती साहित्यातील ग्रंथप्रामाण्य व कर्माविपाकी व्यवस्थेच्या निषेधाची, नकाराची भावना व्यक्त करते.

माणसाचे अवमूल्यन करणाऱ्या सर्व मूल्यांविरूद्ध विद्रोह घेऊन उफाळते आणि भौतिकवाद, इहनिष्ठा स्वीकारते ते केवळ माणसाचे महत्त्व मूल्य उजळ करण्यासाठीच. मानवतेचे मूल्य शिरी घेऊन माणसाला केंद्रवर्तित्व देणारी दलित जाणीव ही वेगळी नवी जाणीव आहे. ती न्यायनिष्ठ आहे. दलित जाणीव समाजपरिवर्तन करणारी सम्यक क्रांतीची जाणीव ठरते. अशा प्रकारे दलित जाणीवेतून एक दाहक जीवनवास्तव, सामाजिक व वाङ्मयीन आविष्काराचा क्रांतिकारी तपशील दलित साहित्य सादर करते.

*** दलित साहित्याची वैशिष्ट्ये:**

- दलित साहित्याच्या जन्मामागे वेगळेपणाची प्रखर जाणीव आहे. तात्विकदृष्ट्या ही जाणीव अधिक भावनाप्रधान आहे.
- दलित साहित्य सामाजिक बांधिलकी असलेले साहित्य आहे. ते संपूर्ण दलित समाजाचे प्रतिनिधित्त्व करते.
- व्यक्तीच्या समाज-संबंधित्त्वाशी निगडित असलेल्या व्यक्तिगत जीवनातील भावनानुभूतींची उत्कट अभिव्यक्ती त्यात आढळते. दलितांच्या सामाजिक चळवळींशी हे साहित्य बांधलेले आहे ते सामाजिक चळवळीचे प्रतिबिंब आहे.
- दलित साहित्य प्रथम त्यांच्या जीवनाचे संपूर्ण दर्शन घडविते. त्यामुळे समाजजीवनाचे वास्तव दर्शन घडविते.
- दलित अनुभव, दलित दृष्टिकोण, दलित जाणीव, त्यांची जीवनदृष्टी व्यक्त करते.
- दलित साहित्य हे त्यांच्या सामाजिक स्थित्यांतराचे प्रत्ययकारी दर्शन घडविते.
- दलित साहित्य हे मानवतावादी साहित्य आहे. नव्या युगाच्या नव्या प्रेरणा देणारे दलितांच्या जीवन उत्थानाचे साहित्य आहे.
- नकार, विद्रोह, बंड दलित साहित्याचे प्रवृत्तीविशेष आहेत. ते सामाजिक क्रांतीची प्रेरणा देते.
- दलित साहित्य सामाजिक चळवळीचाच एक भाग आहे. म्हणून हे साहित्य निर्मितीशील कलावंतांचे सृजनशील साहित्य आहे.
- दलित वाङ्मय प्रेरणा, जाणिवा, दृष्टिकोण, उद्दिष्ट, भूमिका, प्रवृत्ती व प्रगतीची प्रेरणा देणारे आहे. दलित साहित्य नव्या वाङ्मयीन प्रवृत्ती व जाणिवांना उपस्थित करते. नवे

आशय आविष्कारमूल्य, जीवन, सौंदर्य, नव्या प्रतिमा व संकेतादर्श प्रस्थापित करते. नवीन वाङ्मयीन रूपे दलित साहित्य शोधू पाहते.

## ३.६ दलित साहित्य समीक्षा व दलित समीक्षक

दलित साहित्याची निर्मिती झपाट्याने होत असतानाच त्या निर्मितीचा विचार व त्या विचारामागची भूमिका दलित समाजातील काही विचारवंत समीक्षक मांडू लागले. त्यामध्ये डॉ. म. ना. वानखडे, डॉ. भाऊ लोखंडे, दया पवार, राजा ढाले, रावसाहेब कसबे, प्रा.केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, रत्नाकर गणवीर, ताराचंद खांडेकर, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर, बाबुराव बागूल, शंकरराव खरात इ. दलित साहित्य दलित समीक्षकांनी मांडल्या.

## ३.७ दलित साहित्य आणि मार्क्सवाद

दलित साहित्याची आंबेडकरी विचारप्रणालीने समीक्षा करणाऱ्या दलित समीक्षकांमध्ये शंकरराव खरात, गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, दत्ता भगत, ताराचंद्र खांडेकर, राजा जाधव, वसंत मून आदी समीक्षकांचा समावेश होतो, तर दलितेतर समीक्षांपैकी भालचंद्र फडके यांची समीक्षा ह्या प्रकारात मोडते.

दलित साहित्याच्या उदयापासूनच मार्क्सवादी दृष्टिकोनातून दलित साहित्याची समीक्षा केलेली आढळते. दलितांचे प्रश्न केवळ सामाजिक नसून सामाजिक विषमतेबरोबरच आर्थिक विषमताही दलितांचे शोषण करत आहे. त्यामुळे दलितांना सामाजिक आणि आर्थिक अशा दोन्ही आघाडयांवर लढावे लागणार असल्याने दलित लेखकांनी आंबेडकरी विचारप्रणालीसोबत मार्क्सवाद स्वीकारला तरच हा लढा अर्थपूर्ण होईल अशी मांडणी मार्क्स-आंबेडकर विचारांचा समन्वय करणाऱ्या दलित व दलितेतर समीक्षकांनी केलेली दिसते.

दलित लेखक आणि मार्क्सवादी लेखक हे शोषितांच्या शोषणाविरुद्ध भूमिका घेऊन लिहिणारे कलावंत आहेत. त्यांच्या लेखनात बांधिलकी आणि क्रांतीचा उद्घोष होतो. मार्क्स आणि आंबेडकरी विचार हे शोषणविरोधी असल्याने ते एकमेकांना पूरक आहेत म्हणून ह्या दोन क्रांतिकारी विचारात समन्वय झाला पाहिजे अशी या समीक्षकांची भूमिका आहे. अशी भूमिका घेणाऱ्या दलित समीक्षकांमध्ये म. ना. वानखेडे, बाबूराव बागूल, यशवंत मनोहर, अर्जुन डांगळे, रावसाहेब कसबे, दया पवार आणि नारायण सुर्वे यांचा समावेश होतो, तर दलितेतर समीक्षकांमध्ये गं. बा. सरदार, प्र. श्री. नेरूरकर, नरहर कुरुंदकर, सदा कहाडे, वि. स. जोग. सुधीर बेडेकर, दि. के. बेडेकर व शरदच्चंद्र मुक्तिबोध ह्यांची नावे घेता येतील.

## ३.८ दलित साहित्य समीक्षकांनी दलित साहित्याच्या संदर्भात घेतलेल्या भूमिका

*** डॉ. म. ना. वानखडे:**

डॉ. वानखेडे यांची समीक्षा मूल्य संकल्पनात्मक आहे ते वाङ्मयीन मूल्यांवर जास्त भर देतात. कला ही समाजासाठी आहे. पांढरपेशा लेखकांनी आणि समीक्षकांनी ठरविलेली मूल्ये, सिद्धांत, कार्य आणि सौंदर्यांची साक्षेपी मूल्ये दलित लेखकांनी झुगारून दिली

पाहिजेत. दलित साहित्याच्या रूप-आशय - अभिव्यक्तीला महत्त्व दिले आहे. जागृत झालेल्या दलितांनी आपले अनुभव स्वतंत्रपणे मांडावे. दलित साहित्य शतकानुशतके नाकारलेल्या स्वातंत्र्याचाच पुरस्कार करते.

*** शंकरराव खरात:**

शंकरराव खरात दलित साहित्याची विविध अंगांनी चिकित्सा करतात. जीवनातील भाव भावनाच्या आविष्कारातून निर्माण होणारे वाङ्मय हे वास्तववादी व जीवननिष्ठ असते. त्यातून विविध प्रकारच्या साहित्याचा जन्म होतो. त्यात जीवन जाणिवा, आशय, आकार घाट येते. साहित्यिक त्याला येणाऱ्या जीवनानुभवाला जसा येईल तसा आकार देतो. यावर कलावंताचा, व्यक्तिसमूहाच्या प्रेरणाचा, कलाप्रवाहाचा साहित्यनिर्मितीवर प्रभाव पडतो. तसा त्याला रूपरंग येतो. या वाङ्मयाला ते जीवनवादी साहित्य म्हणतात. दलित लेखक त्याच्या कलाकृतीच्या रूपाबद्दल, घाटाबद्दल बेफिकीर असतो, पण ती साहित्यकृती त्याच्या दलितत्त्वाच्या संवेदनातून निर्माण झालेली असते. दलित लेखकांची संवेदना ही मराठी पांढरपेशी समीक्षकांना मुळीच समजली नाही. दलित लेखक आपल्या साहित्यातून त्याच्या अनुभवाचा उत्कट आविष्कार करतो. मानवी जीवनाचे सार्थपण भीषण नाटय त्यात असते. मराठी समीक्षकांनी त्यातील दु:खाचा वरवरचा बालबोध अर्थ लावणे हे अन्यायकारक आहे. दलित समाज दलित व्यक्तीत्वाच्या रूपाने कथा, कादंबरी, नाटय हे केवळ समाजसमूहाची कलाकृती म्हणून लेखन करतो. म्हणून दलित साहित्याची या दृष्टिकोणातून समीक्षा होणे आवश्यक आहे. हा त्यांनी दलित साहित्याचा निकष मानला आहे व अशी मूल्य संकल्पनात्मक समीक्षा केली आहे.

दलित साहित्याची समीक्षा करताना ते म्हणतात, “दलित साहित्यात उत्कटता असून मनाचा ठाव घेणारा व मनाला अस्वस्थ करणारा जिवंत रसरशीतपणा त्यात आहे. दलित साहित्यातील संपन्न मायबोली, भाषासंपन्न अनुभूती, दलित संवेदना, त्याचा उत्कट रसरशीतपणा व त्यातील जीवंत वास्तवता आणि त्यामुळे त्याला आलेला वेगळा फॉर्म याने मराठी साहित्याची कोंडी फोडली आहे. दलित साहित्यातील दलित जाणिवेतून निर्माण झालेल्या आशययुक्त, प्रक्षोभक, विद्रोही परंतु परिवर्तनवादी, मानवतावादी दलित साहित्याने आपला वेगळेपणा प्रस्थापित केला आहे. हा वेगळेपणा पांढरपेशी मराठी साहित्यापेक्षा वेगळाच आहे. या दलित साहित्य कलाकृतीतूनच दलित साहित्याची समीक्षामूल्ये आपोआपच निर्माण होत आहेत. म्हणून दलित साहित्याने पांढरपेशा मराठी साहित्याची प्रस्थापित समीक्षामूल्ये नाकारली आहेत.

दलित साहित्याचे मूल्यमापन रूढ समीक्षापद्धतीने न होता ते दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभूतीच्या व अभिव्यक्तीच्या अनुषंगाने व्हावे. दलित साहित्याचे रूप, आशय, अनुभूती आणि अभिव्यक्तीने रूढ समीक्षेची संकल्पनाच उध्वस्त करून टाकली आहे. म्हणून अशा साहित्याचे मूल्यमापन करताना दलित साहित्यातूनच निर्माण झालेल्या मूल्यांचा शोध समीक्षकांनी घ्यावा व या मूल्यांच्या कसोटीला उतरणाऱ्या दलित साहित्यकृतीची समीक्षा करावी.

अनुभूतीचा कस हे दलित साहित्यातले प्रमुख मूल्य होय. तसेच दलित साहित्याच्या संवेदना, जाणिवा वेगळ्या आहेत. त्यांच्या आशयात जिवंतपणा आहे. दलित साहित्यकृती

ही वास्तव आहे. यांना खरातांची साहित्याचे निकष व मूल्य म्हटले आहे. या मूल्यांच्याद्वारे इतर साहित्यकृतीतील सत्याचा, आत्म्याचा शोध घेता येईल.

## ३.९ मराठी समीक्षकांनी केलेली दलित साहित्याची समीक्षा

'दलित साहित्य ही एक चळवळ आहे.' अशी दलित लेखकाची भूमिका आहे. दलित लेखक आपल्या साहित्याकडे आपली व्यथा-वेदना आणि प्रश्न-समस्या प्रकट करण्याचे साधन म्हणून पाहतो. परंतु दलित साहित्याचा वाचक हा दलित लेखकाचे पुस्तक हे 'साहित्य' म्हणून वाचत असतो. त्यामुळे लेखन आणि वाचक यांच्यातील 'समानधर्मीपणाला' तडा जातो, दलित साहित्य मुळातच जीवनवादी आहे. या साहित्याचे सर्व धागेदोरे जीवनाशी जोडलेले आहेत. दलित लेखक त्याचे जीवन साहित्यातून मांडतो. तेव्हा अशा साहित्याची कलावादी समीक्षा कशी करता येईल? वाङ्मयात जी चिरंतन मूल्ये आहेत ती कधीही बदलणारी नसतात. अशा चिरंतन मूल्यांच्या आधारे दलित साहित्याची समीक्षा कशी करायची? ही चिरंतन मूल्ये कोणती? ती कोण ठरवणार? असे प्रश्न उपस्थित होतात.

दलितेतर समीक्षेकांमध्ये दलित साहित्याच्या समीक्षे संदर्भात दोन सूर गवसतात. १) दलित साहित्याचे मूल्यमापन चिरंतन वाङ्मयीन मूल्यांच्या आधारे केले पाहिजे. २) वाङ्मयाचे निकष सदासर्वकाळ स्थिर नसतात. रूढ वाङ्मयीन निकषांच्या आधारे दलित साहित्याची योग्य समीक्षा करता येणार नाही. दलित समीक्षक हे दुसऱ्या मताशी सहमत आहेत. 'दलित लेखकांनी, पांढरपेशा लेखकांनी आणि समीक्षकांनी ठरवलेली मूल्ये झुगारून दिली पाहिजे' अशी भूमिका म. ना. वानखेडे यांनी घेतलेली आहे. पारंपरिक आणि पांढरपेशा मूल्य सिद्धांताला दलित समीक्षकांनी विरोध केलेला आहे.

### ३.९.१ मराठी साहित्याचे सौंदर्यशास्त्र :

मराठी साहित्य समीक्षेत सौंदर्यविचाराची चर्चा प्रामुख्याने बा.सी.मर्ढेकर, रा.भा.पाटणकर, सुरेंद्र बारलिंगे, नरहर कुरुंदकर, मे.पुं.रेगे, शरदच्चंद्र मुक्तिबोध, द.भि.कुलकर्णी आणि प्रभाकर पाध्ये यांनी सौंदर्यशास्त्राविषयी महत्त्वपूर्ण लेखन केलेले आहे.

#### ३.९.१.१ आनंद हे सौंदर्यमूल्य :

सौंदर्य किंवा सौंदर्यजन्य 'आनंद' हा संवेदनांच्या गुणांवर संपूर्ण निखलसपणे अवलंबून असतो. या संवेदनांमध्ये दुसरा कोणताही ज्ञानात्मक अंश शिरलेला नसतो. अशी बा. सी. मर्ढेकरांची भूमिका आहे. मर्ढेकरांनी 'सौंदर्यजन्य आनंद' आणि 'निर्भेळ संवेदना' यांना महत्त्व दिले आहे. रा. भा. पाटणकर यांनी 'सुखसंवेदनांना' महत्त्व दिले आहे. ते म्हणतात, 'सौंदर्यविधान वस्तूच्या स्वरूपाविषयी नसुन वस्तूच्या दर्शनाने आपल्या मनात निर्माण होणाऱ्या सुख संवेदनाविषयी असते' या सौंदर्यजन्य संवेदना या रसिकांशी निगडित असतात. याचा अर्थ रसिकांची अभिरूची महत्त्वाची ठरते. कलाकृतीचा वाचकांच्या मनावर होणारा परिणाम हा सौंदर्यजन्य आनंदाचा असला पाहिजे अशी सौंदर्यवाद्यांची भूमिका आहे. रसिकाच्या आनंदाला महत्त्वाचे मानून मराठी साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची चर्चा झालेली आहे. या सौंदर्यशास्त्रीय विचाराच्या आधारे दलित साहित्यामध्ये सौंदर्यशास्त्र शोधण्याचा प्रयत्न करणे अयोग्य आहे.

### ३.९.१.२ सौंदर्यशास्त्र आणि दलित साहित्य :

सौंदर्यशास्त्र हे आनंदावर तरलेले आहे; तर दलित साहित्य वेदनेवर आधारलेले आहे. दलित साहित्यातील वेदना आणि विद्रोह वाचून वाचक अस्वस्थ होईल. दलित जाणीव ही क्रांतिकारी मानसिकता आहे. ही जाणीव आनंदावर तरलेली नसून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुभावावर आधारलेली आहे. म्हणूनच दलित समीक्षकांना सौंदर्याची कल्पना बदलणे महत्त्वाचे वाटते. दलित साहित्याची निर्मिती दलित साहित्यातील विद्रोह आणि नकार याचा शोध परंपरागत सौंदर्यशास्त्रीय कल्पना स्वीकारून घेता येणार नाही असे भालचंद्र फडके यांना वाटते. शरद पाटील यांनी आपल्या 'अब्राम्हणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या पुस्तकात दलित साहित्याला वेगळ्या सौंदर्यशास्त्राची गरज आहे असे प्रतिपादन केलेले आहे. दलित साहित्य हा स्वातंत्र्योत्तर काळातील नवीन वाङ्मय प्रवाह आहे. त्याच्या साहित्याचे स्वरूप, प्रयोजन मराठी साहित्यापेक्षा भिन्न आहे. त्यामुळे रूढ सौंदर्यशास्त्राच्या आधारे या नव्या प्रवाहाची चर्चा करता येणार नाही, ही दलित समीक्षकांची भूमिका आहे, ही भूमिका योग्य वाटते. दलित साहित्य हे कलावादी किंवा रंजनवादी नाही. त्यामुळे त्यांच्या आधारे दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची चर्चा करता येणार नाही. म्हणूनच दलित साहित्याच्या निराळ्या सौंदर्यशास्त्राची गरज निर्माण होते.

## ३.१० दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र

१. सामाजिक लोकशाहीवादी मूल्यांशी संवाद, 'बहुजनहिताय बहुजन सुखाय' या न्यायाचा सम्यक समतोल आणि फॅसिस्ट मूल्यांशी विरोध हे दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राचे अंतरंग आहे. आणि अंतरंगाशी एकरस होऊन येणारे उत्कट आविष्कारण हे त्याचे बहिरंग आहे.

२. साहित्यात कलावंताचे व्यक्तित्त्व, त्याचा अनुभव शोधायचा असतो. साहित्यकृतीच्या अनुभवाचा आस्वाद म्हणजे कलास्वाद तीच कलानुभूती होय.

३. दलित साहित्य जीवनानुभूतीला, आशय घनतेला त्यातील भावपूर्ण अशा रसरशीत सौंदर्यरूपाला महत्त्व देते.

४. दलित साहित्य हे जीवननिष्ठ व समाजाभिमुख साहित्य असल्याने समाजपरिवर्तनाचे मूल्य घोषित करते. दलित साहित्यात क्रांतीचे संदर्भ असतात. ते सुंदरपणे जगण्याची सौंदर्यकांक्षा असलेले असतात. हेच दलित साहित्याचे सौंदर्य होय.

५. दलित समाजातीला कुरूपता, विद्रूपता यांचा नायनाट करून शुभाचा, सुरूपाचा, न्यायाचा स्वीकार हा औचित्य विचार दलित साहित्याच्या आशय व सौंदर्याचाच विचार आहे.

६. दलित साहित्य प्रकृतीला जपते, महत्त्व देते, प्रकृतीचे स्वभाव, सौंदर्य जोपासते हीच दलित साहित्याची सौंदर्यजाणीव आहे.

७. आपल्या आशयद्रव्यातील औचित्यविचाराला दलित साहित्य सर्वाधिक महत्त्व देते. हा औचित्याविचार हाच दलित साहित्याचा सौंदर्यशास्त्रीय विचार होय.

८. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र भौतिकवादी आहे. कलाकृतीचे सौंदर्य वास्तविकतेचा कलात्मक आविष्कार असते असे प्रतिपादणारे सौंदर्यशास्त्र भौतिकवादी असते.

९. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र मांडताना आंबेडकरवादी विचाराने प्रेरित झालेली 'दलित जाणीव' ही महत्त्वाची ठरते. कारण दलित जाणीव ही गुलामी विरूद्धची जाणीव आहे. या जाणिवेत समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांचा समावेश होतो. आंबेडकरी विचार हा दलित साहित्यातील सौदर्य विचार आहे.

**१०.** शोषितांचे साहित्य हे प्रामुख्याने 'स्वातंत्र्य' या कल्पनेचा आणि संकल्पनेचा शोध घेणारे आणि त्याचा आविष्कार करणारे साहित्य असते. स्वातंत्र्याच्या कल्पनेला, विचाराला राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि नैतिक अंगाप्रमाणे एक सौंदर्यशास्त्रीय अंग असते. स्वातंत्र्याची सर्वकष कल्पना दलित साहित्याचे प्राणतत्त्व आहे व त्यातील सौंदर्यतत्त्व आहे.

वाघमारे यांनी 'स्वातंत्र्याला' सौंदर्यमूल्य मानलेले आहे. यशवंत मनोहर यांनी समता, स्वातंत्र्य बंधुता या जीवनमूल्यांना सौंदर्यमूल्ये मानलेले दिसते.

**११.** दलित साहित्यिकांची सामाजिक बांधिलकी, कलाकृतीतील जीवनमूल्ये, वाचकांच्या मनात जागृत होणाऱ्या समता, स्वातंत्र्य, न्याय व मातृभाव या विषयीच्या जाणिवा यामध्ये दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र आहे.

**१२.** दलित साहित्याने 'विद्रोह' हे नवे मूल्य निर्माण केले आहे. कारण दलित साहित्यात वेदना, आक्रोश, नकार, विद्रोह, समस्या, संघर्ष, अन्याय, अत्याचार याचे दर्शन घडते.

**१३.** दलित साहित्याने विद्रोही, बंडखोर, संवेदनशील, अबोड-धोबड, रोजच्या बोलीतील शब्दकळा - प्रथमच दिली आहे. सभोवतालच्या जगातील मराठीला अपरिचित असे शब्द, वाक्प्रचार दिले आहेत. प्रत्येक कविने स्वतंत्र शब्दशैली दिली आहे. आपल्या कल्पकशक्तीने अनेकविध सुंदर शब्दकळा व नवनव्या प्रतिमा दिल्या आहेत. अपूर्वता, उत्कटता, काव्यमयता ही साहित्यातील सौंदर्यलक्षणे काही काव्यात उमटलेली दिसून येतात.

**१४.** या शतकाच्या अखेरच्या दशकात विचार करताना कवींच्या काव्यात सर्जनोन्मुख भाषिक संवेदनशीलता, वास्तवाला थेटपणे भिडण्याची मानसिकता दिसून येते. अपूर्वता, उत्कटता व काव्यात्मता ही सौंदर्य लक्षणे दिसून येतात. उदाहरणार्थ - नामदेव ढसाळांची 'पाणी' ही कविता जागतिक साहित्यात सर्वश्रेष्ठ ठरणारी 'पाणी' या विषयावरील कविता आहे. पाण्याचा एक नवा अर्थ एका विलक्षण संवेदनक्षम दलित कविमनाने पहिल्यांदा साकारला आहे. सामाजिक जाणिवांचे महान अपूर्व सौंदर्य म्हणजे पाणी ही कविता आहे. उत्कटता, प्रतिभा यांच्या संगतीने ही कविता सौंदर्यत्मक रूप धारण करते.

**१५.** दलित साहित्याच्या सामाजिक तीव्र, उत्कट ताणातच सौंदर्यनिर्मितीची बीजे लपलेली आहेत. म्हणूनच सौंदर्याचे, कलात्मकतेचे स्वतंत्र व वेगळे भान दलित

लेखक, कवींनी बाळगण्याचे कारण नाही. कारण ते सौंदर्य हे सामाजिक जाणिवांच्या जिवंत आविष्कारामागे आपण हून येते.

मराठी साहित्यात समाजिक जाणिवांचे सौंदर्य निर्माण करण्याची ताकद आज तरी फक्त दलित साहित्यिकांतच आहे असे रा.ग.जाधव यांचे मत आहे. कारण सामाजिक जाणिवांचा अस्सलपणा व सखोलता अनुभवण्याचा भोगवटा दलितांच्याच वाटयाला आलेला आहे. तो मूलगामी आहे व म्हणूनच तो विलक्षण सौंदर्यक्षम व सर्जनक्षम आहे.

## ३.११ दलित काव्यातील सौंदर्य

प्रखर वास्तवाला उत्कटपणे सामोरे जाताना त्याची अभूतपूर्व अंगोपांगे पाहण्याची क्षमता दलित सर्जनशील लेखकांना निश्चितच लाभलेली आहे. नामदेव ढसाळांच्या उत्कट काव्यात ते अपरिहार्यपणे अवतरले आहे. त्यांच्या कवितेत गात्रांतील हेतूंचा, नसांतील प्रपातांच्या, तृष्णांचा, इच्छांचा प्रतिध्वनी प्रत्यक्षा - प्रत्यक्ष स्वरूपात सतत उमटताना आढळतो आणि अनेकदा या तृष्णाच कवींना काव्यनिर्मितीसाठी, काव्यभाषेच्या मोडतोडीसाठी आणि तिच्या पुनर्रचनेसाठी आवश्यक ती उर्जा पुरवताना दिसतात. ढसाळांची भाषा अनुभवाला सापेक्षत: थेट भिडणारी आणि वाचकांशी संवाद साधणारी आहे. काव्यभाषेचे चांगलेच भान असलेली आहे. त्यांची प्रतिमासृष्टी वेगळी आहे. त्यांची स्वतंत्र अनुभवविश्वाची भाषा आहे. मराठीला पूर्ण परिचित नसलेली भाषा आलेली आहे. त्यांच्या भाषेच्या काव्यत्म संघटना जाणीवपूर्वक आहेत. ढसाळांनी भाषेची मोडतोड करूनही तिला उठावदार बनवली आहे. दलित कविंच्या दृष्टीने सवर्ण हे ‘स्वेतर’ आहेत. ‘ते जे आहेत ते आपण नाहीत’, ही जाणीव कवितेमागे आहे. यशवंत मनोहर, भुजंग मेश्राम यांच्या कवितेमध्ये ज्वालामुखी जागा होतो. दोघांच्याही कविता वर्कृत्व गुणांच्या आहारी अधिक जाते. आरंभी रोमॅंटिक कविता लिहिणारे केशव मेश्राम दलित कवितेच्या प्रवाहात सामील होतात. ना. धो. महानारे, दया पवार, अर्जुन डांगळे, वामन निंबाळकर यांनी काही संयत सुरातील कविता लिहिली आहे. परंतु त्यामध्ये संयत सुराचे सातत्य टिकवता आलेले दिसत नाही. प्रज्ञा लोखंडे यांची कविता मराठी कवितेच्या मुख्य प्रवाहात सन्मुख झालेली दिसते. चिंतनगर्भ कविता समाजाभिमुख चेहरा घेऊन सामाजिक वास्तव व्यक्त करू लागले. त्यातून मूल्याधिष्ठित चिंतनशीलता व्यक्त होते. चळवळीच्या कविता, क्रांतीच्या कविता, चिंतनशील कविता दाहक स्वरूप धारण करतात. तसेच उपरोध व्यक्त करतात. बौद्ध धर्माशी संबंधित संज्ञा, संदर्भ देतात. कधी अवजड, बोजड, दुर्बोधता त्यामध्ये दिसून येते. दलित कविता आपले सर्जनाचे रूप बदलताना दिसते. तसेच एकूणच दलित साहित्य काळाप्रमाणे बदलण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. खेडी व शहरांच्या सीमारेषा लोप लावत आहेत.

## ३.१२ समारोप

नव्वदाव्या शतकानंतर ग्लोबलायझेशन, लिबरलायझेशन, प्रायवेटायझेशन या त्रिसूत्रीच्या वाढत्या प्रसार व प्रभावातून नवे प्रश्न निर्माण होत आहेत. समाजातील बदला बरोबर साहित्य बदलण्याच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे दलित साहित्याचे स्वतंत्र सौंदर्यशास्त्र निर्माण करण्याची गरज भासणार नाही. साहित्याचे ठळक असे प्रवाह एकमेकांत विलिन होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत.

## ३.१३ संदर्भ ग्रंथ


- डॉ. मेश्राम योगेंद्र, दलित साहित्य उद्‌गम आणि विकास - श्री. मंगेश प्रकाशन - १९९८
- डॉ. लिंबाळे शरणकुमार, दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र - कांता प्रकाशन, बार्शी - १९९६
- डॉ. लांजेवार ज्योती, दलित साहित्य समीक्षा - सुगावा प्रकाशन, पुणे १९९२
- पाटील. म.सु, कवितेचा रूपशोध - शब्दालय प्रकाशन १९९६
- दलित साहित्य - आजचे क्रांतिविज्ञान, बाबुराव बागूल, दिशा प्रकाशन, १९८१ नाशिक
- दलित साहित्य : प्रवाह व प्रतिक्रिया : कुलकर्णी, गो. म. (संपा.), प्रतिमा प्रकाशन, पुणे१९८६
- दलित वाङ्मय प्रेरणा आणि प्रवृत्ती, खरात शंकरराव, इनामदार प्रकाशन, पुणे, १९७८
- निळी पहाट, जाधव रा.ग., प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९७८.
- दलित साहित्य : एक चिंतन, डांगळे अर्जुन (संपा.); महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ, मुंबई, १९७८
- सामाजिक क्रांतीची दिशा : निंबाळकर, वामन (संपा), (प्राचार्य म. भ. चिटणीस समग्र वाङ्मय), प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००७,
- लोक वाङ्मय गृह, पाटील म. सु., दलित कविता, मुंबई १९९८१.
- दलित साहित्य : चर्चा आणि चिंतन, पानतावणे गंगाधर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३,
- दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, फडके भालचंद्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७० (प्र.आ.) १९८१ (दु.आ.).
- दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान, बाबूराव बागूल, बुद्धिस्ट पब्लिक हाऊस, नागपूर, १९८१.
- निळी वाटचाल, भगत दत्ता, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००१.
- दलित साहित्य: सिद्धांत आणि स्वरूप, मनोहर यशवंत, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९७८

- माटे श्री.म., अस्पृश्यांचा प्रश्न, दाते प्रकाशन, पुणे, १९३३.
- विद्रोही कविता, मेश्राम केशव (संपा.), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८ (प्र. आ.), १९९४ (तृ. आ.)


## ३.१४ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.

३. दलित सौंदर्यशास्त्रा संदर्भातील विविध मतांचा परामर्श घ्या.

४. दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राविषयी दलित लेखकांची भूमिका स्पष्ट करा.

५. आंबडेकरवादाचे स्वरूप स्पष्ट करा.

६. दलित साहित्याच्या समीक्षेविषयी दलित समीक्षकांची भूमिका.

**ब) टीपा लिहा.**

१. दलित साहित्यातील विद्रोह

२. दलित साहित्यातील जाणीव

३. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र

४. आंबेडकरवाद

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. विद्रोह म्हणजे काय?

२. दलित समीक्षकांची नावे लिहा.

३. दलित साहित्याची व्याख्या लिहा.

४. दलित साहित्याची दोन वैशिष्ट्ये लिहा.

५. दलित जाणीवेचे साहित्य म्हणजे काय?

६. दलित साहित्याचे दोन सौंदर्य गुण लिहा.

*****

# ४अ

# कविता आणि आत्मकथने : तात्विक विचार

**घटक रचना**

४.० उद्देश

४.१ प्रस्तावना

४.२ दलित साहित्याचे वेगळेपण

४.३ दलित कवितेचे स्वरूप

४.४ दलित कवितेतील आशय

४.५ आत्मकथने : तात्विक विचार

४.६ आत्मकथन व आत्मचरित्र

४.७ दलित आत्मकथने

४.८ समारोप

४.९ संदर्भग्रंथ

४.१० प्रश्नावली

## ४.० उद्देश

- दलित साहित्याचे वेगळेपण समजेल.
- दलित कवितेचे स्वरूप आणि आशय ध्यानात येईल.
- आत्मकथन व आत्मचरित्र यातील फरक लक्षात येईल.

## ४.१ प्रस्तावना

साधारणतः १९६० नंतर ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्य प्रवाह उदयास आलेत व १९८० नंतर भरभराटीस आलेत. दलित साहित्य प्रवाह हा ही १९६० नंतर मराठी साहित्यात आढळून येणारा प्रमुख असा प्रवाह आहे. ह्या वाङ्मय प्रवाहाने स्वतःचे वेगळेपण तर सिध्द केले आहेच शिवाय ह्या प्रवाहामुळे मराठी वाङ्मयही समृध्द झाले आणि मराठी वाङ्मयाच्या कक्षा अधिक व्यापक होण्यास मदत झाली. वाङ्मयात नवनवे प्रवाह नेहमीच निर्माण होत असतात. समाजात घडणाऱ्या घटनांचे बिंब-प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. दलित साहित्य ही त्याला अपवाद नाही. दलित साहित्य हे दलित चळवळीचे साहित्य आहे. याचाच अर्थ दलित साहित्य हे दलितांच्या चळवळीतून उदयास आले असे म्हणता येईल. दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या आत्मसन्मानाची

चळवळ सुरू केलेली होती. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्त्वाचा पुरस्कार त्यांनी केलेला होता. त्याआड येणाऱ्या रूढी-परंपरांना त्यांनी नकार दिला होता. दलित साहित्यिकांचे आत्मभान जागृत करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' असा कानमंत्र दलित बांधवांना देऊन त्यांनी आत्मशोध घेण्यास प्रवृत्त केले होते. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते म्हणून प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा त्यांनी चंग बांधला होता. त्यांचाच वारसा व प्रेरणा घेऊन दलित साहित्यिकांनी दलित साहित्य हे परिवर्तनाचे साहित्य म्हणून स्वीकारलेले आहे. दलित कविता हा दलित वाङ्मय प्रवाहातील अतिशय महत्त्वाचा व प्रभावी असा वाङ्मय प्रकार आहे. दलित कविंनी आपले दुःख अल्पाक्षरात मार्मिकपणे स्पष्ट करण्यासाठी कविता हा वाङ्मय प्रकार निवडला आहे. ह्या मराठी दलित कवितेने मराठी काव्यवाङ्मयाला समृध्द करून दलित वाङ्मय प्रवाहाला प्रतिष्ठा मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका निभावलेली दिसून येते. दलितांच्या दुःखाचा पहिला हुंकार प्रकट करण्याचा मान दलित कविता या वाङ्मय प्रकाराला जातो. प्रस्थापित मराठी साहित्याला दलितांचे दुःख, गावकुसाबाहेरील त्यांचे जीवन दिसले नाही. म्हणून दलित कवी जागा झाला. आपली दुःखे त्यांनी वेशीवर टांगली सोवळे ओवळे, ईश्वरनिष्ठा, प्रतिष्ठा, लाजलज्जा सोडून दलित कवी आपली व आपल्या समाजातील दलितांची दुःखे कवितेतून अतिशय परखडपणे मांडू लागले. दलित कवी कवितांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तळागाळातील दलित लोकांपर्यंत पोहोचवत होते. त्यामध्ये नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, दया पवार, त्र्यंबक सपकाळे, अरूण कांबळे, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, रविचंद्र हडसनकर, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, मल्लिका अमर शेख, भीमसेन देठे, प्रज्ञा लोखंडे, भगवान सवाई, अरूणकुमार इंगळे, इत्यादी आणि याशिवाय कितीतरी नवकवी दलितांच्या जाणीवांविषयी काव्यलेखन करून दलित कवितेचा प्रांत समृध्द करतांना दिसून येतात. वरील सर्व दलित कवींनी मराठी कवितेच्या कक्षा रूंदावल्या आहेत.

## ४.२ दलित साहित्याचे वेगळेपण

ज्या साहित्य प्रकारातून आरंभी संपूर्णपणे प्रकटले आहे, तो प्रकार म्हणजे दलित कविता होय. दलित कवितेच्या साहित्यातील विद्रोह, नकार, दुःख इत्यादी वैशिष्ट्यांबरोबरच प्रचंड स्वरूपाची आक्रमकता व आत्मविश्वास दिसून येतो. दलितांच्या व्यथा, वेदना या सर्वांना प्रथम दलित कवितेच्या माध्यमातून वाचा फुटली आहे. दलित साहित्याची साधनवादी भूमिका ही सर्वप्रथम तिच्यातून प्रकटते. दलित कविता ही विसाव्या शतकातील वाङ्मयीन आणि सांस्कृतिक वस्तुस्थिती आहे. समाज आणि संस्कृती यातूनच साहित्यनिर्मितीला प्रेरक शक्ती मिळत असते. दलित कवितेचा उदय स्वातंत्र्योत्तर काळात झालेला असला तरी दलित साहित्याची पायाभरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या वृत्तपत्र आणि साप्ताहिकातून झालेली पाहावयास मिळते. मात्र दलित कविता खऱ्या अर्थाने १९६० च्या दरम्यानच उठावदार झाली. समाज मनातील हलकल्लोळ, जीवनाच्या तशी साचलेली विषमता आणि सांस्कृतिक दुभंगलेपणा दलित कवितेतून अत्यंत प्रत्ययीपणे निदर्शनास येते. त्यामुळेच दलित कवितेचा जन्म दलित मुक्तिलढ्यातून झालेला आहे. व्यक्तीच्या दुःखापेक्षा समूहाच्या दुःखाला वाचा फोडण्याची रीत संत चोखामेळ्याच्या अभंगातून व्यक्त होते. त्यांच्या अभंगातून कण्हणे ऐकू येते, चीड व्यक्त होते. ती त्या उपेक्षित दलित समूहाची.

दलित कविता ही समूहाच्या वेदनेची कविता आहे. माणसाचे गाणे गाणाऱ्या माणसांची कविता आहे. दलित कविता ही अकस्मात उदयाला आली असे नाही. कोणत्याही काळात समाज, संस्कृती, तत्त्वज्ञान, विचार, चळवळी यांचा प्रभाव साहित्यावर पडत असतो. १९६० पूर्वी मराठी कवितेचा इतिहास पाहिल्यास मराठी कवितेचे आधुनिक वळण केशवसुतांपासून सुरू झाल्याचे दिसते. "विसाव्या शतकातील मराठी कविता केशवसुतांपासून समर्थपणे विकास पावत गेली, हे स्पष्टच आहे. त्या दृष्टीने केशवसुत ते मर्ढेकर असा एक मोठा कालखंड कवितेचे टीकाकार गृहीत धरतात. हा एवढा कालखंड एकात्म स्वरूपाचा व अखंड होता असे मात्र नाही. त्यात अनेक प्रवृत्ती होत्या. अनेक छोटी मोठी आंदोलनं होती. तरीही सामान्यतः ब्रिटिश रोमँटिक परंपरेच्या वर्तुळातच फिरत राहणारी ती कविता होती. तिच्यात पुढे-पुढे ऱ्हासशील रोमँटिक परंपरेचे प्रतिध्वनीच अधिकाधिक प्रमाणात निनादत राहिले." यावरूनच असे निदर्शनास येते की मराठी कविता ही भारतीय परंपरेबाहेरच्या परिप्रेक्ष्यात विकसित होत गेली. केशवसुतांनी पाश्चात्य साहित्यमूल्यांच्या स्वीकारातून मराठी काव्यात रोमँटिसिझम फुलविला. मात्र केशवसुतपूर्व काळात महात्मा फुल्यांनी काव्यलेखन केले आहे. पारंपरिक अभंगाऐवजी अखंडाची रचना करून मराठी काव्यविश्वाला पर्यायी काव्यप्रकार दिला आहे. फुल्यांनी प्रस्थापितांच्या विरोधात बंडखोरी करण्याच्या त्यांच्या प्रेरणा पश्चिमी अंधानुकरणातून नव्हे तर येथील विद्रोही परंपरेत शोधल्या होत्या. फुल्यांच्या कवितेचा उद्घोष बहुजनांच्या वतीने होताना दिसतो. मानवी मूल्यांचा उद्घोष त्यांच्या कवितेने केला आहे.

दलित कवितेच्या आशयाच्या सीमारेषा भूमिकाधिष्ठित निर्मितीप्रक्रियेने आखल्या आहेत. ही भूमिका दलितत्त्व आणि त्या संदर्भातील नवी जाणीव यांच्यावरच अधिष्ठित असल्याने ह्यातूनच दलित कवितेचा आशय ठरतो. नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, दया पवार इ. कवींच्या कवितांवरुन सहज दृष्टीक्षेप टाकला तरी आशयसंपन्नतेची मौलिकता लक्षात येते. शतका-नुशतकांपासून दलितांवर होत आलेले निर्घण अन्याय, त्यांना भोगावी लागलेली जीवघेणी अवहेलना, लौकिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही पातळ्यांवर त्यांच्या वाट्याला आलेली तुच्छता या साऱ्यांची आणि भयंकर वेदनांची चित्रे दलित कवितेने रेखाटली आहे. आपले काव्यलेखन आजवरच्या मराठी कवितेपेक्षा लक्षण, प्रयोजन, रीती ह्या साऱ्याच बाबतीत निराळे असल्याची जाणीव सर्वच दलित कवींना असून ती त्यांनी आपल्या कवितेतून अनेकदा व्यक्तही केली आहे.

## ४.३ दलित कवितेचे स्वरूप

दलित कवितेच्या स्वरूपामध्ये दलित कवितेची निर्मिती, वेदना, विद्रोह, नकार, आशयाची विविधता इत्यादी विशेषांबरोबरच तिचे वेगळेपण व एकूणच मराठी कविता आणि दलित कविता इत्यादी मुद्यांचाही तात्त्विक विचार येथे होतो. दलित कविता ही जगणाऱ्यांची कविता आहे. दलितांच्या जीवनामध्ये असलेले भीषण अनुभव, भीषण दुःख यांचा भोग भोगत आले आहेत, जगत आले आहेत. म्हणून ती त्याच्या जीवनातून, जगण्यातून निर्माण झालेली आहे. म्हणून केवळ ती दलितांच्या जीवनाचे चित्रण करीत नाही. तर त्या जळत्या जीवनामागे असलेली कारणे शोधते, त्यांचा अंतर्वेध घेऊ इच्छिते आणि व्यापक जीवनावर ती भाष्य करते. समाजव्यवस्था ही मानवनिर्मित आहे व ती बदलण्याची शक्ती दलितांच्या जवळ येऊ लागलेली आहे. याची प्रचिती दलित कवींच्या कवितेतून येते.

दलित कवींची कविता ही सामाजिक आहे आणि त्यातूनच एक महत्त्वाचा विचार स्पष्ट होतो. तो असा की, दलित कविताही दलितांच्या चळवळीतून जन्माला आलेली आहे. एक प्रकारे दलित काव्य ही मुव्हमेंट आहे. वास्तवता व सामाजिकता ही तिची दोन महत्त्वाची अंगे लक्षात घेतल्यावर साहजिकच दलित कवींची बांधिलकी ही सामाजिकतेशी आहे, हे सिद्ध होते. दलित कवींचा बंडखोरपणा स्पष्ट करताना दलित कविता प्रत्यक्ष बंड कार्यान्वित करीत नसली तरी तिचे नाते बंडखोर सृजनाशी आहे.

दलित कवींची संवेदनशीलता ही त्या कवीच्या आत्मानुभूतीच्या खोल व भरभक्कम पायावर उभी आहे. प्रतिभेच्या साह्याने निर्माण केलेल्या स्वप्नरंजित, कल्पनारम्य अशा जगाशी तिचे नाते नाही. म्हणून दलित कविता परंपरेला नाकारणारी आहे. दलित कवींची मानसिकता ही अस्पृश्यतेच्या जाणिवेतून निर्माण होते. जसा आफ्रिकेतील व अमेरिकेतील शोषित व गुलाम झालेल्या काळ्या कवीला गोरा माणूस आपला शत्रू वाटतो. तशीच अस्पृश्य समाजातील कवींना स्पृश्य सवर्ण समाजाची संस्कृती व त्या संस्कृतीतून पोसलेली जीवनमूल्ये व जीवनधारणा निषिद्ध वाटतात.

मराठी साहित्य विश्वात दलित कवितेचा आविष्कार, तिचा आशय, घाट, रूप व शब्दकळा ही आजवर प्रसिद्ध झालेल्या कवींच्या कवितेपेक्षा आमूलाग्र नवी, वेगळी व स्वयंभू अशी आहे. दलित कविता म्हणून तिचे आत्मप्रकटन व आत्मरेखाटन दलित अस्मितेने व दलित जाणिवेतून व आत्मशोधाच्या अंगाने होत राहते हे यावरून दिसून येते.

दलित कविता ही वास्तव जीवनानुभव देणारी कविता आहे. त्यांच्या जीवनातील भीषण वास्तव ते भोगत आलेले आहेत. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' हे त्यांच्या बाबतीत सत्य आहे. खोटया कृत्रिम माणसांचा बुरखा फाडून टाकण्यासाठी ती जन्माला आलेली आहे. समता, न्याय, प्रेम, बंधूभाव, स्वातंत्र्य या मूल्यांची प्रतिस्थापना करण्यासाठी ती आसूसलेली आहे. नारायण सुर्वे, मुक्तिबोध, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, दया पवार, त्र्यंबक सपकाळे, ज. वि. पवार, वामन निंबाळकर, शरणकुमार लिंबाळे, प्रज्ञा लोखंडे, ज्योती लांजेवार, राजा ढाले, अर्जुन डांगळे, किशोर सानप, नीलकांत चव्हाण, अशोक बागवे, वाहरू सोनावणे अशी कितीतरी नावे सांगता येतील की, त्यांची कविता ही त्यांच्या जीवनातून निर्माण झालेली आहे. मात्र अशा सारखी कविता लिहिताना कोणतीही विशिष्ट भूमिका मनात नसते असे स्वानुभव सुर्वे, दया पवार यांनी सांगितलेले आहेत.

## ४.४ दलित कवितेतील आशय

दलित कवितेत आशयाचे विविध प्रयोग पहावयास मिळतात. ती आशयाच्या आणि भाषेच्या दृष्टीने परंपरेने चालत आलेल्या मराठी कवितेपेक्षा वेगळी आहे. तिचा चेहरा, तिचे रूप अभिव्यक्ती ही एखाद्या वेगवान प्रपाताप्रमाणे आहे. मराठी कवितेतील अनुभवसामर्थ्याच्या मर्यादा दलित कवितेने ओलांडल्या आणि तळागाळातील समाज-जीवनाचे सूक्ष्म पदर तिने व्यक्त केले. अनुभवाची सखोलता, सूक्ष्मता, वस्तुस्थितीचे परखड मूल्यमापन करीत जाणारी ही कविता तेजस्वी आहे.

मराठी कविता ज्या एका भोवऱ्यामध्ये शेकडो वर्षे गरगरत होती ती दलित कवितेच्या आगमनामुळे, रूक्ष, दरिद्री व अशक्त मराठी कविता सुंदर, संपन्न आणि सबळ होऊ लागली

आहे. जे जग मराठी कवितेने जाणिवपूर्वक पाहिले नव्हते. ते दीन दलितांचे जग आज दलित कवितेचा विषय झाले आहे. या जगाचे जगण्याचे अनेक पदर दलित कवितेला आपल्या संपन्न प्रतिभेने उलगडून दाखवयाचे आहेत. ही ऐतिहासिक जबाबदारी दलित कवींनी स्वीकारलेली आहे.

दलित कवितेमध्ये आशयाचे नवेपण व वेगळेपणाची जाणीव समृद्ध असलेली दिसते. ती आशयाचा आकार धारण करताना सभोवतालच्या दृश्यादृश्य घटनांचे अनेक रंग, बेरंग त्यात मिसळत असतात. मग या घटनांत व्यापक स्वरूपातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक नवेपणाचे नाते त्या आशयामध्ये असते. म्हणून नवीन आशय, विषय हा दलित कवितेचा विशेष आहे. दलित साहित्यातील अनुभव आणि ललित साहित्यातील अनुभव यामध्ये आशयाचा आकार धारण करताना सभोवतालच्या दृश्यादृश्य घटनांचे अनेक रंग, बेरंग त्यात मिसळत असतात. मग या घटनांत व्यापक स्वरूपातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक नवेपणाचे नाते त्या आशयामध्ये असते. म्हणून नवीन आशय, विषय हा दलित कवितेचा विशेष आहे. दलित साहित्यातील अनुभव आणि ललित साहित्यातील अनुभव यामध्ये आशयाच्या संदर्भातही गुणात्मक फरक राहतोच. दलित कविता समूहमनाची कविता आहे; परंतु या समूहवादात सुद्धा कलावंताचे व्यक्तित्व पृथगात्मकतेने स्पष्ट होते. हे दलित कवितेचे सामर्थ्य आहे. त्यातील जीवनदर्शन आजवरच्या जीवनदर्शनापेक्षा वेगळे आहे. त्यातील जीवनदर्शन आजवरच्या जीवनदर्शनापेक्षा वेगळी आहे. एक नवे जग, नवा समाज, नवा माणूस, प्रथम साहित्यात व्यक्त झालेला आहे. त्या व्यक्त झालेल्या आशयातील वास्तव वेगळे आहे. वास्तवाची भाषा वेगळी आहे. ती रांगडी, राकट अशा प्रकारची आहे. ती दलितांची बोली भाषा आहे. यातील आत्मशोधाची जाणीव ही एक संघर्षाशी नाते सांगणारी मानसिकता आहे. 'स्व' अस्तित्वासाठी, सामाजिक अस्मितेसाठी आशयाचे विविध पदर दलित कवितेतून आविष्कृत होतात. दलित कवितेच्या आशयामध्ये विषयाचे वैविध्य आहे.

## ४.५ आत्मकथने : तात्त्विक विचार

स्वातंत्र्य पूर्व काळामध्ये मराठी भाषेमध्ये अनेक साहित्यप्रकार उदयाला आले. या साहित्यप्रकारामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले. यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, प्रवासवर्णन इत्यादीचा प्रामुख्याने समावेश होतो. वरील सर्व प्रकारांमध्ये विपुल प्रमाणात लेखन झालेले आहे. मराठी भाषा जागतिक स्तरावर पोहोचली आहे. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. जीवनाचे प्रतिबिंब, वास्तव स्वरूप साहित्यात चित्रित झालेले असते. साहित्याच्या निर्मितीवर समाजाचा अधिक प्रभाव असतो. समाजाच्या घडामोडी घडतात, चळवळी होतात, बदल होतात ह्या सर्वांचे चित्रण उमटलेले असते. एकूणच साहित्य हे मानवी जीवनावर भाष्य करणारे आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात विविध साहित्य प्रवाह उदयाला आले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, विज्ञानसाहित्य, लोकसाहित्य इत्यादी. यामध्ये स्वतःचे एक वेगळे अस्तित्व निर्माण केलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय. दलित साहित्याने कोंडी फोडून एक स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. दलित साहित्याची एक वेगळी आणि मोठी फळी मराठी साहित्यामध्ये निर्माण झाली. दलित

साहित्याचा एक स्वतंत्र दबदबा साहित्यक्षेत्रात तयार झाला. त्याचे कारण दलित साहित्याला फार मोठी पार्श्वभूमी लाभलेली आहे. विविध प्रकारच्या प्रेरणा दलित साहित्याला लाभलेल्या आहेत. यामध्ये सर्वात मोठी प्रेरणा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे दलित साहित्य चळवळ उदयाला आली. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजासाठी व एकूणच भारतीय समाजासाठी राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, कायदेविषयक, वृत्तपत्रीय, कृषी अशा विविध क्षेत्रांमध्ये महत्वपूर्ण योगदान देऊन बदल घडवून आणलेला आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली दलित चळवळ समाजातल्या शेवटच्या माणसापर्यंत जाऊन पोहचली. दलित चळवळीत गौतम बुद्ध, कबीर, फुले, मार्क्स आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार खोलवर रुजलेले आहेत. दलित चळवळीने सामाजिक जागृती घडवून आणली. त्यामुळे हळूहळू दलित वर्ग शिकू लागला. त्यांना पाश्चात्य शिक्षणाचा संपर्क झाला. त्यातून त्यांचे आत्मभान जागृत झाले. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारणी' सभेची स्थापना केली यामधून त्यांनी स्वतः सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यानंतर हळूहळू विविध वृत्तपत्र स्थापन करून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. १९४५ रोजी त्यांनी अस्पृश्यांना शिकता यावे म्हणून 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. मुंबईला सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. यामधून विविध जाती-जमातीचे दलित विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले आणि लेखन करू लागले. यातून जी पहिली पिढी शिकून बाहेर पडली त्या पिढीने लेखन करायला सुरुवात केली. याच पिढीतून अनेक महत्त्वाचे दलित लेखक निर्माण झाले. शिक्षण घेतल्यामुळे माणसाला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होते. आत्मसन्मानाची जाणीव होते. तशी जाणीव तत्कालीन शिकलेल्या दलित लोकांमध्ये निर्माण झाली. प्रस्थापित साहित्य वाचल्यानंतर त्यांच्या लक्षात आली आपण जे भोगले आहे, जे जगलेले आहे ते वास्तव अतिशय भयानक आहे. ते लिहिले पाहिजे, त्याला जगासमोर आणले पाहिजे. या भावनेतून त्यांनी लेखन केले. हे लेखन फार मोठया प्रमाणात पुढे आले यामध्ये अनेक लेखकांनी आपले योगदान दिले. हेच साहित्य पुढे दलित साहित्य म्हणून ओळखले जाऊ लागले. दलित साहित्यमध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक असे महत्त्वाचे प्रमुख प्रकार भरपूर प्रमाणात लिहिले. गेले परंतु दलित साहित्याला एक वेगळी उंची प्राप्त करून देणारा साहित्यप्रकार म्हणजे आत्मकथन होय. दलित साहित्यात आत्मकथन हा प्रकार प्रचंड गाजला. या दलित आत्मकथनांचा वाचून समाजही भारावला. दलित आत्मकथनांनी जगण्याची कोंडी फोडली आणि खळखळून पाणी नदीतून वाहावे तशी आत्मकथने साहित्य प्रवाहातून वाहू लागली.

## ४.६ आत्मकथन व आत्मचरित्र

आत्मकथनाचा तात्त्विक विचार पाहण्याआधी आत्मचरित्राच्या संदर्भात काही विचार पाहू ,

डॉ. स. दा. कऱ्हाडे आत्मचरित्र बाबत विचार मांडतात, 'स्वतःच्या जीवनाचे दूरस्थपणे, सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र होय'.

रा. ग. जाधव म्हणतात, 'आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तद्नुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय'.

आत्मकथन हा साहित्यप्रकार स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून उदयाला आलेला आहे. त्याला आत्मकथा, आत्मचरित्र, स्वकथन अशा विविध नावांनी संबोधले जाते. आत्मचरित्र लेखकाला तटस्थपणे लेखन करावे लागते. आत्मचरित्र लेखनातील घटना या सत्य प्रमाणावर आधारित असावे लागतात. आपण जे जगलो, जे भोगले ते सर्व तटस्थपणे लेखन करावे लागते. यामधून आपल्या बरोबरच आपल्या जातीचे, धर्माचे आणि समाजव्यवस्थेचे चित्रण होत असते, तेही कथन करावे लागते. आत्मकथन लेखनामुळे अनेक जाती-जमातींचे जीवन त्यांच्या श्रद्धा समजुती व्यवहार आणि त्यांच्या दुःखाचे कष्टाचे भीषण स्वरूप हे समाजासमोर आणि वाचकांसमोर येत असते. त्यामुळे आत्मकथन हे लिहिण्यासाठी स्वतःचे जीवन सत्य पद्धतीने रेखाटण्यासाठी लेखका जवळ हिंमत असावी लागते. आशय, अभिव्यक्ती व जीवनानुभव यामुळे दलित साहित्यात 'दलित आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार निर्माण झाला. या आत्मकथनाचे स्वरूप काही प्रमाणात आत्मचरित्रात्मक असले, तरी अनेक अभ्यासकांनी या वाङ्मय प्रकाराला ‘आत्मनिवेदन’, ‘आत्मकथा’, ‘स्वकथन’ व ‘आत्मकथन’ अशा अनेक नावांची संज्ञा वापरली आहे. पण 'आत्मकथन' हीच संज्ञा अर्थपूर्ण व समर्पक ठरते. 'भारतीय समाज जीवनात संस्कृतीच्या नावाखाली जो समाज तुडविला गेला, ज्याला रितीरिवाज, परंपरा व नितीमूल्यांच्या नावाखाली समाजाने स्वतःचे दास म्हणून वागविले त्या समाजाच्या भावनेचा, कोंडीचा, पिढयान्पिढया मुक्या असणाऱ्या मनांचा, त्यांच्या वेदनांचा शब्दविष्कार म्हणजे दलित आत्मकथन होय.

आत्मकथन हा साहित्यप्रकार साधारणपणे १९५० नंतर मराठी साहित्यामध्ये उदयाला आलेला आहे. आत्मकथनामध्ये साधारणपणे दलित लेखकांनी मोठया प्रमाणात आत्मकथन लिहिलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून “शिका, संघटित व्हा व संघर्ष करा” हा मूलमंत्र घेऊन स्वातंत्र्यानंतरची दलित पिढी शिकू लागली. या शिक्षणातून त्यांना ज्ञान प्राप्त झाले, वैचारिकता मिळाली आणि आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊ लागली. दलित साहित्यामध्ये कवितालेखन हा प्रकार सगळ्यात जास्त लिहिला गेलेला आहे. त्या खालोखाल दलित आत्मकथने लिहिली गेली आहेत. दलित आत्मकथने खूप मोठया प्रमाणात दलित साहित्यात लिहिलेली आपल्याला पहावयास मिळतात. दलित लेखकांबरोबरच दलित लेखिकांचीही आत्मकथने खूप मोठया प्रमाणात लिहिलेली आढळतात.

## ४.७ दलित आत्मकथने

दलित साहित्याच्या प्रारंभीच्या काळात डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वविचारामुळे, चळवळीमुळे आणि नंतर धर्मांतराच्या घटनेमुळे दलितांमध्ये नव्या जाणिवांचा उदय झाला. शतकानुशतके दबलेल्या भावनांचा उद्रेक होऊ लागला. या उद्रेकाच्या अभिव्यक्तीचा आरंभबिंदू हाच एकाअर्थी दलित साहित्याच्या सृजनाचा आरंभबिंदू. ही अभिव्यक्ती प्रारंभी कवितेच्या रूपाने होऊ लागली. कवितेतूनच दलितांचे आत्मभान अधिकाधिक डोळस, अधिक विवेकपूर्ण, अधिक प्रगल्भ होऊ लागते. कवितेतून व्यक्त होणाऱ्या वेदनेचे स्वरूप व तपशील जाणवू लागले. बंधानुबंधातील कार्यकारणभाव उमगू लागला. व्यक्ती आणि समाज यांच्यातील अवयव-अवयवी, आधार-आधेय नाते संबंधाचा उलगडा होऊ लागला. दलित जाणीव, दलित अनुभवच अभिव्यक्तीच्या विविध रूपांची मागणी करू लागले. दलित कथा, दलित आत्मकथन, दलित कादंबरी लिहिली जाऊ लागली आणि दलित गद्याची वाटचाल

सुरू झाली. 'हकीकत आणि जटायु' (प्रा. केशव मेश्राम), 'बलुतं' (दया पवार), 'उपरा' (लक्ष्मण माने), 'उचल्या' (लक्ष्मण गायकवाड), "मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे" (माधव कोंडविलकर) 'फांजर' (नानासाहेब झोडगे), 'तराळ अंतराळ' (शंकरराव खरात), 'अक्करमाशी' (शरणकुमार लिंबाळे), 'आठवणींचे पक्षी' (प्र. ई. सोनकांबळे), 'कार्यकर्ता' (मुरलीधर जाधव), 'गावकी' (रुस्तुम अचलखांब), 'भटक्या' (के. ओ. गिहे), 'अंतःस्फोट' (कुमुद पावडे), 'माझ्या जल्माची चित्तरकथा' (शांताबाई काबळे), 'मला उद्धवस्त व्हायचंय (मल्लिका अमरशेख), 'मातीचे आकाश' (राम बसाखेत्रे), 'जिणं आमचं' (बेबी कांबळे), 'टाच' (प्रल्हाद चेंदवणकर), 'आमचा बाप आणि आम्ही' (नरेंद्र जाधव), 'कोल्हाट्याचं पोर' (किशोर काळे) इत्यादी दलित आत्मकथने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'गबाळ' 'आभरान' 'खिंडार' या काही आत्मकथनांचाही उल्लेख करता येईल.

गतकाळात आपण जे भोगले, सोसले, अनुभवले त्यातून आपल्या व्यक्तित्वाची जी जडणघडण होत गेली, त्यात जे कोणी प्रेरक वा मारक ठरले. त्या सर्वांच्या आठवणी दलितांच्या मनात ताज्या स्वरुपात जागृत होऊ लागल्या. वर्तमानकाळातही होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाणीव झाली की, गतकाळातील मानसिक व्यथा वेदना आणि यातना अथवा तत्सम अनुभव इत्यादींच्या आठवणी होणे स्वाभाविक असते. दलितांची भौतिक परिस्थिती सुधारत आहे असे मान्य केले तरी वर्णव्यवस्थेचे व जातिव्यवस्थेचे निर्मूलन झालेले नाही. त्यामुळे सामाजिक अन्यायापोटीं दलितांना वर्तमान काळातही मानसिक व्यथावेदना आणि यातना भोगाव्या लागतात. त्या भोगतांना गतकालीन व्यथा वेदनांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे. गतकाळ आठवण्यात एक प्रकारचे मानसिक समाधान लाभते. परंतु दलितांच्या बाबतीत या आठवणी मानसिक समाधान देणाऱ्या नसतात. त्या आठवणीच मूलतः दाहक असतात. त्या आठवणीचे कथन करताना तो दाह लेखकाच्या मनाला जाणवतो. त्यामुळे लेखकाचे बेचैनी, चीड, अस्वस्थता, त्वेष, संताप इत्यादी विकारही बळावतात. अनुभव कथनाच्या वेळी लेखकाचे मन त्या आठवणींनी कळत नकळत प्रक्षुब्ध होते. म्हणून प्रक्षोभ हा दलित आत्मकथनाचा एक विशेष आहे.

## ४.८ समारोप

दलित साहित्यमध्ये एकामागून एक अशी अनेक आत्मकथने प्रसिद्ध झाली. ही आत्मकथने प्रसिद्ध होण्यामागे विविध प्रेरणा आपल्याला आढळतात. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि तत्वज्ञानाने संपूर्ण दलित समाज प्रभावित झाला. त्यानंतर बाबासाहेबांनी त्यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेली दलित चळवळ ही सुद्धा एक प्रेरणाच मानली जाते. यामधून अनेक लेखक पुढे आले गौतम बुद्ध, कबीर, महात्मा फुले, शाहू महाराज, महर्षी शिंदे इत्यादींनी जे काही सामाजिक जागृती प्रबोधन केले, त्यामधून दलित समाजाला आत्मभान लाभले आणि त्यातून ते लिहू लागले. आपला जीवनानुभव इतरांपेक्षा वेगळा आहे आणि तो लिहिला पाहिजे या भावनेतून दलित लेखकांनी लिहिलेले आहे. जगत असताना झालेला अपमान, अवहेलना, वंचना, कुचंबना त्यांनी शब्दबद्ध केलेले आहे. तसेच दलित जीवनातील गरीबी, कुपोषण, परंपरा, रूढी, अस्वच्छता, अंधश्रद्धा, शिक्षणाबाबत अनास्था इत्यादीचे चित्रण ह्या आत्मकथनातून आलेले आपल्याला पाहावयास मिळते. मराठी साहित्यामध्ये दलित आत्मकथनांचा खूप मोठी भर घातलेली आहे.

## ४.९ संदर्भ ग्रंथ


- पाटील, म. सु ., दलित कविता , लोकवाङ्मय गृह मुंबई.
- मेश्राम ,केशव (संपा); विद्रोही कविता , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९७८.
- भगत, दत्ता, निळी वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००१.
- कुलकर्णी, गो.म. (संपा); दलित साहित्य : प्रवाह व प्रतिक्रिया,प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८६.
- बागुल, बाबुराव; दलित साहित्य: आजचे क्रांतीविज्ञान, बुद्धिष्ट पब्लिक हाउस, नागपूर १९८१.
- मनोहर, यशवंत, दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९७८
- जाधव, रा.ग. निळी पहाट, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९७८


## ४.१० प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. दलित साहित्यातील 'दलित कविता: तात्त्विक विचार' स्पष्ट करा.

२. दलित साहित्यातील 'आत्मकथन: तात्विक विचार' स्पष्ट करा.

३. दलित साहित्यातील 'दलित कविता आणि आत्मकथन: तात्विक विचार' स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. दलित कविता: तात्त्विक विचार

२. आत्मकथन: तात्विक विचार

३. कविता व आत्मकथने

*****

# ४आ

# कोंडवाडा - दया पवार

**घटक रचना**

४.० उद्देश

४.१ प्रस्तावना

४.२ दया पवार यांचा परिचय

४.३ कवितासंग्रहाचे प्रास्ताविक 'माझे शब्द'

४.४ कोंडवाडा शीर्षकाची यथार्थता

४.५ कोंडवाडा कविता संग्रहातील आत्मभान आणि समाजभान

४.६ कवितासंग्रहातील वेदना

४.७ कोंडवाडा कविता संग्रहातील अन्याय आणि अन्यायाची जाणीव

४.८ कोंडवाडा कविता संग्रहातील विद्रोह आणि नकार

४.९ देश, धर्मव्यवस्था आणि जातव्यवस्थेला आणि इतरांना विचारलेले प्रश्न

४.१० कवितेतला आशावाद

४.११ इतर काही कविता

४.१२ कवितेची भाषा शैली

४.१३ कवितेतील रूपके प्रतीके, प्रतिमा, प्राक्कथा

४.१४ समारोप

४.१५ संदर्भ ग्रंथ

४. १६ प्रश्नावली

## ४.० उद्देश

- दलित साहित्यातील वेदना, विद्रोह, नकार समजतील.
- विद्यार्थ्यांना 'कोंडवाडा' कविता संग्रहातील आत्मभान आणि समाजभान समजेल.
- विद्यार्थ्यांना 'कोंडवाडा' कविता संग्रहातील अन्यायाची जाणीव होईल.
- विद्यार्थ्यांना 'कोंडवाडा' कविता संग्रहातील आशावाद समजेल.
- 'कोंडवाडा' शीर्षकाची यथार्थता ध्यानात येईल.

## ४.१ प्रस्तावना

कवी दया पवार यांच्या 'कोंडवाडा' कवितासंग्रहाची प्रथम आवृत्ती ऑगस्ट १९७४ मध्ये प्रकाशित झाली आणि सप्टेंबर २०१४ मध्ये कवितासंग्रहाचे पुनर्मुद्रण झाले आहे. कविता संग्रहाला कवीने लिहिलेली 'माझे शब्द' नावाची प्रस्तावना आहे. संग्रहात एकूण ४२ कविता आहेत. दलित जाणीव ही कवितासंग्रहाच्या केंद्रस्थानी आहे. धर्मव्यवस्था, जातव्यवस्थेने खालच्या वर्गांना अतिशय हलाखीचे जिणे जगावे लागले, त्या समाजाचा प्रातिनिधिक हुंकार 'कोंडवाडा' या कविता संग्रहात आहे. दया पवार यांच्या संवेदनशील मनाला झालेल्या यातना काव्यबद्ध झाल्या आहेत. त्यांच्या या काव्यसंग्रहाला १९७५ साली राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

'दलित साहित्य वेदना व विद्रोह' या पुस्तकात भालचंद्र फडके लिहितात, 'दया पवार यांनी तसे मुबलक कविता लेखन केले आहे. पण त्यांचे जिवंत अनुभवविश्व प्रकट झाले आहे ते 'कोंडवाडा' या त्यांच्या कवितासंग्रहात. त्यांच्या कवितेमागे त्यांनी जगलेले आणि भोगलेले जीवन आहे.' या कविता संग्रहातल्या सगळ्याच कविता महत्त्वाच्या आहेतच पण 'प्रक्षोभ', 'हे महाकवे', 'कोंडवाडा', 'हे महान देशा', 'ब्रोकन मॅन', 'खांडववन', 'झाड', 'टेरीलीन शर्टातला मी' या त्यांच्या लक्षणीय कविता होत. दलित साहित्याचे समीक्षक डॉ. महेंद्र भवरे यांचे 'कोंडवाडा' कवितासंग्रहाविषयी खालील विधान महत्त्वाचे आहे. 'नामदेव ढसाळांच्या कवितेने धगधगत्या विद्रोहाने पेटलेली कविता दलित कवितेच्या प्रांतात दाखल केली आणि अनेक प्रतिभा लिहित्या झाल्या, विविधांगी आविष्कार सिद्ध होऊ लागला. त्यापैकी दया पवार हे अत्यंत महत्त्वाचे कवी होत. 'गोलपिठा'च्या पाठोपाठ दया पवारांचा कोंडवाडा (१९७४) दाखल झाला आणि दलित कवितेत दलित जगाची कोंडी फोडणारा, दलित दुःखाला वाचा फोडणारा, घुसमटीला आणि विद्रोहाला वाट मोकळी करून देणारा आविष्कार 'कोंडवाडा'च्या माध्यमातून सिद्ध झाला. समूहाचे दुःख सोबतीला घेऊन, समूहाला सोबत घेऊनच कविता बोलकी झाली.' एकूणच दलित साहित्यात, मराठी साहित्यात नव्या दमाची कविता लिहिण्याचा मान दया पवार यांना जातो.

## ४.२ दया पवार यांचा परिचय

दया पवार यांचे मूळ नाव दगडू मारुती पवार असे आहे. दलित साहित्य चळवळीतले महत्त्वपूर्ण लेखक म्हणून ते सर्वांना परिचित आहेत. 'जागल्या' या नावाने देखील त्यांनी लेखन केले. त्यांचा जन्म अकोला जिल्ह्यातील धामणगाव येथे झाला. संगमनेर येथे त्यांनी आपले दहावीचे शिक्षण पूर्ण केले. नोकरीच्या शोधात त्यांनी मुंबई गाठली. १९५६ मध्ये मुंबईमध्ये परळ येथे पशु वैद्यकीय महाविद्यालयात त्यांनी लेखनिक व प्रयोगशाळा सहाय्यक पदावर काम सुरू केले. नोकरी करता करता त्यांनी आपले शिक्षण सुरू ठेवले. मेलेल्या प्राण्यांची कातडी सोलून त्यांचे शरीर जतन करण्यासाठी त्यांच्या शिरांमध्ये अल्कोहोलचे इंजेक्शन देण्याचे काम त्यांच्या वाटयाला आले. हे करत असताना त्यांच्या संवेदनशील मनावर अनेक आघात झाले. नंतरच्या काळात महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा, प्रगत साहित्य सभा या संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध आला. यातूनच प्रेरणा घेऊन त्यांनी १९६८ सालापासून दलित साहित्य चळवळीत आपले सक्रिय योगदान देण्यास सुरुवात केली. १९६७ मध्ये अस्मितादर्श या नियत कालिकात त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली. पुढे

याच नियतकालिकातून दर्जेदार लेखन केले. त्यांचे 'बलुतं' हे आत्मकथन गाजले. या आत्मकथनाचा हिंदीत 'अछुत' म्हणून अनुवाद झाला. इतर भारतीय भाषांबरोबरच इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन भाषेत देखील त्याची भाषांतरे झाली आहेत. 'कोंडवाडा' आणि 'धम्मपद' हे कवितासंग्रह त्यांनी लिहिले. 'चावडी', 'पासंग', 'जागल्या' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'पाणी कुठंवर आलं ग बाई' आणि 'विटाळ' हे वैचारिक लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. १९७५ मध्ये श्रीलंकेत कोलंबोमध्ये भरलेल्या 'जागतिक बुद्ध परिषदेला' ते हजर होते. १९८२ मध्ये 'फोर्ड फाउंडेशन' ची शिष्यवृत्ती त्यांना प्राप्त झाली. त्यासाठी ते अमेरिकेला गेले होते. १९८४ला जर्मनीतील फ्रँकफर्ट येथे भरलेल्या 'वर्ल्ड बुक फेअर'मध्ये 'दलित साहित्या'वर त्यांनी एक शोधनिबंध सादर केला होता. १९८८ ते १९९४ या कालावधीत ते 'बालभारती' पाठयपुस्तक समितीचे सदस्य होते. १९८७ ते १९९४ या दरम्यान 'महाराष्ट्र राज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधन समिती'चे सदस्य म्हणूनही ते कार्यरत होते. त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

'बलुतं' हे आत्मकथन लिहिल्यानंतर दया पवार हे नाव महाराष्ट्रात सुपरिचित झालं. संपूर्ण महाराष्ट्रात हे आत्मकथन गाजलं. बलुतं हे मराठीतील पहिले प्रकाशित 'दलित आत्मकथन' आहे. आपल्या चाळीस वर्षाच्या जीवन प्रवासाची आत्मकहाणी यात त्यांनी मांडले आहे. संवादी शैलीचा वापर करत त्यांनी या आत्मकथनाची मांडणी केली आहे. एकाच व्यक्तिमत्त्वाची दोन रूपे या आत्मकथनातून व्यक्त झालेली दिसून येतात. 'दगडू' दयाला आत्मकथन करतोय. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ते शोध घेत आहेत. त्यांना त्यांच्या आईने सांगितलं होतं की 'आयुष्यात किमान एकाला तरी घडलेलं सगळं सांगावं' या मंत्रानुसार त्यांनी बलुतं मध्ये सगळं सांगितलं आहे. बलुतं इतकाच त्यांचा कोंडवाडा हा कवितासंग्रह महत्त्वाचा आहे. मराठी कवितेमध्ये साठोत्तरी कविता असा एक कालखंड केला जातो. या कालखंडात विद्रोही कवितेला फार महत्त्वाचे स्थान आहे. अनेक कवींनी आपल्या विद्रोही कवितेतून सामाजिक विषमतेवर हल्ला चढविला. त्या कवितेतून नवे समाजभान निर्माण झाले. यामध्ये दया पवार यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल.

## ४.३ कवितासंग्रहाचे प्रास्ताविक 'माझे शब्द'

कोंडवाडा या कवितासंग्रहात दया पवार यांनी 'माझे शब्द' नावाचे प्रास्ताविक लिहिले आहे. हे प्रास्ताविक आपल्याला कवितेच्या अर्थाकालनास सहाय्यभूत ठरते. कवितेच्या प्रवासाबरोबरच त्यांचा जीवनप्रवास देखील त्यांनी त्यात लिहिला आहे. आपल्याला कवितेची जाणीव कशी झाली आणि कोणकोणत्या गोष्टी प्रेरक ठरल्या त्याही त्यांनी सांगितल्या आहेत. आपल्या विपरीत परिस्थितीची झालेली दाहक जाणीव आणि त्याच वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने सुरू झालेली मानवमुक्तीची चळवळ दोहोंच्या समन्वयातून दया पवार यांच्या कवितेची निर्मिती झाली आहे. त्यांनी आणखी एक कारण सांगितले आहे की मराठी कवितेतला निसर्ग त्यांना कधीच रिझवू शकला नाही. त्यांना आपला समाज, आपले प्रश्न त्यांना मराठी कवितेत दिसले नाहीत. प्रास्ताविकात ते म्हणतात, 'या देशातील जातिजातींची मडक्यांची उतरंड, नुसती श्रमाची विभागणी नाही; तर श्रमिकांची विभागणी. एक जात नेमकी दुसऱ्या जातीच्या तोंडावर बसलेली त्यामुळे गुदमरलेली अवस्था. आपण तर अगदी तळचे मडके. त्यातही 'रांडकीचं रांड प्वार'. पाणलोटाने कचरा किनाऱ्याला लोटावा, तसं आपलं आयुष्य.' आपलं आयुष्य नक्की काय

आहे हे त्यांना कळलं. जातीच्या उतरंडीत आपण अतिशय तळाचे मडके ही जाणीव त्यांना झाली. हे गुदमरलेपण व्यक्त करण्याकरिता त्यांनी ही कविता लिहिली आहे.

'दलित' ह्या शब्दाचे व्यापकत्वही माझ्या ध्यानी येऊ लागले. गावकुसाबाहेरच्या जाती, भूमिहीन शेतमजूर, आदिवासी असा मोठा कॅनव्हास 'दलित' शब्दापाठीमागे जाणवतोय. हा दडपलेला समूह खऱ्या अर्थाने क्रांतिप्रवण झाला, तर आपल्या स्वप्नात तरळणारे देशाचे टांगते चित्र साकार होईल याची जाणीव प्रखर होऊ लागते. ह्यांच्या श्रमावर, रक्तावर, घामावर, सुपर स्ट्रक्चर उभे आहे. त्यांची अवस्था म्हणजे विहिरीत लोटलेल्या बाईसारखी आहे हे कळू लागते. मी हादरला जातो.' दलित या संकल्पनेचे व्यापकत्व त्यांना कळले, त्याचा मोठा पट आहे. नाडलेले पिचलेले सर्व जातीसमूह त्यात समाविष्ट आहेत हे त्यांना जाणवले. हे सगळे वर्गसमूह जर क्रांतिप्रवण झाले तर आपल्या स्वप्नातल्या देशाचे चित्र साकार होईल असे त्यांना वाटले. या सर्व जातीसमुहांच्या अवस्थेला त्यांनी 'विहिरीत लोटलेल्या बाईची' प्रतिमा योजली आहे.

या प्रास्ताविकात दया पवार यांचे अल्पसे चरित्र येते. त्यांच्या आयुष्याला दुभंगलेपण कसे चिकटले आहे ते त्यांनी सांगितले आहे. 'चौथीनंतर गावापासून तीन मैलांवर तालुक्याच्या गावी शिकण्यास जाऊ लागलो. वडिलांचे छत्र गेलेले. आई काबाडकष्ट करून तळहाताच्या फोडासारखी जपते आहे. शहरात मी बदलत चाललो आहे. श्रीमंत मुलांचा सहवास, त्यांच्यासारखे इस्त्रीचे कपडे वापरतोय, आईच्या कष्टावर शुद्ध बोलण्याकरिता धडपडतोय. नाटकात कामे करतोय. बाजाराच्या दिवशी आई मोळी घेऊन विकावयास यायची. समोरून रस्त्याने ती येत आहे. आपल्याबरोबर तर श्रीमंतांची पोरे. आपण तोंड फिरवून आईला ओळख देत नाही. आपल्यात दुभंगलेपणा येत चाललाय. टेरिलीन शर्टातील आपले हे दुभंगलेपण आजही संपलेले नाही.' समाज स्तरावर मिळणारी वागणूक आणि मनाच्या स्तरावरचे दुभंगलेपण, मनाच्या आणि वर्तनाच्या पातळीवर असलेला न्यूनगंड त्यांनी प्रांजळपणे व्यक्त केला आहे.

'पुढे कॉलेजच्या पातळीवर ह्या ग्रंथांशी सलगी झाली, तेव्हा वेगळेच प्रश्न चक्रीवादळासारखे मनात उठले. शंबूक, कर्ण, एकलव्य, सीता, द्रौपदी यांचा आक्रोश नुसता ऐकू येऊ लागला. क्रौंच पक्षाची हत्या पाहून विव्हळणारा वाल्मीकी, त्याने रामराज्याची फक्त स्तुती का गाइली? त्याचा तर जन्म गावकुसाबाहेर झाला! जेथे त्याचा जन्म झाला, त्या जीवनाला त्याने स्पर्श का केला नाही? ऐवढा मोठा प्रतिभावान कवी, त्याच्याच रक्ताचा शंबूक आतून बाहेरून संतापाने पेटून उठला. रामराज्याचा हिमकडा त्याच्यावर कोसळला. अशा वेळी हा अन्याय, अत्याचार, वेशीवर टांगणारा वाल्मीकीने एकही श्लोक का रचला नाही? - असे प्रश्न सुचू लागले.' दया पवार यांना आपली तथाकथित संस्कृती, साहित्य यांच्या विषयी पडलेल्या असंख्य प्रश्नातून या कवितांची निर्मिती केली आहे. कवितासंग्रहातल्या अनेक कवितांच्या निर्मितीची बीजे या प्रास्तविकातून येतात.

दलित साहित्यकृतीचा अभ्यास करताना दलित कवितेच्या विशेषांचा आपल्याला अभ्यास करावा लागतो. स्वभान, समाजभान, अन्यायाची जाणीव, नकार, विद्रोह या मुद्यांच्या आधारे कोंडवाडा या कवितासंग्रहातील कविता आपल्याला समजावून घ्याव्या लागतील. दलित कविता मराठी कवितेपेक्षा वेगळी आहे. ती 'मी' पेक्षा 'आम्हीला' महत्त्व देते.

तिच्यातील अनुभवांना केवळ व्यक्तिभान नाही तर समूहभान आहे. गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित कवितेचे प्रेरणास्थान आहे. मानव परिवर्तनासाठी लढणा-या भारतातील आणि जगभरातील व्यक्ती, घटना यांची भलामण दलित कविता करते. दलित चळवळ आणि दलित कविता यांचे अतूट नाते आहे. दलित सुधारक आणि साहित्यिक यांनी कवितेला परिवर्तनाचे हत्यार म्हणून पहिले आहे. अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तिचा प्रभावी निर्मिती झाली आहे. अस्पृश्यता, विषमता, जातीयतेचे चटके, अपमान, अगतिकता, घुसमटलेपण, चीड, संताप, भूक, दारिद्र्य, शोषण या सर्व गोष्टी दलित कवितेच्या केंद्रस्थानी आहेत. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा न देणा-या सर्व व्यवस्थांना दलित कविता नकार देते. मनस्मृती, चातुर्वर्ण्य व्यवस्थेला दलित कविता विरोध करते. मानवाच्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना प्राधान्य देते. तिला नवी समाज रचना अपेक्षित आहे.

## ४.४ कोंडवाडा शीर्षकाची यथार्थता

नुकसान किंवा उपद्रव करणाऱ्या जनावरांना कोंडण्याची सरकारी जागा. अशा गुरांना कोंडवाडयात घालण्याची व्यवस्था कायद्याने करण्यात आली. यासंबंधीचा कायदा भारतात प्रथम १८७१ साली संमत करण्यात आला. 'कोंडवाडा' म्हणजे गावागावातील अशी बंदिस्त जागा की जिथे गावातील भटकी आणि बेवारस जनावरे कोंडली जातात. वर्षानुवर्ष त्या कोंडवाडयात खितपत पडतात. त्यांची कोंडी केली जाते. दया पवारांनी हा शब्द आपल्या काव्यसंग्रहास चपखलपणे वापरला आहे. एका विशिष्ट समाज गटांनी दुसऱ्या समाज गटाची कोंडी केली. अमूर्त अशा कोंडवाडयात डांबून ठेवले गेले. कोंडीचा हा विविधांगी वेदनादायी आविष्कार आहे. ही एक त-हेची कैद होती त्यात बेसुमार बंधने होती, आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध बोलण्याची मुभा नव्हती. अस्पृश्यता होती. थोडी बहुत हाताशी जमीन होती, परंतु ती सीमा ओलांडण्याची परवानगी नव्हती. कोंडवाडा हेच तुमचे सर्वस्व आहे असा अलिखित आदेश होता. पवारांनी हा कोंडवाडा या कवितेतून खुला केला आहे. कोंडवाडयात घुसमटलेल्या जीवांना त्यांच्या वेदनेला शब्द रूप दिले आहे. या शीर्षकाची एक कविता या कविता संग्रहात आहे.

"आज विषाद वाटतो, कशा वागविल्या मणामणाच्या बेडया
गाळात हत्तींचा कळप रुतावा तशा, ध्येय-आकांक्षा रुतलेल्या
शिळेखाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा
किती जन्माची कैद, कुणी निर्मिला हा कोंडवाडा."

ही आजची कैद नाही तर अनेक जन्मांची कैद आहे असे सांगून कुणी निर्मिला हा कोंडवाडा? थेट सवाल विचारला आहे. 'माणसाचा कोंडवाडा करणा-या माझ्या देशा तुझ्या नावानं' अशी अर्पणपत्रिका त्यांनी लिहिली आहे. देशाबद्दल कडवट भावना असली तरी 'माझ्या देशा' हा शब्द बंध महत्त्वाचा आहे. आम्हाला या अवस्थेत या देशाने जरी ठेवले असले तरी देशावर प्रेम कायम आहे हे त्यांना त्यातून सुचित करायचे आहे. कोंडवाडा हा गावकुसाबाहेर असतो आणि दलित वस्तीही गावकुसाबाहेर असते. 'कोंडवाडा' हा गुलामीचे प्रतीक आहे.

## ४.५ कोंडवाडा कविता संग्रहातील आत्मभान आणि समाजभान

'आत्मभान' याचा अर्थ आपण इतरांसारखे समान आहोत याची जाणीव होणे. फक्त इतरांसारखे आहोत असे नाही तर इतरांच्या बरोबरीचे ही जाणीव होणे म्हणजे आत्मभान. वर्णाश्रमव्यवस्था, जातिव्यवस्था आणि जन्मजात व्यवसाय यामुळे दलित समाजाला आत्मभान नव्हते. याच अनुषंगाने समाजाच्या अस्तित्वाचा विचार करणे म्हणजे समाजभान येणे होय. समीर गायकवाड यांनी आपल्या ब्लॉगवर 'दया पवार- कोंडवाडा- एक व्यथा' नावाचा लेख लिहिला आहे. त्यात ते लिहितात. 'आपलं वास्तव मांडताना ते (दया पवार) केवळ समाजाला नग्न करतात असं नव्हे तर आपल्या घरातलं, परिसरातलं सगळीकडचं जहर समोर आणत राहतात. जन्मदात्याबद्दलही ते तटस्थतेने लिहितात. त्यांचं वैयक्तिक जीवन पाहून आपणच चकित होऊन जातो अन् मनात प्रश्न येतो दारू आणि स्पिरिटचे व्यसन असणारे वडील, त्यांच्या जाण्यानंतर काबाडकष्ट करून शिकवणारी प्रचंड जिद्दीची आई, तसेच समाजात सतत वाटयास येणारी उपेक्षा अन् पोटाची खळगी भरण्यासाठी करावी लागणारी कामे या सर्व जीवघेण्या विश्वात पवारांच्या मनातला संवेदनशील कवी, लेखक कसा काय तेवता राहिला याचं उत्तर त्यांच्या आत्मभानात येतं. त्यांच्या नावाप्रमाणे त्यांचं आयुष्य बंद दगडी चिऱ्यांचं झालं असतं, पण त्यांच्यातल्या प्रज्ञेने त्यांच्यातील सृजन जागा केला!' आंबेडकरी चळवळीने अनेकांना आत्मभान आले. त्यापैकी दया पवार हे एक संवेदनशील कवी होते. त्यांनी बाह्य व्यवस्थेची जशी पोलखोल केली आहे तशी आतल्या व्यवस्थेकडे त्यांनी वस्तूनिष्ठपणे पाहिले आहे. आपण कोण? आपल्या जगण्याला अर्थ काय? आपल्या भोवती हा कोंडवाडा कोणी निर्माण केला यातून त्यांना आत्मभान आले आहे. ज्या विचारधारेने आपल्याला आत्मभान दिले आहे त्याचा दृष्टिकोनातून पारंपरिक धर्म, संस्कृती यांचा पडताळा घेतला आहे.

## ४.६ कवितासंग्रहातील वेदना

आपल्याला क: पदार्थ समजले जातेय, जातीभेदाच्या शृंखला अजूनही ख-या अर्थाने नष्ट झाल्या नाहीत. माणसे एकमेकांना कवेत घेत नाहीत याची सल कवीला आहे. दया पवार यांच्या कवितेत वेदनेचा स्वर तीव्र व्यक्त झाला आहे. 'झाड' ही कविता उदाहरणादाखल घेता येईल. आपल्या समाजाला सोसाव्या लागणाऱ्या दुःखाचा आक्रोश या कवितेतून व्यक्त होतो. झाड हिरवगार असलं पाहिजे. ते फुलाफळांनी बहरलेलं असलं पाहिजे. अशी सर्व साधारण आपली अपेक्षा असते. येथे झाड म्हणजे कवीचा संपूर्ण समाज असे समीकरण जोडता येईल. या समाजाच्या जगण्यात कधी बहर आलाच नाही. हे झाड दुःखाने गदगदत आहे. बोधिवृक्षासारखी याची मुळे खोलवर जरी असली तरी हे झाड साऱ्या ऋतूत कोळपून गेलेले आहे. त्याची पाने महारोग्याच्या बोटासारखी झडलेली आहेत. फांदी फांदीला कुबडं आलेली आहेत. मरण येत नाही म्हणून ते जिवंत आहे पण मरणकळा सोसत आहे. असे दुःखाने गदगताना झाड कवीने पाहिले आहे. त्याची वेदना, त्रास कवीला होत आहे.

"दुःखाने गदगदताना हे झाड मी पाहिलेले
तशी याची मुळे खोलवर बोधीवृक्षासारखी
बोधीवृक्षाला फुले तरी आली

हे झाड साऱ्या ऋतूत कोळपून गेलेले
धमनी धमनीत फुटू पाहणाऱ्या यातना
महारोग्याच्या बोटासारखी झडलेली पाने
हे खोड कसले! फांदी फांदीला जखडलेली कुबडी
मरण येत नाही म्हणून मरण कळा सोसणारे
दुःखाने गदगदताना हे झाड मी पाहिलेले" (झाड पृष्ठ क्र.५६)

दया पवार यांच्या कवितेत अंतर्गत दुही, एकोप्याचा अभाव त्यामुळे दलित चळवळीचे विखुरलेपण या सगळ्याची वेदना कवितांमध्ये जागोजागी दिसते. व्यक्तिगत हेवेदावे, स्पर्धा, इर्षा, अहंकार, पदलालसा यामुळे चळवळ बोथट होते. जे साध्य करायचं आहे त्यालाच हरताळ फासला जातो. 'फाळ' कवितेत 'स्वतःच्या अस्तित्वाला लावता एकमेका गळ्याला तात' असे ते म्हणतात. ज्या दुधावर आपला पिंड पोसला आहे त्याच मातीला विसरणारे लोक इथे आहेत. एकेकाळी मातीची मशागत करण्याकरता वापरले जाणारे नांगराचे फाळ आज भंगाराला देण्याच्या लायकीचे झाले आहेत. त्यांचा काळ संपला आहे असे कवी थेट सांगतो. आत्मभानाच्या जोडीला आत्मप्रतारणा आहे आत्मक्लेशही आहे. पुस्तकांशी ओळख नसती तर बरे झाले असते. अज्ञान असते तर गतानुगतिक जगलो असतो आनंद नाही पण त्रासही झाला नसता असे कवीला वाटते. विंचवासारखे प्रश्न डसले नसते.

"खरंच कशाला झाली पुस्तकांशी ओळख?
बरा ओहोळाचा गोटा
गावची गुरे वळली असती,
असल्या इंगळ्या डसल्या नसत्या"

हा सगळा संघर्ष करताना निराशा वाटयाला येते. म्हणून कवीला स्वत:ला बेचिराख करून घ्यावेसे वाटते. हिरोशिमावर अणुबॉम्ब टाकल्यावर तो जसा बेचिराख झाला तसे कवीला बेचिराख व्हावेसे वाटते.

"विजलोळाने प्रपात व्हावे
बांधावी अस्तित्वाची तिरडी
अन व्हावे बेचिराख
हिरोशिमासारखे"

आत्मसमर्पण करायला तयार होतानाची इच्छा दिसते. 'मरण' कवितेत व्यक्त होतात 'धारधार सुळ्यांच्या दरवाज्याला हत्ती जसे चिपा होतात तसं आपण हसत मरावं.' परिवर्तन होत नाही याची वेदना कवीला ग्रासली आहे असे दिसून येते.

## ४.७ कोंडवाडा कविता संग्रहातील अन्याय आणि अन्यायाची जाणीव

भारतामध्ये अनेक त-हेने तळागाळातील समाजाची अवहेलना केली आहे. त्यापैकी 'अस्पृश्यता' या महाभयंकर समस्येला दलित समाजाला तोंड द्यावे लागले. एका मानवाचा दुस-या मानवाला स्पर्श झाला तर माणूस विटाळतो. ही लांछनास्पद समज आपल्या समाजात होती. त्यात अवैज्ञानिकता, अमानवीपणा होता. दया पवार यांची 'आवर्त' कथात्मक कविता पाहता येईल. देवाच्या मंदिर निर्मितीत तळागाळातल्या श्रमिकांचा सहभाग आहे. त्यांनी डोक्यावर दगड न दगड वाहिले आहेत. वरच्या वर्गाचा हा दुटप्पीपणा आहे की जी माणसे मंदिराच्या निर्मितीला होती त्यांचा तिथे स्पर्श चालतो मात्र प्रतिष्ठापनेच्या दिवशी देवाच्या रथाला त्या माणसांचा सहभाग किंवा साधा स्पर्शही चालत नाही.

"आणि मग... एकच कोलाहल जत्रेत उठला
'रथाला म्हारडा शिवला... हाणा, मारा साल्याला'
गावकरी धावले... फरफटत मला मंडपाकडे नेले
देहाची चाळण झाली... रक्त चिळकांडीने देव भ्याले
चबुतऱ्याच्या थंडगार तुळईला करकचून बांधले
न बुझणारे ओल्या वादीचे आसूड फटके ओढले"

अशी विदीर्ण, पशुवत अवस्था त्याच्या वाटयास येते. तो आपल्या गावापुढे प्राणाची भीक मागतो मात्र त्यांना पाझर फुटत नाही. या हीन वागणुकीमुळे मात्र कुठेही देऊळ पाहिले की कवीची जखम भळभळते. आजवर दलितांना गुलाम बनविण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले गेले. त्यांच्या गळ्यात गाडगं दिलं, तशी हातात 'खुळखुळ्याची काठी' दिली. गावकामगार किंवा यसकर येत आहे याची सवर्णाला माहिती व्हावी म्हणून त्याच्या हातात दिलेली 'खुळखुळ्याची काठी' होती. त्याचा विटाळ होऊ नये म्हणून आगावू सूचना देण्यासाठी सवर्णांच्यासाठी केलेली ती सोय होती. 'ये हेमांगी' या कवितेत आपल्या जाती समूहांना अगदी पाण्यापासून कसे वंचित केले गेले आहे. त्याची मांडणी केली आहे.

"गंगा- सिंधूच्या प्रवाहात
वेद-उपनिषदांची हवा भरून
तुझ्या संस्कृतीचे शीड
चातुर्वर्ण्याच्या पाणवठयावर स्थीर झाले
अन् मग आम्हा भूमीपुत्रांना
पाण्यावाचून वंचित केले" (ये हेमांगी, पृष्ठ क्र.७)

दलित वस्ती ही गावकुसाबाहेरच होती. सवर्णांनी त्या वस्तीतल्या माणसाकडे केवळ आपली सेवा करणारा श्रमिक, कामगार, दास म्हणून पाहिले गेले. कोणतीही न्याय वागणूक वरच्या वर्गाकडून मिळाली नाही. कोंडवाडातल्या कवितेत अनेकदा वस्तीचा संदर्भ येतो. या

वस्तीतल्या आपल्या पिढया बलदंड होत्या मात्र त्यांना वेठबिगार बनवून कमकुवत केले गेले. त्यांच्या आयुष्याची माती केली.

"गावगाडयाची वेठबिगार ओढता ओढता
बलदंड वशिंड असलेल्या आपल्या पिढया
लोळागोळा होऊन मातीमोल झाल्या" (रक्तलाट, पृष्ठ क्र. १०)

संबंध समुहाने हा अन्याय अत्याचार सहन केला आहे आणि ही अमानुषता अजूनही सुरू आहे. हत्ती हा अजस्त्र प्राणी. पवारांनी 'त्या हत्तींचा कळप रुतावा तशा ध्येय आकांक्षा रुतलेल्या' असे वर्णन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा" या संदेशाने समाजात जाणीव-जागृती झाली आणि त्याचे पडसाद आपल्याला कवितेत पहायला मिळाले. तरीही हा दलित समूह पेटून का उठत नाही, ख-या अर्थाने क्रांतीकारक का होत नाही? या प्रश्नाने दया पवारांना अस्वस्थ केले आणि त्यातून त्यांनी 'प्रक्षोभ' ही कविता लिहिली.

"पोलादी चौकटी आड
माझ्या मनातला मी
बोलू लागला बंडाची भाषा
दमेकऱ्यासारखी येते केव्हा
क्रांतीच्या घोषणेची उबळ
गतिमान करावे वाटते
गाळात रुतलेले दैन्याचे चाक" (प्रक्षोभ पृष्ठ क्र.१)

दैन्याचे चाक गाळात रुतले आहे. आता ते चाक बाहेर काढून गतिमान केले पाहिजे अशी कवीला जाणीव झाल्याचे दिसून येते. ही जाणीव प्रातिनिधिक आहे. 'लॉस ऐजेंल्सवरून तू लिहिलस' या कवितेत त्यांच्या मित्राची कथा आहे. परदेशात गेलेल्या या मित्राला जो अनुभव आला तो त्याने कवितेत दिला आहे. तो अनुभव ऐकून दया पवारांच्या मनात येते.

"इथे भर हाटात, हॉटेलात, आवतीभोवती
इंडियन आणि कुत्ते एकाच मापाने मोजतात
निग्गर काळे म्हणून शिवी हासडतात
आतल्या आत सहस्त्र इंगळ्या डसतात."

कवी म्हणतो, हे सारं सारं वाचून फाऽऽर बरं वाटलं. या देशात पिढयान् पिढया आम्ही जे भोगलं ते थोडंसं तुझ्याही वाट्याला आलं... 'स्व'ला जशी जाणीव झाली आहे तशी इतरांना जाणीव करून देण्याचे कार्य कवी करतो. आपल्या समाजाला अस्तित्व प्राप्त करून देणा-या शूरांची आठवण करून देतो.

"हमरस्त्यात येता येत नसेल तर

चुळभर पाण्यात जीव दे रे!

वेशी वेशीवर ज्यांनी मरणाचे तोरण

हसत बांधले, त्यांचा तू वारस ना रे!"

जाणीव होणे ही सकारात्मक बाब आहेच, पण इतरांनाही जाणीवेच्या कक्षेत आणण्याचे कार्य दया पवार यांची कविता करते.

## ४.८ कोंडवाडा कविता संग्रहातील विद्रोह आणि नकार

आपल्यावर आणि आपल्या समाजावर झालेला अन्याय सहन करायचा नाही ही जाणीव तीव्र झाल्यावर दलित कविता विद्रोह पुकारते. बंडाची भाषा बोलते. दया पवारांना समाजात क्रांती अपेक्षित आहे. 'तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा' अशा शीर्षकाची एक कविता आहे. तमाम दलित वर्गाला ही कविता आवाहन करते. "अत् दीप भव्" बौद्ध तत्त्वज्ञातील महत्त्वाचा संदेश. या संदेशाचा पुनरुच्चार ही कविता करते.

"ज्या काजव्यांचा तुम्ही जयजयकार केलात

ते केव्हाच निस्तेज झाले आहेत

आता तुम्हीच प्रकाशाचे पुंजके व्हा

अन क्रांतीचा जयजयकार करा"

'हे महाकवे' ही त्यांची प्रसिद्ध कविता. ते या कवितेतून थेट वाल्मिकीशी संवाद साधतात. वाल्मिकी रामायणाचा निर्माता रामराज्याची स्तुती गाणारा त्याचा महाकवी म्हणून लौकिक आहे. पण पवार त्याला नाकारतात. क्रांती पक्षाची हत्या पाहून त्याचे कारण्यपूर्ण मन आक्रंदून उठले. स्वतःचा जन्म गावाबाहेर झाला तरीही त्याला उपेक्षित वस्ती, जिथे दुःखाचा जन्म झाला आहे तिथे विषण्ण चेहरे काळजीने नांगरलेले चेहरे किंवा मुक्तीसाठी त्यांनी फोडलेले टाहो वाल्मिकीला ऐकू गेले नाहीत. म्हणून दया पवार त्यांना महाकवी म्हणायला धजत नाहीत.

"तुला महाकवी तरी कसे म्हणावे!

हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा

एक जरी श्लोक तू रचला असतास...

...तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले."

ज्या व्यवस्थेने जात, धर्म यांच्या नावाखाली दलित समूहांना नाकारले त्या व्यवस्थेला, त्यातील परंपरांना दलित साहित्याने नकार दिला आहे. बराच काळ या जाती समूहांना मंदिर प्रवेश बंदी होती. चुकून जर प्रवेश केलाच तर प्राणानिशी मार खावा लागे, म्हणून कवी देवळांना पाठ करतो आहे. माझ्याकरिता सताड उघडे असलेले पर्याय देखील कवी सांगतो आहे.

“माझ्याकरिता सारी दारे सताड उघडी आहेत

मी देवळाबाहेर पाठ करून उभा आहे निर्विकार (आवर्त)”

या नकारात ठामपणा आहे. संघर्ष करण्याची तयारी आहे, आता माघार नाही असा निग्रह आहे.

“तुम्ही कोणत्याही कड्यावरून फेका

पंजाखालची माती सुटणार नाही

तुम्ही कोणतेही लेबल लावा

धुमसणारा जाळ विझणार नाही” (जाळ, पृष्ठ क्र.५३)

## ४.९ देश, धर्मव्यवस्था आणि जातव्यवस्थेला आणि इतरांना विचारलेले प्रश्न

कविता संग्रहातल्या सगळ्या कवितांचा विचार केला तर असे दिसते की, कवीने पोटतिडकीने बरेचसे प्रश्न विचारले आहेत. ‘स्व’ आणि ‘स्व’समाजाच्या अस्तित्वाविषयी चिंतन केले आणि मनात मानवी मूल्ये जागी असली की, विविध प्रश्न निर्माण होतात. दया पवार यांना विषमता, विरोधाभास दिसला आहे. तो त्यांनी कवितेतून मांडला आहे.

“आता भूतकाळाची त्वचा सोलून

नितळ चेहऱ्याने कसे मिरवावे?

हे महान देशा! किती दिवस चालणार तुझा पंक्तीप्रपंच?”

या देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले खरे मात्र विषमता, दारिद्रय, शोषण, अन्याय कायम राहिले. त्याच्या किमान गरजा देखील पूर्ण होऊ शकल्या नाहीत. देशाला महान म्हटले जाते खरे पण, अनेकांना त्या महानतेचा लाभ मिळत नाही माणसे अजूनही लहानच आहेत. भूतकाळ विसरून तुम्ही आम्हाला नितळ चेह-याने मिरवायला सांगत असाल तर ते शक्य नाही असे कवी सांगतो. देव, धर्म आणि वंश हे तळातल्या माणसाला अडकवणारे सापळे आहेत.

“देव, धर्म आणि वंश ही तुमची बुजगावणी

अक्कलहुशारीने रचलेत सापळे

बोला माणूस चिरडलात की नाही?”

किंवा

“हे माझ्या देशा – सांग सांग

कोणत्या माझ्या सीमा?”

या देशात राहून देशातल्या सर्वसामान्य माणसांना जशी वागणूक मिळते तशी आम्हाला मिळाली नाही.

आपल्या आतली घुसमट कवीला प्रश्नात टाकते. हे सारे प्रश्न अस्तित्वाविषयी आहेत.

"किती जन्मांची कैद, कुणी निर्मिला हा कोंडवाडा
कैद्यासारखी ताटवाटी आपणच आपली लखलखित करावी
नेहमीचा आपला परित्यक्त कोपरा, वर तलवार टांगलेली.
पुढे सरकारवे तर एकच गहजब, याने स्वयंपाक खोली बाटवली
आतल्या आत घुसमटायचे-आपण कोण? काय आपला गुन्हा?
आलो कुठून?..."

आम्हाला सवर्ण वर्गाने सदैव तुच्छ लेखले आहे. जे पहायचे ते त्यांनी पाहिले नाही. रक्तात पेरून गेलेला या कवितेत कवी प्रश्न विचारतो. खोपटा खोपटातील उघडा-नागडा संसार पाहून तुम्हाला किळस येते पण काचेच्या महालात पापांचे जळीत तुम्हाला का दिसले नाही असा प्रश्न केला आहे.

## ४.१० कवितेतला आशावाद

दलित कविता जेव्हा काही नाकारत असते तेव्हा कशाची तरी प्रतिस्थापना करीत असते. यातून काहीतरी फळास येईल हा आशावाद तिच्यामागे असतो. माणसे लढताहेत हिच गोष्ट आशादायी आहे. असंतोष निर्माण झाला नाही तर क्रांती नाही, क्रांती नाही तर परिवर्तन नाही, नवसमाज नाही.

"गावकुसाबाहेर उपेक्षित वस्तीत
राहुट्यांचे दोर ताणले आहेत
धमनी, धमनीत असंतोषाचे लोट
संतापाने कधीचे तटतटत आहेत"

आपल्या समाजाला अस्तित्व मिळवून देण्याचा, आपल्या हक्कांसाठी लढण्याचा निर्धार पक्का झालेला आहे.

"तुला मला जे सुख-वैभव, देशाने
कधी वाटयालाच येऊ दिलं नाही;
ते सारं सारं पायी खेचून आणणार आहे." (रक्तलाट, पृष्ठ क्. १०)

तुम्ही आम्हाला नि:संतान करण्याचा जरी प्रयत्न केला असला तरी मातेमातेच्या गर्भात तक्षक वाढत आहेत.

"अस्पृश्य ही का माणसे? कुत्र्या - मांजराची औलाद
त्यांनी नुस्ती सेवा करावी,' प्रारब्धाने केलेत दास

सभोवती रोम जळते, सारंगी छेडीत आजही गातो

पोथीनिष्ठ धर्मपीठावर परंपरागत तुमचा निरो

'महाभागांनो! असे का होते कधी कुणाचे निःसंतान

आजही वाढती तक्षक मातेमातेच्या गर्भागर्भात' (खांडववन, पृष्ठ क्र. ५४)

हा दुर्दम्य आशावाद दया पवार यांच्या कवितेचे बलस्थान आहे. त्याला काल्पनिकतेची जोड नाही. तर त्या आशावादाला वास्तवाची जोड आहे. अनेकांच्या बलिदानाचे योगदान आहे.

## ४.११ इतर काही कविता

दलित जाणीवेच्या कवितेसोबत इतर आशयाच्या काही कविता या कवितासंग्रहात समाविष्ट झालल्या आहेत. संसाराला सोबत करणारी सखी, तिच्याविषयीचे भावानुभव कवितेतून येतात. 'खांदा' कवितेत सखीविषयी कृतज्ञ भाव व्यक्त केले आहेत. 'तिने तुझ्या पिठात माझं मीठ रे' असं सांगत संसाराला साथ दिली आहे. संसाराला हातभार लावण्याकरिता ती छातीवर दगड ठेऊन बाहेर पडली आहे. कवितेत आपण आभाळ पेलतो मात्र इथे आपला खांदा लुळा पडला याची खंत तो सखीला सांगतो. असंच पहिल्या रात्रीचा अनुभव त्यांनी शब्दबद्ध केला आहे. तो ज्या नगरीत राहतो ती अभावाची नगरी आहे. एका खोलीत तीन चुली आहेत. साधे शारीर मिलन देखील सहज होत नाही. दोन जीवांच्या आजूबाजूला गर्दीच गर्दी आहे. कवी म्हणतो

"तू जशी जवळ ग आली, तशी दूर दूर सरकली

सारी रात सुनी सुनी, आसू ढाळीत मालवली."

'हार्लेम' नावाच्या कवितेत सखी बद्दलचे थेट भाव व्यक्त झाले आहेत. आपलं अपराधीपण व्यक्त केले आहे. तू मला कितीही झिडकारले तरी मी तुझ्याकडेच येतो तू साधीसुधी आहेस जुनेरात माखलेली आहेस पण वादळात तू उन्मळून पडत नाहीस उभीच राहतेस. मला सतत वाटत राहतं की मी भोगत आहे मात्र तू असंख्य हुंदके लपवले आहेस. मी जाऊन जाऊन जाणार कुठे तुझ्या पायाशीच माझं मरण आहे. हा सगळा लढा लढताना आपल्या सहचारिणीचा विचार ते टाळत नाही.

बुद्ध हा दया पवार यांच्या कवितेचे प्रेरणास्थान आहे. परंतु पद्मासनात ध्यानस्थ असलेला बुद्ध त्यांना नकोय. अजंठा वेरूळच्या लेण्यात दगडी ओठ शिवलेला निद्रा घेत असलेला बुद्ध त्यांना नकोय. त्यांना चालणारा बुद्ध हवाय. दिनदुबळ्यांच्या दुःखावर फुंकर घालणारा, सगळीकडे अंधार आहे आणि हातात मशाल घेऊन झोपडी झोपडी पर्यंत जाणारा, क्रूर अशा दुःखाचे नवे अर्थ सांगणारा त्यांना बुद्ध हवाय. परिवर्तनासाठी कृतीशीलतेची गरज आहे. असे या कवितेतून दया पवार सांगतात. या संदर्भाला जोडून त्यांची 'सिद्धार्थनगर' ही कविता पाहता येईल. ते सिद्धार्थाला उद्देशून सांगतात की आता तुझ्या नावाच्या नगरीला सत्तेचा जुलमी नांगर लागलेला आहे. ते नगर विस्कटून गेलं आहे. वस्तीच्या तळाशी असलेला भूखंड लाटण्याकरिता सिद्धार्थ नगर नावाची वस्ती उठवली जाते. तिकडे चंबळच्या खोऱ्यात दरोडेखोरांचं हृदय परिवर्तन होत आहे. आणि इकडे या सुसंस्कृत जगातील,

व्हाइट कॉलर लोकांची अमानुषता शिगेला पोहोचलेली आहे. सिद्धार्थाचा काळातील अंगुलीमाल हा बुद्धाला शरण गेला मात्र आजचा अंगुलीमाल अक्राळ-विक्राळ आहे. त्याला कसे सामोरे जायचे असा कवीला प्रश्न पडला आहे.

## ४.१२ कवितेची भाषा शैली

कवितेतला आशय कवितेची भाषा घडवीत असते. आपल्या समाजावर झालेला अन्याय सांगणे, त्याच्या विदारक अवस्थेविषयी सांगणे, अन्यायाची मांडणी करणे, त्याच्या विरोधात दंड थोपटणे हा हेतू असल्याने त्याची भाषा मवाळ नसणार किंवा त्यात फारसे अलंकारिक शब्द नसणार हे साहजिकच आहे. पवारांनी अनुभवलेल्या अनेक घटना कवितेत आल्या आहेत. म्हणून काही कवितांना कथारूप आहे. त्यामुळे ती भाषा कथारूप होते. घटनांचे वर्णन त्याचे, पडसाद आणि शेवट कवितेत मांडतात. विजेचा शॉक बसावा/ तसे अनेक हात आखडले/ गांधींच्या जयजयकारात/ खात्याखात्यांत कामगार परतले/ पुन्हा चिमणी धूर ओकू लागली/ यंत्रचाके धडधडली/ सांज झाली, दिशा क्षणात काळवंडली. एकाच कवितेत सारी घटना सांगतात. 'टेरलीन शर्टातला मी' या कवितेत काही संवाद येतात. 'अय्या, आम्ही फ्रीज घेतलं', 'उद्या हे किनई, स्कूटर घेणार' कार्यालयातल्या वरच्या वर्गातल्या सहका-याची भाषा. त्याच्या अभावाच्या जगात या गप्पा जखमेवर मीठ चोळल्यासारख्या आहेत. आर्थिक सामाजिक दृष्टया स्थिर-स्थावर जग आणि अस्थिर जगाची भाषा यातील भेद सहज दिसून येतो.

आपल्या समोर असलेल्या अज्ञानी लोकांना आपल्याला हवे तसे हाकता येते असा समज असलेले पुढारी या पुढा-यांच्या भाषणाची भाषा कवितेत येते. – बंधुहो, / राष्ट्रपिता म्हणायचे / हरिजन देवाची लेकरे / उगवत्या सूर्यबिंबासारखे / त्यांचेही रक्त लाल - या शिवाय भडविच्या, तुह्या आई तुहे या शिव्याही कवितेत येतात. भाषेची संयत, विद्रोही, समंजस रूपे कोंडवाडा कवितेत आढळतात.

## ४.१३ कवितेतील रूपके प्रतीके, प्रतिमा, प्राक्कथा

दया पवार यांच्या कवितेत बौद्ध वाङ्मय, हिंदू पुराणकथा, रामायण, महाभारत, जगभरातील इतिहास यातील पात्रे प्रतिमा म्हणून येतात. त्यांच्याद्वारे आपली अस्वस्था सांगतात. जरासंध याचा वध करताना त्याला दोन भागात चिरले आणि शरीराचे दोन तुकडे दोन दिशांना फेकून दिले. दोन दिशांना फेकले जाण्याची अवस्था त्यातून ध्वनीत होते. दुभंगलेला जरासंध अशी प्रतिमा येते. निरो हा पाचवा रोमन सम्राट. रोम जळत होत तेव्हा निरो फिडल वाजवत होता अशी म्हण प्रचलित आहे. दया पवार यांच्या कवितेत निरोचा संदर्भ येतो. बाह्य परिस्थिती भयानक असताना राजा वाद्य वाजवण्यात मश्गुल आहे. असा त्याचा अर्थ होतो. येथे परंपरागत निरो अशी प्रतिमा येते. खांडववन अथवा खांडवप्रस्थ. महाभारतातील एक वन किंवा जंगल जे श्रीकृष्ण आणि अर्जुनाने जाळले. उत्तरेला कुरुक्षेत्राच्या सीमेवर यमुना नदीच्या तीरावर वनौषधी पशुपक्षी, फुला-फुलांनी बहरलेले हे वन. खांडववनात नागांना जाळण्यात आले. आजही असेच दलित समुहातील लोकांना असेच जाळले जाते असे त्यांना सुचित करायचे आहे. 'आजही वाढती तक्षक मातेमातेच्या गर्भात' अशी एक ओळ कवितेत येते. हे तक्षकाचे मिथक येणारी नवी पिढी संघर्षशील

निघेल, ती अन्याय सहन करणार नाही. या हेतूने ही प्रतिमा वापरली आहे. दया पवारांच्या कवितेच्या आकलनासाठी मूळचे संदर्भ अभ्यासले तर अर्थाच्या आकलनास जास्त मदत होते.

समीक्षक डॉ.महेंद्र भवरे म्हणतात, 'दया पवारांच्या कवितेने दलित कवितेला प्रतिमा, प्रतीके आणि मिथकांचे मोठे योगदान दिले आहे. दस्युचा अबलख घोडा, चातुर्वर्ज्याचा पाणवठा, मनूची अजस्त्र भिंत, पेरता सुरुंग, पडीचे जीणे, इंगळ वेचणारा फिनिक्स, अश्मयुगाचा घनदाट काळोख, मरणाचे तोरण, कळ्यासारखे खुडलेले पाय, सोन्याच्या काडीने दात कोरणारा शत्रू, दुःखाने गदगदलेले झाड या आणि इतर अनेक प्रतिमा दलित कवितेत नव्यानेच दाखल झाल्या. नागभूमी, कोंडवाडा, खुळखुळ्याची काठी, निरो, क्रूस, बुद्ध, ब्रोकन मेन यासारखी प्रतीके आणि एकलव्य, शंबूक, अंगुलीमाल, आनंद, सारिपुत्र, तक्षक यासारखी मिथके यांचे उपयोजन या कवितेत झाले आहे. सोबत अनेक वाक्प्रचार, म्हणीचाही यथोचित वापर आपल्या कवितेत पवारांनी केला आहे.'

## ४.१४ समारोप

दलित समाजाला भोगाव्या लागणा-या यातनांचे वास्तव, सवर्ण वर्गाने दिलेली वागणूक, सवर्ण वर्गाचा कावेबाजपणा, जात, धर्म, वर्ग, वंश यांनी निर्माण केलेल्या माणसाला माणूसपण नाकारणा-या व्यवस्थांचा कावेबाजपणा, त्यांना दिलेला नकार, सवर्ण वर्गाला दोषी ठरवत आपल्या समाजाचे केलेले आत्मपरीक्षण ही दया पवार यांच्या कवितेची ठळक वैशिष्ठये आहेत. दया पवार यांना आलेले दाहक अनुभव, त्यांच्या मनावर आघात करणा-या सामाजिक, मानसिक घटना काव्यबद्ध झाल्या आहेत. दया पवार यांच्या संवेदनशील मनात उपस्थित झालेले अनेक प्रश्न कवितेतून मांडले आहेत. कवितेत विद्रोह असला तरी विविधांगी वेदना तीव्रतेने कवितेत येते. अनेक अर्थवाही प्रतिमा दया पवार यांनी कवितेतून साकारल्या आहेत. दलित कवितेच्या इतिहासात दया पवार यांचे महत्त्वाचे स्थान आहे.

## ४.१५ संदर्भ ग्रंथ


- पवार दया, कोंडवाडा (कवितासंग्रह), मेहता पब्लिकेशन हाउस, पुनर्मुद्रण सप्टेंबर २०१४
- डहाके वसंत आबाजी, कवितेविषयी स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती जुलै १९९९
- फडके भालचंद्र, दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण सप्टेंबर २०१७
- डॉ. भवरे महेंद्र, दलित कवितेचे अर्धशतक मराठी दलित कवितेचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
- गायकवाड समीर, (लेख)दया पवार- कोंडवाडा- एक व्यथा शनिवार २ जून २०१८, लिंक https://sameerbapu.blogspot.com/2018/06/blog-post_2.html

## ४.१६ प्रश्नावली

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'कोंडवाडा' कविता संग्रहातील वेदना, विद्रोह, नकार स्पष्ट करा.

२. 'कोंडवाडा' या कविता संग्रहाच्या शीर्षकाची यथार्थता स्पष्ट करा.

३. दया पवार यांच्या 'कोंडवाडा' या कविता संग्रहात आत्मभानाची जाणीव होते.- हे सविस्तर स्पष्ट करा.

४. दया पवार यांच्या संवेदनशील मनात उपस्थित झालेले अनेक प्रश्न 'कोंडवाडा' कविता संग्रहातील कवितेतून मांडले आहेत- स्पष्ट करा.

५. तुला महाकवी तरी कसे म्हणावे! हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा एक जरी श्लोक तू रचला असतास...
...तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले. – या ओळीतील आशय स्पष्ट करा.

### ब) टिपा लिहा.

१. 'कोंडवाडा'कवितेतला आशावाद

२. 'कोंडवाडा'तील रूपके प्रतीके, प्रतिमा, प्राक्कथा

३. दया पवार- कोंडवाडा

४. 'कोंडवाडा' कविता संग्रहातील आत्मभान

५. 'कोंडवाडा' शीर्षकाची यथार्थता

*****

# ४इ

# 'जग बदल घालुनी घाव' - एकनाथ आवाड

**घटक रचना**

४.१ उद्देश
४.२ प्रस्तावना
४.३ विषय विवेचन
४.४ एकनाथ आवाड यांचे बालपण
४.५ शिक्षण
४.६ समाजकार्याची सुरवात
४.७ डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा प्रभाव
४.८ आवाडांचा सामाजिक संघर्ष
४.९ 'नामांतर' चळवळीत सहभाग
४.१० सामाजिक न्यायविषयक भूमिका
४.११ अनिष्ट रूढी प्रथा आणि परंपरा यांवर घातलेले घाव
४.१२ मानवी हक्क अभियान
४.१३ जागर पदयात्रा
४.१४ 'जग बदल घालुनि घाव' या आत्मकथनाचे भाषिक विशेष
४.१५ समारोप
४.१६ संदर्भग्रंथ सूची
४.१७ नमुना प्रश्नोत्तरे

## ४.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला पुढील गोष्टी समजून घेता येतात.-

- दलित आत्मकथनांचे स्वरूप व विशेष लक्षात येईल.
- ग्रामीण, दलित समाजजीवन समजण्यास मदत होईल.
- दलित जीवन व्यवहार समजून घेता येईल.
- या आत्मकथनातून आत्मभान असलेले जीवन अनुभवता येईल.

## ४.२ प्रस्तावना

१९६० नंतरचा काळ हा परिवर्तनाचा काळ म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्याच्या उल्हासित दृष्टिकोनामुळे स्वभान जागृत झाले. उपेक्षित समाजातील शेवटचा घटकही विचार आणि चिंतनाच्या परिघात आला. मराठी वाङ्मयावरही या समकालीन परिवर्तनाचे पडसाद उमटलेले दिसतात. दलित, आदिवासी, भटका, वंचित उपेक्षित जनसमूह त्यांच्या जीवनाभुतीचे अनुभव साहित्यातून व्यक्त करू लागले. वेदनेचे, नकाराचे आणि विद्रोहाचे स्वरूप धारण केलेले विश्व मराठी साहित्याने त्यातील स्थित्यंतरासहित अतिशय गंभीरपणे स्वीकारलेले दिसते. सर्वच दुःखीत त्यांच्या व्यथा वेदनाचे संदर्भ साहित्यातून व्यक्त करू लागले. सामाजिक बहिष्कृततेचा, हीनतत्त्वाचा तसेच पशुतुल्य वागणुकीचा, पिढयानपिढया झालेल्या अन्याय अत्याचाराचा जाब मराठी साहित्यातून विचारला जावू लागला. यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन व कविता यासारख्या साहित्यप्रकारातून दलित जीवन व्यक्त झाले आहे.

## ४.३ विषय विवेचन

दलित साहित्याने आत्मचरित्रे ही संकल्पना नाकारून आत्मकथन हा शब्दप्रयोग स्विकारला आणि आत्मकथन ही संज्ञा आता मराठी साहित्यात रुढ झाली आहे. दलित व आदिवासी समाजाच्या साहित्यिकांनी वास्तव जीवनदर्शन घडविणारी दर्जेदार अशी काही आत्मकथने लिहिली आहेत. दलित समाज गावकुसाबाहेर राहणारा समाज आहेत. या समाजाच्या वाटयाला दारिद्रय, दुःख आणि वेदना सोसत एकूणच भयाण अशा स्वरूपाचे जगणे त्यांच्या वाटयाला आले आहे. दलित जीवनाच्या व्यथा वेदनांना आत्मकथनाच्या माध्यमातून अनेक लेखकांनी वाट मोकळी करून दिली आहे. मराठी साहित्यात दलित साहित्य प्रवाहाच्या माध्यमातून लेखकांनी वेगवेगळ्या साहित्य प्रकारात विपुल लेखन केले आहे. समाजातील वास्तव, वेदनादायी जीवनानुभवाबरोबरच दुःख आणि वेदना, त्यांच्यावर झालेले अन्याय, अत्याचार याचेही त्यांच्या साहित्यातून चित्रण आलेले आहे. त्यांचे हे चित्रण प्रामुख्याने आत्मकथनाच्या माध्यमातून आलेले दिसते.

दलित आत्मकथा एखाद्या व्यक्तीची आत्मकथा असली तरी त्या समाजाची प्रातिनिधिक मांडणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा प्रोत्साहन घेऊन दलितांची नवी पिढी समाजाच्या व्यथा वेदना व्यक्त करीत आहे. यामध्ये एकनाथ आवाड यांच्या 'जग बदल घालुनी घाव' या आत्मकथनाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. 'जग बदल घालुनी घाव' हे एकनाथ आवाड यांचे दलित आत्मकथनाच्या प्रवाहातील महत्त्वाचे आत्मकथन होय. तेरा प्रकरणात विभागलेले हे आत्मकथन प्रशांत खुंटे यांनी शब्दांकन केलेले आहे. १९९५ मध्ये 'अक्षर'च्या दिवाळी अंकात 'जिजा आणि त्यांचे कार्यकर्ते' अशा शीर्षकाचा दीर्घलेख होता. राजेंद्र साठे आणि आनंद अवधानी यांनी आवाडाच्या कामाचा परिचय त्या लेखात करून दिला होता. त्यानंतर 'समकालीन'तर्फे प्रकाशित झालेल्या 'खरेखुरे आयडॉल्स' या पुस्तकात त्यांच्यावर नव्याने लेख लिहिला गेला. हा लेख ज्या प्रशांत खुंटे यांनी लिहिला त्यांनीच प्रस्तुत पुस्तकाचं शब्दांकन केलं आहे. वास्तवात एकनाथ आवाड यांच्या जीवनप्रवासातील आठवणी व अनुभवांचे हे कथन आहे. ते एका व्यक्तींचे आत्मकथन असले तरी ते समग्र दलित जीवनाचे प्रतिनिधित्व करते. एकूणच दलित समूहजीवनाला

व्यापून घेण्याची क्षमता या आत्मकथनामध्ये आहे. 'मी' पेक्षा 'आम्ही' हे सूत्र घेवून एकनाथ आवाड यांचा लेखन प्रवास सुरू झाल्यामुळे त्याला अधिक गती प्राप्त झालेली दिसून येते. प्रासंगिक आठवणींच्या स्वरूपात या ठिकाणी लेखक व्यक्त होताना दिसतात. लहानपणीच्या आठवणी, घरातील अज्ञान, अंधश्रध्दा, जातीव्यवस्था, मांग समाजजीवन, गुलामगिरी यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टी अधोरेखित केल्या आहेत. एकनाथ आवाड यांचे हे आत्मकथन आंबेडकरी विचारांच्या वाटेने प्रवास करताना दिसते. समतेची भूमिका ते निकराने मांडताना दिसतात.

एकनाथ आवाड यांनी मळलेली ही वाट धुडकावली. घर सोडलं, गाव सोडलं, कष्ट करत शिक्षण घेतलं. जगण्याशी लढत आपली वाट आपण शोधली. पण स्वत:च्या सुखात समाधान मानलं नाही. आदिवासी आणि दलितांना वेठबिगारीतून बाहेर काढलं. अस्पृश्यता आणि जातीभेद या विरोधात गावोगाव संघर्ष मांडला. हजारो भूमिहीनांना गायरान जमिनी मिळवून दिल्या. त्यांना सेंद्रीय शेती शिकवली. बचत करून छोटे मोठे व्यवसाय करायचा मंत्र दिला. अन्यायावर घाला घालत नवं जग घडवण्याचा नवा पॅटर्न उभा केला. 'जीजा' या आपुलकीच्या दोन शब्दांत एकनाथ आवाड यांची ओळख सर्व सामाजिक कार्यकर्त्यांना होती. त्यांचा स्वभाव जात्याच बंडखोरीचा. समाजातील वाईट रूढी-परंपरांवर घाला घालणारा हा संघर्षशील कार्यकर्ता मानवी हक्काच्या लढ्यास सतत पाठबळ देत राहिला.

## ४.४ एकनाथ आवाड यांचे बालपण

आवाड यांचा जन्म बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील दुकडेगाव या गावात एका मांग कुटुंबात झाला. एकनाथ आवाड यांच्या आईचे नाव भागीरथीबाई आणि वडिलांचे नाव दगडू होते. त्यांनी त्यांचे जीवन अत्यंत गरिबी आणि दुःखात व्यतीत केले, आवाड आणि त्यांची मोठी बहीण कलाबाई यांचा विवाह अगदी लहान वयात झाला. त्यांचे वडील दगडू पोतराज म्हणून काम करत होते. बालपणातच ही गुलामी त्यांनी स्वतः पहिली होती. ते लिहितात "मी एक कुशल मांग व्हावं, भीक मागू नये, पाटलाचं खळं करावं, दावं-दोरखंड वळावं असं माझ्या माय-बहिणीला वाटत होतं. त्या दोघींच्या अपेक्षेनुसार मी सकाळी उठून आईवडीलांसोबत गावात पाटलाच्या घरी शेण काढायला जायला लागलो. एकुलता एक लेक असल्याने मांगकी कशी करायची याचं शिक्षण मला आईवडलाकडून मिळत गेलं. पाटलाशी, पाटलाच्या पोराशी कसं बोलावं, त्यांच्यासमोर वाकून कसं राहावे असं सर्व काही ते शिकवायचे. आम्हाला अर्ध्या गावची गावकी (मांगकी) होती. त्यामुळे मला कामाला कमी पडणार नाही असं आईला वाटायचं. 'शेण काढणं, हातणी करणं, मळण्या हाकारणं, मातेरं झाडणं, मात्र्याची जवारी धुणं, पोळ्याच्या दिवशी मालकाचे बैल धुणं, पोळ्याच्या सणाला मोळ टाकणं, हलगी वाजवणं, देवाला हलगीचा शेडा वाजवणं, अशी मांगकीची बरीच कामं असायची. ती मी सर्व शिकलो. मी यातली बरीच कामं करतही होतो. त्यामुळे अजून पाच वर्षांत बापाला मागं बघू देणार नाही,' असं माझे माय-बाप सोयऱ्या-धायऱ्यांना छाती फुगवून सांगू लागले. आईला घुरं यायचं, म्हणजे फीट यायची. फीट आली की तिला काहीच काम व्हायचं नाही. तेव्हा मग मी घरातलीही सगळी कामं करायचो. लहानपणी शिकलेली कामं ती विसरलेलो नाही." (आवाड २०१५, १६) खळं करणं, दावं करणं, बाज विणणं ही कामं त्यांनी केली. केकताड भिजवायचं आणि त्याचे दोर करायचे, या पारंपरिक कामात ते वाकबदार होते. गयाशी त्यांचे लग्न अगदी नकळत्या वयात झाले. पत्नी गया आणि ते उत्तम

प्रतीची रुमाली बाज विणू शकत. गया शाळेत गेली नाही. पण कष्ट करता करता तिनंही नवं जीवन घडवलं. पुढं तिने मुलांकडून अक्षरं शिकून घेतली होती.

जगण्याने शिकवल्यामुळे आवाड यांच्या बालपणीच आजुबाजूच्या असणाऱ्या कामात त्यांना चपळता आली होती. बालपणात सोसून तयार झालेली समज व पाहुण्यांनी रात्रीत ठरवलेले लग्न याबद्दल ते लिहितात "एकदा पिंपरखेडचे आमचे पाहुणे जिजाभाऊ शिंदे आणि त्यांची म्हातारी नित्रुड या गावी जात असताना वाटेत त्यांना वादळ लागलं. नदीलाही पूर आला होता. मग ते आमच्या घरी राहिले. त्या वेळी वडिलांनी काही शेळ्या आणल्या होत्या. मी त्या शेळ्यांमागं फिरायचो. संध्याकाळी मी शेळ्या घेऊन घरी आलो. वय सात-आठ वर्षांचं असेल. आईनं नेहमीप्रमाणं कौतुकानं पाहुण्यांना सांगितलं, "माहं लेकरू आतापासूनच मांगकी करतंय. आरध्या गावची मांगकी हाय. एकुलता एक लेक हाय." आईच्या या बोलण्यामुळं पाहुण्यांना वाटलं, ह्या घरात आपली पोरगी सुखात राहील! झालं, बैठक बसली. घोड्यांचा बाजार असावा तसा व्यवहार ठरला. त्या काळी मुलीला हुंडा द्यायची प्रथा होती. माझ्या वडीलांनी ११ नऊवारी साड्या, ४ पायली गहू, २ पायली ज्वौरी, २ पायली डाळ आणि रोख ३५ रुपये आणि पोरीला दागिना व बांगड्या हुंडा म्हणून दिल्या. पण हा खर्चही माझ्या बाबाला पेलवला नाही. बाबानं खर्चासाठी शेळ्या विकून टाकल्या. त्यामुळे आता आमची सारी भिस्त बाबाच्या भिकेवरच होती. बाबा भाकरी मागून आणायचा. तो येस्तोवर आम्ही त्याचीवाट पहायचो" (आवाड २०१५, १६) या अपमानीत आणि गरिबीच्या जीवनाचा साक्षीदार असलेल्या आवाडांनी अगदी लहान वयातच बंड करण्यास सुरुवात केली. आवाडाच्या वडीलांनी त्यांना शाळेत जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी त्यांच्या वडीलांना पोतराजाचे काम सोडून देण्यास सांगितले होते, पण त्यावेळी त्यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. ते लिहितात की त्यांची बहीण कलाबाई म्हणते की, "मी घरातील शेवटची भांडी विकेन, पण तु कोणत्याही परस्थितीत शिक्षण सोडू नको". त्याचप्रमाणे त्यांच्या आईनीही "मी भीक मागेन, पण एकनाथ शाळेत जाईल" ही मानसिकता केली होती.

## ४.५ शिक्षण

एकनाथ आवाडांनी आपलं शिक्षण फार हालआपेष्टा सहन करत पुर्ण केलं. बाबासाहेब यांच्याप्रमाणेच आपल्या ही नावासमोर पदव्या असाव्या ही इच्छा मनात ठेऊन शिक्षण पूर्ण केले. ते एम.एस.डब्ल्यु झाले, वकीलही झाले. पण या शिक्षणाचा उपयोग स्वतःसाठी न करता खऱ्या अर्थाने बाबासाहेबांनी जसा या वंचित, गरीब जनतेसाठी केला अगदी तोच वारसा आवाडांनी समाजासाठी केला. ते शिकत असतानाच युवकांच्या संघटनेत सक्रीय झाले, राजकीय चळवळीचा भाग बनले. प्रस्थापित, धनदांडग्या विरुद्ध शत्रूत्व घेतले,आरे ला - का रे ची भूमिका, लाचारीने न जगता बाबासाहेबवानी वाघासारखं जगायचं, त्यासाठी रस्त्यावर उतरुन संघर्ष केला, गावागावात जाऊन इतरांना जागं करण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या वडीलांची पोतराजकीतुन मुक्तता तसेच इतर पोतराजांचे प्रबोधन करुन त्यांची ही मुक्तता केली, स्वतःच्या सुखात समाधान मानलं नाही. आदिवासी आणि दलितांना वेठबिगारीतून बाहेर काढलं. अस्पृश्यता आणि जातीभेद या विरोधात गावोगाव संघर्ष मांडला. हजारो भूमिहीनांना गायरान जमिनी मिळवून दिल्या. त्यांना सेंद्रिय शेती शिकवली. बचत करून छोटे-मोठे व्यवसाय करायचा मंत्र दिला. अन्यायावर घाला घालत नव जग घडवण्याचा मार्ग दाखवला.

वडील मागुन आणतील त्यावर गुजराण करायची, अशी आवडांच्या घरातील बेताची परिस्थिती होती. त्यामुळे घरात शिक्षणाचा गंध नाही, मोलमजुरी करायची, कष्ट करायचं, परंपरेला धरून जातीची गुलामीची कामं करायची हे ठरलेलं होत. आवाडांनी हे सारं धुडकावलं. ते लिहितात “मी ते दुःख पाहत होतो, अनुभवत होतो; पण मला त्या दुःखातच सडायचं नव्हतं. गौतम बुद्धानं मानवी जीवनातील चार सत्यं सांगितलीत. जीवनात दुःख आहे, ते निर्माण होण्याचं कारण आहे, दुःख नष्ट करता येतं आणि ते नष्ट करण्याचा उपाय आहे. ही चार सत्यं बौद्ध तत्त्वज्ञानाचा मूलाधार मानली जातात. मला त्या काळात बुद्धाचे तत्त्वज्ञान समजण्याचा काही मार्ग नव्हता. पण मला वाटतं, ही सत्यं मला त्या काळात आपसूक समजली होती. मुख्य म्हणजे शिक्षण हाच मला दुःख निवारणाचा मार्ग वाटू लागला होता.

आवाड यांची शाळा गुरांच्या गोठ्यात होती, तिथे त्यांना एकटेच बसावे लागले. कधी-कधी गुरे सोडायला उशीर झाला की लगतच्या हनुमान मंदिरात वर्ग व्हायचा. मंदिरात ते इतर विद्यार्थ्यांपासून दूर जमिनीवर बसत. शाळेतील शिक्षकांना त्यांची हजेरी लावण्यासाठी दिवसातून एकदा खाली यावे लागत. नंतर त्यांनी त्यांच्या गावापासून ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतला. ते रोज चालत रिकाम्या पोटी शाळेत जायचे. त्यांचे वर्गमित्र सुट्टीत जेवणाचे डबे खात, तर ते शांत बसायचे आणि बघायचे. संध्याकाळी घरी परतल्यावर वडीलांनी गोळा केलेली भाकर त्यांना मिळत असे. गावापासून १० किलोमीटर दूर त्यांनी आठवी इयत्तेत प्रवेश घेतला. प्रवेश घेतल्यानंतर त्याला वस्तीगृहात राहण्याची आणि नियमित जेवणाची सोय व रु. ३० त्यांना मिळू लागले. शाळा आणि वस्तीगृहासाठी पैसे नसल्यामुळे, शाळेच्या वस्तीगृहासाठी लाकूड तोडणे, धान्य दळणे आणि दाणे फोडणे यासारखी कामे केली. इथेही वर्गात किंवा जेवण देताना दलित विद्यार्थी वेगळे बसायचे; त्यांना दुरूनच पाणी दिले जायचे. रोजच्या अपमानानंतरही, ते मॅट्रिक पास झाले. गावात कॉलेज व पैसे जवळ नसल्यामुळे त्यांनी गावा जवळीलच महाविद्यालयात प्रवेश घेतला. शिकायला गेलेला मुलगा शहरात कसा जगेल या भीतीने चिंतेमुळे त्यांची आई आजारी पडू लागली. याच काळात आवाड यांच्या पहिल्या मुलीचा जन्म झाला. वृद्ध वडील, आजारी आई आणि नुकतीच जन्मलेली मुलगी यामुळे त्यांच्या खांद्यावर अधिक जबाबदाऱ्या पडल्या. आवाड यांचे शिक्षण आणि त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह मुख्यतः भारत सरकारच्या शिष्यवृत्तीच्या तुटपुंज्या पैशामुळे झाला. निम्मी रक्कम ते त्याच्या कुटुंबियांना त्यांच्या घर खर्चासाठी पाठवायचे आणि बाकीची रक्कम दैनंदिन गरजांसाठी वापरत. त्याची आई वारल्यानंतर तिसऱ्या दिवशी अंत्यसंस्कार झाल्यानंतर, मगच परीक्षेला बसले. व बीए पास झाले. कुलकर्णी लिहितात “आवाड शिकले. एकीकडे एमएसडब्ल्यू झाले, वकील झाले. पण शिकत असतानाच ते विद्यार्थी चळवळीत उतरले, युवकांच्या संघटनेत गेले, राजकीय चळवळीचा भाग बनले. संस्थांमध्ये जाऊन इतरांना जागे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, संघटनांमधून इतरांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. रस्त्यावर उतरून संघर्ष केला. अस्पृश्यता आणि जातिभेदाविरुद्ध रान पेटवलं. पुढे जाऊन भूमिहीन दलितांना गायरान जमिनी ताब्यात घेण्याची हिंमत मिळवून दिली. कसायला स्वतःची जमीन असेल तरच माणसं स्वावलंबी आणि इज्जतीचं आयुष्य जगू शकतात ही त्यामागील भूमिका. त्यांच्या मते आजमितीला मराठवाडयातील पन्नास हजार कुटुंबं गायरान जमिनींवर शेती कसत आहेत. त्याही पुढे जाऊन त्यांनी भूमिहीन

महिलांचे बचत गट उभारले, दलित बायकांची पहिली फायनान्स कंपनी काढली." (आवाड, २०१५:५)

त्यांना "शिक्षण हे वाघिनीचं दूध आहे" याची जाण होती. त्यासाठी त्यांनी घर सोडलं, गाव सोडलं. अंग मेहनत करुन चार पैसे मिळवत शिक्षण घेतलं. शिकलो तरच जातीच्या गुलामीच्या दलदलीतून बाहेर पडु, ही जाणीव त्यांच्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरामुळे निर्माण झाली. पण डॉ. बाबासाहेबांचा संदेश व्यक्तीगत उन्नती पलिकडे जाऊन आवाडांनी प्रत्यक्षात साकार केला. स्वतःच्या वडिलांची पोतराजकीतुन मुक्त केले. तसेच इतर पोतराजांचे प्रबोधन करुन त्यांची ही मुक्तता केली, स्वतःच्या सुखात समाधान मानलं नाही. हे सर्व त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा परिपाक होय.

**i) आवाडांची पत्नी 'गयाबाई':**

वयाच्या आठव्या वर्षी अवघ्या पाच वर्षांच्या गयाबाई यांच्याशी आवाड यांचा विवाह झाला. घरात खाणारी तोंडे वाढली तरी त्यांचे वडीलच कुटुंबातील एकमेव कमावते होते, त्यांनी एकनाथच्या लग्नासाठी कर्जही घेतले होते. त्यात घरातील सर्व शेळ्या विकाव्या लागल्या त्यामुळे दररोज गावातून भिक मागने हाच पर्याय होता. त्यांच्या पत्नी गयाबाई, जिजांच्या अखंड चळवळीच्या प्रवासात पाठीशी उभ्या राहिल्या. त्या अशिक्षित असूनही त्या जिल्ह्याच्या सभापती (जिल्हा परिषद प्रमुख) म्हणून त्यांची निवड झाली. अगदी लहान वयात लग्न झाल्यानंतर तीन मुलांच्या सोबत त्या आपल्या जीवनात व्यस्त झाल्या. एक प्रसंग आवाड सांगतात. एकदा हॉस्पिटलमध्ये गयाला डॉक्टरांनी सही करण्यास सांगितले. आवाड यांनी त्यावेळी सांगितले की तिला सही कशी करायची हे माहित आहे परंतु ती लाजते आहे. हे खोटे होते. खरे असे होते की तिला लिहिता-वाचता येत नव्हते. या प्रसंगी आपल्या पत्नीसाठी त्याना खोटे बोलावे लागले. या प्रसंगानंतर त्या सही करण्यास शिकल्या. "घरी परतल्यावर, मी माझ्या नावाची सही करायला शिकायला सुरवात करून हळूहळू मुळाक्षरे शिकून घेतली. कालांतराने मी लिहायला आणि वाचायला शिकले. नंतर मी माझ्या मुलांना शिकवू शकले. मी एक अशिक्षित स्त्री आहे हे त्यांना माहीत नव्हते," त्या जवळपास अडीच वर्षे जिल्हा परिषद सदस्य होत्या. त्यांची समाज कल्याण सभापती म्हणूनही निवड झाली. प्रचंड हलाखीची घरची परस्थितीत ही कोणतीही कुरबुर न करता आपल्या मुलांसोबत त्या आपल्या पतीच्या कार्याच्या पाठीमागे उभ्या राहिल्या प्रपंच करत करत त्यांनी आपल्या मुलाना चांगले शिक्षण दिले.

**ii) आवाडांची आई:**

एकनाथ आवाड यांनी शिकावं असं त्यांच्या आईला खूप वाटत होतं. त्यांच्या अडाणी आईला त्यांचे शिक्षण महत्त्वाचं का वाटत होतं? याचे उत्तर देताना ते म्हणतात "मी पोतराज होऊ नये, कुशल मांग व्हावं, असं तिला माझ्या लहानपणी वाटलं. मी कुशल मांग झालो, नंतर शिकू लागलो, तेव्हा तिनं देवळातल्या मारुतीला साकडं घातलं- "ल्योक शिकून बहाद्दर व्हव दे." त्या देवळातल्या तांबड्या भुप्या दगडाला तिच्या भावना काय कळणार? पण मला तिच्या भावना, आकांक्षा कळाल्या होत्या. आई जात्यावर बसून ओव्या गायची. बारा गावांत भीक मागून आणलेली जवारी ती दळायची. पण तिची स्वप्नं केवढी मोठी होती! तिची एक ओवी होती- "दहाची पंचाईत माझ्या एकल्यानं केली. बाळ माझ्या एकनाथानं

सभा सावलीला न्हेली" या ओवीचा अर्थ पाहता तिची आपल्या मूलाबद्दलचा आत्मविश्वास दिसून येतो. दहाची पंचाईत एकल्यानं केली, म्हणजे जिथं दहा पंच बसून न्याय करतात तिथं माझ्या एकट्या लेकानं न्यायाचा झेंडा हाती घेतला. सभा सावलीला नेली म्हणजे योग्य न्याय केला. मी चार लोकांत बसून न्याय-अन्यायाचा निवाडा करावा, जे गरीब आहेत त्यांना सावलीला न्यावं, असं स्वप्न आई भिकेची जवारी दळताना पाहत होती. अशा वोव्या तिला सहज सुचत असत. धकधकीच्या जगण्यात त्यांची आई दिवसेंदिवस आजारी पडू लागली होती. तिचे शेवटचे काही महिने बीड येथील शासकीय रुग्णालयात गेले. कुटुंब, तीव्र गरिबीत, चांगली आरोग्य सेवा देऊ शकले नाही आणि अखेरीस ती आजाराला बळी पडली. रुग्णवाहिका परवडत नसल्याने एकनाथ आवाड यांनी आपल्या आईचा मृतदेह बसमध्ये घालून घेऊन गावी जावे लागले. हा प्रसंग आर्थिक स्थिती नसल्यावर काय काय करावे लागते हे वाचून वाचक हादरून जातो. ते आईविषयीच्या भावना मांडताना म्हणतात "माझ्या मनात येत होतं, आई का मरते? आईनं मरू नये. कुणाच्याच आईनं मरू नये. आई मरणं वाईट." (आवाड, २०१५:४९) तिसऱ्या दिवशी अंत्यसंस्कार झाल्यानंतर, आवाड अंतिम परीक्षेला बसले. ते आईच्या मृत्यू पूर्वी लिहितात "माझ्याकडे थोडे तरी पैसे असते तर मी तिला वाचवली असती. पण आई मेली, आता तिला कशी जिवंत करू? मी शिकत राहिलो तरच ती जगेल. माझ्या मनात ती जिवंत राहील. परवा इंग्रजीचा पेपर आहे, मला निघालं पाहिजे. असा विचार अशा प्रसंगी ते करत होते. आईची मौत-माती उरकून तिसऱ्याच दिवशी ते बीडला आले. ते लिहितात परीक्षेला बसायचं होतं, पास व्हायचं होतं. घर सोडलं. मागं वळून पाहिलं. मला पाठमोरं पाहत रडणारी आई नव्हती. मी परीक्षा दिली पास झालो." हा प्रसंग प्रचंड अस्वस्थ करून जातो व तत्कालीन स्थितीचा आलेख वाचकाला दाखवतो.

**iii) आवाडांचे बाबा:**

आवाडांचे बाबा पोतराज असल्याने ते मांगकी करत नव्हते त्यांच्या वडीलांना वाटायचं पोतराजाचा थोरला पोरगा ही पोतराज म्हणून सोडला पाहिजे आणि हा मांग जातीचा नियम होता त्यामुळे त्यांचे वडील त्यांच्याबाबत म्हणायचे हे पोरगं बी पोतराज होईल पण माझ्या आईला ते पटायचं नाही ती बाबांची माझ्यासाठी भांडायची तिचं नाव भागुबाई तिला ते बाय नावाने हाक मारायचे बाय बाबाला म्हणायची माझ्या लेक चांगला मांग होईल तो अजिबात पोतराज होणार नाही. त्यांची थोरली बहीण कलाबाई आणि माझी आई दोघींना मी कुशल मांग व्हाव असं वाटायचं त्यामुळे त्यांच्यासमोर दोनच पर्याय होते एक पोतराज होणं आणि दुसरा कुशल मांग होणे. त्यांच्या कुटुंबाची त्यांच्याबद्दलची महत्त्वकांक्षा एवढीच मर्यादित होती. साधारणता चार-पाच वर्षाचे एकनाथ आवाड झाल्यानंतर त्यावेळी त्यांच्या वडीलांना वाटू लागलं की आता पोरगा हाताशी आलाय त्यासाठी त्यांनी त्याच्या गावकीच्या कामाची तयारी केली मात्र त्यांच्या आईने व बहिणीने बाबांना कडाडून विरोध केला त्यांच्या या विरोधामुळे त्यांचे बाबा त्यांना कामाला सोडू दिले नाही. या मग दोघींच्या अपेक्षा नुसार त्यांनी सकाळी उठून वडिलांसोबत गावात पाटलाच्या घरी ते शेण काढायला जायला लागले. एकुलता एक लेक असल्याने मांगकी कशी करायची याचे शिक्षण त्यावेळी त्यांना त्यांच्या आई-वडिलांकडून मिळत गेलं. वडील मरणाच्या काळी त्यांची मानसिक स्थिती चित्रित करताना ते लिहितात "बाबा अंथरुणाला खिळून असायचा. गया बाबाचं सगळं स्वच्छ करायची. त्याचं अंथरूण, त्याची धोतरं धुवायची. मी घरी आलो की पाणी तापवून बाबाला खसखसून अंघोळ घालायचो. मग बाबा एखाद्या लहान लेकरासारखा स्वच्छ

दिसायचा. थोडी भाकर खाऊन तो निपचित पडायचा. कधी तरी बाबाला गावी जायची इच्छा व्हायची. मग मी मोटरसायकलवर बाबाचं अधू शरीर माझ्या पाठीला बांधायचो, त्याला गावी सोडून यायचो. मग गावात सटवा आवाड आणि सयाबाई हे बाबाचं हगणं-मुतणं मायेने काढायचे. बाबा आता अंतिम वाटेला लागला होता... आणि मी नव्या मार्गानं प्रवास सुरू केला होता. एक दिवस बाबा माझ्या आयुष्यातून नाहीसा झाला. मी तेव्हा परभणी जिल्ह्यात हट्टा पोलिस स्टेशनला होतो. ऊसतोड कामगारांना मालकांनी डांबून ठेवलं होतं. त्यांची सुटका करण्यासाठी आम्ही गेलो होतो. आतासारखे तेव्हा मोबाइल फोन नव्हते. माझ्या घरीही टेलिफोन नव्हता. मला कुणीच कळवलं नाही. बाबा झोपेत असतानाच कुणाला काही न बोलता निघून गेला. गयाला घरकामाच्या रगाड्यात लक्षातही आलं नाही. नंतर तिनं बाबाचं गार-थंड पडलेलं निपचित शरीर पाहिलं. मला काही कळवणं मुश्किल होतं. मी घरी केव्हा येईन याचीही काही खात्री नव्हती. सुभाष गायकवाड व गयानेच मग बाबाचं पार्थिव दुकडेगावला नेलं. मी माजलगावला आल्यावर ही बातमी कळली. तिथून दुकडेगावला पोहोचलो तेव्हा चिता ढाणढाण पेटली होती. माझ्या डोळ्यांतून अश्रूही आले नाहीत. आता मी पूर्णतः पोरका झालो होतो. आई केव्हाच गेली होती. बाबाच्या शरीराचं जिवंत मुटकुळं घरात असायचं, तेही आता नसणार होतं. माझं न् बाबाचं शेवटचं संभाषण कधी झालं तेही आठवत नव्हतं. बाबासाठी रडावं असं वाटलं नाही. कारण आता मी समाजाच्या इतक्या वेदना पाहिल्या होत्या की त्यात 'बाबा गेला' हे दुःख नाहीसं झालं होतं. बाबासोबत माझ्या पूर्वायुष्याचा एक अध्याय संपला. तिन्ही मुलं मोठी होत होती, शाळेत जात होती. त्यांना किती मार्क पडताहेत, अभ्यास कसा आहे, याकडे माझं लक्ष नव्हतं. ते पाहायला गया समर्थ होती. मी आता दलितांच्या संघर्षाकडं डोळे लावून होतो. त्यातच माझीही प्रगती होणार होती." (आवाड २०१५:१५०) बाप पोतराज आहे म्हणून पोरांन पोतराज व्हावे हा पॅटर्न धुडकावून त्यांनी शिक्षणाचा मूलमंत्र आपलासा केला. तरीही बापाच्या अपेक्षा पाहता एखाद्या गरीब पोतराजाच्या पोराकडून कुणाच्या काय अपेक्षा असणार? बापासारखं पोतराज व्हावं किंवा जातीची पारंपरिक कामं करत लाचारीनं जगत रहावं. पण एकनाथ आवाड यांनी ही मळलेली वाट धुडकावली. घर सोडलं, गाव सोडलं, कष्ट करत शिक्षण घेतलं. जगण्याशी लढत आपली वाट आपण शोधली. पण स्वत:च्या सुखात समाधान मानलं नाही. आदिवासी नी दलितांना वेठबिगारीतून बाहेर काढलं. अस्पृश्यता आणि जातीभेद या विरोधात गावोगाव संघर्ष मांडला. हजारो भूमिहीनांना गायरान जमिनी मिळवून दिल्या. त्यांना सेंद्रीय शेती शिकवली. बचत करून छोटे मोठे व्यवसाय करायचा मंत्र दिला. अन्यायावर घाला घालत नवं जग घडवण्याचा नवा पॅटर्न उभा केला.

..गुलामगिरीच्या या चिखलात रुतुन बसला का ऐरावत..
नीघ बाहेरी अंग झाडुनी.. हे बिनीवरती घाव...
सांगून गेले मला भिमराव..!
जग बदल घालुनी घाव,सांगून गेले मला भिमराव..!!

## ४.६ समाजकार्याची सुरूवात

माणसं हे करू शकतात, त्यामुळे ते महामानव बनतात. सर्वांनाच तेवढी प्रतिभा नसते किंवा समाजाचं नेमकं आकलन करून घेण्याची क्षमता नसते. त्यामुळे महामानवांनी शोधलेल्या मार्गावरून जाण्याचा प्रयत्न लोक करत असतात, पण काळ बदलतो तसे पूर्वीचे मार्ग जसेच्या तसे लागू होत नाहीत, प्रभावी ठरत नाहीत. अशा वेळेस कालानुरूप बदल करून बघावे लागतात. त्यातील जे प्रभावी ठरतात ते घेऊन पुढे जावं लागतं. अशा प्रयत्नांचं मोल अर्थातच मोठं असतं. एकनाथ आवाड यांनी समाजबदलासाठी जो मार्ग अनुसरला त्याचं मोल असंच मोठं आहे. अगदी विपन्नावस्थेत जगणाऱ्या कुटुंबात जन्माला आलेला माणूस एरवी दबून, वाकून, गुलाम होऊन जगत असतो. वाटूनही बंड करून उठणं त्याला शक्य नसतं. त्याला स्वतःच्या जगण्याची इतकी भ्रांत असते की पोटाची खळगी भरण्यातच त्याचं आयुष्य सरतं. आवाडांचा जन्म अशाच एका गरीब मातंग समाजातील पोतराजाच्या पोटी झाला. घरात खायला दाणा नाही. वडील मागून आणतील त्यावर गुजराण करायची, अशी परिस्थिती. घरात शिक्षणाचा गंध नाही. मोलमजुरी करायची, कष्टायचं, परंपरेला धरून जातीची गुलामीची कामं करायची हे ठरलेलं. आवाडांनी हे सारं धुडकावलं. त्यांनी शिकायचं ठरवलं. त्यासाठी घर सोडलं, गाव सोडलं. अंगमेहनत करून चार पैसे मिळवत शिक्षण घेतलं. शिकलो तरच जातीच्या गुलामगिरीतून मुक्त होऊ, ही जाणीव त्यांच्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे निर्माण झाली; पण डॉ. आंबेडकरांचा संदेश व्यक्तिगत उन्नतीपलीकडे जाऊन आवाडांनी प्रत्यक्षात आणला. त्याचं वैशिष्ट्ये त्याच्यात आहे.

एम.एस.डब्लू हे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर, आवाड यांनी ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यात विवेक पंडित यांच्या श्रमजीवी संघटनेत काम करण्यास सुरवात केली. आणि वेठबिगार मजुरांच्या प्रश्नावर काम करण्यास सुरुवात केली. तेथील बहुतांश वेठबिगार मजूर हे आदिवासी होते, कातकरी, कोळी, आग्री, वैती, आग्री पाटील आणि वारली जमातींचे होते. या आदिवासींना त्यांच्या मालकांकडून बळकावलेल्या जमिनी, त्यांची कापणी केलेली पिके आणि आदिवासींच्या नावावर कॉर्पोरेशन्सकडून होणारा नफा यासारख्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संघटित केले. जोरदार आंदोलन करून सुमारे ५०० वेठबिगार मजुरांची त्यांच्या मालकांच्या तावडीतून सुटका करण्यात आली.

नंतर आवाड चर्चच्या ऑक्झिलरी फॉर सोशल ऍक्शन (CASA) मध्ये सामील झाले आणि स्वतःच्या गावी काम करू लागले. त्यांच्या लक्षात आले की त्यांच्या समाजातही मोठ्या संख्येने लोक वेठबिगार म्हणून राहतात. गुलामगिरी मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती जरी त्याविरुद्ध कायदा अस्तित्वात होता. मांग आणि महार समाजातील बरेच लोक अजूनही उच्च जातीच्या शेतात गुलाम म्हणून काम करत होते, अल्प प्रमाणात, ही प्रथा पिढ्यानपिढ्या चालू राहिली. बीडमधील माजलगाव या छोट्याशा गावातून बंधू-मजुरांच्या समस्या मांडून त्यांचे काम सुरू झाले. खेड्यापाड्यात तळागाळात काम केल्यानंतर आवाड यांनी बीड जिल्ह्यातील हजारो कुटुंबांना बंधनकारक गुलामगिरीतून मुक्त केले. पण लवकरच त्यांच्या लक्षात आले की वेठबिगार मजुरांचा संबंध विस्थापन आणि भूमिहीनता यांसारख्या इतर संकटांशीही आहे; यापैकी बहुतेक समस्यांचे एकमेकांशी परस्पर संबंध होते. भूमीहीनता आणि अधर्माने या समुदायांना त्यांच्या गावाबाहेर शहरांकडे ढकलले. त्यांच्यापैकी बहुतेकांनी इतर खेड्यांमध्ये स्थलांतर केले आणि ऊसतोडणी कामगार म्हणून

शेतात काम केले. किंवा शहरांमध्ये स्थलांतरित झाले जेथे, जगण्यासाठी, त्यांनी बांधकाम कामगार म्हणून नोकऱ्या केल्या. या स्थलांतरांचा त्यांच्या जीवनावर, विशेषतः मुलांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम झाला.

## ४.७ डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा प्रभाव

एकनाथ आवाडांनी कायम डॉ. बाबासाहेबांना आपला "बाप" अन् संघर्षाची प्रेरणा मानली. अगदी लहान वयातच आवाड यांना आंबेडकरवादी, फुले आणि मार्क्सवादी साहित्याचा परिचय झाला. आंबेडकर आणि फुले यांचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आवाड यांचा जन्म महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यातील एका मांग जातीतील कुटुंबात झाला. पण शिक्षण घेण्याविषयीची त्यांची तळमळ पाहून तरुणपणी त्यांचे नातेवाईक त्यांना 'महाराची अवलाद' म्हणू लागले. ते लिहितात "घरात माझी आणि गयाची मजुरी आणि बाबानं मागून आणलेल्या भाकरी हेच उत्पन्न. मी मांगकी केली असती तर त्या वेळी जगणं सुसह्य झालं असतं. पण मला शिक्षण सोडायचं नव्हतं. मी महारांसारखा शिकतोय म्हंटल्यावर माझे सोयरे-धायरे 'महाराची औलाद' म्हणून माझी संभावना करीत असत. पण कुणी कितीही डिवचलं तरी मी हा अपमान गिळत राहिलो. मी मनात म्हणायचो, 'मॅट्रिकपर्यंत तर पोचलोय. आता आपण किमान पोतराज तरी नक्की होणार नाही. दुसरं काहीही करू, पण भीक तर मागायची वेळ येणार नाही.' 'शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. ते पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही,' असं बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलंय. हे वाघिणीचं दूध आता माझ्या नसानसांत भिनत होतं. आणि शिक्षणामुळं एक वाघ त्यांच्यात संचारू लागला होता. तो जातिपातीच्या दुःखाला 'खाऊ का? खाऊ का?' म्हणून प्रश्न करू लागला होता." कारण स्वतः महार कुटुंबात जन्मलेल्या आंबेडकरांनी, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जे प्यायल्यानंतर तुम्ही गुरगुरल्याशिवाय राहणार नाही,' असा संस्मरणीय संदेश दिला होता. आपल्या माध्यमिक शाळेत एकनाथ आवाडांनी आंबेडकरांचे साहित्य अतिशय बारकाईने वाचले. आणि त्याचबरोबर एकेकाळी प्रेरणादायी असलेले पण आता दुर्दैवाने विस्मरणात गेलेले समाजवादी आणि तेव्हा खासदारही असलेले- बॅरिस्टर नाथ पै यांची भाषणे आवाडांनी अतिशय आवडीने ऐकली. सत्तरीच्या दशकात आवाड जेव्हा वयात येत होते, तेव्हा 'दलित पँथर'च्या विचाराने आणि मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्यात यावे यासाठी सुरु झालेल्या नामांतराच्या चळवळींनी त्यांना अत्यंत प्रभावित केले. यातील विद्यापीठ नामकरण चळवळीविषयी आवाड लिहितात, 'एखाद्या दिवशी नामकरणाच्या समर्थनार्थ मोर्चा निघाला तर दुसऱ्या दिवशीच नामकरणाच्या विरोधातही मोर्चा निघत असे. एकामागून एक असे साखळीप्रमाणे मोर्चे निघत होते. शिवसेनेचा नामकरणाला विरोध होता. विद्यार्थी, शिक्षक, वकील, डॉक्टर यांच्यापासून तर सामान्य खेडूतदेखील आपापली बाजू घेत होते.'

## ४.८ आवाडांचा सामाजिक संघर्ष

सततच्या संघर्षातूनच 'जग बदल घालुनि घाव'हे त्यांचे आत्मकथन जन्माला आले. प्रत्येक संघर्षाच्या प्रवासाची सुरुवात धीराने पहिलं पाऊल उचलल्याने होते. त्यांनी तर मांग जातीत जन्म घेतला तेव्हाच त्यांच्या संघर्षाची सुरुवात झाली होती. समजायला लागलं तेव्हापासून ते भोवतीचं दुःख पाहत होते. ते लिहितात "आषाढ महिन्यापर्यंत एकही मांग

खोपटांत दाणा नसायचा. भीक मागण्याशिवाय पर्याय नव्हता. मांगवाडा आयाबाया पाटलाची अंगणं शेणाने सारवून द्यायच्या. कोणाही पाटलाला त्या त्याच्याच मालकीच्या वाटायच्या. कुणीही कधीही मांगिणीला वरबडायचं. कुणी मायरानात सरपन विकून, कुणी बहीण शेतातली कणसं चोरून पोटाला आधार शोधायची अंगावरची फाटकी धडकी फेडून ती लेकरांवर पांघरायची. स्वतः तशीच निपचित पडायची. मांगाची पोरगी वयात आली की तिला मुश्किल व्हायचं. महार- मांगवाड्यात तिघी-चौघी तरी शरीर विकून पोट भरणाऱ्या असायच्या. जगणं व्यापूर राहिलेली अशी ही गरीबी. जिला वेठबिगार म्हणून राबत. भाकरीसाठी पारला तर लियात बैंड वाजवत, लगा पुरुष वेदविसाठी लाचारी पत्करत. दारूच्या नशेत तर होऊन जमिनीला पाठ टेकत बाजवत पाटलाच्या बैलांना धुवायचं, त्यांची शिंगं रंगवायची; पण नंतर त्या जनावरांन हात लावला तर विटाळ ! विहिरीतला गाळ काढायला मांगानं पार तळात उतरायच पण नंतर त्या पाण्याला शिवायचं नाही! खळं करीपर्यंत मांगानं हातानं जवारी वेचायची, पण त्याच जवारीच्या भाकरीला शिवायला बंदी ! कोपऱ्यात चिणलेलं असे ते जीवन. मांजराला खोलीत बंद केलं तर तेही चवताळून नरडीवर हल्ला करतं, पण इथ तर हा अन्याय सवर्ण आणि दलित दोघांनी मनोमन स्वीकारला होता. कोणाशी काही बोलावं, भांडावं असं मला वाटायचं, पण त्याचा फारसा काही उपयोग होत नव्हता. 'नागड्यांच्या जगात परीट' अशी माझी त्या वेळची अवस्था होती." सुहास कुलकर्णी लिहितात "त्यांनी समाजबदलाची जी स्वतःची वाट निर्माण केली त्यात! त्यांच्या व्यक्तिगत स्वभाववैशिष्ट्यांतून ही वाट निर्माण झाली आहे. 'जगायचं तर टाचेखाली राहा' असा ज्या काळातला नियम होता, तो नियम भिरकावून देण्याची ताकद आवाडांच्या रक्तातच दिसते. भीती नावाच्या भावनेला आसपास फिरकू द्यायचं नाही, एवढा बेडरपणा त्यांच्यात भिनलेला. त्यामुळे 'अरे'ला 'कारे' करायचं, जमीनदार-मालदार सावकार वगैरे ग्रामव्यवस्थेतील सर्व- सत्ताधीशांना शिंगावर घ्यायचं, कुणी लक्ष देत नसेल तर कुरापती काढून ललकारायचं नि स्वतःच्या आणि साथीदारांच्या सोबतीने पुढच्याला चितपट करायचं, ही त्यांची जगण्याची शैली. ही शैली त्यांनी जशी स्वतःची गुलामीतून मुक्तता करण्यासाठी वापरली, तशीच ती सार्वजनिक जीवनातही आणली. अन्यायाविरुद्धच्या बंडाला आवाडांनी कायद्याचं भक्कम पाठबळ देऊन टोकदार बनवलं. कायद्याचा सनदशीर परंतु आक्रमक वापर, हे शस्त्र त्यातून तयार झालं. न्याय मिळण्यासाठी पोलिसचौकीत चकरा मारत राहणं आणि पोलिसांच्या मर्जीन पदरी पडेल तेवढा न्याय मिळवणं, हा मिळमिळीतपणा त्यांनी केला नाही. माणुसकीचं जगणं मिळणं हा आपला घटनात्मक हक्क आहे, हे त्यांनी दमदारपणे सांगितलं. अस्पृश्यता आणि जातिभेदाचं राजकारण चालू ठेवू इच्छिणाऱ्यांना त्यांनी कायद्याचा बडगा दाखवलाच, शिवाय पोलिसांनाही सतत त्यांच्यावरील जबाबदारीची जाणीव करून दिली. भारतीय राज्यघटनेचा अंमल कसा करवून घ्यायचा याची प्रशिक्षणं त्यांनी आपल्या सोबत्यांना, सहकाऱ्यांना नि कार्यकर्त्यांनाही दिली. आपल्या सामाजिक-आर्थिक स्थानामुळे कायदे आपल्या घरी पाणी भरतात अशी ज्यांची समजूत होती, त्यांना कायद्याच्याच आधारे 'सरल' करण्याची कामगिरी आवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली, त्यातील काही मार्ग सर्वांनाच मान्य होतील असं नाही, पण 'माणूसपणा'च्या वागणुकीची मागणीही जेव्हा मानली जात नाही, तेव्हा असे मार्ग अवलंबले जाणार ही गोष्ट समजून घेण्याची आहे. जातिव्यवस्थेच्या जुलमातून सुटका करून घेण्यासाठी त्यांनी जसा तथाकथित सवर्णाविरुद्ध एल्गार पुकारला, तसाच स्वतःच्या जातीतल्या लोकांशीही झगडा केला. परंपरेच्या ओझ्यामुळे आणि दुर्बल आर्थिक

परिस्थितीमुळे माणसं गुलामाला कवटाळून बसतात आणि त्यातच सुरक्षितता शोधतात हे लक्षात आल्याने आवाडांनी स्वजातीयांनाही डिवचलं, अंगावर घेतलं आणि गुलामीची असलेली नाळ तोडायला भाग पाडलं. पूर्वाश्रमीचे 'मांग' आता स्वतःचं वर्णन 'मातंग' असं करून घेतात. पण अशी केवळ जातीची नावं बदलून गुलामी जात नाही असं आवाडांचं म्हणणं, गुलामी संपवायची तर गुलामगिरीचे साखळदंड तोडावे लागतील, असं त्यांचं स्पष्ट म्हणणं." (आवाड २०१५, ६) जात नाकारणाऱ्या माणसाची अवस्था सरळ रेषेत जाऊ पाहणाऱ्या एखाद्या मुंगीसारखी असते. मुंगी कष्टानं मिळवलेली छोटीशी शिदोरी घेऊन आपल्या वाटेने जात असते. एखादं डांबरट पोरगं त्या मुंगीला चिमटीत पकडतं. मातीच्या पायवाटेभोवती चोरकिड्यानं गली केलेली असते. त्या गलीची माती भुसभुशीत असते. ते इतरंगी पोर मुंगीला गलीत टाकतं. गलीच्या खालच्या टोकाला चोरकिडा दबा धरून बसलेला असतो. मुंगी वर यायचा खूप प्रयत्न करते; पण तिच्या धडपडीनं भुसभुशीत मातीत ती दबली जाते. मग चोरकिडा येऊन हळूच मुंगीला फस्त करतो. एखादीच मुंगी चोरकिड्याच्या खातेऱ्यातून वर येऊ शकते. आपली वाट चालून स्वतःचं वारूळ उभारू शकते. आपण जाती-धर्म नाकारला तरी जाती-धर्म आपल्याला कुठं नाकारतात? जाती-धर्मांचे संस्कार, रूढी आपल्या अवतीभोवती असतातच. या करकट रूढींची पाळंमुळं गरिबीत आहेत. भारतीय मनुष्याची विपन्नावस्था पुन्हा पुन्हा त्याला जातिधर्माच्या खातेऱ्यात ओढत राहते. एखाद्यानं शिक्षण घेतलं, नव्या विचारांशी जाणिवांशी त्याचा संबंध आला, त्यानं त्या जाणिवा आपल्यात मुरवल्या, तरी शेवटी भोवताल तर तोच असतो, नाती-गोती तीच असतात. हे गणगोत हटकून त्या डांबरट पोरासारखं वागतं. माझ्या मते जेव्हा अॅट्रॉसिटीचा गुन्हा एखाद्या गावात नोंदवला जातो तेव्हा ते एक चांगलं लक्षण असतं. ज्या गावातील दलित गपगुमान सवर्णांची अरेरावी सहन करतात त्या गावात शांतता असते. दलिताला जेव्हा व्यक्तिमत्त्व सापडतं तेव्हा तो गुरकायला लागतो. दलित गुरकू लागला की, त्याच्यावरचा अन्याय त्वेषानं उफाळून येतो. मग समोरासमोरचा संघर्ष, चार घाव इकडे, तर एक तरी घाव तिकडे. पण हा एक पलटवार फार महत्त्वाचा असतो. मी अशा पलटवारांना प्रोत्साहन देत गेलो, म्हणून मला नेहमीच मराठवाड्यातील प्रस्थापित पुढाऱ्यांनी नंबर एकचा शत्रू मानलं. मला हद्दपार करावं यासाठी गृहमंत्रालयापर्यंत जाऊन त्यांचे जोडे झिजलेत. बीड जिल्ह्यातून मला तडीपार करावं, असं शेकडो सह्यांचं निवेदन गृह मंत्रालयाला गेलं. पण कोणतं कारण दाखवून मला हद्दपार करणार? न्यायासाठी लढतो म्हणून? 'अरे'ला 'कारे' करतो म्हणून? त्यामुळे मी माझे पाय अधिकच ठाम रोवून उभा राहिलो, लढत राहिलो. परिणामी गावागावांत माझे शत्रू निर्माण झाले. मला खुनाच्या धमक्या येऊ लागल्या. या लढाईत स्वजातीच्याच एका माणसाने आवाडांवर प्राणघातक हल्ला करावा आणि एका परजातीच्या प्रौढेने हात जोडून आवाडांची विचारपूस करावी, यातील अंतर्विरोध जातिअंताच्या लढाईतल्या कार्यकर्त्यांना वेगळं बळ देणारा आहे.

मी अमुक समाजाचा, अशी एक ओळख माणसाला हवी असते. म्हणून गणगोत. नात्यांचं ठीक आहे, पण जातीचा अभिमान बाळगावा असं त्यात काय आहे, हे एक नेहमीच त्याना पडलेलं कोडं आहे. सवर्णांनी जातीचा अभिमान बाळगला तर ते एक वेळ समजण्यासारखं आहे. तसा अभिमान बाळगून तेही स्वतःचं नुकसान करत असतातच, पण खालच्या जातीला चेपून काही लाभ तरी त्यांना मिळतात. पण महार, मांग-अगदी पारधी समाजही आपल्या जातीचा अभिमान गोंजारतो. त्यांना या गोष्टीची गंमत वाटत आलीय. म्हणून

असेल कदाचित, जेव्हा जेव्हा जातीचे पाश माझ्याजवळ आले तेव्हा तेव्हा त्यांच्यात एक तिरीमिरी संचारली. अनेकदा त्यांनी मनाची गंमत म्हणूनही जातीय रूढींशी खेळले, जातबांधवांना डिवचलं. आजही जात हा त्यांच्या थट्टेचा विषय झालेला आहे. जातीच्या बाबतीत परजातीशी आणि जातबांधवांशीही अनेकदा ते हमरीतुमरीवर आलेत. असे प्रसंग अनेक आहेत. त्यांच्या कॉलेजजीवनाच्या आसपास ही वृत्ती मूळ धरू लागलेली दिसते.

## ४.९ 'नामांतर' चळवळीत सहभाग

नामांतर संघर्षामुळे मराठवाडा जळत होता. या चळवळीने मराठवाडयात दलितांवर (मुख्यतः महार आणि मांग यांच्या विरोधात) हिंसाचार सुरू केला होता. मराठवाडयातील औरंगाबाद, नांदेड, परभणी आणि बीड जिल्ह्यातील १२०० हून अधिक गावांवर आणि २५००० लोकांवर या हिंसाचाराचा परिणाम झाला. या हिंसाचारात दलितांच्या हत्या, विनयभंग, दलित महिलांवर बलात्कार, त्यांची घरे जाळणे, दलित-वाड्यांना लुटणे, त्यांना बेघर करणे, दलितांना गावाबाहेर काढणे, त्यांच्या विहिरी आणि पिण्याच्या पाण्यात विषबाधा करणे आणि प्रदूषित करणे, हत्या करणे असे अनेक प्रकार घडले. त्यांची गुरेढोरे, त्यांना काम देण्यास नकार देत. दहशतीमुळे अनेकांना जंगलात किंवा पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये आणि शेजारच्या राज्यांमध्ये पळून जावे लागले आणि पुन्हा आपले जीवन सुरू करावे लागले. नामांतर चळवळीने एकनाथ आवाड यांच्यासारखे अनेक कार्यकर्ते घडवले, जे त्यावेळी बीडमध्ये शिक्षण घेत होते. त्यांनी बी.ए. पूर्ण केले आणि एम.ए. करण्यासाठी अंबेजोगाईला गेले. तोपर्यंत आवाड दलित पँथर्समध्ये सामील झाले होते. नामांतराच्या विरोधातील आंदोलन मराठवाडयात शिगेला पोहोचले होते. त्यांचे कॉलेज जातीयवादी गुंडांनी बंद केले. आवाड यांनी आपल्या सहकारी दलित विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांना प्रेरित केले आणि महाविद्यालय प्रशासनाला महाविद्यालय खुले ठेवण्यास भाग पाडले. यामुळे बळजबरीने महाविद्यालये बंद करणाऱ्या जातीबद्दल मनात भीती निर्माण झाली. खेडयातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली होती, खेडयापाडयात अन्याय आणि आक्रोश पसरत चालला होता, सावकारांनी फसवलेली मजूर आणि मजुरी हे गावकरी कोणतीही विचारपूस न करता फक्त पाहत होते. काही दलित विरोध करत होते पण त्याना कोणाचाही आधार नव्हता. विरोध करणाऱ्यांमध्ये आवाडही सामील झाले. अनेक आंदोलनात ते आघाडीवर होते. आंदोलनाच्या विरोधात असलेल्या सूडबुद्धीने प्रबळ जातीचे सावकार आवाड यांना जीवे मारण्याच्या धमक्या देऊ लागले. आणखी एक समाजवादी कार्यकर्ते बाबा आढाव यांच्यासोबत, आवाड यांनी बराच प्रवास केला आणि 'एक गाव एक पानवठा' चळवळीत ही ते सामील झाले. गावोगावी भेटी देताना त्यांनी पाहिले की, महार आणि मांग यांच्यावरील अत्याचार शिगेला पोहोचले होते. आवाड यांनी राज्यभर फिरून पिडितांची भेट घेतली. त्यांनी त्यांना नैतिक आणि भावनिक बळ दिले.

नामकरण चळवळीमुळे उच्च जातीचे लोक सुडाच्या भावनेने पेटून उठले होते. त्याविषयीच्या आपल्या आठवणी जाग्या करत आवाड लिहितात, 'अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने महारांना लक्ष्य केले जात होते. मराठवाड्यातील किमान १८० गावांना या प्रकारच्या हिंसेचा सामना करावा लागला. या दंगली दहा दिवस चालल्या. १८ जागी पोलीस गोळीबार झाला. हजारहून जास्त दलित घरांना आगी लावण्यात आल्या.' त्यावेळी कॉलेजात शिकणाऱ्या आवाडांना या संघर्षाने अतिशय प्रभावित केले. ते लिहितात,

'दलितांच्या विरोधातील हिंसेच्या बातम्या जसजशा माझ्यापर्यंत पोहचत होत्या, तसतसे माझे मन क्रोधाने भरून येत होते आणि मी आणखीनच अस्वस्थ होत होतो. सरकारला विनंतीपत्रे देण्यात आणि अपील करण्यात मी वारंवार सहभाग घेत होतो. माझ्या आईला माझी चिंता वाटू लागली होती कारण, मी एकाच वेळी गावातील अनेकांची नाराजी ओढवून घेतली होती.' आपल्या जीवनातील सुरुवातीचा गरिबी आणि जातीभेदाविरोधातील संघर्षाचा कालखंड आठवताना आवाड लिहितात, 'उपेक्षेत कसलाच आनंद नाही. आयुष्यभर जर तुम्हाला अपमान आणि तिरस्कारच सहन करावा लागणार असेल तर अशा आयुष्यात कोणताच आनंद उरत नाही. परंतु जेव्हा मनुष्य आपल्या नियतीशी लढण्यास सुरुवात करतो, अन्यायाविरोधात दंड थोपटून उभा राहतो, तेव्हा जीवन एक वेगळ्याच प्रकारचा आनंद देते. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की, जीवनातील संघर्ष राग-संताप अशा भावनांचा निचरा होण्यासाठी वाट मोकळी करून देतो. माझ्यासाठी ही एक सवयच होऊन बसली आहे.'

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्यातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात समाजपरिवर्तन झालेले होते. विशेषत: बाबासाहेबांनी केलेले शैक्षणिक कार्य यात अतिशय महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांनी "पीपल्स एज्युकेशन सोसायटी"ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून विविध महाविद्यालये स्थापन करण्यात आली. १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन करण्यात आले. नागसेन परिसरात उभे राहिलेल्या या महाविद्यालयाने दलित चळवळीला उभारी दिली. ते चळवळीचे केंद्र बनले. मराठवाडयातील अनेक विद्यार्थी या महाविद्यालयात प्रवेश घेऊन शिक्षित झाले. दलित पँथरची चळवळ येथेच चालली. दरम्यान मराठवाडयाला स्वतंत्र विद्यापीठ असावे अशी मागणी पुढे आली. शासनाने २७ एप्रिल १९५७ रोजी न्यायमूर्ती पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या अहवालानुसार २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले. ७ जुलै १९७७ रोजी दलित पँथरच्या माध्यमातून गंगाधर गाडे यांनी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे अशी मागणी केली. त्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडयाच्या शैक्षणिक विकासात मिलिंद कॉलेजच्या माध्यमातून निर्माण केले कार्य होते. या मागणीला विविध विद्यार्थी संघटनांनी पाठिंबा दिला. सरकारने याची दखल न घेतल्यामुळे विविध आंदोलने, मोर्चे निघाले. याचा परिणाम म्हणजे २५ जुलै १९७७ रोजी विद्यापीठ कार्यकारणीने विद्यापीठ नामांतराचा ठराव पास केला. तो ठराव २७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्राच्या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहमध्ये पारीत करण्यात आला. दलित चळवळीच्या वाटचालीतील हे मोठे यश होते. मात्र हा आनंददायी क्षण इथल्या प्रस्थापित व्यवस्थेला पाहावला नाही. नामांतरला मराठवाडयातील जातीयवादी संघटनांनी विरोध केला. प्रचंड मोठ्या प्रमाणात याचे पडसाद ग्रामीण भागात पडले. दलितांची घरे जाळण्यात आली. गावागावात दलितांवर अन्याय अत्याचार करण्यात आले. प्रस्थापित व्यवस्था क्रुरपणे वागली. यावेळी दलित पँथरसह सर्व दलितांचे नेते एकत्र आले. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लॉग मोर्चा काढला. महाराष्ट्रातील दलित जनता यामध्ये सहभागी झाली. सर्व आंदोलने झाली. यात जनार्धन मवाडे, पोचीराम कांबळे, गौतम वाघमारे शहीद झाले. तब्बल १७ वर्षे हा नामांतर लढा लढला गेला. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ ही दलित चळवळीतील इतिहासातील मोठा लढा होता. यात सर्व दलित

समाज एकत्र आला. रस्त्यावर उतरला. कितीही अन्याय अत्याचार झाला तरी माघार घ्यायची नाही अशी परखड आंबेडकरवादी भूमिका सर्वांनी स्वीकारली, शेवटी या लढयाला यश आले. १४ जानेवारी १९९४ रोजी विद्यापीठाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद असे करण्यात आले.

## ४.१० सामाजिक न्यायविषयक भूमिका

जातीय अन्याय सहन करायचा नाही, त्यासाठी वाटेल ते करायचं, वाटेल ती किंमत मोजायला तयार राहायचं, कायद्याचा शस्त्र म्हणून वापर करायचा, त्याआधारे शत्रूला आणि शासकीय यंत्रणेला वठणीवर आणायचं, वेळप्रसंग पाहून संघटित शक्तीचा हिसका दाखवायचा, कायदा अपुरा पडत असेल तर अधिक प्रभावी कायद्याचा आग्रह धरायचा, असं हे तंत्र आवाडांनी विकसित केलं. लोकांची जागृती, त्यांचे संघटन, आक्रमक शैली, जिवावर उदार होऊन लढण्याची तयारी, आणि माणूस म्हणून जगण्याची दुर्दम्य आस यातून आवाडांनी हे तंत्र यशस्वीही करून दाखवलं आहे. पोतराज कातरण्यापासून वेठबिगारी नष्ट करण्यापर्यंत नि दलित अत्याचारांना प्रतिबंध घालण्यापासून गायरान जमिनींचा ताबा घेण्यापर्यंत अनेक बाबतीत हे घडून आलेलं दिसतं. न्याय मिळवण्याची ही शैली समकालीन संघटनात्मक प्रयत्न आणि चळवळींच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणारी आहे. जातिअंताची लढाई जातीच्याच शस्त्राने लढली तर जातीय द्वेष आणि जातीय संघर्ष अटळ असतात. हा मार्ग आवाडांना कधीच जवळचा वाटला नाही. दुसरीकडे, प्रबोधन करण्याचा मार्ग अवलंबला तर जातिअंताची लढाई फारशी पुढे जाऊ शकत नाही, असा पूर्वानुभव असल्यामुळे आवाडांनी स्वतःचा मार्ग निवडला. त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या 'दलित पँथर्स'च्या शैलीचा अंगीकार केला आणि वंचितांच्या उग्र संघटनातून कायद्याची अंमलबजावणी करण्याचा लोकशाही मार्ग स्वीकारला. त्यामुळे लोकांमध्ये प्रबोधन, जागृती होऊन हितसंबंधांची वीण घट्ट झालीच, शिवाय त्याचा दाब येऊन सरकार, पोलिस, न्यायालय यांच्याकडून न्याय मिळवणं शक्य झालं.

हे करताना त्यांनी जशी प्रबोधनाची मवाळवादी भूमिका घेतली नाही, तसंच जातीचा प्रश्न सोडवायचा म्हणून केवळ इतरांना दूषणं दिली नाहीत किंवा आकांडतांडवही केलं नाही. हितसंबंधांची जुळणी करत त्यातून संघर्ष उभा केला नी तडीस नेला. दुसरी गोष्ट म्हणजे युद्धाच्या रणांगणात केवळ संघर्षाचे घोडे दौडवले नाहीत, तर दुसऱ्या बाजूला सैन्याचा टिकाव लागण्यासाठी रचनात्मक, विधायक कामांचं जाळंही विणलं. तिसरी गोष्ट म्हणजे सामाजिक बदल आणि राजकारण यांचा सांधाही त्यांनी जोडला.

मानवी हक्काच्या लढय़ात गायरान जमीन मिळावी, यासाठी सुरू केलेला संघर्ष त्यांनी केवळ दलित समाजापुरता मर्यादित ठेवला नाही, तर पारधी समाजालाही या लढय़ात सहभागी करून घेतले. दलित अत्याचाराच्या गावोगावी घडणाऱ्या घटनांमध्ये पोलिसांनी बहुसंख्य सवर्णांची बाजू घेतली, तर त्याविरोधात बळ देणारा कार्यकर्ता एकनाथ आवाडांनी घडविला. पारधी समाजाच्या वस्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती व्हावी, यासाठी ते प्रयत्नशील होते. आंबेडकरी विचारांशी निष्ठा बाळगताना समकालीन नेते कोण हे सांगणारे आवाड यांचे नेतृत्व होते, म्हणूनच बीडच्या ग्रामीण भागात नेल्सन मंडेला यांच्या नावाने वसाहत त्यांनी निर्माण केली. ज्यांना कोणीच वाली नाही, अशा उपेक्षित समाजाला

न्याय मिळावा यासाठी ते कार्य करायचे. गावातील घरगुती भांडण असो की दलित-सवर्ण वाद, आवाड प्रत्येक समस्येवर काम करायचे. कधी संघर्षांने, तर कधी सामोपचाराने त्यांनी तोडगा काढला. परिवर्तनाच्या लढाईत राजकीय नात्यांची गरज ओळखून त्यांना चळवळीत सामावून घेण्याची वृत्ती आवाडांकडे होती. त्यांचे राजकारणही याच दिशेने जाणारे होते. उपेक्षित वंचिताच्या क्षेत्रातही 'एनजीओ कल्चर' विकसित होत असताना, त्याला फाटा देत लढाऊ कार्यकर्ते त्यांनी घडविले. सामाजिक चळवळीला नवा विचार देताना एकनाथ आवाड यांनी राजकारणही केले.

ऊसतोड कामगारांचे प्रश्नही या काळात त्यांनी खूप हाताळले. ऊसतोड कामगार म्हणजे भूमिहीन. मुकादमाकडून उचल घेतली की ऊसतोड कामगारांची जोडी मुकादमाची गुलाम. हंगामाच्या तोंडावर बाई गर्भार असेल तर पिशवी साफ करून कामावर जायचं. उघडया ट्रकमध्ये दहा-बारा जोड्यांची एक ऊसतोड कामगारांची टोळी ऊन-वारा-पाऊस झेलत बीडपासून पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, राजस्थान-वाट्टेल तितक्या लांब नेली जाते. सहा ते आठ महिने गावाचं नाव काढायचं नाही. मुकादम कारखान्याकडून उचल घ्यायचे. त्या पैशांतून मजुरांना उचल द्यायचे. एका हंगामात अमुक एवढा ऊस तोडायचा, अशी बोली व्हायची. पण मुकादम न कारखान्यांकडून उचल घ्यायचे. त्या पैशांतून मुकादम जमीन-गाडी-बंगला आणि एकाच ऊसतोड कामगारांच्या टोळीला सर्व ठिकाणी राबवू पाहणार. अश्या अनेक ऊसतोड कामगारांच्या टोळ्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्याना न्याय दिला आहे. कधी भांडून तर कधी प्रेमाने अशा चळवळी त्यांनी हाताळल्या.

भारताला स्वातंत्र्य मिळून जवळपास तीस वर्षं उलटली तरी आदिवासी वेठबिगार म्हणून गुलामीत होते. वेठबिगार म्हणजे काय, तर ज्याला वेठीला धरून चाकर बनवलाय तो. भारत सरकारने १९७९ साली वेठबिगार निर्मूलन कायदा केला होता, पण हा कायदा कोणाला फारसा माहीतही नव्हता. या कायद्याचा आधार घेऊन वेठबिगारमुक्तीचे प्रयत्न करायचे, हे त्यांनी आपले मुख्य काम ठरवले. राबणाऱ्या मजुरांना 'लगीनगडी' म्हटलं जायचं. मालकलोक आदिवासी पोरांना बैल चारण्यासाठी ठेवत. एक वेळचं जेवण आणि दोन जोड कपडे यात ती पोरं बैलं राखायची. ही मुलं नांगर धरू लागली, म्हणजे 'नांगरे' झाली की मालकच त्यांचं लग्न ठरवायचा. लग्नाचा बस्ता मालकच बांधायचा. धान्य वगैरेचा खर्च करायचा. आणि मग लग्नासाठी झालेल्या खर्चाचं कर्ज फेडण्यासाठी त्या दोघा नवरा-बायकोंना मालकाकडे राबावं लागायचं. काही काही मालकलोक तर लगीनगड्यांच्या बायकांनाही वापरायचे. वर्षभरात दोन बनियन, कंबरेला गुंडाळायचे दोन रुमाल. महिन्याला सव्वा मण म्हणजे वीस किलो भात या मजुरांना मालकाकडून मिळायचा. मजूर अडाणी होते. त्यांना हिशोब कळत नव्हते. त्यामुळे लग्नाचं कर्ज कधीच फिटत नव्हतं. त्या जोडप्याला झालेलं पोरही मालकाकडेच राबायचं. आई-बापाच्या लग्नाचं कर्ज फेडणारे अनेक आदिवासी तिथे होते. अश्या लोकाना एकत्र करून त्यानां न्याय देण्यासाठी अथक प्रयत्न त्यांनी केले. अनेक रोमांचक प्रसंग त्यांच्यावर घडले पण कोणताही माघार न घेता घेतला प्रश्न त्यांनी सोडवलेला दिसतो. सामाजिक बदलासाठी निवेदनं, उपोषणं, धरणं, मोर्चे, आंदोलने हे मार्ग तर त्यांनी अवलंबलेच, शिवाय राजकीय पक्षांना कधी कोंडीत पकडून तर कधी 'सुसरबाई, तुझी पाठ मक' म्हणत हस्तक्षेप करायला लावला. आपला सामाजिक बदलाचा कार्यक्रम पुढे रेटण्यासाठी संघटनात्मक प्रयत्नांसोबत राजकीय

सहभागाचा मार्ग यशस्वीपणे राबवणारी उदाहरणं महाराष्ट्रात विरळा आहेत. एकनाथ आवाड यांचं हे वेगळं वैशिष्ट्य नवी दृष्टी देणारं आहे.

## ४.११ अनिष्ट रूढी प्रथा आणि परंपरा यांवर घातलेले घाव

एकनाथ आवाडांचा जन्म पोतराज म्हणून 'देवीची गाणी म्हणणारे दगडू आवाड यांच्या घरात झाला. घरातूनच परिवर्तनाची लढाई सुरू करायची असते, हे ओळखून त्यांनी पोतराज वडिलांचे केस कापले. ज्या काळात ही घटना घडली तेव्हा केस कापले तर देवीचा कोप होईल आणि माणूस मरेल, अशी अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात होती. ती पूर्णत: संपली आहे असे नाही. मात्र, अशा रूढींच्या विरोधात पाय रोवून उभे राहावे लागते, हे मराठवाड्यात आवर्जून सांगणारे कार्यकर्ते म्हणजे एकनाथ आवाड. पारंपरिकपणे, पोतराजाने केस वाढवत असल्याने त्यांच्या वडिलांनीही केस वाढीवले होते. आवाडांनी आपल्या वडीलांपासून सुरुवात करून, परंपरागतपणे भीक मागण्यास भाग पाडलेल्या शंभरहून अधिक मांग पोतराजांचे केस कापून या जाती प्रथेवर हल्ला केला. पोतराज समाजात केस वाढवणे ही प्रथा होती. आपल्या वडीलांपासून या केशवपणाची सुरवात एकनाथ आवाड यांनी सुरू केली. ते लिहितात "काय बया वल्या झाडाला आग लावली तुमच्या लेकानं! तुमच्या पोटाला राकस जन्माला आलाय!" लक्ष्मीबाईचं ऐकून बाबाच्याही अंगात मरीआय संचारायला लागली. बाबा धरधरू लागला. चालता चालताच त्याच्या अंगात यायला लागलं. मी त्या दोघांना घरच्या वाटेला लावून हरीच्या भट्टीवर गेलो. हरी माझा चुलत भाऊ. तो हातभट्टी काढायचा. त्याच्याकडून चांगली पहिल्या धारेची दारू घेतली. घरी आलो तर बाबा घुमतच होता. मी घरातला कानतुटका कप घेतला, त्यात हातभट्टी घातली आणि बाबाला म्हटलं, "येऽ मरीआय, घे. पहिल्या धारंची हाय." दारू पाहिल्यावर बाबानं एका घोटात ती संपवली. मी दुसरा कप भरून दिला. तोवर मरीआय कुठच्या कुठं गेली होती. बाबानं दुसरा कपही तोंडाला लावला. मला म्हणाला, "आरं, कसली आलीय आय! ह्या मनचंदीमुळंच माजं वाटुळं झालं. हो माजं दात ह्या मरीआयनच पाडलं. पोटासाटी मरीआयचं नाव घिऊन नाचलो, पन ह्या सटवीनं एक दिस बरा धिला नाय." बाबानं दात दाखवले. त्याचे पुढले दात पडलेले. मरीआय अंगात आल्यावर कोंबडीचं नरडं तोडताना बाबाचे दातही निसटले होते. बाबानं त्या रात्री मरीआयला भरपूर शिव्या दिल्या. मला म्हणाला, "घरातलं ते लचांबळ पन टाकून दे." मला तेच हवं होतं. देव्हाऱ्यात पत्र्याचे देव होते. ते सगळे फडक्यात घातले. तेव्हा नदीला पूर आलेला. देव्हाऱ्यातले सगळे देव मी पुरात फेकून दिले. बाबाच्या पोतराजकीचे उरलेसुरले अवशेषही वाहून गेले. माझ्या घरातून मांगपणाचं नामोनिशाण मिटलं." (आवाड, २०१५:३६)

पोतराजांप्रमाणे 'कारन' हीदेखील मांग जातीला चिकटलेली एक करकट प्रथा होती. या प्रथेच्या विरोधात त्यांनी आपला मोर्चा वळवला. कारन म्हणजे रेड्याच्या मटणाचं सामूहिक जेवण. अशा जेवणाला 'कंदुरी' असाही एक प्रतिशब्द आहे. पण कंदुरीपेक्षा कारन जरा वेगळं असायचं. कंदुरीला बकऱ्याचं मटण असतं, तर कारन करताना हल्या कापला जातो. कुणी तरी आपल्यावरची पीडा टाळण्यासाठी मरीआईला नवस करायचं. 'कारन करतो, माझ्यावरची ब्याद घालव', असा नवस बोलला की एक रेडा देवीला सोडला जायचा. हा रेडा गावभर हिंडून चांगला माजल्यानंतर कारन ठरायचं. पोतराजही लोकांना 'कारन करा, तुमची बला टळल' असे सल्ले द्यायचे. यामागे चांगलं आठवडाभर पुरेल एवढं रेड्याचं मटण आणि

दारूची मेजवानी व्हावी एवढाच उद्देश असायचा. कारन करताना त्या देवीला सोडलेल्या हाल्याची गावात मिरवणूक काढली जायची. त्या मिरवणुकीपुढं पोतराज हलगी वाजवत गाणी गायचे. आया-बायांच्या अंगात यायचं. मानेला झटके देऊ देऊ त्यांच्यातले देव मिरवणुकीत नाचायचे. मिरवणुकीनंतर रेड्याच्या मानेवर पाच पानांचा विडा ठेवला जायचा. गावच्या पोलिस पाटलाला हा विडा कापायचा मान दिला जायचा. पाटलांना हा त्यांचा खूपच मोठा सन्मान वाटायचा. कारण रेड्याच्या मानेवरील विडा कापताना मोठी तलवार त्यांच्या हाती दिली जायची. मोठया ऐटीत पाटील तलवारीनं विडा कापायचे. नंतर त्या प्राण्याचा जीव घेतला जायचा. रेड्याचं मटण भरपूर निघायचं. ते दलित वस्तीला मिळायचं. दलित वस्तीतल्या घराघरांत भाकरी थापल्या जायच्या. बऱ्याचदा सामूहिक जेवण आणि दारूसोबत हा सोहळा रंगायचा. सोबत 'ध्रुपदाआयच्या नावानं चांगभलं, अंबाबाईच्या नावानं चांगभलं' अशा आरोळ्यांचा धुमाकूळ चालायचा. मांग जातीला हलकट ठरवणारी ही रूढी अजूनही तुरळक प्रमाणात चालते. त्यांनी या प्रथेवर खूप आळा बसवला.

## ४.१२ मानवी हक्क अभियान

एम. एस. डब्ल्यू. (M. S. W.) चे शिक्षण घेत असताना वसई येथील विवेक पंडित यांच्या विधायक संसदशी एकनाथ आवाड जोडले गेले. आदिवासी समाजात राहून आदिवासींची होणारी वेठबिगारी सोडवण्याचे काम त्यांनी केले. या आदिवासी समाजात काम करताना मराठवाडयातील दलितांच्या प्रश्नासाठी लढणे त्यांना गरजेचे वाटले आणि याचसाठी त्यांनी बीड गाठले. डिसेंबर १९९० मध्ये मानवी हक्क अभियानाची मुहूर्तमेढ एकनाथ आवाड यांनी रोवली व दलितांच्या अनेक प्रश्नांना मानवी हक्क अभियानाच्या माध्यमातून वाचा फोडली. त्यांनी असंख्य अन्याय, अत्याचार पाहिले. असंख्य अन्याया विरोधात ते उभे राहिले. ते लिहितात “किती नोंदवू? किती सांगू? दलित पोरानं इनशर्ट केला? गॉगल घातला?... चौकातले धर्माभिमानी रिकाम टेकडे शर्ट फाडणार. गॉगल पायाखाली तुडवणार. वर विचारणार- “काय आमची शार्ट उपटशील का रं धेडा?” सवर्णाच्या मुलीची चिठी याच्याकडे सापडली, हा गुन्हा?... चौकात खांबाला बांधून मरेस्तोवर झोडपणार. आमच्या पोरीकडं बघितलंस? डोळा मारला?... चाकूनं डोळे काढले । आंबेडकरांच्या जयंतीची तयारी करायची म्हणून मजुरीला रजा मागितली. मालकांनी पायाला दोर बांधला. पाण्याच्या टाकीवर नेऊन उलटा टांगला. झुला केला. दिला सोडून टाळूवर. जणू कडेलोट। आता करशील जयंती साजरी? सवर्णाच्या बांधाला लागून जमीन खरेदी केली ?... कालचा मजूर आता शेतकरी म्हणून मिरवणार? घे तुज्या मायला मांगट्या... डोक्यात कोयत्याचा घाव. दलित पोरगी कॉलेजात जाऊ लागली?... बघा कसा माल चाललाय !... येतीस का उसात? पोरीनं काय करावं? कुणाला सांगावं? गरीब बाप 'शिक्षण सोड' म्हणतो. मग पोरगी आत्महत्या करते. आणि तरीही ॲट्रॉसिटी कायद्यातील बहुतांश प्रकरणांत आरोपी दोषमुक्त ठरवले जातात. पोलिस गुन्हा दाखल करीत नाहीत. सरकार विशेष न्यायालयाची तरतूद अंमलात आणत नाही. साक्षीदाराला न्यायमूर्ती विचारतात “तुम्ही तर म्हातारे! रात्रीच्या अंधारात ह्यांनीच हल्ला केला, हे तुम्ही कसं ओळखलं?" म्हातारा साक्षीदार "सायेब, आमच्या गावातलीच पोरं ही. कुठंबी वळखीन.” न्यायमूर्तीचं भरतवाक्य “तुमची नजर कमजोर आहे, म्हणून आरोपी दोषमुक्त !” या पार्श्वभूमीवर मानवी हक्क अभियान उभं राहिलं. कार्यकर्ते गीतं रचू लागले. गाऊ लागले-शान से जियो, शान में, मानवी हक्क

अभियानमें...उतर जाओ मैदानमें, मानवी हक्क अभियानमें... भाई, तू क्यूं सोच में पड़ा नहीं कोई छोटा-बड़ा... बात रखो अभी ध्यानमें... मानवी हक्क अभियानमें... (आवाड २०१५,१६०) १९९१ ते २००८ हा काळ. या काळात मराठवाडयातील आठ जिल्ह्यांत अॅट्रॉसिटीचे ३५२९ गुन्हे नोंदवल्याचं शासकीय दस्तऐवज दाखवतात. हे हिमनगाचं एक टोक आहे. अनेक घटना गावातच दाबल्या गेल्या असतील. अनेक घटना पोलिस चौकीपर्यंत आल्या, पण नोंदवल्या गेल्या नसतील, पण तरीही मराठवाडयात अॅट्रॉसिटी, गुन्हे नोंदवले जाण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे. दलिताला कुणी बोट लावलं की तिथं मानवी हक्क अभियान पोहोचू लागलं. पोलिस अधिकारी, शिक्षक, ग्रामसेवक, तहसीलदार अशा अनेकांवर आम्ही अॅट्रॉसिटीचे गुन्हे दाखल केले. अनेकांना नोकरीवरून घरी बसवलं. बीडसारख्या जिल्ह्यातील हा कार्यकर्ता मानवी हक्कासाठी लढला याची नोंद आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली. २००१ मध्ये त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या वंशभेदविरोधी परिषदेत सहभागी होण्याची संधी मिळाली. ही त्यांच्या कामाची पावतीच म्हणावी लागेल.

## ४.१३ जागर पदयात्रा

कुठल्याही आंदोलनात जोमाचा काळ असतो तसं त्यात शैथिल्य येणंही स्वाभाविक असतं. पण मग आंदोलनात जोश कसा येईल? यासाठी त्यांनी  थेट लोकांसमोर जायचं ठरवलं. अहमदनगर ते नांदेड हे साडेसहाशे किलोमीटरचं अंतर पायी चालत जायचं, दलितांचं मानस जाणून घ्यायचं. संघटनेचा विचार पुन्हा लोकांपर्यंत पोचवायचा. या पदयात्रेला एकनाथ आवाड यांनी 'जागरयात्रा" हे नाव दिलं. जागर पदयात्रेची सुरुवात नगर जिल्ह्यातील खंडाळा गावातून झाली. तारीख होती २४ सप्टेंबर. डॉ. आंबेडकरांनी पुणे करारावर सही केली तो हा दिवस. पुणे कराराने दलितांची भारतीय राजकारणात कायमची गोची केली. आंबेडकरांच्या मागणीप्रमाणे जर दलितांच्या स्वतंत्र मतदारसंघातून दलितांनी दलितांचे उमेदवार निवडून दिले असते तर आजची दलित राजकारणाची कोंडी झाली नसती. आज दलितांचे नेते कोण हे प्रस्थापित राजकीय पक्ष ठरवतात. त्यांना सोयीचं ठरेल अशा नेतृत्वालाच जवळ करतात. यामुळे राजकारणात दलित हुजरे निर्माण झाले, चमचेगिरी वाढली. प्रस्थापितांचे बूट चाटणारे 'दलितांचे नेते' म्हणून मिरवू लागले. दलितांचं खरं नेतृत्व निर्माणच होणार नाही, अशी तजवीज झाली. राखीव मतदारसंघातून दलित निवडून आला तरी तो वागणार सवर्णांच्या मर्जीनं. हे एक दुष्टचक्र सुरू झालं. दलित जातींमध्ये फूट कायम ठेवली गेली. मी मांग जातीत जन्म घेतला म्हणून दलितांचे मुख्य पक्ष मला सावत्र ठरवत आलेत. जणू बाबासाहेबांचं नाव घ्यायचा अधिकार फक्त एका ठराविक जातीचाच. पण मला बाबासाहेबांचा विचार एका जातीत बंदिस्त होऊ द्यायचा नव्हता. म्हणून आमच्या 'जागरयात्रे'ची सुरुवात पारधी समाजाच्या वस्तीवरून झाली. या पदयात्रेदरम्यान त्यांनी डायरी लिहिली होती. त्या डायरीतील ही वाचली तर लोकांच्या मध्ये झालेली जागृती आपल्याला सहज समजून येते. ते लिहितात "अहमदनगर, खंडाळा गावातील पारधी वस्ती. आम्ही ४०-५० कार्यकर्ते वस्तीवर जमलोत. मानवी हक्क अभियानाच्या निळ्या- लाल ध्वजाचं ध्वजारोहण. एका पारधी बाईने आयुष्यात पहिल्यांदाच झेंडा फडकवलाय. त्यामुळे पारधी वस्तीत प्रचंड उत्साह आहे. लोक यांना चोर-गुन्हेगार- भिकारी म्हणूनच पाहत आलेत. समाजाकडून हाडहूड वागणूक मिळालीय." अशा अनेक प्रसंगांनी हे आत्मकथन भरलेले आहे. वाचकाला आत्मभान देत देत जागृतीचा विस्तव मनात पेटवत राहते.

## ४.१४ 'जग बदल घालुनि घाव' या आत्मकथनाचे भाषिक विशेष

या आत्मकथनाची अनेक वैशिष्टे आहेत. साधी सोपी सरळ संवादी भाषा आणि जे काही अनुभवले त्याचे प्रामाणिक स्पष्ट निवेदन, व्यवस्थेविरोधात आक्रोश देखील संयमी आहे. या आत्मकथनात उगीच शब्दखेळ आणि रंगीत चित्रण नाही. त्यात एक तटस्थता आणि प्रामाणिकपणा दिसून येतो. त्यामुळे सारी पात्र वाचकाला भेटल्यासारखी वाटतात. खानदेश आणि मराठवाडा भागातील बोलीचा संवादी उपयोग आहे. या पुस्तकात इतिहासाचा, दलितांच्या चळवळीचा अगदी थोडका, पण नेटकेपणाने उल्लेख येतो. पण कुठेही उपेक्षित असल्याचे भांडवल या आत्मकथनात आवाडांनी केलेले दिसत नाही. म्हणूनच आपण नवीन काही तरी वाचतो आहोत, याचीच जाणीव वाचकाला शेवटपर्यंत होत राहते. या आत्मकथनातून भेटणारी विविध माणसे बरेच काही शिकवूनही जातात. पांढरपेशा जगण्यातला फोलपणा उघड करण्याचे कामही हे पुस्तक एका बाजूला करत राहते. त्यात कोणताही आव नसतो वा अहंगंड-न्यूनगंडाची भावना नसते. गावकुसाबाहेरचे आयुष्य जगत आलेला माणूस ना धड प्रतिकार करू शकत, ना धड सहन करू शकत. माती आपली आहे याचीच ज्याला शाश्वती नाही, त्याला छप्पर उडेल की टिकेल याची चिंता नसते आणि म्हणूनच अशा गरिबीने, जातीयवादाने पोळलेला मनुष्य व्यवस्थेविरोधात उभे राहण्याची धमक दाखवतो हे या आत्मकथनातून पदोपदी जाणवत राहते. याच बंडखोरीमुळे पोतराजाचा मुलगा म्हणून जन्माला आलेले आवाड पुढे मात्र क्रित्येक उपेक्षितांचा आवाज बनतात, बदलाचे घाव ते जगावर घालतात आणि हे सर्व लिहिताना जे 'आम्ही केले ते आम्हीच, जे त्यांनी दिले ते त्यांनीच' हे आत्मविश्वासपूर्वक मान्य करतात.

सुहास कुलकर्णी  लिहितात "एकनाथ आवाड यांचं हे आत्मनिवेदन त्यामुळेच मराठी आत्मचरित्रांत आणि त्यामुळे मराठी साहित्यात मोलाची भर घालेल, असा विश्वास आम्हाला वाटतो. 'उपरा' आणि 'बलुतं' पासून सुरू झालेला वंचितांच्या आत्मकथनांचा प्रवाह अलीकडच्या काळात सुकत चालला होता. आपल्या वाट्याला आलेलं दुःख, दैन्य आणि बिनमाणुसकीचं जगणं या प्रवाहाने पुढे आणलं. त्यातून दलितांच्या व एकूणच सामाजिक-राजकीय चळवळींना दिशा मिळाली. आवाडांचं हे पुस्तक आपल्या वाटयाला आलेलं दुःख सांगतं, पण तिथेच थांबत नाही. या दुःखाच्या चिखलातून बाहेर कसं पडायचं, न्याय कसा मिळवायचा, स्वतः साठी संधीची नि प्रगतीची कवाडं कशी खुली करायची आणि पिढ्यान् पिढ्यांची गुलामगिरी कशी भिरकावून द्यायची याचं एक शास्त्रच या पुस्तकातून पुढे येत आहे. या अर्थांने दलित आत्मकथनांच्या पुढच्या टप्प्याची पायाभरणी करणारं हे पुस्तक आहे." (आवाड २०१५, ८) लिखाणातले हे सच्चे रांगडेपण वाचकाला अंतर्मुखही करते. हे आत्मकथन वाचताना वाचकांना अनेक नव्या शब्दांची ओळख होत जाते. पांढरपेशा जगण्यापलीकडच्या संवेदना, मळभी विश्वाची जाणीव होते. माणुसकीची शिते ज्याच्या ताटात अजूनही शिल्लक आहेत, तो प्रत्येक वाचक हे उपेक्षित, जातीय विषमतेमुळे होरपळणारे जगणे बघून मनोमन अस्वस्थ होतो. दरवेळी प्रश्न निर्माण होतो, या समाजातल्या कुणी जर समान अधिकार मागितले, तर त्याला मुळापासून आजही झगडावे लागते. का? हे अधिकार मागायचे तर नेत्याला, कार्यकर्त्याला आपले आयुष्य आपले म्हणून जगता येत नाही. बदलत्या जगाचा हाही एक चेहरा शिल्लक आहे, ज्यावर घाव घालून तो बदलायला पाहिजे हाच संदेश या पुस्तकातून मिळतो. एकनाथ आवाड यांच्या "जग बदल घालुनि घाव"

या आत्मकथनाचे वेगळं विशेष म्हणजे त्याचे प्रस्तुतीकरण. लेखक विविध घटनाप्रसंगावर, अन्याय, अत्याचार व कर्मकांडावर तसेच अंधश्रद्धावर भाष्य करतात. त्यावेळी भाषिक स्तोम न करता त्या सरळपणे व्यक्त होतात. यातील व्यक्तिरेखा या प्रसंगानुरूप समोर येतात. त्या विशिष्ट समाजाचे, त्या भागाचे, घटनांचे प्रकटीकरण आहे. एका विशिष्ट प्रवाही लयीत कथावस्तू पुढे सरकते. सामाजिक जाणीवेचे कथामूल्य या आत्मकथनाला अधिक सकस करताना दिसते. विशिष्ट घटना प्रसंगाना ठसठसीत करण्यासाठी ग्रामीण दलित भाषेचा बाज असलेला बोलीचा वापर करतात. निवेदन मात्र प्रमाणभाषेत करताना दिसतात. कोणत्याही प्रसंगावर स्वतःचे भाष्य करताना त्या एका सरळ साध्या पद्धतीने प्रबोधनात्मक पातळीवर व्यक्त होतात. त्यांची संवादशैली उपदेशापेक्षा समजावण्याच्या स्वरूपात दिसते. तत्कालीन दलित जीवन, त्याच्यातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक व्यवहारातून प्रचलित असणारे शब्द, त्यातील संदर्भ यांची योजना घटना प्रसंगाला उठावदार करते. अज्ञान अंधश्रद्धेने ग्रासलेले जीवनमान, त्यातील बटबटीतपणा व्यक्त करताना समतेच्या वाटेवर जाण्यास भाग पाडणारी निवेदन शैली हे एकनाथ आवाड यांच्या लेखनाचे विशेष होय. उपरोधिक, उपहासात्मक भाष्य करताना त्या उपरोधातून मानवी मूल्यांचा स्वीकार करण्यास प्रेरणा देणारी भाषाशैली यामध्ये दिसते. या आत्मकथनाला वास्तवतेची मोठी किनार आहे. 'मी' यापेक्षा 'आम्ही' ही समूह भावनाच सांघिकतेला चालना देणारी ठरलेली आहे. निवेदन, संवाद, भाषिक योजना, तत्कालीन समाजव्यवस्थेत प्रचलित असणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार घटना प्रसंगांना उठावदार करतात.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न – एकनाथ आवाड यांनी दलित नेता म्हणून केलेले सामाजिक कार्य स्पष्ट करा.

____________________

____________________

____________________

____________________

## ४.१५ समारोप

सततच्या संघर्षातूनच 'जग बदल घालुनि घाव' हे त्यांचे आत्मकथन जन्माला आले आहे. जातीय दुःखावर उत्तरे शोधता शोधता स्वतःसोबत हजारो दलितांच्या जीवनात सन्मानाची ज्योत पेटवणा-या एकनाथ आवाड यांचे दलित साहित्याच्या प्रवाहात एक पाऊल पुढे टाकणारे आत्मकथन होय. जगण्याच्या लढाईत आलेल्या यशापयशाची व्यक्तिगत पातळीवरची नोंद यातून या पुस्तकाची वीण तयार होते, तर या लढाईला जातिअंताच्या लढ्याचे परिमाण लाभल्यामुळे एका सार्वजनिक चळवळीचा इतिहास त्यातून प्रतिबिंबित होतो. जातिअंताच्या लढाईत समाज किती पुढे सरकला, या प्रश्नाचं उत्तर काहीसं निराशाजनक आहे, तरी पण हे स्वकथन कार्यकर्त्यांना निराश करत नाही. कारण मुळात ज्याच्याविरुद्ध आपण लढाई सुरू केली तो शत्रू किती बलवान आहे हे समजून-उमजून ही लढाई केल्यामुळे इथला पराभवसुद्धा चळवळीतल्या कार्यकर्त्यांना एक वेगळा उत्साह देणारा आहे, याचाच प्रत्यय येत राहतो.

जातीय दुःखावर उत्तरे शोधता शोधता स्वतःसोबत हजारो दलितांच्या जीवनात सन्मानाची ज्योत पेटवणा-या एकनाथ आवाड यांचे दलित साहित्याच्या प्रवाहात एक पाऊल पुढे टाकणारे आत्मकथन. या लढाईत स्वजातीच्याच एका माणसाने आवाडांवर प्राणघातक हल्ला करावा आणि एका परजातीच्या प्रौढेने हात जोडून आवाडांची विचारपूस करावी, यातील अंतर्विरोध जातिअंताच्या लढाईतल्या कार्यकर्त्यांना वेगळं बळ देणारा आहे. लोक आणि कार्यकर्ते जाती व्यवस्था बदलण्यासाठी आणि आंबेडकरवादी आणि बौद्ध आदर्श स्थापित करण्यासाठी कटिबद्ध आहेत ज्यासाठी आवाड यांनी आयुष्यभर काम केले. आवाड हे महाराष्ट्रातील एकमेव व्यक्ती होते, ज्यांनी नागरी समाज संघटनांच्या मदतीने एक मजबूत मानवाधिकार मोहीम चालवली आणि आपल्या संविधानात अंतर्भूत लोकशाही आदर्श प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. चळवळीतील त्यांचे योगदान युगानुयुगे स्मरणात राहील आणि कार्यकर्त्यांसाठी आणि दलित चळवळीसाठी ते नेहमीच प्रेरणादायी राहतील. हे आत्मकथन म्हणजे दलित समाजजीवनाचे वास्तव प्रतिबिंब आहे. स्वांतत्र्यपूर्व सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, जीवनव्यवहार कसा होता हे स्पष्ट होते. या काळातील जातिव्यवस्था, त्याला असणारे धार्मिक, सामाजिक महत्त्व, यातून अस्पृश्यांची होणारी हेळसांड यांचे प्रत्ययकारी चित्रण या आत्मकथनात आले आहे. हे आत्मकथन तत्कालीन दलित जीवनाची अस्वस्थता व्यक्त करते. तत्कालीन समाजजीवन समजून घेण्यास या आत्मकथनाचा महत्त्वपूर्ण उपयोग होवू शकतो.

## ४.१६ संदर्भग्रंथ सूची


- कन्हाडे, सदा, दलित साहित्य चिकित्सा, स्वरूप, प्रकाशन, औरंगाबाद २००१.
- कुलकर्णी, गो. म. (संपा.), दलित साहित्य : प्रवाह व प्रतिक्रिया, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८६.
- खरात, शंकरराव, दलित वाङ्मय प्रेरणा आणि प्रवृत्ती, इनामदार प्रकाशन, पुणे १९७८.
- जाधव, रा. ग. निळी पहाट, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, १९७८.
- डांगळे, अर्जुन (संपा.), दलित साहित्य एक चिंतन, महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ, मुंबई, १९७८.
- पाटील, म. सु., दलित कविता, लोकवाङ्मय गृह, मुंबई १९८१.
- फडके, भालचंद्र, दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९७० (प्र.आ.) १९८९ (दु.आ.).
- पानतावणे, गंगाधर, दलित साहित्य चर्चा आणि चिंतन, साकेत प्रकाशन, औरंगाबागद, १९९३.

• मनोहर, यशवंत, दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९७८.

## ४.१७ नमुना प्रश्नोत्तरे

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) 'जग बदल घालुनि घाव' या प्रसिद्ध आत्मकथनाचे शब्दांकन कोणी केले?

अ) प्रशांत खुंटे

ब) राजीव पाटील

क) रमेश पवार

ड) वैभव पवार

२) एकनाथ आवाड यांच्या वडिलांचे नाव काय आहे?

अ) पंढरीनाथ

ब) दगडू

क) मनोहर

ड) मारुती

३) मानवी हक्क अभियानाची मुहूर्तमेढ कोणी रोवली?

अ) एकनाथ आवाड

ब) पंढरीनाथ घोलप

क) डॉ. बाबा आढाव

ड) मॅक्सीन बर्नसन

इ) प्रशांत खुंटे

४) पोतराजांप्रमाणे 'कारन' हीदेखील कोणत्या जातीला चिकटलेली एक करकट प्रथा होती?

अ) फासे पारधी जातीला

ब) आदिवासी जातीला

क) मांग जातीला

ड) महार जातीला

५) "जग बदल घालुनी घाव,सांगून गेले मला भिमराव..!!" या ओळी कोणी लिहिल्या?

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ब) अण्णा भाऊ साठे

क) नामदेव ढसाळ

ड) शाहीर अमरशेख

**उत्तरे**

१) प्रशांत खुंटे

२) दगडू

३) एकनाथ आवाड

४) मांग जातीला

५) अण्णा भाऊ साठे

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) एकनाथ आवाड यांच्या जीवनातील संघर्ष 'जग बदल घालुनि घाव' या आत्मकथनातून कसा प्रकटतो याचा परामर्श घ्या ?

२) दलित नेता म्हणून एकनाथ आवाड यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घ्या ?

**क) टीपा लिहा**

अ) 'जग बदल घालुनि घाव' या आत्मकथनातील भाषा

ब) एकनाथ आवाड यांचे अंधश्रध्दा निर्मुलन विषयक कार्य

क) मानवी हक्क अभियान

*****